॥ श्रीराम ॥

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८४

श्रीदासराममहाराजकृत

# अभंग सुधा

(विवरणासह)

प्रा. डॉ. के. वा. आपटे

आवृत्ती पहिली सांगली सन २०२०

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८४**

# अभंग सुधा

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**
द्वारा प्रा. नारायण केशव आपटे
२, श्रीराम पार्क, एस.टी.कॉलनी,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५
संपर्क : ९४२३८२९५९१

**प्रकाशक :**
श्री. महेश नामदेव शिंगारे
आदिशक्ती अपार्टमेंट फ्लॅट नं. एफ-४,
विसावा चौक, खाडीलकर गल्ली गांवभाग,
सांगली ४१६४१६

प्रथम आवृत्ती इ.स.२०२०

प्रकाशन दिन : बुधवार दि. ०९.०९.२०२० (प्रा. डॉ. के. वा. आपटे जन्मदिन)
भाद्रपद वद्य ७, शके १९४२

**© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी :**
पॉप्युलर एस.ॲण्ड टी. इन्स्टिट्यूट, सांगली
श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे

**मुद्रक :** एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स, वखारभाग, सांगली

स्वागत मूल्य : रु.५०/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

# माझ्या मनातील...

भ.स.श्रीदासराममहाराजांचे वाङ्मय एखाद्या महासागराप्रमाणे अथांग व गहन आहे. गहन या अर्थाने की, ते समजायलाही अतिशय अवघड आहे. त्यांच्या वाङ्मयात अनेक अवघड विषय, संकल्पना, संज्ञा येतात. अनेक शब्दांवर श्लेष असतो. या सर्वांतून योग्य तो पारमार्थिक अर्थ काढणे हे अतिशय किचकट व अवघड काम आहे. त्यांचे अप्रकाशित वाङ्मय प्रकाशात आणण्याचे कार्य सुरू आहेच.

माझे पिताश्री प्रा. डॉ. के. वा. आपटे हे भ.स. श्रीदासराममहाराजांचे अनुगृहीत. त्यांना भ.स.श्रीदासराममहाराजांशिवाय दुसरा देव माहीतच नव्हता. त्यांनी भ.स. श्रीदासराममहाराजांच्या सर्व हस्तलिखित वह्यांचे अनेक वर्षांपूर्वीच सखोल परिशीलन करून, त्यातील पदांची, अभंगांची वर्गवारी केली, वह्यांना क्रमांक दिले, प्रत्येक पदाला संदर्भ क्रमांक दिला. त्यांच्या या जगड्व्याळ कामामुळेच भ.स. श्रीदासराममहाराजांचे वाङ्मय संगतवार, विषयवार प्रकाशित व्हायला मदत झाली, अजूनही होते आहे.

शंकराचार्य हेही त्यांच्या अभ्यासाचा विषय. शंकराचार्यांच्या अनेक प्रकरणग्रंथांवर त्यांचे अनेक लेख, लेखमाला, ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. ब्रह्म, माया, अद्वैत या शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानातील काही संज्ञा. शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानातील काही संकल्पनांचे त्यांनी केलेले विवरण या ग्रंथाच्या पहिल्या भागात आहे. याचे वैशिष्ट्य असे की, या संज्ञांचा अर्थ त्यांनी चिमड संप्रदायाच्या - विशेषतः भ. स. श्रीदासराममहाराजांच्या

लेखनाच्या अनुषंगाने - दृष्टिक्षेपातून मांडला आहे. ‘केवलाद्वैत वेदान्त’, ‘माया आणि ब्रह्म’ व ‘उन्मनी’ हे ते तीन लेख. तात्त्विक विषयांवर त्यांना एकूण ५ लेख लिहायचे होते. परंतु त्यांच्या निर्याणापर्यंत त्यांचे तीन लेख लिहून पूर्ण झाले होते. ‘नाम’ या विषयावरील लेख लिहावयाचा आहे, असे ते सतत माझ्या मातोश्रींच्याकडे बोलून दाखवत असत. त्या लेखासाठी त्यांनी काढलेली टिपणे फक्त आहेत. त्यांच्या निर्याणाच्या आदल्या रात्री त्यांनी त्यांच्या टेबलावर ठेवलेले ते कागद तसेच होते. आपल्या दुर्दैवाने तो व आणखी एक लेख आपल्याला उपलब्ध होणार नाही.

या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात, भ.स. श्रीदासराममहाराजांच्या ४६ पदांचे त्यांनी केलेले विवरण आहे. हे लेख ते इ.स. २०११ सालापासून त्यांच्या निर्याणापर्यंत लिहीत होते. म्हणून मुद्दाम त्यांनी काही लेखांच्या खाली घातलेल्या तारखा येथेही घातल्या आहेत. त्यांच्या हस्तलिखितांवर त्यांनीच दिलेल्या क्रमानुसार हे लेख छापले आहेत. आणखी असे की, गेल्या वर्षी (इ.स.२०१९ मध्ये) सांगलीत आलेल्या महापुरात हे लेख असलेली फाईल पूर्ण भिजली होती. वरची फाईल पूर्ण खराब झाली. पण आतील हस्तलिखित कागद खराब झाले नाहीत. त्यांवरील अक्षरे वाचनीय होती. हीही भ.स.श्रीदासराममहाराजांचीच कृपा.

हा ग्रंथही ती. दादांच्या हयातीत प्रसिद्ध व्हावयाचा योग आला नाही. माझा मित्र श्री. दीपक याच्या पुढाकारामुळे हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. भ.स. श्रीदासराममहाराजांचे आशीर्वाद तर आहेतच. भ.स. श्रीअण्णांनीही आशीर्वादपर चार शब्द लिहून दिले, त्याबद्दल त्यांचे आभार. अक्षर जुळणीचे काम करणारे श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे, एस.बी. लिथो

प्रिंटिंग प्रेसचे श्री.अमोल कुलकर्णी व कर्मचारीवर्ग यांनाही धन्यवाद. माझ्या मातोश्री श्रीमती माया केशव आपटे व माझी पत्नी सौ. पद्मावती हिचेही सहकार्य असतेच. या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल श्री.महेश नामदेव शिंगारे यांनाही धन्यवाद. तसेच या पुस्तकास उत्कृष्ट मुखपृष्ठ करून दिलेबद्दल श्री. सागर मोहिते यांनाही धन्यवाद. भ.स. श्रीदासराममहाराजांना साष्टांग प्रणिपात करून येथेच थांबतो.

नारायण केशव आपटे
सोमवार दि.०८.०६.२०२०
ज्येष्ठ व.३/संकष्टी ४, शके १९४२

## ।। श्रीराम ।।

भगवान श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांच्या अगदी अंतरंगातील एक कृपांकित प्रा. डॉ. के. वा. आपटे तथा आमचे ती. केशवकाका आपटे यांनी जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांच्या तत्त्वज्ञानातील ब्रह्म, माया, अद्वैत या संज्ञांवर व त्यांच्या तत्त्वज्ञानातील काही संकल्पना यावर चिंतनीय असे तीन लेख त्यांनी लिहिले आहेत. शिवाय पितृदेव भगवान श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांच्या ४६ पदांवरील केलेले विवरण या ग्रंथात प्रकाशित झाले आहे. सदरचे लेख असलेली फाईल २०१९ च्या श्रीकृष्णाबाईच्या महापुरात पूर्ण भिजलेली होती. वरची फाईल भिजून पूर्ण खराब झालेली होती. पण आतील हस्तलिखित कागद खराब झाले नाहीत, अक्षरे वाचनीय होती. ''राघवे सागरात पाषाण तारिले । तैसे या तुकोबाचे अभंग रक्षियेले ।।'' असे श्री वेदमूर्ती रामेश्वरभट्ट यांनी जगद्गुरु श्रीतुकाराममहाराज यांच्या केलेल्या आरतीत म्हटले आहे. त्यांची आठवण झाली. का ती अक्षरे चैतन्याची आहेत व अक्षरं आहेत. श्रीदासराममहाराजांची सत्ता अगाध आहे.

चैतन्य हे ध्वनी, प्रकाशयुक्त आहे. ही चैतन्याची अक्षरे प्रकाशात आणण्याचे काम आमचे श्री.महेश नामदेव शिंगारे यांनी केले असून, हे उजेडात आणण्याचे काम एस.बी. लिथो प्रेस यांनी केले आहे. यामुळे साधकांना फार मोठा ठेवा उपलब्ध करून दिला आहे.

प्रा.डॉ. के. वा. आपटे यांची आठव बऱ्याचवेळा होते. त्यांचे चिरंजीव प्रा. नारायणराव केशव आपटे, त्यांच्या पत्नी सौ. पद्मावती नारायण आपटे व मातोश्री प.पू. मायावहिनी आपटे यांनाही धन्यवाद. तीर्थरूप आई-वडिलांच्या मनातील ओळखून वागणारी मुले जगात दुर्मिळ असतात एवढेच लिहितो.

प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या अंतःकरणातील ''स्थावर जंगम भरली पाही । दासा दैवत त्याविण नाही ।।'' अशी धारणा आमचेही ठिकाणी दृढ व्हावी अशी भ.स.श्रीदादांचे चरणी प्रार्थना करतो.

शेवटी भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी शतशः दंडवत घालतो व अशीच कृपा असू द्यावी ही प्रार्थना करतो!

शेष श्रीरामस्मरण!

सांगली

दि.२२.०६.२०२० श्रीदादांचा कृपाभिलाषी

चंद्रशेखर

(चंद्रशेखर रामराय केळकर)

# प्रकाशकाचे मनोगत

भगवान श्रीसद्गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांच्या श्रीदासरामगाथ्यातील निवडक ४६ अभंगांचे विवरण असणारा **'अभंग सुधा'** हा ग्रंथ प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या अभंगांचे विवरण श्रीदासराममहाराज केळकर यांच्या अंतरंगातील शिष्य प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी केले आहे. हा ग्रंथ प्रकाशित होतेवेळी प्रा.डॉ. के.वा.आपटे हे सगुणरुपात नाहीत याचे वाईट वाटते. ते आत्ता असते तर त्यांना फार आनंद झाला असता. शेवटी महाराजांची इच्छा.

मी श्रीरामनिकेतनमध्ये इ.स.१९९५ पासून येत आहे. मी श्रीरामनिकेतनमधे येण्याला श्री. सुधाकर रेगोडकर हे कारणीभूत आहेत. त्यांनी मला प.पू. श्रीदादांचे रोज दर्शन घेत जा असे सांगितले होते. त्याप्रमाणे मी येऊ लागलो. इ.स.१९९८ साली मी महानगरपालिकेच्या निवडणुकीला उभारणार होतो. त्यावेळी माझे मित्र श्री. मिलिंद खाडिलकर हे रोज श्रीदादांकडे येत असल्याने त्यांनी मला अर्ज भरणेपूर्वी श्रीदादांचे दर्शन घेऊन अर्ज भरूया असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही श्रीदादांकडे आलो. त्यावेळी श्रीदादांनी मला संपूर्णपणे न्याहाळले व प्रसाद दिला व अर्ज भरणेपूर्वी भीमरूपी स्तोत्र म्हणून अर्ज भर, तुझे काम होईल असा मला आशीर्वाद दिला. या आशीर्वादामुळेच मी निवडणुकीत विजयी झालो. यामुळे माझी श्रीदादांच्यप्रती निष्ठा दृढ झाली. इ.स.२००६ पासून मी श्रीरामनिकेतनमध्ये सकाळच्या नित्यक्रमाला न चुकता येत आहे. माझ्यावर श्रीअण्णांचेही तितकेच प्रेम व जिव्हाळा आहे.

श्रीदादांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त श्रीदादांची ग्रंथ संपदा प्रकाशित करणेचे काम सुरु असलेचे मला समजले. माझ्या हातूनही काही सेवा घडावी अशी माझी इच्छा मी श्री. दीपक केळकर यांचेकडे व्यक्त केली. त्यानुसार या ग्रंथाची प्रकाशन सेवा करणेची संधी मला मिळाली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

अशा या ग्रंथातील सांगितलेले श्रीदादांचे तत्त्वज्ञान व विचार मला व सर्व साधकांना नेहमीच मार्गदर्शक ठरतील अशी माझी खात्री आहे. शेवटी प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज केळकर व प.पू.सद्गुरू श्रीअण्णामहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात करून येथेच थांबतो.

महेश नामदेव शिंगारे

# अनुक्रम


प्रास्ताविक ... ... ... ...
आशीर्वाद ... ... ... ...
मनोगत ... ... ... ...
प्रकाशकाचे मनोगत ... ... ...

**विभाग पहिला - संकीर्ण लेख**

१. केवलाद्वैत वेदान्त ... ... ... १
२. माया तेचि ब्रह्म ... ... ... ... २२
३. उन्मनी ... ... ... ... ... ३६

**विभाग दुसरा - अभंगांचे विवरण**

१. शिवापासोनिया आली परंपरा ... ... ५१
२. चिन्मय गुरुपरंपरा ही ... ... ... ५५
३. विश्वाचा जनिता रेवणसिद्ध ... ... ५९
४. ऐका गुरुपरंपरा ... ... ... ... ६३
५. हनुमंतराय उदार उदार ... ... ... ६७
६. आसरा तो झाला बालरामा ... ... ७२
७. संतांची सात लक्षणे ... ... ... ७५
८. गुरु जगी थोर ... ... ... ... ८०
९. दास स्वरूपी मिळाला ... ... ... ८५
१०. अग्नी नारायण देव ... ... ... ८८
११. हरिनामदास म्हणती सिद्धानंद ... ... ९२
१२. दासराम तेथे धाला ... ... ... ९६
१३. दासरामा बोध साधनाचा ... ... ... ९९
१४. दासराम शरण त्याचे पैल ... ... ... १०२
१५. पाच प्राण आणि त्यांचे कार्य ... ... १०६
१६. सोहंराव त्याचे पैल महाराजा ... ... १०९
१७. दासराम स्थिर अलक्ष्यातु ... ... ... ११३
१८. पंचभूत अंश मन हे जाणिजे ... ... ११८

| | | |
|---|---|---|
| १९. | रामनाम तारु ... ... ... ... | १२२ |
| २०. | सहजेची जोडे हरी ... ... ... | १२५ |
| २१. | दासरामांतरी प्रगटे नामब्रह्म ... ... | १२८ |
| २२. | कठिण ते सोपे होय ... ... ... | १३१ |
| २३. | काही न करोनी नामचि घेतले ... ... | १३४ |
| २४. | नामी सर्व सुख आले ... ... ... | १३८ |
| २५. | प्रेमे गान गाई अखंडित ... ... ... | १४३ |
| २६. | दासा येई हाता मूळ ब्रह्म ... ... ... | १४६ |
| २७. | पूर्ण ब्रह्म नारायण ... ... ... | १५० |
| २८. | कोणता धर्म? ... ... ... ... | १५३ |
| २९. | वर्माची खूण ... ... ... ... | १५७ |
| ३०. | स्वये निर्मियेले द्वैत ... ... ... | १६० |
| ३१. | अवघाचि आत्माराम ... ... ... | १६३ |
| ३२. | आत्मवस्तू देखण्याची ... ... ... | १६६ |
| ३३. | देहभावे जीव भ्रांतिरूप झाला ... ... | १७० |
| ३४. | दासराम हा ब्रह्म गे माय ... ... ... | १७४ |
| ३५. | देहाचिये मध्ये भरले चैतन्य ... ... | १७८ |
| ३६. | शिवरूपची आहेसी ... ... ... | १८१ |
| ३७. | ब्रह्मी दृश्य मावळले ... ... ... | १८४ |
| ३८. | ऐसा मी देखिला प्राणी ... ... ... | १८६ |
| ३९. | जगाचा तोडी या तटका ... ... ... | १९१ |
| ४०. | पुण्य आणि पाप .... ... ... ... | १९६ |
| ४१. | मोक्ष दूर नाही त्याला ... ... ... | १९९ |
| ४२. | एक सद्गुरुराव आळवावा ... ... ... | २०३ |
| ४३. | परमार्थ पूर्ण तया ठाया ... ... ... | २०६ |
| ४४. | नादमयी जहाल्या शिव कळतसे ... ... | २०९ |
| ४५. | अतर्क्य तो जाण वेदालागी ... ... | २१२ |
| ४६. | नामी सर्व सुख आले ... ... ... | २१६ |

# विभाग पहिला

# संकीर्ण लेख

# केवलाद्वैत वेदान्त

भारतात प्राचीनकाळी अनेक दर्शने उद्‌भत झालेली होती. त्यांमध्ये उपनिषदांवर आधारलेले वेदान्त-दर्शन हे बरेच लोकप्रिय झालेले होते. त्या वेदान्त-दर्शनाचे जे पाच संप्रदाय होते, त्यांमध्ये शंकराचार्यांनी पुरस्कृत केलेला केवलाद्वैत वेदान्त हा फारच लोकप्रिय झालेला होता. या केवलाद्वैत वेदान्ताचे तीन मुख्य सिद्धांत असे होतेः- (१) निर्गुण ब्रह्म हे अंतिम सत्य तत्त्व आहे. (२) या ब्रह्माच्या अधिष्ठानावर भासणारे विश्व हे स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे. (३) साहजिकच या भासमान जगात वावरणारे आपण जीवही भासमान असून, आपण जीव तत्त्वतः ब्रह्मरूप आहोत. हे तीन सिद्धांत कीर्तनकार, प्रवचनकार यांनी लोकांना ऐकविले.

केवलाद्वैत वेदान्ताचे आणखी एक तत्त्व होते, ते असे :- काही विशिष्ट प्रक्रियेने विद्यमान जीवनात जीव हा ब्रह्मरूप होऊ शकतो. अशा लोकांना आचार्य, गुरु, सद्गुरु, संत असे म्हटले जाई. या संतांकडून ब्रह्मरूप होण्याची प्रक्रिया जाणून घेणे आवश्यक होते.

महाराष्ट्रामध्ये अनेक संत/सद्गुरु होऊन गेले, सध्या आहेत, आणि पुढेही होतील. असेच एक संत सांगली नावाच्या गावी होऊन गेले. त्यांचे पुष्कळ साहित्य उपलब्ध आहे. त्यांच्या पद-अभंगांचा गाथा प्रसिद्ध झाला आहे. दासराममहाराजांनी पुरस्कृत केलेल्या केवलाद्वैत वेदान्ताची अनेक तत्त्वे श्रीदासराम गाथा या ग्रंथात इतस्ततः विखुरलेली आहेत. ही तत्त्वे सांगणारी त्यांची वचने विषयवारीने एकत्र करून प्रस्तुतचा लेख सिद्ध

झाला आहे.  ही वचने कळण्यास केवलाद्वैत वेदान्ताच्या सिद्धांतांचा थोडासा खुलासा आवश्यक आहे. हा खुलासा अगोदर यापुढे दिला आहे.

## केवलाद्वैत मताचा अधिक खुलासा

आपण जीव ज्या जगात वावरत आहोत, त्याच्या बुडाशी ब्रह्म हे एकच तत्त्व आहे. त्याच्या पलीकडे आणि त्याच्या शिवाय अन्य कोणतेही तत्त्व नाही, म्हणून ते अद्वैत/अद्वय, एकमेव एक आहे. हे ब्रह्म निर्गुण आहे. म्हणून त्याचे वर्णन हे अशब्द, अस्पर्श, अरस, अगंध, निराकार अशासारख्या निषेधात्मक शब्दांनी करावे लागते.

या निर्गुण ब्रह्माला माया/अविद्या/अज्ञान अशी उपाधि येते. त्या उपाधीमुळे निर्गुण ब्रह्म हे सगुण ब्रह्म आहे असे वाटू लागते. या सगुण ब्रह्माला ईश्वर/परमेश्वर अशी संज्ञा दिली जाते. उपाधि म्हणून येणाऱ्या मायेजवळ/अज्ञानाजवळ आवरण आणि विक्षेप अशा दोन शक्ति आहेत. आवरण शक्तीमुळे ब्रह्मावर आच्छादन येऊन ब्रह्म कळेनासे होते. मायेच्या विक्षेप शक्तीमुळे ब्रह्मावरच जगाचा भास होऊ लागतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, ब्रह्माच्या अज्ञानामुळे ब्रह्मावरच जगाचा भास दिसू लागतो. उदा. जमिनीवर एक रज्जू पडली होती. ती रज्जू म्हणून कळली नाही.  या रज्जूच्या अज्ञानाने रज्जूवरच सर्प भासू लागला.  तांत्रिक भाषेत सांगायचे झाल्यास रज्जूच्या अधिष्ठानावर सर्प भासू लागला.  त्याला अध्यस्त असे म्हणतात. त्याप्रमाणे ब्रह्माच्या अधिष्ठानावर अध्यस्त विश्व भासू लागते. आता, खरे म्हणजे रज्जूखेरीज सर्प म्हणून निराळे काही नाही, म्हणून रज्जू म्हणजेच सर्प असे म्हणता येते. त्याप्रमाणे ब्रह्माच्या अधिष्ठानावर भासणारे अध्यस्त विश्व हे ब्रह्मच आहे, असे म्हणता येते. म्हणून ''सर्वं खल्विदं ब्रह्म'' असे म्हटले जाते.

ब्रह्मावर भासणारे विश्व हे काही विशिष्ट पद्धतीने भासू लागते असे सांगितले जाते. म्हणजे असे :- ब्रह्माच्या अधिष्ठानावरच माया/अज्ञान हे आकाश, वायू, तेज, पाणी आणि पृथ्वी ही नावे असणारे पाच सूक्ष्म भूते निर्माण करते. या पाच सूक्ष्मभूतांपासून डोळा, कान इत्यादी पाच ज्ञानेंद्रिये, हात, पाय इत्यादी पाच कर्मेंद्रिये, प्राण, अपान इत्यादी पाच प्राण, मन आणि बुद्धि या १७ घटकांनी बनलेली सूक्ष्म शरीरे उत्पन्न होतात. तसेच पाच सूक्ष्म भूतांमध्ये पंचीकरण प्रक्रिया होऊन आकाश, वायू इत्यादी पाच स्थूल भूते निर्माण होतात. त्यांच्या संयोगाने विश्वातील सर्व स्थूल पदार्थ आणि स्थूल देह उत्पन्न होतात. आता या सर्वांचे अधिष्ठान ब्रह्म असल्याने, सूक्ष्म आणि स्थूल देहात ब्रह्म आहेच. आता ते शरीरात असल्याने त्याला अंतरात्मा/प्रत्यगात्मा असे म्हणले जाते. अशा शाब्दिक दृष्टिने जरी अंतरात्मा आणि ब्रह्म/आत्मा हे वेगळे आहेत, तरी तत्त्वतः अंतरात्मा आणि ब्रह्म/आत्मा एकच आहेत (अयमात्मा ब्रह्म । ).

वर ज्या सूक्ष्म शरीराचा उल्लेख केला, त्यात बुद्धि आहे. या बुद्धिमध्ये अंतरात्म्याचे प्रतिबिंब पडते. त्या प्रतिबिंबालाच जीव असे म्हटले जाते. प्रतिबिंबाला स्वतंत्र अस्तित्व नाही; ते बिंबरूपच आहे. याचा अर्थ असा, प्रतिबिंबरूप असणारा जीव हा अंतरात्मा म्हणजे आत्मा म्हणजेच ब्रह्म आहे (जीवो ब्रह्मैव नापरः).

या सर्व गोष्टी ज्यांना कळाल्या आहेत, जे ब्रह्मरूप झालेले आहेत, त्या पुरुषांना जीवन्मुक्त म्हटले जाते. काही जीवन्मुक्त पुरुष हे ज्ञान, ब्रह्मजिज्ञासू माणसाला देतात. ते मुमुक्षूंचे आचार्य/ गुरु होतात. हे ज्ञान मिळाल्यावर गुरूंनी सांगितलेले साधन जो पूर्ण करतो तोही ब्रह्मरूप होतो. म्हणून ब्रह्मजिज्ञासू माणसांच्या संदर्भात गुरु हा अत्यंत महत्वाचा आहे. त्यामुळे गुरूलाही ब्रह्म असेच म्हटले जाते (गुरुः साक्षात् परं ब्रह्म ।).

## श्रीदासराममहाराजांच्या कथनांची वैशिष्ट्ये

श्रीदासरामगाथ्यात कोणत्या पद्धतीने आणि कसे केवलाद्वैत तत्त्वज्ञान कथन केले आहे हे आता सांगितले आहे. ते पहाताना एक गोष्ट सतत लक्षात घेतली पाहिजे की त्यांच्या मते निर्गुण ब्रह्म आणि सगुण ब्रह्म एकच आहेत. म्हणून त्यांनी देव, राम, कृष्ण, हरि, गोपाल इत्यादी शब्द वापरले आहेत. या शब्दांनी कधी निर्गुण ब्रह्म सूचित होते, तर कधी सगुण ब्रह्म अपेक्षित असते. हे सर्व संदर्भानुसार ठरवावे लागते.

१) जीवाचा निर्देश जसा जीव शब्दाने आहे, तसाच तो ''तू, तुम्ही, मी, आम्ही, आपण'' अशा एक वचनी आणि अनेक वचनी शब्दांचा वापर करून केलेला आहे. २) अज्ञानाने जीवाला ब्रह्म कळत नाही, हे सांगण्यास ''जीवाला आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडलेला आहे'' अशाप्रकारच्या शब्दांनी व्यक्त केला आहे. ३) ब्रह्म हे सगुण अथवा निर्गुण अभिप्रेत असो, ते मानवी इंद्रियांना ग्राह्य नाही हे सांगण्यास फक्त ''डोळा'' या इंद्रियाचा उल्लेख केलेला आहे. त्या सर्व ठिकाणी उपलक्षणाने कान इत्यादी अन्य ज्ञानेंद्रिये सूचित होतात, हे लक्षात ठेवावयास हवे. ४) ब्रह्माचा साक्षात्कार कसा होतो, हे सांगताना श्रीदासराममहाराजांनी विशिष्ट स्वरूप असणाऱ्या मनाला अथवा बुद्धिला ब्रह्मदर्शन होते असे सांगितले आहे.

वरील गोष्टी लक्षात ठेवून श्रीदासरामगाथ्यात कैवल्याद्वैत वेदांत कसा सांगितला आहे हे आता पहावयाचे आहे.

## ब्रह्म/आत्मा/परमात्मा/वस्तु

कैवल्याद्वैत वेदांतात अंतिम तत्त्व हे निर्गुण ब्रह्म त्याच्यासाठी कधी कधी वस्तु शब्द वापरलेला आहे. श्रीदासरामांनी वस्तु या शब्दाचा असा प्रयोग केलेला आहे.

आत्मवस्तु ही मूळरूप आहे; तेच प्रथमचे निर्विकल्प तत्त्व[१] आहे.ब्रह्म हे स्वतःसिद्ध[२] आहे. ब्रह्म हे स्वतःसिद्ध असल्याने त्याला[३] जन्म-मरण इत्यादी विकार नाहीत. वस्तु ही अस्तित्वरूप असल्याने ती आनंदाचा[४] गोळा आहे.

निर्गुण ब्रह्माला माया/अज्ञान ही उपाधि आल्यावर ते सगुण झाल्यासारखे वाटते. त्यालाच ईश्वर/परमेश्वर म्हणतात. या दोहींचा निर्देश करण्यास दासरामांनी हरि, राम, कृष्ण, केशव इत्यादी शब्द वापरले आहेत. कारण त्यांच्या दृष्टीने निर्गुण आणि सगुण ब्रह्म एकच[५] आहेत. तसेच ब्रह्म हे मानवी शब्दांनी वर्णन करता येत नसल्याने, ते अनिर्वाच्य आहे (अनिर्वाच्य ब्रह्म । १५१९.२). तथापि त्याच्याविषयी काहीच सांगितले नाही तर काहीच कळणार नाही. म्हणून काही वेळा नकारात्मक शब्द वापरून तर कधी भावात्मक शब्द वापरून त्याचे वर्णन करता येते. तसेच ब्रह्माच्या अधिष्ठानावर विश्वाचा भास होत असल्याने विश्वाच्या आत आणि बाहेर ब्रह्मच आहे.

## ब्रह्म ही सत्य वस्तु आहे

निश्चळ आणि निःशब्द असणारी सत्य वस्तु ब्रह्म[६] आहे. ब्रह्म हेच खरेखुरे सत्य[७] आहे. आणि सत्य ते की ज्यात कोणतेही विकार[८]/फेरफार

---

१) आत्मवस्तु मूळ रूप । प्रथम तत्त्व निर्विकल्प ।। १३५२.३

२) कासयाचे व्हावे ब्रह्म । स्वतःसिद्ध जे उत्तम ।।१५३५.१

३) जे का स्वतः सिद्ध आपण । तया काय म्हणोन मरण । ९२२.२

४) अस्तित्व ते घनानंद । १३२०.४

५) सगुण निर्गुण शब्द झाले दोन। परी ते अभिन्न निःशब्दातु ।। ३२.२

६) निश्चळ निःशब्द वस्तु पूर्ण सत्य। २७.५

७) सत्य साच ब्रह्म खरे । ६५.३, सत्य साच परमेश्वर।१५१.३

८) सत्यात विकृती नाही नाही ।७४.२

होत नाहीत. साहजिकच सत्याला जन्म, मरण हे विकार असूच शकत[१] नाहीत. सत्य हे भास नाही, आणि ते भास[२] नसल्याने त्याला जन्म-मरण नाही. म्हणून सत्य असणारे ब्रह्म हे अढळ, विकाररहित, फेरफाररहित[३], विकार न पावणारे आहे.

## अभावात्मक/नकारार्थी शब्दांनी ब्रह्माचे वर्णन

ब्रह्म हे निर्गुण आहे. ब्रह्म म्हणजेच आत्मा/परमात्मा आहे. त्याला कधी आत्माराम म्हटले जाते. या ब्रह्मापेक्षा अन्य श्रेष्ठ काहीही नसल्याने ते परब्रह्म आहे. परब्रह्म म्हणजेच परमात्मा. हा परमात्मा अथवा[४] आत्मा निश्चळ आहे. हा परमात्मा अथवा ब्रह्म हे निःशब्द आहे ; त्याला कोणताही शब्द[५] लागू पडत नाही. आत्म्याला कोणतीही मर्यादा[६] नसल्याने ते मर्यादारहित, अपरिच्छिन्न आहे. ब्रह्म हे अखंड, निरवयव असल्याने त्याचे भाग पडत नाहीत. ते अविभाज्य[७] आहे. ब्रह्माचे ठिकाणी संकल्प नसल्याने ते पूर्णपणे[८] निर्विकल्प आहे. ब्रह्म/देव आधाररहित म्हणजेच निराधार[९] आहे. ब्रह्माला कोणतेही रूप/आकार नसल्याने ते निराकार[१०] आहे. ब्रह्मामध्ये

१) नाहीच सत्यासी जन्ममरण । ७४.४

२) सत्य नोहे भास । कैचे जन्ममरण त्यास ।।४३९.२

३) सत्य हे अढळ । ४३९.३

४) तो हा परमात्मा निश्चळ । ६४७.२; निश्चळ आत्मा । १०३२.६; निश्चळ ते ब्रह्म । ४९.१, १५०४.१; निश्चळ ते पूर्ण घन । १३२२.१

५) परमात्मा तो निःशब्द । ९८७.२; निःशब्द ते ब्रह्म ।१३२७.६; सर्व ब्रह्म ते निःशब्द । १३५५.१

६) आत्मा अपरिच्छिन्न । ८०.२

७) ब्रह्म ते अविभाज्य । ९६.१

८) ब्रह्म पूर्ण निर्विकल्प । ९६.२

९) परी निराधार थोर देव । ५१०.३

१०) परी देव निराकार । १३.२

कोणतेही दोष[१] नसल्याने ते निरंजन आहे आणि विश्वातील कोणतेही रोग तेथे नसल्याने[२] ते निरामय आहे. ब्रह्म हे इंद्रियग्राह्य नसल्याने अलक्ष्य[३] आहे. आत्म्याला अंत/मर्यादा/शेवट/नाश नसल्याने ते अनंत आहे. ब्रह्मात कोणताही फेरफार/नाश[४] होत नसल्याने ते अव्यय आहे; तसेच त्याच्यात कोणतेही भेद[५] नसल्याने ते अभेद आहे.

**भावात्मक शब्दांनी ब्रह्माचे वर्णन**

आत्म वस्तु ही सत्-चित् - घन[६] आहे. सत् म्हणजे सदोदित अस्तित्वात असणारी आणि चिद्घन म्हणजे संपूर्ण चैतन्यरूप आहे. चैतन्य म्हणजे ब्रह्म[७] आहे. आत्माराम चिद्घन[७] आहे. आत्मतत्त्व[९] चैतन्ययुक्त आहे. जेथे सत् आणि चित् असते तेथे आनंद असतो. म्हणून ब्रह्म हे घनानंद[१०] आहे. ब्रह्म हे पूर्ण घनानंद[११] आहे. ब्रह्म हे सत् असल्याने ते सनातन[१२] आहे. ब्रह्म हे चैतन्य, ज्ञानरूप असल्याने ते ज्योतीरूप[१३] आहे.

---

१) परब्रह्म निरंजन । १३२२.१; निश्चळ ते पूर्ण रूप निरंजन । १३१७.४; पूर्ण निरंजन निःशब्द ते । ११७.६
२) तेची निरंजन निरामय पूर्ण । १५७७.१
३) अलक्ष्य ते ब्रह्म।४२.६; ब्रह्म ते अलक्ष्य । ६०५.१
४) अनंत आत्माराम । २९४.६
५) अव्यय अभेद । १३२०.४
६) आत्मवस्तु सत् चित् घन । १०१.१०; ६२८.४
७) चैतन्य ते ब्रह्म ब्रह्म ते चैतन्य । ११४१.१०
८) ऐसा तो चिद्घन आत्माराम । ११०४.१
९)चैतन्ययुक्त ते आत्मतत्त्व श्रेष्ठ ।११६७.३
१०) घनानंद ब्रह्म निःशब्द निवांत । १४२८.७
११) ब्रह्म पूर्ण घनानंद । ५२४.४
१२) दासरामी पहाता ब्रह्म सनातन।११७.६
१३) ज्योतिरूप आत्मा । २१२.४

ब्रह्म हे प्रणवरूप आहे (ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म). साहजिकच श्रीदासराम प्रणवालाही[१] देव/ब्रह्म म्हणतात.

श्रीदासरामांनी ब्रह्म/आत्मा ह्या शब्दांऐवजी कधी वायु/वारा हा शब्द उपयोजिला आहे. अर्थात हा वारा म्हणजे पंचभूतातला वारा नसून तो चैतन्याचा वारा[२] आहे. आत्मा हा निश्चळ[३] वारा आहे. साहजिकच, वारा[४] हाच देव आहे, आणि ज्याप्रमाणे ब्रह्म/आत्मा जग व्यापून आहे, त्याप्रमाणे हा वायु[५]/वारा जगामध्ये भरलेला आहे.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास, ब्रह्म/आत्मा हा सत्, चित् आणि आनंद आहे.

----

आता हे ब्रह्म/आत्मा आणि त्याच्या अधिष्ठानावर भासणारे विश्व यांचा संबंध काय हे दासराम पुढीलप्रमाणे सांगतात :-

## विश्व आणि ब्रह्म/आत्मा/देव

ब्रह्मावर/देवावर हे विश्व भासत असल्याने, देवाने/ब्रह्माने हे विश्व निर्माण केले आणि तो विश्वाचा मायबाप[६] आहे, असे म्हटले आहे. या मायबाप देवानेच हे सर्व विश्व[७] निर्माण केले आहे. सत्य ब्रह्म हे अढळ असले तरी त्याने[८] सर्व विश्व निर्माण केले आहे. अनंत असा आत्माराम हा

१) प्रणव तो देव प्रणव तो देव ।४८२.१

२) चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार । १०४३.१

३) आत्मा निश्चळ वारा । १०६०.१

४) वायु हाचि देव वायु हाचि देव । ११४७.३; वाराचि देव आमुचा।१०२५.१

५) वारा हा जगती भरला ।१०३१.१

६) सकळ जगाचा मायबाप देव । ४२२.१; विश्वाचा तो मायबाप ।४२३.१

७) मायबाप देव तेणे निर्मियले सर्व । १९४.३

८) सत्य हे अढळ । तेणे निर्मिले सकळ ।।४३९.३

एकटाच या जगात[१] नटला आहे. निराकार ब्रह्म हेच साकार[२] विश्व झाले. तेथे कार्य हे कारणरूप असते हीच कल्पना अंतर्भूत आहे. म्हणून ''सर्व झाले ब्रह्म'' (७९.२) असे श्रीदासराम म्हणतात. आता ब्रह्माने/आत्म्याने हे विश्व निर्माण केले असल्याने त्याच्याच सत्तेने हे जग चालते, हे उघड होते. म्हणून श्रीदासराम म्हणतात, त्या ब्रह्माच्या/देवाच्या सत्तेवीण[३] काहीच चालत नाही. देवाची सत्ता ह्या जगात ओतप्रोत भरलेली[४] आहे. किंबहुना असेच म्हणता येईल की, हे संपूर्ण ब्रह्मांड प्रभूच्या/ब्रह्माच्या[५] सत्तेने चालते.

## विश्वात सर्वत्र ब्रह्म आहे

विश्व निर्माण करून ब्रह्म/राम विश्व व्यापून राहिला आहे. राम हा जगभर[६] भरलेला आहे. विश्वात नारायण भरलेला[७] आहे. विश्वात सर्वत्र ब्रह्मच भरून[८] राहिलेले आहे. विश्वातील चराचर पदार्थात श्रीहरी घनदाट[९] भरलेला आहे. सर्व जग म्हणजे नारायण[१०] आहे. विश्वात मागे-पुढे देव भरलेला[११] आहे. अदृश्य असणारे ब्रह्मच दृश्य[१२] विश्व झाले आहे. विश्वाच्या[१३]

---

१) अनंत आत्माराम जगी हा नटला एकला । २९४.६

२) निराकारु तेचि जहाले आकारु । ३२.१

३) काहीच न चले त्याचे त्याचे सत्तेवीण ।५१४.३

४) देव सत्ता ओतप्रोत । ५१९.१

५) प्रभूचिये सत्ते चाले हे ब्रह्मांड । ५१३.१

६) राम भरला जगभर ।६८.४

७) विश्वी भरला नारायण । २९१.१

८) ब्रह्म सर्वत्र संचले ।१५०९.७

९) सर्वत्र श्रीहरी । घनदाट चराचरी।२९९.३

१०) अवघाची नारायण । ५२.२

११) मागे पुढे भरला देव । ६८.२

१२) अदृश्य ते दृश्या आले । १०८.३

१३) आत राम बाहेर राम । अवघाची जाहला राम ।। ५३०.१

आत आणि बाहेर राम आहे. विश्वाच्या आदि ब्रह्म आहे. विश्वाच्या अंती ब्रह्म आहे[१] म्हणून सर्व विश्व हे ब्रह्मच आहे. या विश्वात नाम आणि रूप भिन्न दिसत असले तरी सर्व विश्वात अभिन्न[२] असा आत्मा भरून राहिलेला आहे. संक्षेपाने सांगायचे झाल्यास विश्वात देवाशिवाय[३] काही नाही. नारायण हा स्वतःच सर्व विश्व[४] झाला आहे. हरि हा विश्वच[५] झाला आहे. तत्त्वतः सांगायचे झाल्यास हे विश्व, ही सृष्टी ब्रह्मरूप[६] आहे.

## मानवी देहातही ब्रह्म आहे

विश्वात देव आहे, साहजिकच विश्वातील मानवी देहातही[७] देव आहे. विश्वातील सर्व भूतात[८] आणि माणसाच्या देहात आत्मा आहे. गोपाळ आपल्या अंतरात म्हणजे देहात आहे, हे लक्षात[९] घ्यावे. आपल्या देहातच ज्योतीरूप[१०] आत्मा आहे आणि देहातील बुद्धिच्या पलीकडे परमात्मा आहे.

---

१) आदी ब्रह्म अंती ब्रह्म । म्हणोनिया सर्व ब्रह्म ।।९८.३
२) नामरूप भिन्न । परी आत्मा तो अभिन्न ।। ८०.१
३) देवावीण काही नाही । ६८.३
४) सर्वची आपण । झाला असे नारायण ।।१५७.२
५) विश्वची झाला हरी । ४३६.१
६) तत्त्वता हे जग ब्रह्मरूप आहे । ४०१.१;
तत्त्वता पहाता ब्रह्मरूप सृष्टी ।६४.१
७) परब्रह्म हे असूनी देही । १९२.१;
देव काही दूर नाही । आहे आपुल्याच देही ।। ५३१.३
८) आत्मा याचे अधिष्ठान । तोचि सर्व भूती ।। ६६.२-३;
सर्वाठायी आत्मा । २२८.४
९) पाही अंतरी गोपाळ । २०५.४
१०) अंतरी पेटली आत्मज्योती।२११.४;
बुद्धिपैल परात्मा । २९५.१

## विश्व मिथ्या/भास आहे

हरि/नारायण/बह्म हेच जर विश्व आहे, तर आपणास ते न दिसता नाना पदार्थांनी, शरीरांनी भरलेले विश्व दिसते. मग आपणास दिसते ते विश्व काय आहे? ते खरे नाही काय? असा प्रश्न येतो. या प्रश्नाचे उत्तर आहे की, आपणास दिसणारे विश्व हे भास आहे, मिथ्या आहे. ही गोष्ट श्रीदासराममहाराज पुढीलप्रमाणे सांगतात :-

प्रथम सत्य ब्रह्म होते. ब्रह्माला आलेल्या माया[१] या उपाधीमुळे विश्व भासू लागले. आकार असणारे विश्व हे सर्व मायेने निर्मिलेले[२] आहे. पण जग हे नाशवंत[३] आहे. ज्याला जन्म-मरण असते, सहा विकार असतात ते नाशवंत असते. ज्याला जन्म-मरण असते, ते असत्य असते. सत्य ब्रह्मावर भासणाऱ्या विश्वाला[४] नाश असल्याने ते असत्य आहे. याचा अर्थ असा की, सत्य ब्रह्मावर[५] असत्य/मिथ्या विश्वाचा भास होतो. विश्व म्हणजे ब्रह्मावरचा भास[६] आहे. मायेमुळे आकारास आलेले विश्व, मायेमुळे निर्माण झालेले जग हे केवळ परब्रह्मावरचा[७] भास आहे. अविनाशी असणाऱ्या

---

१) आधि होते सत्य । तयावरी उठले मिथ्य ।। यासी कारण ही माया । ४१०.१-२

२) विश्व हे असार। त्यासी आहे आकार।। सर्व निर्मिले मायेने ।७०.१-२

३) अशाश्वत आहे जग ।१३७.२

४) सत्यावरी होय भास । तया लागी आहे नाश ।।१।।
तया म्हणती असत्य । जे का विकृत नाशिवंत ।।२।।
तेचि जाणावे नश्वर । जया लागी षड्विकार ।।३।।
असत्यासी जन्म-मरण ।।४।। (७५०.१-४)

५) ब्रह्मची असोन भासतसे विश्व । ७२.३

६) विश्व परब्रह्मी भास । ४१२.१

७) विश्व परब्रह्मी भास । माये आकारास । ४१२.१

परब्रह्मावर जे द्वैतात्मक नश्वर जग भासते, ते केवळ भासरूप[१] आहे.

अधिष्ठानरूप ब्रह्मावर जगाचा भास कसा होतो? याला श्रीदासराममहाराज उत्तर देतात ते असे :- ज्याप्रमाणे वाळवंटात पडलेल्या शिंपेवर रुप्याचा/चांदीचा भास होतो, किंवा जमिनीवर वेडी-वाकडी पडलेली रज्जू ही सर्परूपाने भासते, त्याप्रमाणे ब्रह्मावर[२] विश्व भासते. खरे म्हणजे शिंप ही काही चांदी नाही किंवा रज्जू काही सर्प नाही. पण शिंप ही शिंप म्हणून न कळल्याने, रज्जू ही रज्जू म्हणून न कळल्याने, शिंपेवर चांदीचा भास होतो आणि रज्जूवर सर्पाचा भास होतो. त्याप्रमाणे ब्रह्म हे न कळल्याने ब्रह्मावर भासात्मक विश्व दिसू लागते.

यावर कुणी म्हणेल की आम्हाला विश्व हे भास वाटत नाही. आम्हाला विश्व खरेच वाटते. हे कसे काय? याला श्रीदासराममहाराज स्वप्नाचे उदाहरण देऊन उत्तर देतात. जोपर्यंत आपण स्वप्न पहात असतो, तोपर्यंत आपणास स्वप्न खरेच वाटते. त्याप्रमाणे - स्वप्नाप्रमाणे - आपणास विश्व खरे वाटते. खरे म्हणजे हे विश्व केवळ स्वप्न[३] आहे. दृश्य विश्व हे केवळ स्वप्नाप्रमाणे[४] खरे वाटते. स्वप्न हे नाशवंत[५] असते, त्याचप्रमाणे विश्व हेही नाशवंत[६] आहे. संक्षेपाने सांगायचे झाल्यास, स्वप्न जसे खरे वाटते, तसे भासमान विश्व खरे वाटते. पण ते स्वप्नाप्रमाणे

---

१) द्वैत तेची भास । अद्वय अविनाश ।।२९.७

२) शिंपेवरी जैसा रुपियाचा भास । रज्जु आपणास सर्प भासे ।।७२.१

३) हे तो केवळ आहे स्वप्न । ४१२.२

४) स्वप्न जैसे वाटे खरे । परी ते असत्यची सारे ।।१।।
तयेपरी येथे आहे । दृश्य खरे वाटताहे ।।२।। (७२.१-२)

५) हे तो नाशिवंत स्वप्न । ६६.२

६) अशाश्वत आहे जग । १३७.२

खोटे, असत्य[१] आहे. जगातील नाम[२] व रूप खोटे आहे. खऱ्या ब्रह्मावर भासणारे विश्व खोटे[३] आहे. अद्वैत ब्रह्मावर भासणारे जग खोटे आहे. सत्य ब्रह्मावर भासणारे असत्य नाशवंत असल्याने ते खोटे आहे. जगाला भासणारे द्वैत असत्य आहे. ''मी तू[४]'' इत्यादि प्रकारे व्यक्त होणारे जगातील द्वैत असत्य आहे. संक्षेपाने सांगायचे झाल्यास विश्वाचा हा प्रपंच/पसारा हा खोटा[५] आहे.

याचाच अर्थ असा :- सत्य, अद्वैत ब्रह्मावर भासणारे विश्व हे स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे. जे विश्व ब्रह्माच्या ठायी नव्हते (अघटित) ते माया दाखवू लागते. म्हणून तिला 'अघटित-घटना-पटु' असे म्हटले जाते.

**मायेचे स्वरूप**

ज्या मायेमुळे ब्रह्मावर मिथ्या जग भासते, त्या मायेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :- ज्या मायेमुळे निर्गुण ब्रह्म हे सगुण वाटू लागते, ईश्वर वाटते, त्या ईश्वराची/देवाची शक्ति माया आहे. ती अघटित आहे[६], अगाध[७] आहे. या माया शक्तीच्याद्वारा ईश्वर विश्व निर्माण करतो, म्हणून ईश्वर हाच विश्वाचा माय-बाप[८] मानला जातो. ही माया अघटित आहे, कारण तिला आदि नाही. ती ब्रह्माची उपाधी का बनते हे कळत नसल्याने ती अगाध

---

१) सर्व दृश्य हे वोखटे ।४४०.१

२) नाम आकार हे खोटे । १३२०.५

३) खऱ्यापासुनी खोटे निघे । १५०८.१; द्वैत उभारणी अद्वैताचा पाया । ४.१; द्वैत हे सर्वदा नाशिवंत । ४.२ ; सत्य ते अद्वैत असत्य ते द्वैत । ४०१.३

४) मी तू आहे खोटे । ४५२.१

५) हा प्रपंच अवघा लटका । २.१

६) अघटित माया परमेश्वरी । ३६.१; देवाचिये माया अघटित आहे।३९७.३

७) माया प्रभूची अगाध । ४१०.३

८) सकळ जगाचा माय बाप देव । ४२२.१; विश्वाचा तो मायबाप ।४२३.१

आहे. ती नसणारे (अघटित) विश्व दाखविते. ती चंचळ[१] आहे. या चांचल्य गुणाने ती विश्वाचे असत्य[२] नवल दाखविते. ती विश्वाचा खेळ[३] दाखविते. माया म्हणजे अज्ञान[४] आहे. सत्य ब्रह्माच्या दृष्टीने अन्य कोणतेही तत्त्व नसल्याने माया म्हणजे[५] काही नाही असे म्हणता येते. ती ब्रह्माप्रमाणे सत्य नाही. पण ती असत्‌ही नाही, कारण ती विश्वाचा भास दाखविते. म्हणून ती सत् आणि असत् या शब्दांनी सांगता येत नाही.

माया ही स्वप्न[६] आहे. ती स्वप्नाप्रमाणे मिथ्या जग दाखविते. माया मृगजळ[७] आहे. ती मृगजळाप्रमाणे मिथ्या असणारे विश्व दाखविते. स्वप्न, मृगजळ दोन्हीही खोटे. ब्रह्माच्या दृष्टीने माया ही मिथ्या[८] आहे.

**जीव**

या भासमान जगाला ब्रह्म हे अधिष्ठान आहे. जगात स्थूल आणि सूक्ष्म देहांच्या उपाधीत सापडलेले ब्रह्म हे 'जीव' म्हटले जाते. आता विश्व हे जर मागे पाहिल्याप्रमाणे तत्त्वतः ब्रह्म आहे, तर विश्वातील जीव हाही तत्त्वतः ब्रह्मच आहे. पण जीवाच्या बाबतीत या विश्वात घडते ते असे :-

मायेमागे देव दडलेला असल्याने जीवाला देवाचे ज्ञान होत नाही,

---

१) तुझी माया हे चंचळ ।(९९१.१

२) परी नवल दिसो येई । १३५.२

३) करी विश्वाचा हा खेळ । ९९१.१

४) माया हे अज्ञान । १९३.८

५) माया म्हणून काही नाही । ९९१.१

६) माया आहे स्वप्न । ६३.४

७) माया मृगजळ जाण । २५६.२

८) ब्रह्मरूपी मिथ्या माया । ५१०.२

त्यामुळे जीवाला स्वतःच्या ब्रह्मस्वरूपाचे विस्मरण[१] होते. या कारणाने जीव स्वतःला ब्रह्मापेक्षा कोणीतरी वेगळा असे मानू[२] लागतो. म्हणजे आपण म्हणजे देह अथवा मन आहे असे त्याला वाटू लागते. पण खरे म्हणजे तसे [३] नाही. खरे म्हणजे जोपर्यंत शरीराच्या उपाधीत ब्रह्म आहे, तोपर्यंतच शरीर सोज्ज्वळ, जिवंत[४] असते. आणि या शरीरालाच ''मी'' असे मानल्याने जीव[५] हा जन्ममरणाच्या बंधनात अडकतो. खरे म्हणजे ब्रह्म शरीरात जीवाच्या जवळच असून, ''मीपणाने'', ''अहंकाराने'' ब्रह्म व आपण वेगळे आहोत असे त्याला वाटू लागते[६].

खरे म्हणजे 'जीव' हा कोण आहे? शरीराच्या उपाधीत सापडलेले[७] ब्रह्म म्हणजे जीव आहे. वस्तुस्थिती अशी आहे की देहात[८] आत्मा/ब्रह्म हे मुख्य आहे. या ब्रह्माचे/आत्म्याचे प्रतिबिंब बुद्धीत[९] पडते. लगेच तेथे अहंकार प्रगट होतो आणि या अहंकाराने जीव या प्रतिबिंबाला 'मी' म्हणू लागतो. पण बिंबाखेरीज प्रतिबिंबाला स्वतंत्र असे अस्तित्व नाही. प्रतिबिंब हे बिंबरूपच आहे. म्हणून प्रतिबिंबरूप जीव हाच बिंबरूप आत्मा/ब्रह्म आहे. म्हणून जीव हा आत्मरूप/ब्रह्मरूप आहे. ही गोष्ट हडसून खडसून

---

१) मायेआड लपला देव । विसरला त्यासी जीव । याचे कारण अज्ञान । (११२.२-३)

२) परी विस्मरण योग । करी जाण पा वियोग ।।१६१.३

३) नव्हेसी तू देह मन । तू तो अनिर्वाच्य जाण।।१४१.३

४) शरीर हे सोज्वळ । आत असता ब्रह्म गोळ ।। ४३०.२

५) देहभावे जीव भ्रांतिरूप झाला । कैचा हा गोविला बंधनात ।।१२१२.१

६) वस्तु जवळी जवळी । झालजी मी पणे निराळी ।।१६९५.१

७) उपाधीत जे पातले । त्यासी जीव बोलिले ।।६३.२;
उपाधी माझारी प्रतीत जे झाले । जीव ते बोलिले रामरूप ।।१११.३

८) देहामध्ये आहे मुख्य आत्मा जाण । ४५८.३

९) आत्मरूप तेचि बिंब । आम्ही त्याचे प्रतिबिंब ।।४२६.१

श्रीदासराममहाराजांनी पुढीलप्रमाणे सांगितली आहे :- १) जीव तत्त्वता केशव । ६३.३, २) आपण आहो ब्रह्म ।२२.२, ३) जीव तो पहाता ब्रह्मरूप जाण। १६०.३ ४) तू ब्रह्मरूपची असूनी । १८४.२ ५) असोनिया जीव स्वये परब्रह्म। ३९२.२, ६) आम्ही नाही भिन्न । जाणा परब्रह्माहून।। ३९२.१ ७) जीव आत्मरूप अभिन्नची । ४३२.४ ८) जैसा शिव आणि जीव । एकरूप नान्यथा भाव ।।१४१.४, ९) शिवरूपची आहेसी । १४१.७, १०) हाची ब्रह्मरूप वस्तूता पहाता ।।१२१२.२ ११) आम्ही आत्मरूप जाणा । ४२६.२ १२) ब्रह्म आहो की आपण । ४७७.४

या सर्वांचा इत्यर्थ असा की जीव हा तत्त्वतः ब्रह्मरूप, आत्मरूप आहे. जीव हा ब्रह्माहून भिन्न नाही.

पण ही गोष्ट सहजासहजी घडत नाही. ब्रह्मसाक्षात्कारी गुरु जर जीवाला भेटला आणि गुरूने त्याला तें सांगितले, ते त्याला पटले आणि जर त्याने गुरुप्रणीत साधन केले तर त्याला आपण ब्रह्म आहो हा साक्षात्कार होतो आणि तसे झाल्यावर तो ब्रह्मरूप[1] होतो. ब्रह्म हे सुखरूप आहे. ब्रह्माशी एकरूप झाल्यावर जीव जन्ममरणाच्या कटकटीतून सुटून ब्रह्मनंदात[2] बुडून जातो.

## गुरु/सद्गुरु

जीव ब्रह्मरूप होऊन ब्रह्मसुख भोगतो हे खरे, पण ते आपोआप घडत नाही. त्यासाठी त्याला ब्रह्मसाक्षात्कारी पुरुषाचा शोध घेऊन, त्याचा बोध घ्यावा लागतो. त्याला शरण जाऊन, प्रसन्न करून घेऊन, त्याचेकडून योग्य ते ज्ञान प्राप्त करून घेऊन, त्याने सांगितलेले साधन करून, ब्रह्मरूप होऊन जावे लागते. अशा ब्रह्मसाक्षात्कारी पुरुषाला आचार्य/गुरु/सद्गुरु

---

१) ब्रह्मासी पहाणे पहाता पहाणे तेचि होणे ।।६४८.१

२) ब्रह्मालागी तद्रूप होता । ब्रह्मसुख येई हाता ।। १५५.३

आणि आधुनिक भाषेत संत म्हणतात. या संतांचे देहधारी रूप हे खरे त्यांचे स्वरूप नाही, त्यांचे खरे स्वरूप ब्रह्म आहे. हे संत/सद्गुरू पुढीलप्रमाणे असतात, असे श्रीदासराममहाराज सांगतात :-

सद्गुरु-स्वरूप आणि आत्मस्वरूप हे एकच[१] आहेत. सद्गुरु हाच देव[२] आहे. या दृष्टीने गुरु हा देवाप्रमाणेच[३] जगत्कर्ता, जगाचा नियंता आणि जगाचा संहारकर्ता आहे. गुरु हाच देव[४] आहे, संत हे ब्रह्ममूर्ती[५] असतात. संत हे अद्वैत स्वरूपात समरस[६] झालेले असतात. संत हे निर्गुण निराकार देव संत[७] झालेले असतात. संत हे आत्मरूपाकार[८] झालेले असतात.अंतिम आत्मा हा जसा अंतरात्मा असतो, त्याप्रमाणे सद्गुरु/संत हे अंतरात्मा[९] असतात. याचा संक्षेपाने अर्थ असा की संत/सद्गुरु हा अंतिम तत्त्व आत्मा आहे, जगाचा नियंता आहे आणि जगातील जीवामध्ये तो अंतरात्मा आहे.

परमार्थात गुरु हा मुमुक्षुंच्या दृष्टीने महत्वाचा आहे. मुमुक्षूने असा गुरु शोधून काढून त्याला शरण जाणे आवश्यक[१०] आहे. त्यांची सेवा इत्यादि करून त्यांना प्रसन्न करून घ्यावे. मग संत/सद्गुरु हे जीवांचे

---

१) सद्गुरु स्वरूप आत्मस्वरूप दोनी एक रूप ।।२८२.३

२) सद्गुरु देव सदुगुरु देव । देवांचाही थोर देव ।। ५.१

३) कर्ता हर्ता नियंता सद्गुरु । जयाचे आधारु जग चाले । ६.१

४) गुरु हाची देव । ११३८.५; सद्गुरु तो देव सद्गुरु तो देव ।।१२३६.४

५) ब्रह्ममूर्ती संत सद्गुरु अनंत । १११७.१

६) संत तो अद्वैती समरस झाले । ५५३.१

७) निर्गुण निराकार । संत देवाचे अवतार ।।२२.४

८) आत्मरूपाकार स्वये साधुसंत ।१११०.१

९) आत्मा तो रे पाही सकळ जीवांचा ।। ६.२

१०) संतालागी शरण जावे । ४४४.३

देवाविषयीचे अज्ञान दूर करतात[१] खरे काय आहे आणि खोटे काय आहे, हे संत समजावून[२] सांगतात. ते सांगतात की एक देव/आत्मा तेवढा खरा आहे. बाकी सर्व खोटे आहे. म्हणून त्या देवाकडे/आत्म्याकडे लक्ष द्यावयास हवे. संतांच्या संगतीने, संतांच्या उपदेशाने वेदांताचे मर्म[३] कळून येते की आत्मा हा एकमेव एक सत्य तत्त्व आहे आणि बाकी सर्व जे दिसते ते अनात्मा आहे म्हणजे आत्मा नाही, अनात्मा हा मिथ्या आहे. अशाप्रकारे संत/सद्गुरु मुमुक्षु शिष्याच्या मनात ज्ञानाचा उजेड पाडतात, ते त्याच्या मनात[४] ज्ञानदीप लावतात.

आता हा जो सत्य आत्मा आहे तो प्राप्त करून घ्यावयाचा आहे. त्यासाठी जे काही साधन आहे ते सद्गुरु सांगतात. सद्गुरुवाचोनी आत्मप्राप्तीचे साधन कळत नाही.[५] आता सद्गुरूने सांगितलेले साधन करणे हे शिष्याचे कर्तव्य आहे. ते साधन जर मुमुक्षूने केले तर त्याच्यावर गुरूची कृपा[६] होते. अशी गुरूची कृपा झाली तरच परमार्थातले गुह्य कळून येते. खरे सांगायचे तर गुरूची कृपा झाल्याशिवाय देव कळत नाही, देवाचा साक्षात्कार[७] होत नाही. संतांची/सद्गुरूंची कृपा झाली तरच अंतिम तत्त्व आत्मा आपल्या अंतरात अंतरात्मा आहे हे कळून[८] येते आणि त्याचे दर्शन होते.

---

१) अज्ञानाचे हो मालिन्य धुतले । १५.३

२) खरे खोटे दाखविले । २०.२

३) संतांचिया संगे उकले वेदांत । १४८१.२

४) गुरुने नवलाव केला । ज्ञानदीप पाजळला ।।४४७.१

५) सद्गुरुवाचोनी कळेना साधन । ७.२

६) संतकृपा होता गूज केले तत्त्वता । ४३७.१

७) देव तो नाकळे गुरुविना । ३.३

८) अंतरी अंतरी आत्मधन आहे ।
पहाताची आहे संतकृपे ।। ४५५.३

## आत्मा/देव कसा कळतो ?

गुरूने आत्म्याविषयी कितीही सांगितले तरी आपल्या भौतिक स्थूल इंद्रियांना आत्मा कळणारच नाही. व्यवहारातसुद्धा अनेक सूक्ष्म गोष्टी आपल्या डोळे इत्यादि इंद्रियांना सापडत नाहीत. मग सूक्ष्मापेक्षा सूक्ष्म असणारा आत्मा इंद्रियगम्य नाही हे उघड आहे. मानवी इंद्रियांना जगातील शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे विषय कळत असतात. तसेच ही इंद्रिये जड/अचेतन आहेत. कारण ती अचेतन पंच महाभूतांच्या मिश्रणाने बनलेली आहेत. म्हणून अचेतन स्थूल इंद्रियांच्या टप्प्यात आत्मा/ब्रह्म येत नाही. म्हणून श्रीदासराममहाराज सांगतात की चर्मचक्षूला देव दिसत नाही. येथे चर्मचक्षू हे सर्व ज्ञानेंद्रियांचे उपलक्षण आहे. म्हणून मानवी ज्ञानेंद्रियांना आत्मा हा कळणारा नाही.

मग प्रश्न असा :- देव/आत्मा हा अंतःकरणाला तरी कळतो काय? या प्रश्नाचे उत्तर होय आणि नाही असे दोन्ही आहे. म्हणजे असे :- अंतःकरणात मन, चित्त, बुद्धि हे येतात. ते आहेत त्या स्वरूपात त्यांना देव दिसत[१] नाही. याचे कारण असे :- मन हे सूक्ष्म भूतांच्या अंशापासून[२] बनलेले असल्यामुळे ते अचेतन/जड आहे. त्या अचेतन मनाला आत्मा कळणार नाही हे उघड आहे. तसेच मन हे सतत संकल्प-विकल्प[३] करीत असते. तेच मनाचे स्वरूप आहे. आत्मा/ब्रह्म तर निर्विकल्प आहे, म्हणून तो मनाला ग्राह्य नाही.

---

१) नेत्र असमर्थ पहावया देव । २०८.२; चर्मचक्षूने ही पाही । खरा देव दिसत नाही । ३७९.१; डोळा न पाहे आत्मया । १३१३.२

२) मन ते जाणावे पंचभूत अंश । ५७.१; पंच भूत अंश मन हे जाणिजे।। १२८८.२

३) संकल्प विकल्प तेची मनाचे स्वरूप ।१०१०.२

बुद्धि ही पंच भूतांच्या सूक्ष्म अंशापासून झालेली आहे. साहजिकच तीसुद्धा जड/अचेतन आहे. बुद्धि ही निश्चय करते. तिचे निश्चयही बदलत असतात. म्हणून तीही मनाप्रमाणे चंचल आहे. अशा चंचळ बुद्धीला निश्चळ आत्मा कळणे शक्य नाही.

मन आणि बुद्धि याप्रमाणे चित्त हेही पंच भूतांच्या सूक्ष्म अंशापासून झालेले आहे. तेही अचेतन आहे. त्यामुळे चित्त ज्या स्वरूपात आहे त्यालाही आत्मा कळणे शक्य नाही.

या सर्वांचा अर्थ असा की अंतःकरणातील मन, चित्त आणि बुद्धि यांना आत्मा कळणारा नाही.

मग अंतःकरणाला आत्मा/ब्रह्म कळू शकते असे वर कसे म्हटले? या प्रश्नाचे उत्तर असे :- आहे त्या स्वरूपात जरी मन, चित्त व बुद्धि यांना आत्मा कळत नसला तरी त्यांचे रूप जर पालटले तर त्यांना आत्मा ग्राह्य होतो. म्हणजे असे :-

संकल्प आणि विकल्प हे मनाचे स्वरूप आहे. ते जर थांबले तर त्या मनाला आत्मा ग्राह्य होतो. संकल्प-विकल्प थांबले की मन हे ''अमन'' अथवा ''उन्मन''[१] होते आणि त्या अवस्थेत ब्रह्मसाक्षात्कार होतो. याप्रमाणे आत्मा उन्मना ग्राह्य ठरतो. निश्चय हे बुद्धीचे स्वरूप आहे. हे तिचे कार्य बंद झाले की ती 'निवांत' होते आणि मग या निवांत बुद्धीचा विषय[२] श्रीहरी/आत्मा होतो. या बुद्धिला हरि समजून येतो आणि त्याचा साक्षात्कार[३] होतो. वर पाहिल्याप्रमाणे चित्त म्हणजे चित्त असल्याने, त्यातील 'त' गेला की चित्त हे 'चित्'च होते. चैतन्य हे चित्ताचे खरे स्वरूप[४] आहे.

१) होता मनोन्मन समाधी ते । ४७०.४
२) निवांत बुद्धीचा विषयो श्रीहरी । ११७.१,
३) बुद्धिगम्य हरी । १३६.४
४) चैतन्य संपूर्ण रूप त्याचे ।। १२८५.१

त्यामुळे चित्तातील 'त' निघून गेला की चित्त हे चैतन्यात[१] शिरते आणि चैतन्यरूप/ब्रह्मरूप[२] होऊन जाते. अशाप्रकारे विशिष्ट प्रकारच्या मनाला, बुद्धीला आणि चित्ताला आत्मा ग्राह्य होतो.

## अज्ञानाचा निरास होऊन ज्ञानाने साक्षात्कार

मागे पाहिल्याप्रमाणे जीव हा मूलतः ब्रह्मरूप आहे. पण अज्ञानामुळे तो स्वतःचे ब्रह्मरूप विसरला आहे. हे अज्ञान आत्म्याच्या[३] ज्ञानाने दूर होते. अज्ञानामुळे/मायेमुळे झालेला भ्रम ज्ञानाने दूर होणारा[४] आहे. ज्ञानाने हे अज्ञान दूर झाले की जीवाला स्वतःचे खरे स्वरूप[५] समजून येते. वर पाहिल्याप्रमाणे विशिष्ट अशा मनाला, चित्ताला, बुद्धिला आत्म्याचे ज्ञान होते आणि जीवाचे अज्ञान आणि अज्ञानाअंती येणारा भ्रम दूर होतो. अज्ञान दूर झाले की जीव ब्रह्म होतो, ब्रह्मरूप होतो. ब्रह्म हे आनंदरूप आहे. ब्रह्माशी एकरूप झालेला जीव आनंदाच्या सागरात मिळून[६] जातो. जीव स्वतःचे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घेतो.

विद्यमान जीवनात गुरुकृपेने ब्रह्मरूप झालेला जीव हा जीवन्मुक्त होतो. प्रारब्धकर्म संपेपर्यंत तो जिवंत रहातो आणि मरणोत्तर तो देहरहित अवस्थेत ब्रह्मरूप होऊन जातो. अशा ब्रह्मरूप झालेल्या जीवाच्या[७] जन्माचे सार्थक झाले, असे म्हणता येते.

*****

---

१) चित्त हे शिरले चैतन्यामाझारी । २००.५

२) चित्त हे चैतन्य होईल गा । २१०.३

३) गुरुराज म्हणे ज्ञान । घालविते हे अज्ञान । ६६.५

४) भ्रम ज्ञाने सारा। ३८७.१

५) निरसोनी अज्ञान पाही तू स्वतःसी । आत्माची आहेसी आत्मरूप ।। १२१२.३

६) भ्रम ज्ञाने सारा । मिळा आनंदसागरा ।।६८७.१

७) जन्माचे सार्थक रहावे ब्रह्मपणे । गुरुराज म्हणे तुम्हा लागी ।। ३९०.५

# माया तेचि ब्रह्म

आद्य शंकराचार्यांच्या केवलाद्वेत वेदान्त तत्त्वज्ञानाची लोकप्रियता वाढली. त्यामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानातील ''माया'' हा शब्द फारच प्रचारात आला. आणि कीर्तनकार, प्रवचनकार, वक्ते इत्यादींच्या वापरण्यात येऊ लागला. शंकराचार्यांची ही माया निर्गुण ब्रह्माला उपाधी म्हणून येते. आणि ती सदसद्-विलक्षण म्हणजे सत् आणि असत् यापेक्षा वेगळी असणारी म्हणून अनिर्वचनीय - योग्य शब्दांनी सांगता न येणारी - अशी आहे.

या मायेचे उल्लेख महाराष्ट्रातील आत्मसाक्षात्कारी/ब्रह्मसाक्षात्कारी संतांच्या अभंग, पदे इत्यादीमध्ये आढळून येतात. साहजिकच सांगलीच्या दासराममहाराज केळकर या आत्मसाक्षात्कारी संतांच्या अभंग-गाथ्यामध्ये दिसून आला तर नवल वाटण्याचे कारण नाही. या गाथ्यातील काही अभंगात 'माया म्हणजेच ब्रह्म' असे एक समीकरण दिलेले आहे. माया ही ब्रह्मापेक्षा वेगळी आहे असे वाटणाऱ्या वाचकांना हे समीकरण चकित करणारे आहे. म्हणून यासंदर्भात दासराममहाराजांना मायेविषयी काय सांगावयाचे आहे, याचा विचार करणे आवश्यक ठरते.

मायेविषयीचा हा विचार पुढीलप्रमाणे भाग पाडून, प्रस्तुत लेखात विशर करण्याचा प्रयत्न केला आहे. १) ब्रह्म /आत्मा या अंतिम तत्त्वाला आलेली उपाधी म्हणजेच माया आणि तिचे कार्य. २) मायेमुळे निर्गुण हे सगुण ब्रह्म म्हणून भासते. या सगुण ब्रह्माला ईश्वर म्हणतात. हा ईश्वर आणि माया यांचा संबंध. ३) माया ब्रह्मावर जगाचा आभास दाखविते तेव्हा जग आणि माया यांचा संबंध. ४) या जगात नाना जीव आहेत. त्यांचा आणि मायेचा संबंध. ५) निर्गुण ब्रह्मात चंचळ उठते आणि हे चंचळ म्हणजे माया आहे. म्हणून चंचळ मायेचे कार्य हा भाग येतो. ६) माया मिथ्या,

स्वप्न आहे. किंबहुना माया म्हणजे 'काही नाही' असे म्हटले आहे. त्याचा अर्थ. ७) आणि माया म्हणजे ब्रह्म या समीकरणाने अभिप्रेत असणारा अर्थ.

वरील भागानुसार विचार करताना दासराम गाथ्यातील जी जी वचने आधारभूत म्हणून घेतली आहेत, तीही येथे संदर्भ या स्वरूपात मुद्दाम दिलेली आहेत.

## १) निर्गुण ब्रह्माला माया ही उपाधी

अंतिम तत्त्व सूचित करण्यास आत्मा/परमात्मा/ब्रह्म/परब्रह्म असे शब्द दासराम वापरतात. कधी ते आत्मवस्तु असाही शब्द उपयोजितात. ते सांगतात :- आत्मवस्तु ही निश्चळ, निःशब्द असून ती पूर्ण सत्य[१] आहे. ही आत्मवस्तु[२] सत्, चित्, घन आहे. आत्मवस्तु ही मूळरूप आहे. तीच पहिले निर्विकल्प तत्त्व आहे.[३] परब्रह्म हे निश्चळ, निरंजन आणि पूर्ण घन आहे.[४] या सर्वांचा भावार्थ असा की आत्मा / ब्रह्म निःशब्द इत्यादि आहे, म्हणजेच ते निर्गुण[५] आहे.

---

१) निश्चळ निःशब्द वस्तु पूर्ण सत्य । २७.५ , परमात्मा तो निःशब्द। ३८.२; निश्चळ निःशब्द आतु परमात्मा । ३०.३

२) आत्मवस्तु सत् चित् घन । १०१.१०, ६२८.४.

३) आत्मवस्तु मूळरूप । प्रथम तत्त्व निर्विकल्प । १३५२.३.

४) निश्चळ ते पूर्ण घन । परब्रह्म निरंजन ।। १३२२.१, निश्चळ ते पूर्णरूप निरंजन । १३१७.४.

५) यासंदर्भात दासराम आणखी सांगतात की नाम हेच ब्रह्म आहे. उदा.मूळ निर्विकल्प नाम। १८१८.३, नाम हे निःशब्द आहे (निःशब्द ते नाम ।१९१.४) निःशब्द नाम हेच ब्रह्म आहे (निःशब्दातू नाम ब्रह्म ।१७५७.४ व निःशब्द ते पूर्ण ब्रह्म । १७५८.४). एकतत्त्व नाम हे परम, स्वतःसिद्ध, अविनाश असे मूळ ब्रह्मरूप आहे (एकतत्त्व नाम हे स्वतःसिद्ध परम । अविनाश असे ब्रह्म मूळ रूप ।। १८९.२). या वचनात दासराममहाराजांनी विशिष्ट प्रकारच्या नामाचे स्वरूप सांगितले आहे. पण या नामाचा विचार प्रस्तुत लेखात करण्याचे काहीच कारण नाही.

या निर्गुण ब्रह्माला माया ही उपाधि येते, असे केवलाद्वैत वेदांत मानतो आणि ही माया म्हणजे अविद्या, अज्ञान आहे असे सांगतो[१]. त्याला अनुसरून माया ही अज्ञान आहे, असे दासराममहाराज सांगतात.[२] या मायेला दासराम आदिमाया[३], महामाया[४] म्हणतात आणि ती नीलवर्णाची नारी आहे असे सांगतात. तसेच ती आदिशक्ति माया[५] आहे असेही म्हणतात. या स्थितीत माया आणि ब्रह्म हे दोघेही तटस्थ असतात[६].

ही माया दोन प्रकारची आहे. १) शुद्ध सत्त्व माया[७] आणि २) अशुद्ध सत्त्व माया. यातील शुद्ध सत्त्व माया म्हणजे ब्रह्माचे 'हेतूचे देखणे' आहे.[८] तर अशुद्ध सत्त्व माया/अशुद्धात्म माया[९] ही 'पंच भूत सृष्टी' आहे. शुद्धरूप माया ही 'आत्म्याची अनादि काया'[१०] आहे. या स्थितीत ब्रह्म/आत्मा आणि माया हे वृक्ष आणि त्याची छाया[११] याप्रमाणे आहेत. अशुद्धात्म माया ही पंचभूत सृष्टि आहे म्हणजे तिच्यापासून पंच भूते असणारे विश्व उत्पन्न होते. या विश्वात सर्वत्र 'नाना' म्हणजे भेद आहे. या भेदाचे म्हणजेच नानाचे/द्वैताचे कारण माया[१२] आहे.

---

१) अज्ञानं प्रकृतिः शक्तिरविद्येति निगद्यते । सर्ववेदांतसिद्धांतसारसंग्रह, ३०५.

२) माया हे अज्ञान । १९३.८

३) आदिमाया । १२७६.२

४) महामाया आदी नारी नीलवर्ण । ५८.२

५) दासराम प्रार्थी माय आदि शक्ती । ४०.५, धन्य आदिशक्ती । ४०.४

६) माया ब्रह्म दोनी पहाता तटस्थ । ५४.४

७) शुद्ध सत्व माया । १२५३.२, अशुद्धात्म माया । १२५४.४

८) पंचभूत माया शुद्ध सत्त्व माया । १२५३.८, शुद्ध सत्त्व माया हेतूचे देखणे । १२५३.४

९) अशुद्धात्म माया पंचभूत सृष्टी । १२५४.४,

१०) धन्य शुद्धरूप माया । आत्मयाची अनादि काया ।। ६१०.२

११) वृक्ष आणि छाया । तैसी ब्रह्म आणि माया ।।२५६.१,

१२) स्वये निर्मियेले द्वैत । ८९.१

मायेमुळे ज्याप्रमाणे नाना/द्वैतात्मक विश्व निर्माण होते, त्याप्रमाणे मायेमुळे निर्गुण ब्रह्म हे सगुण ब्रह्म झाले असे वाटू लागते. या सगुण ब्रह्म झाले असे वाटू लागते.[१] या सगुण ब्रह्मालाच ईश्वर असे नामाभिधान दिले जाते.

अशाप्रकारे मायेमुळे एका बाजूने सगुण ब्रह्म/ईश्वर होतो आणि दुसऱ्या बाजूने पंचभूतात्मक सृष्टी उत्पन्न होते. या सृष्टीत नानाप्रकारचे जीव असतात.

मायेमुळे सगुण ब्रह्म होते आणि विश्वाची निर्मिती होते. याचप्रमाणे दासराम मायेची आणखी कार्ये अशी सांगतात.

माया ही चंचळ आहे. ब्रह्मातील चंचळ म्हणजे माया[२] आहे. या 'चंचळ' गुणाने माया ही हरि/ब्रह्मस्वरूपी उदय[३] पावते आणि ती ब्रह्मापेक्षा वरचढ होते.

याचे कारण असे की ती ब्रह्माचे स्वरूप ब्रह्माला दाखविते.[४] म्हणजे चंचळ गुणाने जशी माया विश्व दाखविते त्याप्रमाणे ती ब्रह्माला[५] ब्रह्मपण दाखविते. याचा अर्थ असा की माया शक्ति निजाला[६]/ब्रह्माला ब्रह्मपण/निज दाखविते. आणि मग ब्रह्माला ब्रह्मपण दाखवून झाल्यावर ती ब्रह्मरूप[७] होऊन जाते.

---

१) निर्गुणापासोनी जहाले सगुण । ५०.३

२) या विधानाचा अधिक विचार याच लेखात पुढे येतो.

३) चंचळेची हरिस्वरूपी उदय । परी केला जय ब्रह्मावरी ।। ४२.४

४) ब्रह्माचे स्वरूप ब्रह्मासी दाविले । ४२.५

५) ब्रह्मा ब्रह्मपण दाविले शक्तीने । चंचळाचे गुणे विश्व रचिले ।।४२.३

६) शक्ती भेटविते निजासी हे निज । ४४.१

७) ब्रह्म जे दावोनी ब्रह्मरूप होते । ४४.२

## २) माया आणि विश्व/सृष्टि

प्रथम निर्गुण ब्रह्म हे एकमेव एक आहे. तेथे माया ही उपाधि आली आणि मग तिने ब्रह्मावर/परब्रह्मावर विश्वाचा[१] भास निर्माण केला. हेच मानवी उत्पत्तीच्या स्वरूपात सांगावयाचे झाल्यास, मायेने ब्रह्मापासून सृष्टि निर्माण केली[२] असे म्हणता येते.

आत्मा/ब्रह्म निवांत निश्चळ आहे. माया ही चंचळ आहे. ती जणु नाचते, उडते आणि ती स्वतःच्या चांचल्य गुणामुळे विश्व निर्माण करून त्यातील अनेक/नाना/द्वैत[३] दाखविते. विश्वात जसे द्वैत आहे, तसे विश्वाला काहितरी आकार[४] आहे. हे सर्व यदृच्छेने घडले, मायेने घडविले अशाप्रकारे माया विश्वाचा खेळ[५] करते.

मायेमुळे उत्पन्न झालेले विश्व सत्य नाही. विश्व हे असार[६] आहे. विश्व केवळ स्वप्न आहे.[७] सत्य अशा ब्रह्मावर मायेमुळे मिथ्या जग[८] भासू लागले. याचा अर्थ असा :- माया ही ब्रह्मावरच विश्वाचा भास निर्माण करते. आता विश्व हे मिथ्या/स्वप्न/भास असल्याने, ते प्रत्यक्षात नाही. आहे ते केवळ ब्रह्म आहे. म्हणून तात्त्विक दृष्ट्या ही सृष्टि/विश्व ब्रह्म /

---

१) विश्व परब्रह्मी भास । माये आले आकारास ।। ४१२.१,

२) जगाचिये पोटी व्याली आदिमाया सृष्टी । ५४८.१,

३) आत्मा तो निवांत । चलित माया दावी द्वैत ।। २८.१, नाचे हो माया कैशी कवतुके । चांचल्ये अनेके भासवोनी ।। १३०३.२,

४) विश्व हे असार । त्यासी आहे आकार ।। ७०.१, हे तो घडले यदृच्छेने । सर्व निर्मिले मायेने ।। ७०.२,

५) करी विश्वाचा हा खेळ । ४१२.२,

६) विश्व हे असार । ७०.१,

७) हे तो केवळ आहे स्वप्न । ४१२.२

८) आधी होते सत्य । तयावरी उठले मिथ्य ।।४१०.१

ब्रह्मस्वरूप[१] आहे. मायेमुळे विश्व हे ब्रह्मापेक्षा वेगळे वाटत असले तरी तात्त्विक दृष्ट्या सृष्टि/विश्व ब्रह्मरूपच आहे.

### ३) माया आणि ईश्वर

निर्गुण ब्रह्माला माया ही उपाधी येते आणि निर्गुण ब्रह्म सगुण ब्रह्म/ईश्वर वाटू लागते. निश्चळ ब्रह्मात चंचळ शब्द[२] उठतो. हा चंचळ शब्द[३] म्हणजे माया[४] आहे आणि या मायेमुळे निर्गुण आणि सगुण ब्रह्म असा भेद दिसू लागतो.[५] वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, ब्रह्माला माया ही उपाधि आल्यावर या मायेत ब्रह्माची जी छाया[६] उमटते तीच ईश्वर आहे. आणि तो ईश्वर मायेबरोबर नाना[७] रंग करतो. ही माया ईश्वराची शक्ती[८] मानली जाते.

ही ईश्वराची माया अगाध[९] आहे, ही परमेश्वराची माया अघटित[१०] आहे. म्हणून भक्त म्हणतो, ''हे देवा, तुझी माया कळली. ती आम्हाला देहात[११] गुंतवून टाकते''

---

१) तत्त्वता पहाता ब्रह्मरूप सृष्टी । माया भासे दृष्टी विभागली ।।६४.१।।

२) शब्द हा चंचळ शब्द हा चंचळ । ५०.१,

३) याचा खुलासा पुढे आला आहे.

४) शब्द ते सगुण अशब्द निर्गुण । १६९८.१, शब्दाची हे माया शब्दीच विरोदे ।। १६९४.१,

५) मायेमुळे आले ब्रह्मा ब्रह्मपण । सगुण निर्गुण प्रगट केले ।। ४०.३,

६) ब्रह्मावरी आली माया । मायेमाजी पडली छाया ।। ६३.१

७) मायेसवे रंग करी नानापरी । ५४.३

८) सगुण आकार शक्तीचेनी देव । ४३.४,

९) माया प्रभूची अगाध । ४१०.३

१०) अघटित माया परमेश्वरी । ३६.१, देवाचिये माया अघटित आहे । ३९७.३,

११) कळली कळली तुझी माया । गुंतविली का हे काया । १५४३.२,

मायेमुळे ज्याप्रमाणे ईश्वराची संकल्पना येते, त्याप्रमाणे जीवांचीही येते. मानवी जीवनातील जन्माची कल्पना करून दासराम सांगतात की मायेच्या उदरी ब्रह्म जन्माला येते आणि त्याला ईश्वर(शिव) आणि जीव[१] ही नावे दिली जातात.

## ४) माया आणि जीव

मायेमुळे भासणाऱ्या जगात असंख्य जीव आहेत. खरे म्हणजे जीव हा ब्रह्मरूप आहे (जीव तो पहाता ब्रह्मरूप जाण । १६०.३) तत्त्वतः जीव हा केशव आहे (जीव तत्त्वता केशव । ६३.३) पण मायेमुळे तो क्षुद्र झाला (मायेमुळे धरिले क्षुद्रत्व । ६३.३). आणि मायेमुळे तो जन्ममरणाच्या बंधनात पडला (जरी का जीवे ब्रह्म व्हावे। ८२.३, याला मायाची कारण । ८२.४) स्पष्ट करून सांगायचे झाल्यास :- मायेमुळे जगाचा भास होतो. या भासमान जगात अनेक स्थूल शरीरे दिसतात. जीव म्हणजे शरीरात प्रतिबिंबित होणारे ब्रह्म[२] आहे आणि मायेच्या प्रभावामुळे जीव शरीराला मी[३] म्हणू लागला. मायेच्या बंधनामुळे जीवाचे जन्ममरण संपत नाही[४] जीव मायेला भुलतो (मायेकडे प्राणी भुलले ।२२४.३) मायेमुळे जीव अज्ञानात पडला (जीव तो पहाता अज्ञानी पातला । १६०.४). संक्षेपाने सांगायचे झाल्यास मायेने देवाला आपल्या आड लपविल्यामुळे जीव देवाला विसरतो. म्हणजे मायेमुळे आपण ब्रह्म/ईश्वर आहोत असा जीवाला विसर[५] पडला.

---

१) मायेचे उदरी ब्रह्म ते जन्मले । जीव शिवनाम पावले वो ।। ३९.१

२) येथे जे का प्रतिबिंबले । ते ते जीवे ओळखले ।।४१२.३

३) तद्रूपची झाला मायेमुळे । १६०.४

४) होता मायेचे बंधन । सुटती न जन्ममरण ।।४७६.५

५) मायेआड लपला देव । विसरला त्यासी जीव ।।११२.२

तेव्हा आपण जीव जर मायेत गुंतून राहिलो तर आपण जन्ममरणाच्या[१] बंधनातून सुटणार नाही. खरे म्हणजे आपण जीव मायेपेक्षा निराळे आहोत. पण मायेच्या गळामुळे आपण जन्ममरणात बद्ध[२] होतो. तेव्हा जीवाने मायेला न भुलता, मायेच्या बंधनातून[३]/मोहातून सुटावयास[४] हवे. म्हणून माया कशीही असो, आपण ब्रह्माकडे लक्ष[५] द्यावयास हवे. जो जीव मायेला दूर सारून, तिच्या पाशातून सुटतो त्याला कळते की आपण क्षुद्र जीव नसून[६] आपण ब्रह्मच आहोत.

माया ही उपाधि निर्गुण ब्रह्माला आल्यावर, ब्रह्मावरच माया जगाचा आभास दाखविते. मायेमुळेच सगुण ब्रह्माची,ईश्वराची संकल्पना येते आणि माया ही ईश्वराची शक्ति मानली जाते. मायेमुळे भासमान झालेल्या जगात स्थूल देहात जीव आहेत असा भास मायेमुळे निर्माण होतो. इतका सगळा भाग आत्तापर्यंत पाहून झाला.

हा सर्व भाग दासराममहाराज आता वेगळ्या शब्दात सांगतात. त्याला आधार आहे त्यांचा ब्रह्मानुभव. हे सांगताना ते काही वेगळे शब्द वापरतात. ते म्हणजे शब्द आणि चंचळ. त्यांच्या म्हणण्यानुसार, ब्रह्म हे जरी निश्चळ, निःशब्द आहे, तरी तेथे चंचळ उठते, तेथे शब्द उमटतो. हे चंचल म्हणजे शब्दच आहे. पुढे दासराम सांगतात की ब्रह्मात उठणारे हे चंचळ म्हणजे माया आहे. म्हणून आता निश्चळ ब्रह्मातील चंचळ, निःशब्द

---

१) जरी मायेत गुंतसी । तरी कधी न सुटसी ।। ४१६.२

२) आपण असोनी मायेच्या निराळे । मायेचिया गळे बद्ध होतो ।।३९७.१

३) होई होई रे मोकळा । भुलू नको मायाजाळा ।।४१६.१

४) म्हणून ईश्वराची अशी प्रार्थना केली आहे :- अरे अरे प्रभुराया । आवरी आवरी तुझी माया ।। १८१०.१, मायेमाजी नको ठेऊ । नको मोहाने भुलवू ।।१८३८.१।।

५) माया असेल तैसी असो । आम्ही पुसो ब्रह्मासी ।। १८१८.१

६) ब्रह्म आहो की आपण । ४७७.४, आपण आहो ब्रह्म । ८२.२

ब्रह्मात उठणारा शब्द यांची माहिती प्रथम दिली आहे. नंतर दासराम सांगतात की निश्चळ ब्रह्मातील हे चंचळ म्हणजे माया आहे. त्याचाही विचार पुढे केला आहे.

यानंतर दासराममहाराज सांगतात, निश्चळ ब्रह्मात उठणारे चंचळ हे निश्चळ ब्रह्मापासून वेगळे असू शकत नाही. जसे, संथ पाण्यात तरंग उठतो. पण तो तरंग पाण्यापेक्षा वेगळा नसतो. त्याप्रमाणे ब्रह्मात उठणारे चंचळ हे निश्चळ ब्रह्मरूप आहे. आता निश्चळ ब्रह्मात उठणारे हे चंचळ म्हणजे मायाच असल्याने माया ही ब्रह्मच आहे. माया ही ब्रह्मरूप आहे.

वरील सर्व भाग दासरामगाथ्यात कसा व्यक्त झाला आहे हे यापुढे तीन भाग करून सांगितले आहे. हे तीन भाग असे :- (१) निश्चळ ब्रह्मात उठणारे चंचळ, (२) निश्चळ ब्रह्मात उठणारे चंचळ म्हणजे माया. (३) निश्चळ ब्रह्मातील चंचळ हे ब्रह्मरूप आहे आणि चंचळ रूप असणारी माया म्हणजेच ब्रह्म आहे.

## १. निश्चळ, निःशब्द ब्रह्मात उठणारा शब्द/उठणारे चंचळ

मुळात ब्रह्म हे निश्चळ, निःशब्द आहे. त्यात चंचळ[१] उठते. चंचळामुळे हालचाल निर्माण होते. हालचाल झाली की तेथे शब्द प्रगट होतो. अशाप्रकारे निश्चळ, निःशब्द ब्रह्मात चंचळ आणि शब्द येतात. याचा अर्थ असा :- ब्रह्म हे निश्चळ निःशब्द, सच्चिदानंद आहे (आत्मवस्तु सच्चिद्‌घन। १०१.१०). त्यातील चित्‌ हे चंचळ आहे. या चिद्‌गुणामुळे[२]

१) निश्चळ ब्रह्मातील या चंचळापासूनच विश्वाचा खेळ, विश्वातील भेद निर्माण होतात, असेही दासराम सांगून जातात. हे चंचळ का उठते? दासराम सांगतात, 'स्वसुख चाखाया रूपे धरली दोन । नरनारी होऊनी क्रीडा करी ।।'१३१२.४. हे नरनारी म्हणजेच माया व ईश्वर. ते दोघे विश्वाचा खेळ करतात. त्यातून स्वसुख मिळते. तर अन्यत्र दासराम म्हणतातः- ब्रह्मा नाही ठावे कोणे केली माया । ब्रह्माते पहाया ब्रह्म झाले।। १३१२.१.

२) सदानंदरूपी चिद्गुण चंचळ । विश्वाचा हा खेळ केला तेणे ।। ४१.१ चंचळ हे निश्चळातु । ९८.२

निश्चळ ब्रह्मात चंचळ उठते आणि या चिद्‌गुणाच्या चंचळपणामुळे विश्व आकारास येते. चिद्गुणाच्या चंचळपणाने द्वैतात्मक विश्व[1] दिसू लागते. या चिद्‌गुणामुळे द्वैतात्मक[2] भेद येतो.

या चित् गुणाच्या चंचळपणामुळे शब्द निर्माण होतो. त्यामुळे निःशब्द ब्रह्मात शब्दाचा उद्भव होतो. हा शब्दही चंचळ[3] आहे. या शब्दाचेच मूळ स्मरण[4] आहे. आणि हे स्मरण[5] वेगळे काही नसून ते चिद्रूप आहे.

या सर्वाचा भावार्थ असा :- सच्चिदानंद असे ब्रह्म आहे. त्यातील चित्‌मुळे निश्चळ ब्रह्मात चंचळ उठते. हे चंचळ म्हणजेच शब्द आहे आणि या शब्दाचे मूळ चिद्रूप स्मरण आहे. म्हणजे चित्‌च्या चंचळपणानेच शब्द उद्‌भूत होतो.

## २) निश्चळ ब्रह्मातील चंचळ म्हणजे माया

निश्चळ ब्रह्मात जे चंचळ उठते, ते दुसरे तिसरे काही नसून माया आहे; माया[6] हीच चंचळ आहे. निरंजन, निश्चळ ब्रह्मात चंचळ[7] माया आहे. निश्चळ ब्रह्मात जी चंचळ लहर उसळली तीच आदिमाया[8] आहे. भूमितीच्या भाषेत दासराम सांगतात :- निश्चळ ब्रह्माला जर वर्तुळ म्हटले

---

१) चिद्गुणेची चंचलपणे। त्याला आकारीचे लेणे ।। १०२.४ नवल चंचलाच्या गुणे । झाले विश्वाचे देखणे।।७१८.३,चंचळाचे गुणे द्वैत झाले। ५८८.२, द्वैतपण चंचळगुणे।६०८.२

२) चिद्गुणेची झाला भेद । ६३४.४

३) शब्द हा चंचळ शब्द हा चंचळ । ५०.१

४) शब्द कैचा उठे अशब्दाचे ठायी । त्याचे मूळ पाही स्मरण ते ।।५१.१

५) चिद्रूप जे स्मरण । झाले सगुण निर्गुण ।। ९९४.२

६) चंचळू ते माया । ३२.३

७) चंचळ माया देखू निरंजनी । १०५५.३,

८) चंचळ लहरी उसळली । १२७६.१
तेचि आदिमाया तेचि आदिमाया ।। १२७६.२

तर त्यातील चंचळ ही रेषा आहे.[१] आणि ही चंचळ रेषा म्हणजेच बहुगुणी माया आहे.

मायेमुळे निर्गुण ब्रह्म सगुण ब्रह्म / ईश्वर झाले आहे. म्हणून ईश्वराला उद्देशून दासराम म्हणतात :- तुझी माया चंचळ आहे आणि ती विश्वाचा खेळ करते.[२] म्हणून मायेबद्दल बोलावयाचे पण आत्मवस्तु मात्र[३] पहावयाची आहे.

हे जे निश्चळात उठणारे चंचळ आहे, त्याला शून्य असे दासराम म्हणतात. तीच विशाल माया आहे आणि तिच्या पलीकडे[४] ब्रह्म आहे. आणि हे जे चंचळ आहे, जे चंचळ माया आहे, जे चंचळ शून्य आहे, त्या शून्याचा खेळ म्हणजे विश्व आहे, पण[५] निरंजन आत्मा आहे तसाच रहातो.

आत्तापर्यंत असे सांगून झाले :- निश्चळ ब्रह्मात चंचळ उठते.[६] हे चंचळ म्हणजे माया आहे. चंचळामुळे शब्द उद्‌भूत होतो इत्यादी. हा सर्व भाग दासरामगाथ्यात पुढीलप्रमाणेही व्यक्त झाला आहे :-

निश्चळ ब्रह्म हे घन आहे, तर चंचळ हे पोकळ[७] आहे. हे चंचळ म्हणजे माया आहे. परमात्मा हा घन, निश्चळ आहे, तर त्यात उठणारे चंचळ म्हणजे माया[८] ही पोकळ आहे.

---

१) निश्चळी वर्तुळ चंचळ रेषा । पहाणे माया ब्रह्मगुण वेषा ।। १०५.१

२) तुझी माया हे चंचळ । करी विश्वाचा हा खेळ । ९९१.१

३) निश्चळाचे अंगी उठले चंचळ । मांडिलासे खेळ बोलण्याचा ।। १४०९.३
महामाया बोलायाची । आत्मवस्तु देखण्याची ।। १३५२.१

४) शून्य ते चंचळ माया रे विशाल । पैल ते विमल निजरूप ।।१३३१.१

५) शून्याचा हा खेळ शून्याचा विस्तार । आत्मा निरंतर जैसा तैसा।।१३३१.३

६) निश्चळाचे अंगी उठले चंचळ । १४०९.३

७) निश्चळ घन चंचळ पोकळ । १५०४.२

८) निःशब्द परमात्मा माया पोकळिमा । १४९८.३

निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी चंचळ शब्द[१] उठतो. मूळ निश्चळ ब्रह्मात हुंकार उठला. तो शब्दस्वरूपी होता. तेथेच मूळमाया[२] जन्मली.

निश्चळ ब्रह्मात उठलेला शब्द आणि माया यांचा परस्परसंबंध काय याबाबत दासराम सांगतात की माया ही शब्दाचे[३] कारण आहे (चंचळ ते माया शब्दाचे कारण । १३१७.२). याउलट शब्दापासून वांझ म्हणजे माया-मायेलाच अनेकदा वांझ म्हटले जाते - जन्मली (शब्दापासुनी वांझ जन्मली । मोहमायेची पुतळी रे ।। १७९३.२). म्हणजे माया आणि शब्द हे एकमेकांपासून उद्‌भूत होतात.

## ३) माया आणि ब्रह्म यांचा संबंध

ब्रह्म हे निःश्चळ, निःशब्द, निर्गुण आहे. त्याच्या संदर्भात माया ही उपाधी येते. आणि ही माया आणि ब्रह्म यांचा संबंध येतो. हा संबंध पुढीलप्रमाणे सांगता येतो :-

(१) माया ही उपाधी ब्रह्माला येते. त्यामुळे ब्रह्माचे ज्ञान होत नाही. याचे कारण तिच्याजवळ आवरण शक्ती आहे. तिच्या योगे ती ब्रह्मावर आच्छादन घालते. (२) मायेजवळ विक्षेप शक्ती आहे. तिच्या योगे ती ब्रह्मावरच विश्वाचा भास दाखवते. (३) निर्गुण ब्रह्म हे निश्चळ आहे तर माया चंचळ आहे. ब्रह्मात उठणारे चंचळ म्हणजे माया आहे. (४) निश्चळ ब्रह्माला वर्तुळ म्हटले तर मायेला रेषा म्हणता येते. (५) मायेच्या[४] पलीकडे ब्रह्म आहे.

आता दासराम सांगतात की ही माया ब्रह्माचे ज्ञान करून घेण्यास उपयोगी आहे. ही माया सहजपणे ब्रह्म[५] दाखविते. ही मायाच[६] ब्रह्मज्योती प्रगट

---

१) तेथे शब्द हा चंचळ । १३२२.२, निःश्चळ निःशब्द चंचळ तो शब्द ।१५०४.३

२) मूळ ब्रह्मरूपी निघाला हुंकार । तेथे झाली थोर मूळमाया ।१५०६.१

३) चंचळता झाली वायुरूप माया । तेथे आला उदया प्रणव गा ।।१५०६.२

४) निःशब्द परमात्मा । माया पोकळिमा । १४९८.३ तेचि प्रकृती चराचरा कारण । १४९८.४ त्याचे पैल पूर्णब्रह्म देख ।। १४९८.४

५) कैसी हे माया ब्रह्म दावी लीलया । ४०.२

६) दासराम प्रार्थी माय आदिशक्ती । जिने ब्रह्मज्योती प्रगट केली ।।४०.५

करते. मायेमुळेच निर्गुण ब्रह्म सगुण होते. हे सर्व लक्षात घेऊन दासराम व्यावहारिक भाषा वापरून सांगतात की, माया ही ब्रह्माची[१] माता आहे.

हे सर्व पाहिल्यावर असे वाटू लागते की, माया म्हणून ब्रह्माखेरीज आणखी एक शक्ती आहे. तेव्हा प्रश्न असा पडतो की, ब्रह्माच्या जोडीने माया हे दुसरे स्वतंत्र सत्य तत्त्व आहे काय? या प्रश्नाचे उत्तर दासराम नाही असे देतात. मायेच्या बाबतीत दासराम आणखी असे म्हणतात :- माया ही नरोटी आहे. तिला सोडून[२] द्यावयाचे आहे. माया ही खोटी आहे. स्वप्न खोटे असते, माया ही स्वप्न[३] आहे. मृगजळ खोटे असते, माया[४] ही मृगजळ आहे. ब्रह्मावर भासणारी माया ही मिथ्या[५] आहे. माया ही मिथ्या विकल्प[६] आहे.

याचा अर्थ असा की, माया म्हणून काही नाही. माया म्हणून ब्रह्माचे जोडीने स्वतंत्र तत्त्व नाही. माया हे केवळ शब्द[७] आहे. आता शब्द हा असून नसून सारखाच[८] असतो. माया ही असून नसून सारखीच[९] आहे. याचा अर्थ असा होतो की माया हे ब्रह्माचे जोडीने स्वतंत्र तत्त्व नाही. कारण माया म्हणून ब्रह्माच्या जोडीने एखादा वेगळा पदार्थ नाही. माया म्हणून[१०] काही नाही.

माया म्हणून काही नाही याचा अर्थ ब्रह्मापेक्षा वेगळेपणाने माया म्हणून काही स्वतंत्र तत्त्व नाही. मग प्रश्न असा :- जी माया असे असे करते असे सांगितले ती माया नाही. याचा अर्थ तरी काय? हा अर्थ दासराम पुढीलप्रमाणे स्पष्ट करून सांगतात :-

---

१) ब्रह्माची हे माता धन्य आदिशक्ती । ४०.४

२) मायेमुळे दुःख जे का आहे खोटी । जाणिजे नरोटी त्वरे सोडी ।।१३७१.४

३) माया आहे स्वप्न । ६३.४

४) माया मृगजळ जाण । २५६.२

५) ब्रह्मरूपी मिथ्या माया। जाहली जैशापरी छाया।। ४१२.१,५१०.२, ५१२.२

६) माया मिथ्या विकल्प । १५०६.६

७) मुळी नाही माया बोल शब्द केवळ । १५०६.७

८) शब्द हा असोनी नसोनी सारिखा । १५०६.४

९) माया ही असोनी नासोनी सारखी । १५६७.८

१०) माया म्हणून काही नाही । ९९१.१, माया म्हणुनी काही नाही ।१३५२.२

मागे पाहिल्याप्रमाणे ब्रह्मात उठणारे चंचळ म्हणजे माया आहे. ब्रह्म हे निःश्चळ आहे, त्यातील चंचळ म्हणजे माया[१] आहे. खरे म्हणजे निर्गुण ब्रह्म हे निःशब्द, निःश्चळ, निवांत[२] आहे. माया ही काय हे पाहू गेले तर असे आढळते की, ब्रह्मातील चंचळ म्हणजे माया[३] आहे. ब्रह्मातील ही चंचळता/चांचल्य म्हणजेच वायुरूप[४] माया आहे. म्हणजे एका दृष्टीने पाहू गेल्यास, माया ही ब्रह्माची शक्ती आहे असे म्हणता येते. कारण ती ब्रह्मातीलच चंचळ आहे. आणि शक्ति ही शक्तिवानापेक्षा वेगळी[५] नसते म्हणून ब्रह्माची शक्ति असणारी, माया ही ब्रह्मापेक्षा वेगळी, असे स्वतंत्र तत्त्व नाही. ती ब्रह्मरूपच[६] आहे. म्हणून माया आणि ब्रह्म[७] हे एकच आहेत. याचा अर्थ असा होतो की, माया काय आहे की नाही हे पहावयास गेले तर असे आढळते की, माया हीच ब्रह्म आहे. आणि ब्रह्म काय आहे म्हणून पहावयास गेले तर ब्रह्म म्हणजे माया आहे असे दिसून[८] येते. याचा अर्थ इतकाच की, माया ही ब्रह्मापेक्षा वेगळे तत्त्व नसून, माया हीच ब्रह्म आहे आणि ब्रह्मच माया आहे.

माया तेची ब्रह्म ब्रह्म तेची माया ।३९.२

माया आणि ब्रह्म एकच हे वाचावयास अथवा ऐकावयास चमत्कारिक वाटले तरी अनुभवी संतांच्या दृष्टिकोनातून 'माया तेचि ब्रह्म' असेच आहे.

*****

---

१) निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया । ४२.१,१५०४.१ चंचळ ते माया निश्चळ ते ब्रह्म । १६४२.१

२) घनानंद ब्रह्म निःशब्दू निवांत । १४२६.७

३) माया ही पहाता चंचळ चंचळ ।१४२६.६

४) चंचळता झाली वायुरूप माया । १५०६.२

५) शक्ती वेगळी नोहे बा आणिक । ४४.३

६) ब्रह्म शक्ती पूर्ण ब्रह्मरूप । ४४.४

७) माया ब्रह्म एक एकपणे दावी । ३१९.२

८) ब्रह्म पहाता माया माया पहाता ब्रह्म । ३९.५

# उन्मनी

भारतीय संकल्पनेनुसार धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ आहेत. पुरुषार्थ म्हणजे मानवी जीवनाचे ध्येय/साध्य/प्राप्तव्य. ही ध्येये माणसाने आपल्या जीवनात साध्य करून घ्यावीत अशी अपेक्षा आहे. या चार पुरुषार्थांपैकी पहिले तीन म्हणजे धर्म, अर्थ आणि काम हे प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न बहुतेक सर्व माणसे करीत असतात. परंतु मोक्षाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणारे फार थोडे लोक दिसून येतात.

आता मोक्ष म्हणजे काय याविषयी भारतातील निरनिराळ्या तत्त्वज्ञांनी भिन्न मते मांडलेली आहेत. त्यामध्ये आद्य शंकराचार्यांच्या केवलाद्वैत वेदांताच्या मते मोक्षाचे स्वरूप असे आहे :- माणसाचा जीव हा मूलतः अंतिम तत्त्व आत्मा/ब्रह्म आहे. पण जीवाला त्याचा विसर पडला आहे. तेव्हा हा विसर दूर करून माणसाने आपल्या जीवनात आत्मरूप/ब्रह्मरूप प्राप्त करून घेतले, तर तोच त्याचा मोक्ष आहे. कारण ब्रह्म होणे हाच मोक्ष आहे (ब्रह्मभावश्च मोक्षः||).

शंकराचार्यांची ही मोक्षविषयक संकल्पना मराठी संतांनी मान्य केली आहे. या संतांच्या मते, माणसाला चार देह आणि चार अवस्था आहेत, या चार देहांचा आणि अवस्थांचा निरास करून जीव जर त्यांचे पलीकडे असणाऱ्या उन्मनी अवस्थेत गेला आणि तेथे तो आत्मरूप/ब्रह्मरूप झाला तर तोच त्याचा मोक्ष आहे आणि हा मोक्ष माणूस चालू म्हणजे विद्यमान जीवनातच प्राप्त करून घेऊ शकतो. असा मोक्ष ज्याला प्राप्त होतो तो जीवन्मुक्त होतो. जीवन्मुक्त म्हणजे विद्यमान जीवनात

जिवंत असतानाच मुक्त झालेला पुरुष होय. सर्व आत्मसाक्षात्कारी संत हे जीवन्मुक्त होते.

असेच एक जीवन्मुक्त संत विसाव्या शतकात महाराष्ट्रातील सांगली या गावी होऊन गेले. त्यांचे नाव दासराममहाराज केळकर. त्यांनी केलेल्या पद्यात्मक लिखाणाचा संग्रह असणारा ''दासराम गाथा'' प्रकाशित झाला आहे. या गाथ्यात दासराममहाराजांनी चार देह, चार अवस्था आणि त्यापलीकडील उन्मनी अवस्था याबद्दल सांगितले आहे आणि त्याचाच विचार प्रस्तुत लेखात केलेला आहे. ते मांडण्यापूर्वी चार देह आणि चार अवस्था याबद्दलची थोडी सामान्य माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. ही माहिती पुढीलप्रमाणे :-

माणसाचा स्थूल पांचभौतिक देह सर्वांना दिसत असतो. स्थूल देह चार्वाकापासून ते शंकराचार्यांपर्यंत सर्वांना मान्य आहे. हा स्थूल देह म्हणजेच आत्मा असे चार्वाक मानतात. पण या स्थूलदेहापेक्षा आत्मा वेगळा आहे असे मानणारे काही तत्त्वज्ञ होते. त्यांच्या मते या जगात जीव जी काही बरीवाईट कर्मे करतो, त्यांचे फळ त्याला भोगावे लागते. सर्वच कर्मफळे चालू जीवनात मिळत नाहीत. त्यासाठी त्याला मरणोत्तर पुनः जन्म घ्यावा लागतो. मरणोत्तर जीवाबरोबर जाणारा एक सूक्ष्म देह आहे. हा सूक्ष्म देह योगी लोकांना दिसतो, असे सांगितले जाते. अशा प्रकारे स्थूलदेहाच्या जोडीने दुसरा सूक्ष्म देह मानला गेला आहे. आता या स्थूल आणि सूक्ष्म देहांना कारणीभूत असणारा असा आणखी एक ''कारण'' देह आहे, असे शंकराचार्यांचा केवलाद्वैतवेदांत सांगतो. त्यामुळे माणसाचे स्थूल, सूक्ष्म आणि कारण असे तीन देह झाले. या तीन देहांच्या जोडीने ''महाकारण'' नावाचा चौथा देह साक्षात्कारी संतांनी सांगितला. अशाप्रकारे माणसाचे चार देह झाले. (या चार देहांच्या तपशीलवार विवेचनासाठी

पहा :-विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, १९९२ मधील 'परमार्थातील पाच देह' हा माझा लेख).

या चार देहांना अनुसरून चार अवस्था मानल्या गेल्या आहेत, त्या अशा :- १) जागृति अवस्थेत स्थूल देह कार्यरत असतो. २) स्वप्न या अवस्थेत सूक्ष्मदेह क्रियाशील असतो. ३) सुषुप्ति (निद्रा) या अवस्थेत कारण देह असतो. ४) तुर्या अवस्थेत महाकारण देह असतो. या चार अवस्थातील पहिल्या तीन अवस्था सर्व माणसांना येत असतात. तुर्या ही चौथी अवस्था परमार्थाची काही वाटचाल केलेल्या माणसाला प्राप्त होत असते. या चार अवस्थांच्या पलीकडे उन्मनी अवस्था आहे.

या उन्मनी अवस्थेचे दासराम गाथ्यातील विवेचन पहाण्यापूर्वी आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी ती अशी :- शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान आधुनिक संतांनी प्रायः स्वीकारले असले तरी त्यांनी सगुण आणि निर्गुण ब्रह्म एकच असे म्हटले आहे, तेही लक्षात घेणें आवश्यक आहे. सगुण ब्रह्म म्हणजे ईश्वर. या सगुण ब्रह्मास/ईश्वराला आधुनिक संतांनी केशव,राम, कृष्ण इत्यादि नावे दिली आहेत. तेव्हा या संतांच्या वचनांचा विचार करताना हीही गोष्ट लक्षात ठेवावयास हवी.

वरील सर्व भाग दासराम गाथ्यात कसा आला आहे, हे यापुढे सांगितले आहे.

## अंतिम तत्त्व सगुण-निर्गुण आहे

आत्मा/ब्रह्म हे अंतिम सत्य तत्त्व आहे. ते सत् चित् घन[१] आहे.

---

१) आत्मवस्तु सत्‌चित्‌घन । १०१.१०, ६२८.४, परमात्मा तो निःशब्द। ३८.२. दासराममहाजांचे मते, नाम हेच ब्रह्म आहे. ते म्हणतात :- मूळ निर्विकल्प नाम ।१८१८.३, निःशब्द ते नाम । १९१.४, एकतत्त्व नाम स्वतःसिद्ध परम । अविनाश ब्रह्म मूळरूप ।।१२९.२, स्मरणामाजी देखे नाम । निःशब्द ते पूर्ण ब्रह्म।।७५८.४

हा आत्मा निर्गुण असल्याने तो निःशब्द, निश्चळ अशाप्रकारच्या शब्दांनी सांगावा लागतो[१]. या ब्रह्माला माया ही उपाधी[२] येते. या मायेमुळे निर्गुणाचेच सगुण ब्रह्म[३] झाले. मायारूपी शक्तीने सगुण/साकार असा देव/ईश्वर ही संकल्पना[४] आली. म्हणजे निर्गुण ब्रह्मापासून सगुण ब्रह्म/देव/ईश्वर असा भाव झाला आणि ही माया ईश्वराची असे मानले जाऊ[५] लागले. मायेमुळे सगुण ब्रह्माची /ईश्वराची संकल्पना आली. तथापि सगुण आणि निर्गुण ब्रह्म हे भिन्न नसून ते एकच आहेत.

## जीव हा ब्रह्म / ईश्वर आहे

परमार्थदृष्ट्या पाहिले तर जीव हा ईश्वर/केशव आहे. पण मायाजन्य देहाच्या उपाधीमुळे तो क्षुद्र झाला[६] आहे. खरे म्हणजे चैतन्यरूप अंतिम तत्त्व हे देहाच्या उपाधीत त्या आत्मरूप चैतन्याला जीव[७] म्हणतात. देहात चैतन्य[८] भरलेले आहे. जीव हा देहही नाही आणि मनही[९] नाही, तर तो केवळ अनिर्वाच्य ब्रह्म आहे.

---

१) निश्चळ निःशब्द वस्तु पूर्ण सत्य। २७.५; निश्चळ निःशब्द आतू परमात्मा।३०.३

२) ब्रह्मावरी झाली माया । मायेमाजी पडली छाया ।।६३.१

३) मायेमुळे आले ब्रह्मा ब्रह्मपण । सगुण निर्गुण प्रगट केले ।।४०.३; निर्गुणापासोनी जहाले सगुण । ५०.३

४) सगुण आकार शक्तीचेनी देव । ४३.४

५) अघटित माया परमेश्वरी । १३६.१; देवाचिये माया अघटित आहे । ३९७.३; माया प्रभूची अगाध । ४१०.३

६) जीव तत्त्वता केशव । माये धरिले क्षुद्रत्व ।। ६३.३; आम्ही नाही भिन्न । जाणा परब्रह्माहून ।। ३९२.१

७) उपाधीमाझारी प्रतीत जे झाले। जीव ते बोलिले आत्मरूप ।।१११.३

८) देहाचिये मध्ये भरले चैतन्य । ८३.१

९) नव्हेसी तू देह मन । तू तो अनिर्वाच्य जाण।।१६१.३

आता या जीवाने ब्रह्मरूप होऊन जाणे हे त्याचे कर्तव्य आहे. तसे होण्यातच[१] त्याच्या जीवनाचे सार्थक आहे. तसे त्याने केले तर त्याच्या जन्माचे कल्याण होणार आहे आणि ब्रह्मरूप[२] होणे हाच मोक्ष आहे. हा मोक्ष त्याने विद्यमान जीवनातच प्राप्त करून घ्यावयास हवा.

असे असले तरी मायेमुळे जीवाला भूल पडली आहे. मायेमुळे त्याला आपल्या मूळ रूपाचे विस्मरण झाले आहे आणि त्यामुळे देव/ईश्वर/ब्रह्म कुठे आहे असा त्याला प्रश्न पडला आहे. या ईश्वराचा शोध कसा आणि कुठे करावयाचा, असाही प्रश्न त्याला पडतो. या प्रश्नांची उत्तरे दासराम गाथ्यात सापडतात. त्यानुसार जीवाने ईश्वराचा शोध करून ईश्वररूप होऊन, मोक्षप्राप्ति करून घ्यावयाची आहे.

हे खरे की ईश्वर या जगात ओतप्रोत भरला आहे (ओतप्रोत जाण जगी आहे । ८३.१). तथापि या जगात देव कुठे शोधावयाचा? त्याचा साक्षात्कार करून घेऊन ईश्वररूप/ब्रह्मरूप होऊन, मोक्ष कसा मिळवावयाचा? याचे उत्तर असे :-

ईश्वर/ब्रह्म ज्याप्रमाणे जगात भरले आहे, त्याप्रमाणे ते मानवी देहातही आहे. आत्मवस्तू/ब्रह्मवस्तू ही जीवाच्या[३] अगदी जवळ आहे. म्हणजे ज्या देहात जीव आहे, त्या देहातच चैतन्यरूप आत्मा[४] भरलेला आहे. निश्चळ, निःशब्द असणारा परमात्मा हा जीवाच्या[५] देहातच आहे.

---

१) जन्माचे सार्थक रहावे ब्रह्मपणे ।

२) ब्रह्मभावश्च मोक्षः । शंकराचार्य

३) वस्तु जवळी जवळी । १६९५.१

४) देव काही दूर नाही । आहे आपुल्याच देही ।। ५३१.३;
देहाचिये मध्ये भरले चैतन्य । ८३.१

५) निश्चळ निःशब्द आतु परमात्मा । देखे दासरामा याचि देही।।३०.३

या देहातच जीवाला ईश्वराचा साक्षात्कार करून घेता येतो, म्हणून देह[१] हाच मुक्तीचे द्वार आहे असे म्हटले जाते.

तसेच देहातील देवाचा साक्षात्कार करून घेऊन, मोक्ष प्राप्त करून घेण्याची कळा साहजिकच या देहातच[२] आहे. आत्मसाक्षात्कार करून घेण्याच्या साधनाची कळा या देहातच[३] आहे. ज्यामुळे देव आणि भक्त यांची भेट होते ती परमार्थाची/परमात्म्याची खूण या देहातच[४] आहे. असे असले तरी, ही खूण जीवाला माहीत नाही. ती त्याने आत्मसाक्षात्कारी गुरूकडून जाणून घ्यावी लागते. आणि मग गुरूने जे साधन करावयास सांगितले आहे, ते केले तरच या देहात जीवाला आत्म्याचा साक्षात्कार[५] / अनुभव येतो. पण हा अनुभव येण्यापूर्वी जीवाच्या अंतरातील[६] मळ दूर होणे आवश्यक आहे आणि मग ज्या जपाने आत्मसाक्षात्कार होतो, तो सहजच होणारा जप एकवीस हजार[७] (सहाशे) आहे. तो व्हावयास हवा.

## चार देहापलिकडे आत्मा आहे

जरी देव अगदी आपल्या जवळ आहे, आपल्या देहात आहे तरी आपण देह म्हणजे आत्मा/देव नव्हे. हे पक्के लक्षात ठेवावयास हवे. माणसाला जे चार देह आहेत, त्यातील कोणताही देह हा देव नाही. तसेच त्या देहाचे कोणतेही घटक म्हणजे मन[८] इ. हेसुद्धा देव नाहीत. तसेच देव/आत्मा हा

१) नरदेह मुक्तिद्वार । येथे भेटे रघुवीर ।।१२९.२
२) नरदेही ठेवली मुक्तीची बा कळा । १५०१.७
३) देही ऐसी ठेविली साधनाची कळा । २३९.३
४) देहामाजी देखे परमार्थ खूण । भेटवी आपण देव भक्त ।।४८०.६
५) साधनाच्या यत्ने देही अनुभव । १५६९.४
६) अंतरीचा गेल्या मळ । देव आपुल्या जवळ ।।५३१.२
७) सहजाचा जप एकवीस हजार । ४९१.८
८) नव्हेसी तू देह मन । तो तू अनिर्वाच्य जाण ।। १३१.३

चार देहांच्या पलीकडे असल्यामुळे, देहातील डोळा इ. ज्ञानेंद्रियांना देव[१] कळणारा नाही, हेही स्पष्ट आहे. देवाला पाहण्याचा डोळा अगदी वेगळा आहे.

ज्या चार देहांच्या[२] पलीकडे देव/ईश्वर/आत्मा/ब्रह्म आहे, ते चार देह पुढीलप्रमाणे आहेत :-

१) स्थूल देह :- आपल्या डोळ्यांनी दिसणारा स्थूल देह आहे. तो आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी या पाच अचेतन[३] महाभूतांपासून बनलेला आहे. साहजिकच हा देह जड/अचेतन आहे.

२) सूक्ष्म देह :- स्थूल देहाचे आत सूक्ष्म देह[४] आहे. हा देह आकाश, वायू, तेज, जल आणि पृथ्वी या सूक्ष्म भूतांपासून बनलेला[५] आहे. या सूक्ष्म देहात मन आणि बुद्धी असतात. साहजिकच मन[६] इ. सूक्ष्म भूतांपासून बनलेली आहेत. मनामध्ये नाना वासना येत जात असतात. सूक्ष्म देहात मन हे मुख्य आहे. म्हणून ज्या मुख्य देहात मन आहे, त्यास दासराममहाराजांनी 'वासनेचा[४] देह' म्हटले आहे. आता ज्या आकाश इत्यादी सूक्ष्म भूतांपासून सूक्ष्म देह बनलेला आहे, ती जड/अचेतन आहेत, म्हणून सूक्ष्म देह हासुद्धा जड/अचेतन आहे.

---

१) नेत्र असमर्थ पहावया देव । २०८.२; डोळा न पाहे आत्मया।१३१३.२

२) स्थूल सूक्ष्म कारण देह । १५००.१-३; १५०२.१-४; महाकारण देही ऐकिजे प्रणव । १५००.४-५; महाकारण देही अखंड स्मरण ।१५०२.५ त्याचे पैल आहे निजवस्तु । १५००.६

३) पंचतत्त्वांचे जहाले शरीर । स्थूल देह साचार जाणिजे पा ।।१७०३.१; पाचांचे बनले तत्त्वता शरीर । ४५७.२

४) वासनेचा देह तयाचे अंतरी। सूक्ष्म तो विवरी चाळकू गा ।। १७०३.२

५) पंचभूत अंश सूक्ष्म देह । ३१४.१; पंचतत्त्व यांची जहाली शरीरे। ४८०.३

६) मन ते जाणावे पंचभूत अंश ।५७.१; पंचभूत अंश मन हे जाणिजे ।१२८८.२

३) कारण देह :- सूक्ष्म देहाच्या आत कारण नावाचा देह आहे. हा कारण देह[१] म्हणजे अज्ञान आहे. हा देह कारण म्हटला जातो याचे कारण तो स्थूल आणि सूक्ष्म देह यांचे कारण आहे.

४) महाकारण देह :- कारण देहाच्या पलीकडे महाकारण देह, हा महाकारण[२] म्हणजे ज्ञान आहे; तो ज्ञानमय आहे. (पण रामदासस्वामींनी म्हटल्याप्रमाणे महाकारण देहाच्या ज्ञानात मायेचेही ज्ञान असते म्हणून या देहातही आत्म्याचा साक्षात्कार होत नाही.)

या चार देहांच्या अनुषंगाने जीवाला चार अवस्था येतात. त्या म्हणजे जागृती[३], स्वप्न, सुषुप्ती आणि तुर्या. जागृती अवस्थेत स्थूल देह कार्यप्रवण[४] असतो. स्वप्न या अवस्थेत[५] सूक्ष्म देह क्रियाशील असतो. सुषुप्ती(निद्रा)[६] या अवस्थेत कारण देह असतो. आणि तुर्या या अवस्थेत[७] महाकारण देह असतो. यातील पहिल्या तीन अवस्था सर्वच माणसांना येत असतात. चौथी जी तुर्या अवस्था आहे, ती मात्र सर्व माणसांना येत नाही, तर परमार्थाची काही वाटचाल ज्याने केली आहे अशा माणसाला तुर्या ही अवस्था येते. या चार अवस्थांच्या पलीकडे उन्मनी अवस्था, की जिच्यामुळे ''सोऽहं रूप'' प्रतीतीला[८] येते.

माणसाला पंचेंद्रिये आहेत. उदा. डोळा, कान इत्यादी. त्यांना

---

१) अज्ञान कारण देह त्या भीतरी । १७०३.३
२) महाकारण देह ज्ञानमयी पूर्ण । १७०३.४
३) जागृति स्वप्न सुषुप्ति तुरिया । कारण ऐशीया जीव स्थिती ।। २४.१
४) जागृतिमाझारी स्थूल देहाभीतरी ।१४९५.१;
५) स्वप्नाचे माझारी सूक्ष्म देहाअंतरी । १४९५.२
६) सुषुप्तिमाझारी कारण शरीरी । १४९५.३
७) तुरीयेमाजी साचारी महाकारणांतरी । १४९५.४
८) सोऽहंरूप त्याचे पैल महाराणा । १४९५.५

फक्त देहाबाहेरील जगातल्या वस्तूंचे ज्ञान होत असते. साहजिकच, त्यांना देहातील आत्म्याचे ज्ञान होणार नाही हे उघड आहे.

सूक्ष्म देहात अंतःकरण म्हणजे देहाचे इंद्रिय आहे. हे अंतःकरण वृत्तीनुसार मन, चित्त आणि बुद्धि होते. या आतील इंद्रियांनाही आत्मा ग्राह्य नाही. याचे कारण असे :- संकल्प-विकल्प हे मनाचे स्वरूप[१] आहे. चित्त हेही सूक्ष्म देहातच[२] आहे. चित्त हे चैतन्याचा परमाणुरूप अंश[३] आहे. एखाद्या बाह्य विषयावर जर मन[४] एकाग्र झाले, तर त्याला चित्त म्हणतात आणि मनाच्या संकल्प-विकल्पांपैकी एकाद्या संकल्प-विकल्पाचा निश्चय करणे हे बुद्धीचे स्वरूप[५] आहे.

हे अंतःकरण सूक्ष्म देहाचा घटक आहे. साहजिकच तेही जड/ अचेतन आहे. साहजिकच या अंतःकरणाच्या तीनही घटकांना आत्मा ग्राह्य नाही. कारण तो मन, चित्त[६] आणि बुद्धि यांच्या पलीकडे[७] आहे.

वरील चर्चेचा मतितार्थ असा झाला. देह चार आहेत. या चार देहाअंती ४ अवस्था आहेत. ते सर्वच आत्मग्रहणासाठी निरुपयोगी आहेत. म्हणून असे सांगितले जाते की, या चार अवस्था व चार देह - विशेषतः देह

---

१) संकल्प-विकल्प । तेचि मनाचे स्वरूप ।। १०१०.२;
संकल्प विकल्प चालिले चिंतन ।

२) सूक्ष्म देही चित्त होय आकलन।१२८७.३

३) चित्त परिमाणू चैतन्य रूपाचे । १२७८.१; चित्त अणुप्रमाण चैतन्य गहन । १६८२.३; चित्त हेही परमाणुप्रमाण । चैतन्य संपूर्ण रूप त्याचे ।। १६८५.१

४) जेथे एक अग्र होय तुझे मन । जाणिजे सुजाण चित्त तेची ।१२८७.१

५) निश्चयी संकल्प । तेचि बुद्धीचे स्वरूप ।।१०१०.३

६) चित्ताबद्दल थोडे अधिक सांगणे आवश्यक आहे. चित्त हे जरी चैतन्याचा अंश म्हटले जाते तरी नेहमीच्या व्यवहारात ते बाह्य गोष्टींनी इतके लडबडून गेलेले असते की, ते चैतन्याचे/चैतन्यरूप आत्म्याचे ग्रहण करू शकत नाही.

७) मनाआधी चित्त । चित्ताआधी बुद्धि । बुद्धीपैल परात्मा । २९५.१

- यांना बाजूला सारून आत्मरूपाचे दर्शन/साक्षात्कार करून घ्यावा लागतो.

## चार देहांचा निरास

चार देहांच्या पलीकडे आत्म्याचा साक्षात्कार आहे. म्हणून चार देहांचा निरास करावा लागतो. आता चार देहांचा निरास म्हणजे काय? चार देहांचा निरास याचा अर्थ चार देहांचा नाश असा नाही. कारण जर स्थूल देह नष्ट झाला तर आत्म्याचे दर्शन कसे होणार? तेव्हा चार देहांचा निरास याचा अर्थ या देहांविषयी आसक्ति असता कामा नये. देह म्हणजे मी ही भूमिका नष्ट व्हावयास हवी. म्हणून दासराममहाराज सांगतात :- प्रथम देहाचा चटका[१] करावा लागतो. शरीर दूर ठेवले तर ब्रह्मस्वरूपात[२] बुडी मारता येते. कारण जर देहबुद्धी म्हणजे मी देह ही बुद्धी ठेवली तर आत्मदर्शन न होता जन्म[३] वाया जातो.

म्हणून ही चार देहांची खोळ दूर व्हावयास[४] हवी. चौदेहांच्या खोळीचे निरसन झाले तरच विमल[५] असे आत्मरूप कळते. चार देहांच्या[६] पलीकडेच आत्म्याचे बोल आहेत. चार देह दूर झाले की आत्मरूप[७] दिसते. चत्वार देहांचे निरसन झाले की जीव-तेज आत्म-तेजात[८] मिसळून जाते म्हणूनच संत हे देहामध्ये अनासक्त[९] असतात. चार देहांच्या निरसनाने संत

१) केला चटका देहाचा । २१.१
२) दूर ठेवोनिया कुडी । ब्रह्मरूपी मारा बुडी । ४२८.१
३) देहबुद्धि ठेवोनिया । जीव अखेर जाय वाया ।। ४३३.३
४) चौदेहाची खोळ निरसोनी । ६१४.५
५) उकलोनी आता चौदेहाची खोळ । दासराम विमलरूपी धाला ।।१३४५.१
६) चार देह शून्य सांडोनिया पैल । गुरुकृपे बोल ओळखावे ।।८५.६
७) चौदेह सांडोनी स्वरूप दावी । ३१६.५
८) चत्वार देहांचे झाल्या निरसन । तेजामाजी पूर्ण तेज मिळे ।।२३९.५
९) देहामाजी अनासक्त । दासराम म्हणे संत ।।३७.५

हे जिवंतपणीच[१] मृत झालेले असतात. आणि ते मोक्षरूप/आत्मरूप झालेले असतात.

**मनाचेच उन्मन होते**

चार देहांचा निरास झाल्यावर येणाऱ्या उन्मनी अवस्थेत ब्रह्मसाक्षात्कार होणार आहे. उन्मनी अवसथेत मनाचे नेहमीचे स्वरूप पालटते, ते मन म्हणून उरत नाही. म्हणजे असे :-

संकल्प-विकल्प करणे हे मनाचे स्वरूप आहे. या संकल्प-विकल्पांनीच परमार्थ/आत्मा दूर रहातो. म्हणून या मनावर[२] जर मात केली तर खरा परमार्थ/आत्मा प्राप्त होतो. आता मनावर मात करावयाची म्हणजे काय करावयाचे? या प्रश्नाचे उत्तर आहे :- मनावर मात म्हणजे मनाचे संकल्प-विकल्प दूर करणे होय. मनाचे संकल्पविकल्प दूर करावयाचे म्हणजे मनाला उघडे करावयाचे. आणि असे मन उघडे - संकल्प-विकल्परहित- झाले की ब्रह्माचा साक्षात्कार[३] होतो. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, 'मेलेले मन हेच[४] उन्मन होते.' याचा अर्थ असा की, 'जो मनाचा अभाव' त्यालाच अमन = (मन नसणे) अथवा उन्मन (= मनाच्या पलीकडे जाणे)म्हणतात. चार देहांचा व अवस्थांचा निरास झाला की मन हे निष्क्रिय होते, मन हे अमन अथवा उन्मन होते. चार अवस्थांच्या पलीकडील या अवस्थेला अन्य काही स्वतंत्र नाव न देता मनाच्या अभावालाच उन्मन/उन्मनी असे नाव दिले गेले आहे. ही पाचवी अवस्था 'मन' शब्दाचा वापर करूनच अमन म्हणजे मनाची उपस्थिती नसणारी

१) आपुले मरण देखिले संतांनी । देही ठेले होऊनी मोक्षरूप ।।५४०.३

२) दास म्हणे केल्या मनावरी मात । खरा परमार्थ दूर नसे ।।२७५.३

३) मन ते उघडे उघडे । करूनि पाहता ब्रह्म उघडे ।। ५९८.३

४) मनाचे उन्मन होत असे ।२८१.३; मनाविण उन्मन ।२२१.४

अथवा उन्मन (उत्+मन = मनाच्या पलीकडील) अवस्था असे म्हटले गेले आहे. मन मेलेल्या अशा उन्मनी अवस्थेत जीव हा ब्रह्मरूप होऊन[१] जातो.

### उन्मनी केव्हा प्राप्त होते

मनाचा अभाव झाल्यावर उन्मनी अवस्था[२] प्राप्त होते आणि आत्मसाक्षात्कार होतो. तुर्या अवस्था संपल्यावर उन्मनी अवस्था[३] प्राप्त होते. मग प्रश्न असा :- मनाचा अभाव केव्हा होतो? मनाचा चाळा म्हणजे संकल्प-विकल्प करणे हा केव्हा बंद होतो? मन मारण्यास कोणते उपाय आहेत? कारण मनावर मात केली तरच खरा परमार्थ[४]-साक्षात्कार साधतो. मनावर मात करण्यास पुढील उपाय आहेत :-

१. मन जेव्हा निःशब्दात प्रवेश करते, तेव्हा तेथे उन्मनी अवस्था[५] येते.

२. मन जेव्हा तदाकार/ब्रह्माकार होते तेव्हा ते उन्मन होते; कारण[६] त्यावेळी मनातले संकल्पविकल्प थांबलेले असतात.

३. बुद्धि आणि मन यांचा ग्रास झाला असता, मन उन्मन[७] होते. मन, चित्त[८], बुद्धि यांच्या पलिकडे आत्मा आहे.

---

१) मन मारूनि तेचि होऊ गा । २९५.१

२) मनाविण उन्मन परते निरंजन।२२१.४ ; मनीचे मनपण गेले । शून्य अंधार राहिले ।।२५४.२ ; मन गिळुनी उन्मनीपरता । दासराम तो हा स्वता ।।१०९.७

३) तुरियेचे अंतरी मनाचे उन्मन । ४९१.१३

४) दास म्हणे केल्या मनावरी मात । खरा परमार्थ दूर नसे ।।२७५.३

५) निःशब्दामाझारी प्रवेशता मन । होतसे उन्मन सुखरूप ।।२११.२

६) मन झाले तदाकार । तेथे हरपले विचार ।। २६५.३

७) ग्रासिलिया बुद्धी मन । कैचे जहाले उन्मन ।। ६२४.१

८) मन चित्त बुद्धी पर परमात्मा ।१७७.१

४. महाकारण देहातील ज्ञानात मन आटले की बुद्धिरूप उन्मनी[१] येते. ही बुद्धि निश्चयात्मक आहे. जिचे पूर्ण रूप म्हणजे उन्मनी आहे.

५. हरिनामात मन उन्मन[२] होते. नामाचा छंद लागला की मन[३] उन्मन होते. नामाच्या योगे मन, प्राण, जीव यांच्या पलीकडे असणारी उन्मनी[४] प्राप्त होते.

६. शरीरातील श्वासोच्छ्वासाची प्राणगति उलट झाली की मनाचे उन्मन[५] होते. श्वासोच्छ्वासाकडे श्रवण आणि दृष्टि हे एकवटून लागले असता श्वासोच्छ्वासाची क्रिया अगदी मंद होते. मग त्यातील जड अशा चत्वार देहांचा निरास होतो. मग त्यातील (चैतन्ययुक्त) प्राण हा ऊर्ध्वमुख होऊन भ्रूमध्याचे ठिकाणी जातो.

७) शरीराच्या आत सहजनादाचा नाद घुमत आहे. त्या नादाशी एकरूप झाले असता, उन्मनी लागून जीव[६] हा शिवरूप होतो.

**उन्मनीने काय साध्य होते?**

उन्मनी अवस्थेत आत्मसाक्षात्कार होतो असे सामान्यपणे म्हटले होते. त्याचा थोडा तपशील असा आहे :-

---

१) ज्ञानमुसेमाजी मनाची आटणी । देखिजे उन्मनी बुद्धीरूप ।। निश्चयात्मवृत्ती बुद्धीचे स्वरूप । हिचे पूर्णरूप उन्मनता ।।१२८९.४-५
२) हरिनामी जे उन्मन । परिपूर्ण समाधान ।।६१६.१
३) लागता उन्मनी नाम छंदी । २८६.३
४) दासरामा नामी आत्मरूप दर्शन । जेथे जीव प्राण मन नाही ।।७२०.४
५) उलट हा प्राण । झाले मनोन्मन । ३१७.५
६) अंतरात नाद कसा घुमतसे पहा । नादमयी जहाल्या शिव कळतसे अहा ।२७०.१

१) उन्मनी ही प्रकाशरूप आहे. म्हणून उन्मनीची ज्योति असे म्हणतात. या उन्मनीची ज्योति लागताच आत्मरूपाची प्राप्ति[१] होते.

२) उन्मनी अवस्थेत चित्त हे चैतन्यरूप[२] होते.

३) उन्मनी अवस्थेत ईश्वराची पाऊले[३] दिसतात.

४) उन्मनी अवस्थेत अक्षर परमात्म्याचा साक्षात्कार[४] होतो.

५) महाकारण देहाच्या म्हणजे तुर्या अवस्थेच्या पलीकडे असणाऱ्या उन्मनी अवस्थेत संतांना - तसेच साधकांना - आत्मसाक्षात्काराची मौज अनुभवण्यास[५] मिळते.

६) महाकारणाचे पैल म्हणजे तुर्या अवस्थेचे पैल असणाऱ्या उन्मनी अवस्थेत निःशब्द परमात्म्याचा[६] अनुभव येतो.

७) मनाचे उन्मन होणे हीच समाधी[७] आहे. ही समाधी[८] अखंड असते.

उन्मनी अवस्थेत जीव हा ब्रह्मरूप होत असल्याने तोच मोक्ष आहे. साहजिकच विद्यमान जीवनात तो जीव मुक्त होतो. त्याला जीवन्मुक्त म्हणतात. हा जीवन्मुक्त प्रारब्धकर्मानुसार जरी देहात असला आणि संसारातील व्यवहार करीत असला, तरी तो देह, व्यवहार इत्यादींना सुटून असतो, त्यातून तो अलिप्त असतो. नारळाचा वाळलेला गोटा जसा

---

१) लागताची उन्मनी ज्योती । आत्मरूप येई हाती ।।२७२.३

२) चैतन्य हे चित्ता भेटवी का रे ।४७३.३

३) उन्मनीचे पोटी पाऊले गोमटी ।१७१९.२

४) उन्मनीचे जाता आत। अक्षर साक्षात्कार होत ।।१५४४.५

५) महाकारणाचे पैल ते जावोनी। देखिली संतांनी मौज देही ।।१५०३.१

६) निःशब्दानुभव ज्ञान तयापैल । ९७९.३

७) होता मनोन्मन समाधि ते । ४७०.४

८) अखंड समाधि न ढळे कधी । ४८७.७

करवंटीला सुटून असतो, तसा तो देह, व्यवहार इत्यादीतून सुटून असतो. म्हणजे उन्मनीत साक्षात्कार झालेला जीव चालू देहातच 'विदेही' होतो. त्याला संत म्हणण्यास हरकत नाही. असे विदेही संत हे देहात अनासक्त[१] असतात. हे संत देहात असतानाच[२] विदेही झालेले असतात.

*****

१) देहामाजी अनासक्त । दासराम म्हणे संत ।। ३७.५

२) देहीच विदेही झाले संत । ४८२.३

# विभाग दुसरा

# श्लोकांचे विवरण

# १. शिवापासोनिया आली परंपरा

श्रीदासराममहाराज केळकर यांनी आपल्या काही अभंग समूहांना ''पाठ'' असे नाव दिले आहे. अशा अनेक पाठांमध्ये त्यांचा ''स्वधर्मपाठ'' नावाचा एक पाठ आहे. स्व म्हणजे निज. म्हणून स्वधर्म म्हणजे निजधर्म. निजधर्म हे नावही श्रीदासराममहाराजांनी वापरलेले आहे. या स्वधर्माचे आचरण व्हावयास हवे असे दासराममहाराजांचे मत आहे. तसे झाल्यास ''परमानंदी मन मिळे'' (१४२९.४) अशी स्थिती होते. हा स्वधर्म व त्याची उपासना आपणास गुरुपरंपरेने प्राप्त झाली असे दासराम ज्या अभंगात सांगतात तो अभंग असा :-

**धन्य धन्य धन्य हनुमंत सद्गुरु ।**
**तेणे हा विस्तारु बोध केला ।।१।।**
**रामचंद्र माऊली परमची गुरु ।**
**स्थापियेला भारू निजधर्म ।।२।।**
**चिन्मयाचा धर्म देवाजीचे नाम ।**
**सकळा सुगम धर्मपाठ ।।३।।**
**रघुनाथप्रिय साधु भगवान ।**
**तेणे दिली खूण रामचंद्रा ।।४।।**
**गुरुलिंगजंगम रघुनाथप्रिया ।**
**बोधिती सदया निजधर्म ।।५।।**

**काडसिद्ध वोळले गुरुलिंगजंगमा ।**
**दाविले ते वर्मा पूर्ण कृपे ।।६।।**
**मरुळसिद्धांनी काडसिद्धा बोधिले ।**
**मरुळसिद्धा दाविले रेणाईने ।।७।।**
**शिवापासोनिया आली परंपरा ।**
**केलेसे विस्तारा हनुमंते ।।८।।**
**धन्य रघुनाथ धन्य ते गोविंद ।**
**कीर्तनी आनंद स्वधर्माचा ।।९।।**
**गुरुलिंगजंगमे लावियेले रोप ।**
**दाविले स्वरूप सत्य सत्य ।।१०।।**
**ऐकोनि पडसाद लिहिली अक्षरे ।**
***दासराम* सत्वरे शरण आला ।।११।।**

(दा.गा.१४५५)

स्वधर्म / निजधर्म सांगण्याची परंपरा भगवान शंकरांपासून सुरू झाली (८). शंकर हेच जगाचा उत्पत्तिकर्ता इत्यादि आहेत; रेवणसिद्धही तसेच आहेत(१७३३.१). म्हणून दासरामांच्या मते शिव व रेवणसिद्ध हे एकच आहेत; रेवणसिद्ध हे ''शंभुस्वरूप'' आहेत. संसारात बुडणाऱ्या जीवांना तारण्यासाठी रेवणसिद्ध आले (१७२३.२). प्रथम त्यांनी हा स्वधर्म आपले शिष्य जे मरुळसिद्ध त्यांना सांगितला (७). मरुळसिद्धांनी काडसिद्धांना बोध केला(७). काडसिद्ध हे गुरुलिंगजंगम ऊर्फ निंबरगीकरमहाराज यांचेवर प्रसन्न झाले आणि त्यांच्यावर कृपा करून त्यांनी स्वधर्माचे वर्म गुरुलिंगजंगमाना कथन केले(६). ही सिद्धत्रयी अतिमानवी होती. मानवांत स्वधर्माचा बोध करण्याचा उपक्रम

गुरुलिंगजंगमांनी केला. म्हणून ''गुरुलिंगजंगमे लावियेले रोप''(१०) असे येथे श्रीदासराममहाराज सांगतात.

यथाक्रम गुरुलिंगजंगमांनी रघुनाथप्रिय साधु या आपल्या शिष्याला दयेने निजधर्माचा बोध केला(५). भगवान रघुनाथप्रिय साधुमहाराज यांनी स्वधर्माची खूण रामचंद्रमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज यांना सांगितली(४). चिमड महाराजांनी 'देवाजीचे नाम हा जो चिन्मयाचा धर्म ।' तो धर्मपाठ आपले शिष्य हनुमंत म्हणजे तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना सांगितला आणि कोटणीसमहाराजांनी विस्तार केला (१,८). हनुमंतरायांनी म्हणजे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी सांगली गावात इ.स. १९०१ ते १९२४ अशी दोन तपे नित्य हरिकीर्तन करून निंबरगीकरमहाराजांनी लावलेल्या रोपाचा विस्तार केला.

हनुमंतरायांचे नंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव रघुनाथ आणि शिष्य गोविंद म्हणजे मामामहाराज केळकर यांनीही नित्य कीर्तन करून हनुमंतरायांची परंपरा पुढे चालविली आणि त्यांनी कीर्तनाद्वारे 'स्वधर्माचा आनंद कीर्तनात' प्रगट केला(९).

वरील गुरुपरंपरेने जो स्वधर्म/निजधर्म आणि त्याची उपासना सांगितली, त्या स्वधर्माचे स्वरूप संक्षेपाने पुढीलप्रमाणे सांगता येईलः-

स्वधर्म म्हणजेच निजधर्म म्हणजे आपला, म्हणजे आपणा जीवांचा धर्म. (तो वर्णाश्रमधर्म इत्यादींपेक्षा वेगळा आहे). हा धर्म मानवी देहात आहे आणि त्याचे योगेच देहाची धारणा होते (१४३९.१). हा स्वदेहातील धर्म मात्र ओळखून घ्यावयास हवा (१४२९.२). गुरुलिंगजंगमांनी म्हणजे निंबरगीकरमहाराजांनी त्याची खूण सांगून ठेवली आहे(१४२९.३).

देहामध्ये त्रिकालाबाधित, अढळ, सत्य, असा जो तत्त्वरूप अर्थ आहे, तोच धर्म आहे (१४३१.३). किंबहुना अढळ, अखंड, सत्यरूप असा धर्म आहे(१४३९.४). संक्षेपाने सांगायचे झाल्यास, मानवी शरीरात जो आत्मा आहे, तोच स्वधर्म आहे. हा आत्मा पूर्ण व स्वयमेव स्वतःसिद्ध असा आहे (१४५४.४).

हा आत्मा/धर्म मानवी शरीरात येऊन चलनवलन करतो (१४४३.३). प्राणाचे प्राणपण आणि मनाचे मनत्व या स्वधर्माने येते (१४३९.२). ज्यायोगे मनाचे स्मरण रहाते, तीच स्वधर्माची खूण आहे (१४४०.२). धर्मावाचून/आत्म्यावाचून प्राणी जिवंत राहू शकत नाही हीच स्वधर्माची खूण आहे (१४४१.९).

या आत्म्यावर/धर्मावर आपले प्रेम असते (१४५२.१). हृदयात असणारे नाम हे स्वधर्माचे वर्म आहे (१४३२.५). नाम हेच ब्रह्म आहे (१४३६.५). स्वधर्माचे वेड लागले की, गोड रामनाम मुखात येते (१४४३.१०). या स्वधर्माची / आत्म्याची उपासना नामाने करावयाची आहे(१४५६.६).

नामाची उपासना कशी करावयाची हे सद्गुरु सांगतात. ही उपासना केली असता, स्वधर्माचे म्हणजे आत्म्याचे दर्शन होते. आत्मदर्शन म्हणजेच आत्मरूप होणे. म्हणजेच जीवाने आपले मूळरूपाशी एकरूप होणे आहे. हेच जिवाचे जीवनात इतिकर्तव्य आहे.

***(१७.१२.२०११)***

***

## २. चिन्मय गुरुपरंपरा ही

श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायाचे अनुयायी होते. ते चिमड संप्रदायाला चिन्मय संप्रदाय असे म्हणत. त्यांना हनुमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचा अनुग्रह होता. या तात्यासाहेबमहाराजांपर्यंत गुरुशिष्यपरंपरा कशी आली होती ते त्यांनी ज्या अभंगात व्यक्त केले आहे तो अभंग असा :-

**कीर्तनकाळी नमितो पाही ।**
**चिन्मय गुरूवर परंपरा ही ।।१।।**
**असा सद्गुरू रेवणसिद्ध ।**
**बिंदुस्वरूप जे शंभू प्रसिद्ध ।।२।।**
**मरूळप्रभू श्रीकाडसिद्ध ।**
**अर्धमातृका रूप अगाध ।।३।।**
**अकार जाणा नारायण ।**
**काडसिद्ध ज्या गुरुरूप जाण ।।४।।**
**उकार लक्षुमी अक्का जाण ।**
**रघुनाथप्रिय बंधुप्रमाण ।।५।।**
**मकार साधुमहाराज ।**
**नारायण ज्या सद्गुरुराज ।।६।।**
**ईकार प्रभू रामराय ।**
**साधुराम जया श्रीगुरुराय ।।७।।**

**एकार प्रभू हनूमंत ।**
**धन्य सद्गुरु राम समर्थ ॥८॥**
**येथे झाला पूर्णोंकार ।**
**गुरु नारायण नामोच्चार ॥९॥**
***गोविंदतनय* प्रेमे कृपाकर ।**
**मागत मस्तकी असो निरंतर ॥१०॥**

(दा.गा.७४०)

हरिकीर्तनाचे प्रारंभी नमन केले जाते. आपल्या कीर्तनाचे नमन म्हणून श्रीदासरामांनी आपल्या संप्रदायातील गुरुशिष्यपरंपरेला या अभंगात वंदन केले आहे. येथे हे लक्षात घ्यावे. श्रीदासराममहाराज हे पद नेहमी म्हणत नसत. त्यांनी आपल्या वडिलांचे - मामामहाराजांचे कीर्तनाचे नमनच प्रायः स्वीकारलेले होते. या अभंगात ''चिमड संप्रदाय परंपरा'' असे न म्हणता दासरामांनी चिन्मय परंपरा असे म्हटले आहे. याचे कारण असे की या संप्रदायात ''चैतन्याचे द्वारा चैतन्याचे साधनाने चैतन्याचा साक्षात्कार'' प्राप्त होतो. म्हणून 'चिन्मय परंपरा' हे नाव सार्थ ठरते. या परंपरेतील गुरुशिष्यांची नावे या अभंगात सांगितलेली आहेत.

चिन्मय संप्रदाय रेवणसिद्धांपासून सुरू झाला. हे रेवणसिद्ध हे लिंगायत धर्माच्या पाच आचार्यांपैकी मुख्य आचार्य होते. ते सोमेश्वर पिंडीतून प्रगट झाले होते. श्रीदासराममहाराजांच्या मते ते भगवान शंकररूप होते. साधनात शंकरांचा साक्षात्कार प्रकाशाचा बिंदू या स्वरूपात होतो म्हणून रेवणसिद्धांना येथे 'बिंदूस्वरूप जे शंभू प्रसिद्ध' असे म्हटलेले आहे. त्यांचे स्थान हे रेणागिरी येथे आहे. रेवणसिद्धांचे शिष्य मरुळसिद्ध. यांचे स्थान मोंगलाईत उज्जेन येथे आहे. मरुळसिद्धांचे शिष्य काडसिद्ध. त्यांचे स्थान कोल्हापूरजवळील सिद्धगिरी या पर्वतावर आहे. काडसिद्धांचे स्वरूप

''अर्धमातृका रूप अगाध'' असे येथे म्हटले आहे. त्याचे कारण असे :- श्रीदासरामांच्या मते, ॐकाराला पाच मात्र आहेत. या पाच मात्रांशी दासरामांनी पाच गुरुशिष्यांचा संबंध पुढे जोडला आहे. ॐकाराला एक अर्धमात्रा आहे. ती गूढ आहे. म्हणून गूढ अर्धमातृका म्हणजे काडसिद्ध असे येथे श्रीदासराम म्हणतात.

काडसिद्धांचे शिष्य नारायण म्हणजे नारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर हे होत. ॐकाराच्या मातृकेशी त्यांचे ऐक्य सांगितले आहे (अकार जाणा नारायण । काडसिद्ध ज्या गुरुरूप जाण ।।). निंबरगीकरमहाराजांचे चिमड संप्रदायाशी संबंधित असे दोन शिष्य होते. एक म्हणजे महायोगिनी लक्ष्मीबाईअक्का. चिमड संप्रदायाचे संस्थापक रामभाऊ यरगट्टीकर यांचे निर्वाणानंतर काही वर्षे लक्ष्मीबाईअक्कांनी चिमड संप्रदायाचे नेतृत्व केले होते. त्यांना येथे ॐकाराची ''उकार'' मात्रा म्हटले आहे (उकार लक्ष्मीअक्का जाण). दुसरे शिष्य म्हणजे रघुनाथप्रिय साधुमहाराज. ते लक्ष्मीबाईअक्कांचे गुरुबंधु होते. त्यांचे समाधिस्थान चिमड गावी आहे. त्यांना येथे ॐकाराची ''मकार'' मात्रा म्हटले आहे (रघुनाथप्रिय बंधु प्रमाण । मकार साधुमहाराज ।। नारायण ज्या सद्गुरुराज ।।). ॐकाराची चौथी मात्रा ईकार आहे. ती मात्रा म्हणजे रामराय. हे रामराय म्हणजे रामचंद्रमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज. ते साधुमहाराजांचे पट्टशिष्य होते. त्यांनी चिमडगावी साधुमहाराजांचे समाधिमंदिर बांधवून घेतले आणि चिमड संप्रदायाचा प्रसार केला (ईकार प्रभू रामराय । साधुराय ज्या श्रीगुरुराय ।।). ॐकाराची ''एकार'' मात्रा म्हणजे हनुमंत. हनुमंत म्हणजे हनुमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज होत. हे कोटणीसमहाराज हे सामर्थ्यसंपन्न 'राम' म्हणजे रामचंद्र यरगट्टीकर यांचे शिष्य होते (एकार प्रभु हनुमंत । धन्य सद्गुरु राम

समर्थ ||). आपल्या गुरूच्या आज्ञेने कोटणीसमहाराजांनी नित्य हरिकीर्तन सुरू केले. स्थलांतरे करीत ते सांगली गावी स्थिर झाले आणि सांगली गावात त्यांनी इ.स.१९०१ ते इ.स.१९२४ अशी चोवीस वर्षे दररोज हरिकीर्तन केले.

श्रीकोटणीसमहाराजांच्या अखेर ॐकाराच्या पाच मातृका पूर्ण झाल्या. यानंतर नारायण म्हणजे निंबरगीकरमहाराज यांच्या नावाचा उच्चार करून श्रीदासराममहाराजांनी ही गुरुशिष्यपरंपरा पूर्ण केली आहे (येथे झाला पूर्णोंकार | गुरु नारायण नामोच्चार ||).

हे सर्व सांगून झाल्यावर गोविंदतनय म्हणतात. गोविंदतनय म्हणजे गोविंद अनंत ऊर्फ बापूराव ऊर्फ मामामहाराज केळकर यांचे चिरंजीव. म्हणजेच दासराममहाराज. ते अभंगाचे शेवटी प्रार्थना करतात :- माझ्या गुरुपरंपरेतील सर्व गुरुजनांचा कृपाकर माझे मस्तकी असो (गोविंदतनय प्रेमे कृपाकर | मागत मस्तकी असो निरंतर ||). श्रीदासराममहाराजांची प्रार्थना खरोखरच पूर्ण झाली. सद्गुरूच्या कृपेने ते आत्मसाक्षात्कारी सिद्धसंत झाले. त्यांचे पितृदेव श्रीमामामहाराज यांनी कोटणीसमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे ३८ वर्षे अखंड हरिकीर्तन केले. आपल्या वडिलांचे निर्वाण झाल्यावर श्रीदासराममहाराजांनी ३९ वर्षे अखंड हरिकीर्तन केले आणि ते चिन्मय संप्रदायाचे कळस झाले. त्यांचे विस्तृत चरित्र उपलब्ध आहे.

*(१०.०१.२०१२)*

***

## ३. विश्वाचा जनिता रेवणसिद्ध

श्रीदासराममहाराज केळकर हे एकदा आपल्या चिमड संप्रदायाच्या आद्य सिद्ध अशा रेवणसिद्धांचे दर्शनास रेणावी येथे गेले होते. तेथून परत आल्यावर त्यांचे स्वप्नात त्यांना मूतिरूपाने रेवणसिद्धांचे दर्शन झाले आणि रेवणसिद्धांनी त्यांच्या कपाळी विभूती लावली आणि त्याचवेळी रेवणसिद्धांच्या स्तुतिपर असे अभंग श्रीदासरामांना स्फुरू लागले. या अभंगसमूहाला त्यांनी 'रेवणसिद्ध पाठ' असे नाव दिले. त्या रेवणसिद्ध पाठातील एक अभंग असा आहेः-

**जगाचा नियंता सर्वाठायी सत्ता ।**
**विश्वाचा जनिता रेवणसिद्ध ।।१।।**
**करवीरक्षेत्री नवकोटी सिद्धांसी ।**
**कारागृहवासी सोडविले ।।२।।**
**रमकदेवी सुंदरी जहाली शरण ।**
**सामर्थ्य देखून सिद्धांचे या ।।३।।**
**तिने विष दिले कराया प्राशन ।**
**तव ते शिवार्पण जहाले वो ।।४।।**
***दासरामप्रभु* ऐसा सत्ताधीश ।**
**परमार्थी आस सकळ पुरवी ।।५।।**

(दा.गा.१७३३)

श्रीदासराममहाराज हे चिमड/चिन्मय संप्रदायाचे अनुयायी. चिमड संप्रदायात आद्य असे तीन सिद्ध होते. ते म्हणजे रेवणसिद्ध, मरुळसिद्ध

आणि काडसिद्ध. या तिघांमध्ये रेवणसिद्ध हे मुख्य होते. श्रीदासरामांचे मते, रेवणसिद्ध हे साक्षात् भगवान शंकर होते. शैवसंप्रदायात भगवान शिव हेच सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय करणारे आहेत, असे मानले जाते. त्याला अनुसरून दासराम म्हणतातः- ''जगाचा नियंता सर्वाठायी सत्ता । विश्वाचा जनिता रेवणसिद्ध।।'' या वचनात विश्वाच्या लयाचा उल्लेख नाही, तो येथे घ्यावयास हवा. भगवान शिवरूप असणारे रेवणसिद्ध हे जगाचा जन्म आणि जगाचे नियंत्रण करतातच, सर्वत्र त्यांचीच सत्ता आहे. ते सर्वश्रेष्ठ ईश्वर/शंकर आहेत.

जगातील परमार्थी माणसांचा उद्धार करणे हे कार्यही रेवणसिद्ध करतात, म्हणून रेवणसिद्ध माऊली ''जगाच्या उद्धारा धावोनिया आली'' असे श्रीदासरामांनी अन्यत्र सांगितले आहे. जगदोद्धार करण्यासाठी सोमेश्वराच्या पिंडीतून रेवणसिद्ध प्रगट झाले अशी आख्यायिका आहे.

हे रेवणसिद्ध दिसण्यात कसे होते, त्यांची मूर्ती कशी होती, हेही श्रीदासरामांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

भव्य सिद्धमूर्ती प्रसन्नता चित्ती । पहाताची शांती लाभे चित्ता ।।
जटाजूट मस्तकी त्रिशूळ ते हाती । चरणी शोभती पादुका ते ।।
एका हाती स्मरणी खांद्यावरी झोळी । तेजःपुंज उजळी नवलप्रभा ।।
शिवनामी वाणी रंगोनिया गेली । कंठी ते आगळी रुद्राक्षमाळा ।।

या रेवणसिद्धांचे मरुळसिद्ध हे मुख्य शिष्य आणि मरुळसिद्धांचे शिष्य काडसिद्ध. एका आख्यायिकेनुसार, काडसिद्ध हे अन्य कोणी नसून रेवणसिद्धच काडसिद्ध झाले होते आणि त्यांनी करवीर क्षेत्री रमक नावाच्या देवीचा पराभव केला.

करवीर (कोल्हापूर) क्षेत्री ''रमक'' नावाची देवी होती. तिच्याकडे भिक्षेला आलेला सिद्ध खरेच आत्मसाक्षात्कारी आहे का याची ती परीक्षा

घेत असे. तिची पद्धत अशी होती : आलेल्या तथाकथित सिद्धाला ती प्राशन करण्यास विष देई. त्याने जर विष पचविले तर तो खरा सिद्ध. तसे नसेल तर ती त्या तथाकथित सिद्धाला बंदीवासात टाकी. असे तथाकथित 'नव कोटी सिद्ध' तिने बंदीवासात टाकले होते. येथे कोटि हा शब्द संख्यावाचक नसून प्रकारवाचक आहे. म्हणजे नऊ प्रकारच्या सिद्धांना रमक देवीने कारावासात टाकले होते (करवीर क्षेत्री नवकोटी सिद्धांसी । कारागृहवासी ). असे म्हणतात की बंदीवासाला कंटाळलेल्या सिद्धांनी 'आपली सुटका करावी' म्हणून रेवणसिद्धांची करुणा भाकली. तेव्हा त्यांच्या हाकेनुसार रेवणसिद्ध करवीरक्षेत्री आले. त्यांना अंर्तज्ञानाने सर्व कळले होतेच. आल्या आल्या त्यांनी रमक देवीकडे भिक्षेची याचना केली. तिने नेहमीच्या पद्धतीनुसार त्यांना प्राशन करण्यास विष दिले (तिने विष दिले करण्या प्राशन). रेवणसिद्धांनी ते तत्काळ पिऊन टाकले. पण त्या विषाचा कोणताही परिणाम रेवणसिद्धांवर झाला नाही. कारण ते सर्व विष शिवार्पण झाले होते (तव ते शिवार्पण जहाले वो). रेवणसिद्धांचे हे सामर्थ्य पाहिल्यावर रमक देवी लज्जित झाली आणि ती रेवणसिद्धांना शरण गेली (रमकदेवी सुंदरी जहाली शरण । सामर्थ्य देखून सिद्धांचे या ।।). तिने त्यांची क्षमा मागितली. तेव्हा रेवणसिद्धांनी तिला आज्ञा केली, ''तू जे नव कोटी सिद्ध कारागृहात टाकले आहेत, त्या सर्वांना मुक्त कर.'' त्यांच्या आज्ञेला अनुसरून रमकदेवीने बंदीवासातील सर्व सिद्धांना मोकळे केले.

असे हे भगवान शिवरूप रेवणसिद्ध होते. ते आजही आपल्या भक्तांना दर्शन देतात. जयरामस्वामी वडगावकर, तात्यासाहेब कोटणीसमहाराज इत्यादींना त्यांनी दर्शन दिले होते.

सांगली जिल्ह्यातील विटे या गावाजवळील रेणावीच्या डोंगरावर रेवणसिद्धांच्या विश्रांतीचे स्थान आहे. तेथे दर अमावस्येला यात्रा भरते.

असे म्हणतात की, तेथील रेवणसिद्धांची पाषाणमूर्ती ही उभी होती. उंची जास्त असल्याने तिची पूजा करण्यास भक्तांना त्रास होई. तेव्हा ही मूर्ती आडवी झाली. आजही तेथे आडवी झोपलेली मूर्ती आहे. मूर्तीच्या नाभिस्थानी बाराही महिने थंडगार पाणी असते. हे पाणी साधे नसून 'नाभिकमलातोनि वाहे शुद्ध गंगा' असे दासराममहाराजांचे मत आहे. तेथे दररोज नवनाथ रेवणसिद्धांच्या दर्शनास येतात असे सांगितले गेले आहे. या स्थानी रेवणसिद्धांनी काही मृतांनाही जिवंत केले, अशा कथा आहेत (मृत शरीरेही जेणे उठविली).

असे हे शिवस्वरूप रेवणसिद्ध सर्वसत्ताधीश आहेत. ते दासरामांचे प्रभू/स्वामी आहेत आणि आपल्या एकनिष्ठ भक्तांची परमार्थाची आस ते पूर्ण करतात, असे दासराममहाराजांचे सांगणे आहे (दासरामप्रभु ऐसा सत्ताधीश । परमार्थी आस सकळ पुरवी।।).

अशा रेवणसिद्धांना नमस्कार असो.

*(०२.०१.२०१२)*

***

## ४. ऐका गुरुपरंपरा

**ऐका गुरुपरंपरा ऐका गुरुपरंपरा ।**
**अवतरले जगदोद्धारा ।।१।।**
**आदिपीठ काडसिद्ध ते आदिपीठ काडसिद्ध ते ।**
**ब्रह्मस्वरूपी एकरूप ते ब्रह्मस्वरूपी एकरूप ते ।**
**अवतरले जगदोद्धारा ।।२।।**
**तयांचे शिष्य निंबरगीकर । अवतारले गुरु दातार ।**
**रामनामी आनंद सारा।।३।।**
**तयांचे शिष्य साधुमहाराज । जयासी वश हा रामराज ।**
**घेतले ब्रह्म अवतारा।।४।।**
**तयांचे शिष्य रामभाऊमहाराज । अनंतकोटी राजाधिराज ।**
**घेतले राम अवतारा ।।५।।**
**तयांचे शिष्य हनुमंतराज । जयांचे असे कीर्तनकाज ।**
**घेतले हनुमंत अवतारा ।।६।।**
**धन्य धन्य गुरुदातार । जे का असती उदार ।**
**वश केले परमेश्वरा ।।७।।**
**दया क्षमा शांतीचा पुतळा । जिंकू शकला कळिकाळाला ।**
***दासावरी* ठेले कृपाकरा ।।८।।**

(दा.गा.७५१)

श्रीदासराममहाराज हे चिमडसंप्रदायातले. या संप्रदायास ते चिन्मय संप्रदाय असेही म्हणत. कारण या संप्रदायात चैतन्याचा साक्षात्कार हा

मुख्य आहे. दासराममहाराजांना वयाच्या चौदाव्या दिवशी हणमंत ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा अनुग्रह दृष्टिद्वारा लाभला. ते परमार्थात उदार होते आणि त्यांनी दासरामांना अनुग्रह दिला होता (धन्य धन्य गुरु दातार । जे का असती उदार।।). ते दया, क्षमा आणि शांती यांचा पुतळा होते (दया क्षमा शांतीचा पुतळा). त्यांच्या चरित्रात त्यांचे हे तीन गुण उठावदारपणाने दिसून येतात. त्यांनी परमेश्वराला वश केले होते (वश केले परमेश्वरा) आणि म्हणून ते कळिकाळाला जिंकू शकले (जिंकू शकला कळिकाळा). अशा श्रेष्ठ गुरूंनी 'राम' या 'दासावर' कृपाछत्र धरले, असे दासराममहाराज सांगतात. त्यांचा कृपाकर, त्यांचा अमृतहस्त बालपणी दासरामांच्या मस्तकावरून फिरला होता (दासावरी ठेले कृपाकरा).

संप्रदाय म्हणजे गुरुशिष्यपरंपरेने चालत आलेले तत्त्वज्ञान आणि साधन. हा संप्रदाय कोठून सुरू झाला हे शिष्यास माहीत असावयास हवे. या दृष्टीने आपल्या काही अभंगांत दासराममहाराजांनी आपल्या पूर्वीची गुरुशिष्यपरंपरा सांगितली आहे. त्यातलाच हा एक अभंग आहे. या अभंगात ते म्हणतात, ''जगाचा उद्धार करण्यास चिमड संप्रदायात जे गुरुशिष्य झाले त्यांची परंपरा ऐका (ऐका गुरुपरंपरा। अवतरले जगदोद्धारा ।।'').

चिमड संप्रदायाचे आद्यपीठ काडसिद्ध आहेत (आदिपीठ ते काडसिद्ध). दुसऱ्या एका परंपरा सांगणाऱ्या अभंगात 'पहिले ते रेवणसिद्ध' आणि 'दुसरे जाणा मरुळसिद्ध' असे दासराम सांगतात. रेवणसिद्ध हे भगवान शंकरस्वरूपी होते (शंभुस्वरूपी अगाध). म्हणजे चिमड संप्रदाय ही भगवान शंकरापासून सुरू झाला. रेवणसिद्ध, त्यांचे शिष्य मरुळसिद्ध आणि त्यांचे शिष्य काडसिद्ध ही सिद्धत्रयी भगवत्स्वरूपी होती, ब्रह्मस्वरूपी होती. म्हणून काडसिद्ध हे 'ब्रह्मस्वरूपी एकरूप ते' असे म्हटलेले आहे.

काडसिद्ध या अवतारात त्यांचे स्थान कोल्हापूरजवळील सिद्धगिरी या पवित्र पर्वतावर आहे.

या काडसिद्धांनी निंबरगीकरमहाराजांना अनुग्रह दिला. ते तुकाराममहाराजांचा अवतार अशी चिमड संप्रदायाची श्रद्धा आहे. त्यांचा आनंद रामनामात होता (रामनामी आनंद सारा). ते कर्नाटकातील देव निंबरगी या गावी रहात. तेथेच त्यांचे समाधिस्थान आहे.

निंबरगीकरमहाराजांचे शिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज होत (तयांचे शिष्य साधुमहाराज). हेही ब्रह्माचा अवतार होते (घेतले ब्रह्म अवतारा). ते आमरण ब्रह्मचारी होते. त्यामुळे त्यांना ब्रह्मचर्याचा अवतार असेही म्हणता येईल. त्यांना प्रभु रामराजा वश होता (जयासी वश हा रामराज). कर्नाटकातील चिमड या गावी साधुमहाराजांचे समाधिमंदिर आहे.

रामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज हे साधुमहाराजांचे शिष्य होते (तयांचे शिष्य रामभाऊमहाराज). ते 'अनंतकोटी राजाधिराज' होते. कोटणीसमहाराजांच्या मते ते प्रभूरामचंद्रांचा अवतार होते. म्हणून त्यांना येथे ''घेतले राम अवतारा'' असे म्हटले आहे. चिमडमहाराजांनी चिमड गावी राहून संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनीच चिमडगावी साधुमहाराज या आपल्या गुरूंचे समाधिमंदिर बांधवून घेतले आणि साधुमहाराजांचा पांडवपंचमीचा रथोत्सव निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेने चिमडला सुरू केला. चिमड येथेच चिमडमहाराजांची समाधी आहे.

हनुमंत/हणमंत ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे चिमडमहाराजांचे शिष्य (तयांचे शिष्य हनुमंतराज). मामामहाराज केळकर आणि दासराममहाराज यांच्या मते कोटणीसमहाराज हे रामायणातील

हनुमंताचा/मारुतीचा अवतार होते (धन्य हनुमंत अवतारा). त्यांनी सांगलीत इ.स.१९०१ ते इ.स.१९२४ या प्रदीर्घ काळात गुरूच्या आज्ञेने नित्य हरिकीर्तन केले (जयाचे असे कीर्तनकाज). 'हनुमानसमाधिमंदिर' आणि 'कैवल्यधाम' अशा दोन ठिकाणी सांगलीत त्यांची समाधिस्थाने आहेत.

कोटणीसमहाराजांचे शिष्य दासराममहाराज होत. दासरामांनीही ३९ वर्षे अखंड नित्यकीर्तन केले व परमार्थाचा पसारा वाढविला. सांगलीतील 'रामनिकेतन'मध्ये त्यांचे समाधि शिलासिंहासन आहे.

*(३०.१२.२०११)*

***

## ५. हनुमंतराय उदार उदार

श्रीदासराममहाराज केळकरांना वयाचे चौदावे दिवशी हनुमंतराय पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचा दृष्टिद्वारा अनुग्रह झाला होता. त्यांचे अनेक भक्त होते. आपल्या विशिष्ट भक्तांसाठी कोटणीसमहाराजांनी काय केले हे सांगणारा दासराममहाराजांचा पुढील अभंग आहे :

**हनुमंतराय उदार उदार ।**
**भक्तांना दिले निज भांडार ।।ध्रु.।।**
**धन्य रघुनाथा परमार्थ दिला ।**
**सारिखाचि केला आपुलिया ।।१।।**
**गुरुभक्ति बीजारोपण तैं केले ।**
**फळ चाखविले पुत्रालागी ।।२।।**
**नानासाहेबांसी अंतरीचे प्रेम ।**
**दिलेसे उत्तम हृद्गदची ।।३।।**
**निजधामी गेल्यावरी पैं येवोन ।**
**दिधलीसे खूण गोविंदासी ।।४।।**
**कीर्तनाचा ठेवा तयासी दिधला ।**
**आपुला म्हणविला दासालागी ।।५।।**
**पाहोनी भक्तांचे निर्मळ अंतर ।**
**दाविला ईश्वर कृपाबळे ।।६।।**
**माघ वद्य तृतिया दिन पाहुनिया ।**
**निशीत सखया प्रगटले ।।७।।**

**गोविंदरायानी करिता वंदन ।**
**आशिर्वाद जाण बोलियेले ।।८।।**
**तुझे रे कीर्तन चालेल अखंड ।**
**होशील उदंड जगामाजी ।।९।।**
**तयेपरी नित्य चालिले कीर्तन ।**
**धन्य धन्य जाण गुरु शिष्य ।।१०।।**
**सेवेचे निधान गंगाधरा दिले ।**
**आपुलेसे केले भक्तालागी ।।११।।**
**दिले सकळासी सोपे सुगम नाम ।**
**भेटती परम देव जेणे ।।१२।।**
**धन्य ब्रह्मरूप गुरु हनुमंत ।**
**तया शरणागत *दासराम* ।।१३।।**

(दा.गा.७३६)

हनुमंतराय म्हणजे हनुमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे होत. ते दासराममहाराज व अन्य काही भक्त यांचे गुरु होते. या हनुमंतरायांनी आपल्या जीवनात कुणाकुणाच्या बाबतीत काय काय केले हे या अभंगात दासराम सांगत आहेत.

हनुमंतराय हे व्यवहारात तसेच परमार्थात उदार होते. येथे त्यांचे परमार्थातील उदारपण प्रामुख्याने अभिप्रेत आहे. त्यांनी आपल्या परमार्थाचे भांडार सर्वस्व उघडे केले आणि ते भक्तांना वाटून टाकले. त्यासाठी ते रोज रात्री हरिकीर्तन करीत आणि कीर्तनाद्वारा त्यांनी परमार्थ भक्तांसाठी खुला केला (हनुमंतराय उदार उदार । भक्तांना दिधले निजभांडार ।।). इ.स.१९०१ पासून इ.स.१९२४ पर्यंत त्यांनी सांगलीत नित्यकीर्तन केले.

रघुनाथ हे तात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव. त्यांना त्यांनी उपदेशानुग्रह केला होता. इतकेच नव्हे तर रघुनाथावर कृपा करून तात्यासाहेबांनी रघुनाथाला आपल्यासारखे संत व साक्षात्कारी केले (धन्य रघुनाथा परामर्थ दिला । सारिखाची केला आपुलिया ।।). रघुनाथाचे ठिकाणी त्यांनी परमार्थातील गुरुभक्तीचे बीज पेरले आणि साक्षात्कार हे त्याचे फळ रघुनाथांना मिळाले (गुरुभक्ति बीजारोपण ते केले । फळ चाखविले पुत्रालागी ।।).

मुधोळ, बेळगाव, तेरदळ अशी स्थलांतरे करीत तात्यासाहेब सांगली गावात स्थिरावले होते. सांगलीत असताना कोटणीसमहाराजांचा फडणीस कुळातील 'नानासाहेब' या गृहस्थाशी परिचय झाला. हे नानासाहेब 'नानबा फडणीस' या नावाने प्रख्यात होते. हे नानबा कोटणीसमहाराजांचे निःसीम भक्त होते. ते कीर्तनात कोटणीसमहाराजंची साथही करीत. त्यांच्या विषयी कोटणीसमहाराजांना फार आपुलकी वाटू लागली ती इतकी की त्यांनी नानबांना सहकुटुंब आपल्या घरी ठेवून घेतले. अशाप्रकारे नानबा फडणीसांना कोटणीसमहाराजांनी आपले प्रेम दिले आणि नानबा आता घरचेच झाल्यामुळे अनेकदा त्यांनी नानबांना आपले मनातीलही सांगितले (नानासाहेबांसी अंतरीचे प्रेम । दिलेसे उत्तम हृद्‌गदची).

याचवेळी सांगलीत गोविंद अनंत ऊर्फ बापूराव केळकर हे सज्जन गृहस्थ होते. तेही कोटणीसमहाराजांचे भक्त होते. ''तुमचे पूर्वनियोजित गुरु चिमडचे नारायणमहाराज यरगट्टीकर आहेत'' असे सांगून त्यांनी गोविंदांना नारायणमहाराजांकडे अनुग्रहासाठी पाठविले होते. तरी गोविंद हे मनोमनी कोटणीसमहाराजांना गुरु मानीत. कोटणीसमहाराज इ.स. १९२४ साली निजधामास गेले. त्यांचेनंतर त्यांची नित्यकीर्तनाची परंपरा आपण चालवावी अशी गोविंदांची म्हणजे बापूराव केळकरांची इच्छा होती. पण त्या इच्छेला गुरूचे - कोटणीसमहाराजांचे पाठबळ हवे होते. ते देण्यासाठी कोटणीसमहाराज आपल्या निर्याणानंतर इ.स. १९२४ साली माघ वद्य तृतीयेला मध्यरात्री दासबोध वाचत असणाऱ्या बापूरावांपुढे प्रगट झाले. अशाप्रकारे निजधामी

गेल्यावरही कोटणीसमहाराजांनी आपल्या अद्‌भुत सामर्थ्याची खूण बापूरावांना दिली (निजधामी गेल्यावरी पैं येवोन । दिधलीसे खूण गोविंदासी । माघ वद्य तृतिया दिन पाहुनिया । निशीत सखया प्रगटले।।). कोटणीसमहाराज प्रगट झाल्यावर गोविंदरायांनी त्यांना वंदन केले. तेव्हा कोटणीसमहाराजांनी बापूरावांना आशीर्वाद दिला (गोविंदरायांनी करिता वंदन । आशीर्वाद जाण बोलियेले ।।). कोटणीसमहाराज बोलले ''गोविंदा/ बापूरावा, तू नित्यकीर्तन कर. तुझे ते कीर्तन अखंड चालेल आणि अखंड कीर्तनकार म्हणून जगात तुझी कीर्ति होईल'' (तुझे रे कीर्तन चालेल अखंड । होशील उदंड जगामाजी ।।). कोटणीसमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे गोविंदाचे कीर्तन अखंड चालू झाले आणि बापूरावांनी अखंड अडतीस वर्षे आपल्या देहपातापर्यंत कीर्तन केले. नित्यकीर्तन करताना बापूरावांना अनेक अडचणी आल्या. पण निश्चयाने त्यांनी अखंड कीर्तन केले. कारण कोटणीस गुरूंची कृपा त्यामागे होती. खरोखर कोटणीस हे गुरु आणि गोविंद हे शिष्य धन्य होत (तयेपरी नित्य चालिले कीर्तन । धन्य धन्य जाण गुरुशिष्य ।।). तात्पर्य काय ''कीर्तनाचा ठेवा तयासी दिधला । आपुला म्हणविला दासालागी ।।''. कोटणीसमहाराजांची कृपा एवढ्यावरच थांबली नाही. कोटणीसमहाराजांनी गोविंदरावांचे साधन पूर्ण करून घेतले आणि त्यांना ईश्वराचा साक्षात्कार घडवून आणला (पाहोनी भक्ताचे निर्मळ अंतर । दाविला ईश्वर कृपावंते ।।). कोटणीसमहाराजांच्या नित्यकीर्तनास 'गंगाधर' या नावाचे भक्त येत असत. ते गंगाधरसिंग दीक्षित या नावाने ओळखले जात. तात्यासाहेबांनी देह ठेवल्यानंतर त्यांच्या कलेवराला अग्नि देण्यासाठी म्हणून त्यांनी कृष्णानदीकाठची आपली मळीची जागा दहनासाठी दिली होती आणि नंतर त्या दहनस्थानीच गंगाधरसिंगांनी कोटणीसमहाराजांचे समाधिमंदिर उभे केले. ते हनुमान समाधिमंदिर या नावाने आजही प्रख्यात आहे. या हनुमान समाधिमंदिरात गंगाधररावांनी कोटणीसमहाराजांप्रमाणे नित्याची उपासना सुरू केली. त्यांनाही कोटणीसमहाराजांनी आपलेसे केले होते (सेवेचे निधान गंगाधरा दिले । आपुलेसे केले भक्तालागी ।।).

आपला पुत्र रघुनाथ, नानबा फडणीस, गोविंद आणि गंगाधरसिंग या भक्तांच्यासाठी कोटणीसमहाराजांनी काय काय केले जे वर सांगून झाले. मग प्रश्न असा येतो :- आपल्या नितयकीर्तनात येणारे जे अन्य भक्त होते, त्यांच्यासाठी कोटणीसमहाराजांनी काही केले की नाही? या प्रश्नाचे उत्तरही दासराममहाराजांनी दिले आहे, ते असे :- आपल्या कीर्तनात कोटणीसमहाराज ईश्वराच्या नामाचा महिमा सांगत. 'नाम हेच ब्रह्म आहे. नामात ब्रह्म प्रगट होते. म्हणून नामाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.' असे कोटणीस सांगत. नामाच्या योगे ईश्वर भेटतो, ब्रह्मसाक्षात्कार होतो आणि या नामाचा अभ्यास कसा करावयाचा हे कोटणीसमहाराज अनुग्रह देताना सांगत (दिले सकळासी सोपे सुगम नाम । भेटतो परम देव जेणे ।।). अशाप्रकारे सर्व भक्तांना कल्याणाचा मार्ग कोटणीसमहाराजांनी दाखविला. म्हणून रामराय म्हणतात, गुरु हा परब्रह्म आहे. हनुमंतगुरु हे परब्रह्म आहेत. त्यांना शरण जाणे इतकेच मला करता येणार आहे आणि ते मी करीत आहे (धन्य ब्रह्मरूप गुरु हनुमंत । तया शरणागत दासराम ।।).

अशाप्रकारे दासराममहाराजांनी आपल्या ब्रह्मरूप गुरूचा महिमा या अभंगात कथन केला आहे.

***(०८.०१.२०१२)***

***

## ६. आसरा तो झाला बालरामा

श्रीमामा आणि श्रीदादा ही पितापुत्रांची जोडी जगावेगळीच होती. जगातील व्यवहारात पिता व पुत्र यातील संबंध वेगवेगळे असतात. कधी त्यांचे सख्य असते, कधी वैर असते तर कधी त्यांच्यामध्ये तटस्थ वृत्ति असते. असला कोणताच प्रकार श्रीमामा व श्रीदादा यांच्यामध्ये नव्हता. श्रीमामा व श्रीदादा हे परस्परांकडे ईश्वर या स्वरूपात पहात. श्रीमामा श्रीदादांना ''माझ्या घरात सगुण रूपाने वावरणारा रामप्रभु'' असे म्हणत. तर श्रीदादा श्रीमामांना ''सगुण रूपात असणारा गोविंद परमेश्वर'' असे मानीत. असा हा विलक्षण संबंध त्या दोघांमध्ये होता. याचाच दृश्य परिणाम म्हणजे श्रीदादांनी श्रीमामांचे वर्णन करणारे सुमारे ऐंशी अभंग लिहिले आहेत. त्या अभंगांत अनेक गोष्टींचे संदर्भ आहेत आणि त्यांचेद्वारा श्रीदादांनी श्रीमामांचा महिमा शब्दबद्ध केला आहे. असाच श्रीदादांचा पुढील अभंग आहे :-

**मामा तुम्ही गेला हनुमंतापाशी ।**
**त्यांनी चिमडासी पाठविले ।।१।।**
**परी प्रेम त्यांचे ऐसे तुम्हांवरी ।**
**झाले साक्षात्कारी प्रगटची ।।२।।**
**आपुल्या अंतरीचे देवुनी वोळले ।**
**कवतुके केले कृपादान ।।३।।**
**प्रेमाची माऊली केलीसे साऊली ।**
**चराचरी झाली कीर्ती ऐसी ।।४।।**

**हनुमंतरूपी मिळोनिया ठेला ।**
**आसरा तो झाला *बालरामा* ।।५।।**

(दा.गा.८३१)

श्रीमामा सांगली गावी रहात. सांगली गावात इ.स. १९०१ पासून हणमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेबमहाराज यांची नित्यकीर्तने चालू होती. श्रीमामांचे पिताजींनी कोटणीसमहाराजांचा उपदेशानुग्रह घेतला होता. श्रीमामाही कोटणीसमहाराजांच्या कीर्तनास जात. पारमार्थिक ग्रंथांच्या वाचनाने श्रीमामांना कळले होते की, गुरूपदेश घेतल्याशिवाय परमार्थ होत नाही. म्हणून आपणही कोटणीसमहाराजांना गुरू करून घ्यावे असे श्रीमामांना वाटू लागले. तशी प्रेरणा होताच श्रीमामा कोटणीसमहाराजांच्याकडे गेले आणि त्यांनी आपली उपदेशानुग्रहाची इच्छा प्रगट केली. तेव्हा कोटणीसमहाराज म्हणाले, ''बापूराव, तुमचे पूर्वनियोजित गुरु चिमडमठाधिपती नारायणमहाराज आहेत. तेव्हा तुम्ही चिमडास जाऊन त्यांचा उपदेश घ्या आणि त्यानंतर काही लागले तर मला विचारा.'' याप्रमाणे हणमंत कोटणीसमहाराजांनी अनुग्रहासाठी श्रीमामांची रवानगी चिमडास केली (मामा तुम्ही गेला हनुमंतापाशी । त्यांनी चिमडासी पाठविले ।।).

व्यवहारात असे घडले. पण कोटणीसमहाराजांना श्रीमामांचे विषयी आपुलकी होती, प्रेम होते. या प्रेमापोटीच कोटणीसमहाराज माघ वद्य तृतीया, इ.स. १९२४ या दिवशी दासबोधाचे पठण करणाऱ्या श्रीमामांचे पुढे साक्षात प्रगट झाले (परी प्रेम त्यांचे ऐसे तुम्हावरी । झाले साक्षात्कारी प्रगटची ।।).

कोटणीसमहाराजांच्या मनात नित्यकीर्तन करण्याची आवड होती. तीच त्यांनी श्रीमामांच्या मनातही निर्माण केली. आणि श्रीमामांना नित्यकीर्तन करण्याची आज्ञा दिली आणि आपल्या कृपेने त्यांनी

श्रीमामांचेकडून नित्यकीर्तन करवून घेतले (आपुल्या अंतरीचे देवुनि वोळले । कवतुके केले कृपादान।।). अशाप्रकारे कोटणीस माऊलीने श्रीमामांचेवर आपल्या कृपेची सावली केली. त्यानंतर श्रीमामांना झालेला कोटणीसमहाराजांचा साक्षात्कार कोटणीसमहाराजांच्या चरित्रात नोंदला गेला. अशाप्रकारे कोटणीसमहाराज व श्रीमामा यांची कीर्ति चराचर जगात पसरली (प्रेमाची माऊली केलीसे साऊली। चराचरी आली कीर्ति ऐसी।।).

कोटणीसमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीमामा नित्य हरिकीर्तन करू लागले. ही गोष्ट कर्णोपकर्णी चिमडच्या नारायणमहाराजांना कळली. बापूराव नित्यकीर्तन करतात हे कळल्यावर नारायणमहाराजांना आश्चर्य वाटले. बरोबरच आहे! एखादे दिवस अथवा कधीतरी कीर्तन करणे हे सोपे आहे, पण नित्यकीर्तनाचा वसा पार पाडणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. म्हणून नारायणमहाराजांना आश्चर्य वाटले (चिमडी नारायण आश्चर्य करिती । ऐकोनिया स्थिती कीर्तनाची ।।).

हणमंत कोटणीसमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे श्रीमामांनी एकही दिवस खंड पडू न देता अखंड ३८ वर्षे हरिकीर्तन केले. निर्वाणीच्या दिवशीसुद्धा श्रीमामांनी ''श्रीराम जयराम जयजय राम'' या त्रयोदशाक्षरी नामाचा उच्च रवाने उच्चार करून आपले अंतिम कीर्तन पार पाडले. कारण नामस्मरण हेच कीर्तन आहे. त्यानंतर श्रीमामांनी देह ठेला. निर्वाणानंतर श्रीमामा हनुमंतरूपात म्हणजे कोटणीसमहाराजांच्या निर्गुण रूपात मिळून गेले (हनुमंतरूपी मिळोनिया ठेला।). असे हे श्रीमामा श्रीदादांना पूज्य देवरूप वाटतील यात नवल ते काय? असे श्रीमामा पिता या व्यावहारिक स्वरूपात बालरामाचा म्हणजे श्रीदादांचा आसरा/आश्रयस्थान होते (आसरा तो झाला बालरामा ।).

श्रीमामा व श्रीदादा यांचे असले पितापुत्राचे संबंध हे ईश्वरनियोजित होते असेच म्हणावयास हवे.

***

# ७. संतांची सात लक्षणे

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात की, मीच सर्वश्रेष्ठ परमेश्वर आहे. हा परमोच्च ईश्वरच या विश्वाची उत्पत्ती करतो. ही विश्वाची उत्पत्ती केल्यानंतर ''आपले काम संपले'' असा विचार करून हा ईश्वर स्वस्थ बसत नाही. तर हे जग व्यवस्थित चालेल याचीही चिंता तो करतो. जगाचे भले व्हावे यासाठी ईश्वर प्रयत्न करीत असतो. (पहा : भगवद्गीता ३.२२-२४) आणि त्यासाठी तो या जगात अवतारही घेतो.

उत्पन्न झालेल्या जगात बऱ्यावाईटाचा झगडा सुरू होतो. बरे वागणारे ते साधू आणि तसे न वागणारे ते असाधू. अनेकदा वाईट वरचढ होते. साधुजनांना असाधू त्रास देऊ लागतात. तसेच असाधू लोकांच्या वाईट आचरणाने जगात अधर्म वाढत जातो. तेव्हा साधूंचे रक्षण करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी ईश्वर या जगात अवतार घेतो. ईश्वर जरी जन्मरहित आहे तरी तो स्वतःच्या प्रकृतीवर अधिष्ठान ठेवून आणि स्वतःचे सामर्थ्य वापरून या जगात जन्म घेतो. हाच ईश्वराचा अवतार होय (''अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् । प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभावाम्यात्ममायया ।।'' भ.गी.४.७). या ईश्वरी अवताराचा उद्देश श्रीकृष्ण असा सांगतो :- ''परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।''

म्हणजे, 'साधूंचे रक्षण करण्यासाठी, दृष्कृत्ये करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी मी (ईश्वर) जन्म घेतो.'

परंतु ईश्वरी अवतार काही वरचेवर होत नाही, तथापि ईश्वरी कार्य या जगात चालू रहावे म्हणून काही लोक प्रयत्न करतात, ते म्हणजे संतसज्जन. ईश्वराचा साक्षात्कार करून घेतलेले साधुसंत या जगात अवतार घेतात. तुकाराममहाराज सांगतात, ''आम्ही वैकुंठीचे वासी । आलो याच कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।।'' म्हणजे जगाचे मागे ईश्वर आहे, त्याची भक्ती केल्याने ईश्वर प्राप्त होतो. ईश्वरप्राप्तीचा अमूक मार्ग आहे. इत्यादी आध्यात्मिक गोष्टी लोकांना सांगण्यास संत अवतार घेतात.

साधुसंत हे जीवन्मुक्त असतात. देह हे त्यांचे खरे स्वरूप नव्हे. ते ईश्वरस्वरूपच झालेले असतात. तथापि ते या जगात वावरत असतात. तेव्हा त्यांना कसे ओळखावे असा प्रश्न पडतो. साहजिकच ते कसे असतात हे सांगणे आवश्यक ठरते. आता संतच संतांना ओळखतात, म्हणून संत हे कसे असतात हे अनेकदा संतांनीच सांगून ठेवले आहे. त्यावरून संतांच्या खऱ्याखुऱ्या सत्य स्वरूपाची थोडीफार कल्पना येऊ शकते.

संतांचे सत्य स्वरूप सांगणारे एक संत नुकतेच सांगलीनगरात होऊन गेले. त्यांचे नांव श्रीरामदाय गोविंद केळकर ऊर्फ श्रीदासराममहाराज होय. त्यांच्या अभंग पदांचा संग्रह 'श्रीदासरामगाथा' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला आहे. त्यातील काही अभंगांत त्यांनी संत कसे असतात हे वर्णन केले आहे. त्या संतवर्णनातील एक अभंग असा आहे :-

**संत तो अद्वैती समरस झाले ।**
**रंगोनिया गेले भक्तिरसी ।।१।।**
**नामसंकीर्तन उरले त्या ठाया ।**
**देह भाव लया गेला त्यांचा ।।२।।**

**त्रिपुटी ग्रासिली वृत्ति स्थिर झाली ।**
**ज्योतीसी मिळाली आत्म ज्योती ।।३।।**
***दासराम* ऐशा संता शरण ।**
**वंदितो चरण प्रेमभावे ।।४।।**

(दा.गा.५५३)

या अभंगाच्या पहिल्या तीन कडव्यांत श्रीदासराममहाराजांनी संतांची पुढील सात वैशिष्ट्ये सांगितली आहेत : १) संत हे अद्वैतात समरस झालेले असतात. २) ते भक्तिरसात रंगून गेलेले असतात. ३) ते नामसंकीर्तन करतात. ४) संतांचा देहभाव लयाला गेलेला असतो. ५) संतांनी त्रिपुटीचा ग्रास केलेला असतो. ६) त्यांची वृत्ती स्थिर झालेली असते. ७) त्यांची जीवज्योती ही आत्मज्योतीत मिसळून गेलेली असते. संतांच्या या सात लक्षणांचे संक्षिप्त स्पष्टीकरण असे करता येते :-

समर्थ रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे निर्गुण हेच अंतिम तत्त्व आहे आणि त्यात मिसळून जावयाचे आहे. त्यासाठी प्रथम सगुणाची उपासना करणे हे उपयुक्त असते. म्हणजे सगुण ईश्वराची भक्ती करणे हे आवश्यक ठरते. भक्ती म्हणजे ईश्वरावरील प्रेम. हे प्रेम अनन्य व अव्यभिचारी हवे. प्रेमाचा विषय ईश्वराखेरीज अन्य कोणी असता कामा नये. भागवत पुराणाने ईश्वराची नवविधा भक्ती पुढीलप्रमाणे सांतिलेली आहे :- ''श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।'' अशाप्रकारची भक्ती करण्यात संतांना आनंद होत असतो. संत हे या भक्तिरसात म्हणजे भक्तीच्या आनंदात रंगून गेलेले असतात.

वरील नवविधा भक्तीमध्ये कीर्तनं किंवा नामसंकीर्तन हे अंग महत्त्वाचे आहे. नामसंकीर्तन दोन प्रकारांनी होऊ शकते. ईश्वराच्या नामाचा

महिमा गाणे, ईश्वराच्या लीला वर्णन करणे, इत्यादी प्रकारांनी लोकांसाठी कीर्तन, प्रवचन, निरूपण करता येते. काही संत असे नामसंकीर्तन करीत असतात. पण हे संकीर्तन बाह्य स्वरूपाचे आहे. संत हे स्वतःही नामसंकीर्तन म्हणजे नामस्मरण करीत असतात. ते वाणीने किंवा मनाने होऊ शकते. त्याला नामजप म्हणता येते. पण हा जपही बाह्य स्वरूपाचा झाला. खरे म्हणजे मानवी देहात ईश्वराचे नाम उमटत असते आणि ते ऐकणे हे खरे आणि आंतरिक नामस्मरण आहे. ''रामनाम ध्वनि उमटे । तेथे लक्ष लावी नेटे । ब्रह्मानंद सहज भेटे'' असे एका संतांनी सांगून ठेवले आहे. देहामध्ये जे ईश्वराचे नाम सतत घुमत आहे ते ऐकण्यात संत रंगून गेलेले असतात.

संतांची त्रिपुटी लयाला गेलेली असते. आपल्या दैनंदिन व्यवहारात त्रिपुटी असते. त्रिपुटी म्हणजे तीन विशिष्ट गोष्टींचा समूह. उदा. ज्ञान - ध्यान - ध्येय/ध्याता ; द्रष्टा - दृश्य - दर्शन; श्रोता - श्रोतव्य, श्रवण; इत्यादी या त्रिपुटीत ज्ञान, ध्यान, द्रष्टा किंवा श्रोता हे वेगळेपणाने असतात. त्रिपुटीत भेदभाव असतो. असला भेदभाव संतांच्या बाबतीत लयाला गेलेला असतो, कारण ते आत्म्याशी एकरूप झालेले असतात आणि 'हे सर्व ब्रह्म आहे' (सर्वं खल्विदं ब्रह्म) किंवा 'आहे ते सर्व वासुदेव आहे' (वासुदेवः सर्वमिती । भ.गी.७.१९) अशी त्यांची भूमिका बनलेली असते.

माणसाचे मन हे अत्यंत चंचल आहे. संकल्प आणि विकल्प हे मनाचे स्वरूप आहे (संकल्पविकल्पात्मकं मनः). किंबहुना संकल्पविकल्पांचा सततचा प्रवाह म्हणजे मन आहे. माणसाची इंद्रिये ही सातत्याने बाह्य अशा शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांकडे धावत असतात आणि ही इंद्रिये इतकी बलवान आहेत की ती मनासही खेचून विषयाकडे नेतात (इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः । भ.गी. २.६०). आणि मग मन हे विषयांमध्ये आसक्त होते. विषयांमध्ये आसक्त झालेले मन हे जन्मकर्माच्या

बंधनाला कारणीभूत होते. पण तेच मन जर विषयातून निवृत्त झाले तर ते मोक्षाला कारणीभूत होते (मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः । बंधाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।।). संतांचे मन हे विषयातून निवृत्त होऊन फक्त भगवंताकडे लागलेले असते. संतांची वृत्ती - मनोवृत्ती स्थिर झालेली असते. सुख-दुःख येवो, मान-अपमान होवो अथवा अन्य काही होवो, संतांच्या मनावर त्याचाकाहीच परिणाम होत नाही. त्यांचे मन स्थिर झालेले असते. त्यांच्या मनातील संकल्प-विकल्प संपलेले असतात.

मनोवृत्ती स्थिर होणे म्हणजेच मन परतून जाणे. असा मनाचा नाश झाला असताना आत्मसाक्षात्कार होतो असे उपनिषदे सांगतात (मन अलोक्य वृत्तिशून्यं यदा भवेत् । ततः परं ब्रह्म दृश्यं ते सुदुर्लभम्।। योगशिखा).

***

## ८. गुरु जगी थोर

**गुरु जगी थोर बोलतसे श्रुती ।**
**गुरु कोण चित्ती उमजेना ॥१॥**
**ऐसा गुरुपाठ विचारेची घ्यावा ।**
**विचारे शोधावा गुरुबोध ॥२॥**
**गुरु जगी एक बोले गुरुगीता ।.**
**परी तसा अर्थ जाणती ना ॥३॥**
**सद्रूपी ओळख करी तो सद्गुरु ।**
**येर ते गुरु गुरु करिताती ॥४॥**
**गुप्तरूप जेणे प्रगटचि दिसे ।**
**ऐसा गुरु वसे *दासरामी* ॥५॥**

(दा.गा.११२८)

जगातील व्यवहारात काय किंवा परमार्थात काय, गुरु हा महत्त्वाचा आहे. गुरु म्हणजे तो की जो आपणांस काहीतरी सांगतो/ शिकवतो आणि जे आपण मान्य करतो. या दृष्टीने व्यवहारात आई, बाप, शिक्षक इत्यादी आपले गुरु ठरतात. भागवत पुराणात अवधूताने चोवीस गुरु केले असे सांगितले आहे. अवधूताच्या मते ज्यांचेपासून एकादा गुण घेतला तो गुरु. हे झाले लौकिक व्यवहारात. पण परमार्थात मात्र अनेक गुरु नाहीत. आत्म्याचे/ब्रह्माचे/अंतिम तत्त्वाचे ज्ञान करून देणारा आणि आत्मसाक्षात्काराचा उपाय सांगणारा तो गुरु किंवा सद्गुरु असे परमार्थात

आहे. अशा पारमार्थिक गुरूबद्दल दासराममहाराजांनी वरील अभंगात विवेचन केले आहे. त्यासाठी श्रुती व गुरुगीता यांचा निर्देश केला आहे.

परमार्थात/अध्यात्मशास्त्रात गुरु हा सर्वश्रेष्ठ आहे असे श्रुतीने सांगितले आहे. श्रुति म्हणजे वेद. देव हे ऋषिमुनींना नादरूपाने ऐकू आले, असे मानले जात असल्याने वेदांनाच श्रुति म्हणतात. वेदांच्या अंत्यभागी उपनिषदे आहेत. या उपनिषदांनाही श्रुति अथवा वेद म्हणले जाते. एक उपनिषद सांगते की, आचार्य/गुरु असणाऱ्या पुरुषालाच अंतिम तत्त्वाचे / ब्रह्माचे/ आत्म्याचे ज्ञान होते (आचार्यवान् पुरुषो वेद). आणि हा आचार्य/ गुरू हा श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ म्हणजे ब्रह्मसाक्षात्कारी हवा असेही उपनिषदे सांगतात. ज्याला ब्रह्माचा साक्षात्कार झाला आहे तोच ब्रह्माबद्दल सांगू शकेल हे अगदी स्पष्ट आहे. असा गुरु ब्रह्मज्ञानासाठी आवश्यक आहे. ब्रह्मज्ञान/ आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. साहजिकच ते ज्ञान देणारा गुरु सर्वश्रेष्ठ आहे हे उघड आहे. तथापि श्रुतीने सांगितलेला गुरु व त्याचे स्वरूप सामान्य माणसांना उमजत नाही. म्हणून दासराममहाराज म्हणतात, ''गुरु जगी थोर बोलतसे श्रुती । गुरु कोण चित्ती उमजेना।।'' म्हणजे श्रुतीला अभिप्रेत असणारा गुरु जाणून घेणे आवश्यक आहे. मग अशा गुरुचा शोध घेऊन त्यांचेकडून आत्मज्ञान आणि आत्मप्राप्तीचा उपाय जाणून घ्यावयास हवा. असा गुरु सहजासहजी लाभत नाही. त्याचा शोध घ्यावा लागतो.

गुरुगीता या ग्रंथानेही गुरूचे महत्त्व वर्णन केले आहे. भगवान शंकरांना पार्वती मातेने एकदा विचारले, ''हे जगद्गुरु शंकरा, कोणत्या मार्गाने जीव ब्रह्मरूप होईल ते मला सांगा.'' त्यावर शंकर म्हणाले, ''गुरूशिवाय हा मार्ग कळून येत नाही.'' असे सांगून भगवान शिवांनी नानाप्रकारांनी गुरूचे महत्त्व आणि सामर्थ्य पार्वतीला कथन केले. हा सर्व

भाग 'गुरुगीता' या ग्रंथात अंतर्भूत आहे. गुरुगीतेच्या मते, गुरु हा साक्षात परब्रह्म आहे (गुरुः साक्षात परब्रह्म). गुरूशिवाय अन्य श्रेष्ठ काहीही नाही. येथे हे लक्षात घ्यावे :- या जगात आत्मज्ञानी गुरु हा मानवी देहधारी रूपात असतो. पण खरा गुरु म्हणजे साडेतीन हात देहाचा स्थूल देह नव्हे. गुरु हा ब्रह्मरूप असतो. सर्व गुरू ब्रह्मरूप असल्याने जगात एकच गुरु आहे असे मानण्यात अडचण नाही. सर्व संत एकरूपच असे आधुनिक संतही सांगतात आणि हा अर्थ जाणून घेतला पाहिजे. गुरुगीतेने सांगितलेले गुरुचे स्वरूप हे असे आहे (गुरु एक जगी बोले गुरुगीता । परी तया अर्था जाणती ना।।). 'जगामध्ये एकची ब्रह्म गड्या' या अभंगात म्हटल्याप्रमाणे जगाचे मागे एकच ब्रह्म आहे. ते ब्रह्म म्हणजे गुरु आहे. गुरूचे हे खरे स्वरूप गुरुगीतेला सांगावयाचे आहे आणि हा अर्थ जर आपणास कळला नाही तर गुरू कोण हे आपणास कळलेच नाही असा अर्थ होतो.

वरील सर्व विवेचनाचा भावार्थ असा की, श्रुती आणि गुरुगीता यांना गुरूचे जे खरे स्वरूप अभिप्रेत आहे, ते आपण जाणून घ्यावयास हवे. हे ज्ञान झाल्यावर असा गुरु शोधावयाचा आहे आणि तो खरेच ब्रह्मस्वरूप आहे याची विचार करून खात्री पटवून घ्यावयाची आहे (ऐसा गुरुपाठ विचारेची घ्यावा). त्याचा आचार, विचार आणि उच्चार याचा विचार करून तो खरा आत्मज्ञानी आहे हे जाणून घ्यावयाचे आहे. मग नम्रपणाने त्या गुरूला शरण जाऊन त्याचेकडून आत्मज्ञान आणि आत्मप्राप्तीचा उपाय जाणून घ्यावयाचा आहे.

गुरूने सांगितले ''ब्रह्म हे सत्-चित्-आनंद आहे आणि ते जगाचे कारण आहे.'' या गुरूंच्या उपदेशाचा नीट अर्थ समजून घ्यावयास हवा. ब्रह्म हे सत् आहे म्हणजे ते न बदलणारे आहे. ते चित् आहे म्हणजे चैतन्यस्वरूप आहे. तसेच ते आनंदस्वरूप आहे. हा अर्थ नीट समजून

घ्यावयास हवा. जसे गुरूने सांगितले की श्वासोच्छ्वास हा ब्रह्माकडे नेणारा मार्ग आहे. याचा अर्थ श्वासोच्छ्वासात ब्रह्म आहे आणि ते शाखाचंद्र न्यायाने घ्यावयाचे आहे हा सम्यक अर्थ आहे. गुरूने सांगितले ''प्राणपानामाजी मनाचे मीलन । परमार्थ पूर्ण तया ठाया ।।''. येथे प्राण आणि अपान या शब्दांनी काय अभिप्रेत आहे आणि त्यात मनाचे मीलन म्हणजे काय याचा नीट विचार करून त्या त्या शब्दांचे योग्य ते अर्थ समजून घ्यावयास हवेत (विचारे शोधावा गुरुबोध).

परमार्थात ब्रह्मरूप गुरूलाच सद्गुरु असे म्हणतात. आता सद्गुरु या शब्दाचा अर्थ काय? दासराममहाराज सांगतात, ''सद्रूपी ओळख करी तो सद्गुरु''. ब्रह्म हे एकमेव एक सत् आहे. सत् शब्दाला दोन अर्थ आहेत ते असे :- १) सत् म्हणजे अस्तित्वात असणारे. ब्रह्म हे अस्तित्वात आहे किंबहुना ब्रह्म हे अस्तित्वरुपच आहे. २) ब्रह्म हे सत् म्हणजे सत्य आहे आणि सत्य ते की जे भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनही काळात न बदलता जसेच्या तसे रहाते. ब्रह्म हे असे न बदलणारे सत्य आहे. अशा सद्रूप ब्रह्माचे ज्ञान सद्गुरु करून देतो. या सद्रूप ब्रह्माखेरीज जर कुणी अन्य काही सांगत असेल तर त्यांची बडबड वायफळ आहे, व्यर्थ आहे असे समजावे (येर ते गुरु गुरु करिताती).

सद्गुरु शब्दाचा अभिप्रेत अर्थ दासरामांनी सांगितला तसा ते गुरु शब्दाचा अर्थही सांगतात. त्यांच्या मते, ''गु म्हणजे ब्रह्माचे गुप्तरूप, आणि ते जो प्रकट करून दाखवितो तो गुरु'' (गुप्तरूप जेणे प्रगटची दिसे । ऐसा गुरु). ब्रह्म हे जरी सर्वत्र आहे, तरी ते आपल्याला कुठे दिसत नाही. याचे कारण ते गुप्त म्हणजे झाकल्या स्वरूपात आहे. ब्रह्म हे सूक्ष्म रूपाने सर्वत्र आहे. आणि त्याच्यावर जडाचे आवरण असल्याने ते प्रगटपणे दिसत नाही. अज्ञान, पंचकोश, इत्यादींचे आवरण ब्रह्मावर पडले असल्याने

ते प्रगट न दिसता ते गुप्त/झाकले आहे. आवरण दूर करून ब्रह्म कसे आहे हे गुरु दाखवितो. त्यासाठी तो शिष्याला योग्य तो उपाय सांगतो. शिष्याने ही गुरुकथित साधना केली तर त्याला ब्रह्माचा साक्षात्कार होणार आहे. शिष्याने केलेल्या साधनेच्या आधाराने गुरु प्रसन्न होतो आणि मग गुरुकृपेने शिष्याला ब्रह्मरूपाचा साक्षात्कार होतो आणि तो ब्रह्मरूप/गुरुरूप होऊन जातो.

गुरु हा ब्रह्मरूप आहे. ब्रह्म हे सर्वव्यापक आहे हे गुरुकृपेने दासराममहाराजांना कळले इतकेच नव्हे तर ते गुरुरूप/ब्रह्मरूप आपल्या ठिकाणीही आहे हे त्यांच्या लक्षात आले (ऐसा गुरु तसे दासरामी).

अशाप्रकारे गुरूचे वर्णन करणारा हा अभंग आहे.

*(१८.०१.२०१२)*

✻✻✻

## ९. दास स्वरूपी मिळाला

आपण या जगात नानाप्रकारचे व्यवहार करीत असतो. व्यवहारातील बजबजपुरीला कंटाळून एकादाच देवाकडे वळतो. देवाकडे जाण्यासाठी जे काही केले जाते ते परमार्थात मोडते. परमार्थात अंतिम अवस्था आहे आत्म्याच्या दर्शनाची. आत्मा हे अंतिम सत्य आणि नित्य तत्त्व आहे. आत्मदर्शन याचा अर्थ आत्मस्वरूप होणे असा आहे. आत्मा हा आनंदरूप आहे. म्हणून आनंदरूप होणे हे परमार्थाचे साध्य आहे. ते साध्य होण्यास आत्मसाक्षात्कारी गुरु हा आवश्यक आहे. नामदेवमहाराजांना पांडुरंगाने गुरु करण्यास सांगितले हे येथे लक्षात घ्यावे. गुरु केल्याविना केला जाणारा परमार्थ निरर्थक ठरतो. गुरूचे हे महत्त्व दासराममहाराज केळकरांनी आपल्या पुढील अभंगात स्पष्ट करून सांगिले आहे.

**गुरुराजे कृपा केली । वृत्ती आनंदित झाली ।।१।।**
**खरे खोटे दाखविले । बरे डोळे उघडिले ।।२।।**
**नाममंत्र सांगितला । सोपा मार्ग दावियेला ।।३।।**
**आत्मरूप प्रगट केले । बोल अबोल सरले ।।४।।**
***दास* स्वरूपी मिळाला । जगी होवोनि मोकळा ।।५।।**

(दा.गा.२०)

आपण या जगात वावरत असतो. डोळा, कान, नाक इत्यादि पाच ज्ञानेंद्रियांच्या द्वारा आपणास बाह्यजगाचे ज्ञान होत असते आणि ज्या जगाचे ज्ञान होते ते जग खरे आहे अशी आपली समजूत असते. पण

परमार्थदृष्ट्या ही समजूत बरोबर नाही. जग हे नाशवंत, अस्थिर, सतत बदलणारे आहे आणि जे बदलते ते खरे नसते. म्हणून बदलणारे जग खरे नाही. मग खरे काय आहे? जगाच्या बुडाशी असणारा देव / आत्मा हा फक्त खरा आहे. कारण तो कूटस्थ आहे. तो कधीही बदलत नाही. म्हणून गुरु सांगतात, ''बाबा रे, हे जग खरे नाही. नित्य असणारा आत्मा / आत्मस्वरूप फक्त सत्य /खरे आहे.'' हे कळताच खऱ्याखोट्याचा निवाडा होऊन साधकाचे डोळे उघडतात आणि त्याला खरे सत्य आणि खोटे लक्षात येते.

आता सत्य आत्मस्वरूप होण्यास उपाय काय? हा उपाय गुरु सांगतात. नाम हेच ब्रह्म/आत्मा आहे आणि हे नाम कुठे आहे आणि त्याचे स्मरण कसे करावयाचे हेही गुरु सांगतात. हे नाम श्वासोच्छ्वासात गतिरूप आहे. तोच नाममंत्र आहे. हा नाममंत्र गुरु दाखवून देतात आणि त्याचेकडे लक्ष देणे म्हणजेच नामस्मरण असेही ते सांगतात. देवाप्रत पोहोचण्याचा, देवरूप/आत्मरूप होण्याचा नामस्मरण हा सर्वात सोपा मार्ग आहे, हे सर्व संतांनी सांगितले आहे आणि गुरूही तेच सांगतात.

गुरुंनी सांगितलेल्या नाममंत्राचे स्मरण पूर्णकोटीला गेले असता आत्मरूप प्रगट होते. नाद, बिंदू, कला व ज्योती या चार स्वरूपात आत्मरूप प्रगट होते व त्याची प्रचीति येते. हे होण्यास गुरु हा आवश्यक असल्याने, गुरुकृपेने आत्मस्वरूप प्रगट होते, असे दासराममहाराज सांगतात. ही गुरुकृपा होण्यास गुरूंनी सांगितलेली नाममंत्राची प्रक्रिया साधकाने आचरणात आणावयास हवी हे उघड आहे आणि एकदा का आत्मरूप प्रगट झाले की बोलण्यास आणि न बोलण्यास काही उरतच नाही. आत्मरूप झालेला साधक मौनरूप होतो.

गुरूंनी सांगितलेले नामस्मरण होण्यास, माणसाचे मन या जगातून मागे व्हावे लागते. माणसाने अंतर्मुख व्हावे लागते. तसे झाले तरच परमार्थ साधतो. म्हणजे जगाविषयी आसक्ति सोडणे म्हणजे जगातून मागे येणे. इति निवृत्ती झालेला माणूस आत्मरूप होऊन जातो, तो आत्मस्वरूपात मिसळून जातो. आत्मस्वरूप होणे हेच परमार्थातील साध्य आहे आणि ते दासराममहाराजांना साधले, असे त्यांनी या अभंगाच्या शेवटच्या कडव्यात सांगितले आहे.

अशाप्रकारे गुरुकृपेने साधक आत्मस्वरूप झाल्यावर, तो काही लगेच मरून जात नाही. प्रारब्ध कर्मानुसार तो मरेपर्यंत जिवंत रहातो आणि तो जिवंत असतानाच आत्मरूप झाल्याने, तो जीवन्मुक्त होतो. आत्मस्वरूप होणे हीच मुक्ति आहे. जीवन्मुक्त या जगात वावरत असतो. पण तो वेगळा ठरतो. जगात असताना त्याच्यावरही सुखदुःखाचे प्रसंग कोसळत असतातच. पण त्या त्या प्रसंगात जीवनमुक्त मात्र मनात आनंदी असतो. त्याची मनोवृत्ती सदा आनंदित असते. दुःखाच्या प्रसंगीसुद्धा त्याच्या मनाचा आनंद ढळत नाही, संपत नाही. आणि असा हा आनंद - सततचा आनंद - साधकाला गुरुकृपेनेच प्राप्त होत असतो.

***

# १०. अग्नी नारायण देव

प्रपंचात राहून परमार्थ करावा असे साधुसंतांनी सांगून ठेवले आहे आणि तसा प्रयत्न काही साधक करीत असतात. परमार्थ करणे हे मानवी जीवनाचे ध्येय आहे याबद्दल संतांचे एकमत आहे. आणि परमार्थ करण्याचा अधिकार सर्व मानवांना असला (सकळांसी येथे आहे अधिकार ।), तरी प्रपंचात राहून काय तर प्रपंच बाजूला सारूनसुद्धा परमार्थातील परमोच्च पदवी प्राप्त करून घेणे ही गोष्ट कठीणातील कठीण आहे. परमार्थात 'नाम' महत्त्वाचे आहे. ते 'नाम फुकाचे' आहे आणि ते ''उच्चारण्याला काळवेळ नाही'' इत्यादी जरी सांगितलेले असले तरी हे नाम आपल्या वैखरीवाणीने तरी किती येते हा प्रश्नच आहे. हे परमार्थाचे काठिण्य वेगळ्या शब्दात दासराममहाराज केळकरांनी आपल्या पुढील अभंगात सांगितले आहे :-

**अग्नि घातिला पदरात । कैसा झालासे प्रदीप्त ।।१।।**
**ऐसा असे परमार्थ । जाणती हे नवल संत ।।२।।**
**अग्नी नारायण देव । मूळरूपी त्याचा ठाव ।।३।।**
***दासराम* लोटांगणी । येतो संतांचे चरणी ।।४।।**

(दा.गा.१२४४)

श्रीदासराममहाराज अनेकदा सांगत, ''आमचे निंबरगीकरमहाराज म्हणत की, परामर्थ हा अग्नि आहे. हा अग्नि गुरु शिष्याच्या पदरात टाकतात. शिष्याने त्याचा यथायोग्य वापर केला तर तोच अग्नि

परमात्मरूपी त्याला कृतार्थ करतो. या उलट त्याने त्याचा दुरुपयोग केला तर तो अग्नि त्याचा घात करतो.''

व्यावहारिक जगात आपण भिन्न भिन्न स्वरूपात अग्नीचा वापर करतो. पण अग्नि हा उपकारक तसेच घातकही आहे. त्याचा व्यवस्थित उपयोग केला तर तो स्वयंपाक, उष्णता देणे, इत्यादी कामे व्यवस्थित पार पाडतो. पण दुसऱ्याची घरे, शेते जाळणे, इत्यादीसाठी त्याचा उपयोग केला तर तो घातक ठरतो. इतकेच नव्हे तर घरातल्या अग्नीकडे लक्ष न दिल्यास तो स्वतःचे घर जाळून टाकण्याचे कार्य करतो आणि क्वचित त्यालाही जाळून भस्मसात करतो.

परमार्थ हाही अग्नि आहे. या वाक्यात 'अग्नि' हा शब्द वाच्यार्थाने घ्यावयाचा नसून, लक्ष्यार्थाने, गौण अर्थाने घ्यावयाचा आहे. म्हणून परमार्थ हा अग्नि आहे याचा अर्थ परमार्थ हा अग्नीप्रमाणे आहे. अग्नि हा जसा इष्ट कार्यसाधक आणि घातक आहे, तसाच परमार्थही आहे. म्हणून अग्नीप्रमाणेच त्याचा सदुपयोग अथवा दुरुपयोग होऊ शकतो.

आवश्यक तितके लक्ष देऊन प्रपंच केला आणि परमार्थरूपी अग्नि वाढविला, तर गुरूपदिष्ट साधनप्रक्रियेने हा परमार्थरूपी अग्नि प्रदीप्त होऊन, तो शेवटी साधकाला परमार्थप्राप्ती करून देऊ शकतो. पण असे जर घडले नाही तर तो घातक ठरू शकतो तो असा :-

प्रपंचाकडे दुर्लक्ष करून परमार्थ करण्याचा प्रयत्न केल्यास, प्रापंचिक कटकटी सुरू होतात. नातेवाईक विरुद्ध जातात. या सर्व कटकटींनी साधकाचे मन बेचैन होऊन, गुरूंनी सांगितलेल्या साधनाकडे त्याचे दुर्लक्ष होते आणि साधनाच्या अभावाने पदरात काहीच पडत नाही.

प्रपंच व्यवस्थित करून, परमार्थरूपी अग्नि वाढत गेल्यास तेथे

अन्य प्रकारच्या नाना अडचणी येतात. लोकनिंदा ही पहिली अडचण. ती सहन झाली नाही तर संपलेच.

समजा, परमार्थरूपी अग्नि फुलला आणि अनेक लोक त्या माणसाभोवती गोळा झाले, तर येणाऱ्या अडचणी अशा :- मी कोणीतरी मोठा आहे, अशी भावना येऊन अहंकार येतो आणि अहंकार आला की घातच होतो. जमणारे लोक पै-पैसा अर्पण करतात. त्या पैशाचा लोभ सुटू शकतो आणि मग तो द्रव्यलोभी बनतो. आणि लोभ हे नरकात नेणारे एक द्वार आहे असे गीतेने सांगून ठेवले आहे (त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभः ।। भ.गी.१६.२१). अशाप्रकारे ही वित्तेषणा घातक ठरते.

या तथाकथित पुरुषाकडे येणाऱ्या लोकांमध्ये अनेक स्त्रिया असतात. त्या पाया पडतात, गोड गोड बोलतात, घरी येण्याचे आमंत्रण देतात इत्यादी. त्यातील एखादी स्त्री अतिप्रसंग करू शकते. अथवा त्याला एखाद्या स्त्रीचा मोह पडतो. तसे झाल्यास 'काम' हा विकार वाढत जातो. हा 'काम' रामाला बाजूला ढकलून त्या माणसाच्या मनावर प्रभाव टाकू लागतो आणि गीतेने म्हटल्याप्रमाणे 'काम' हे नरकाचे एक द्वार आहे.

कधी कधी या तथाकथित परमार्थी पुरुषाला लोकेषणा आवडू लागते. लोक कीर्तन, प्रवचन इत्यादी करण्यास बोलावतात आणि स्तुति करतात. स्तुति ऐकण्याचा मोह पडतो. कार्यक्रमाला जायचे म्हणजे जाण्यायेण्यात वेळ जातोच. असाच जर वेळ जात राहिला तर गुरुप्रणीत साधन करण्यास किती वेळ राहणार? तसेच, पारायण, पायी वारी इत्यादी गोष्टी अंगीकारल्यास साधनाला किती वेळ राहणार? अशाप्रकारे, या लोकेषणेमुळे परमार्थाच्या मार्गावरून च्युत होण्याचा प्रसंग ओढवू शकतो आणि त्याची पारमार्थिक प्रगति खुंटते.

वरीलप्रमाणे परमार्थरूपी अग्नि हा घातकही ठरू शकतो. म्हणून परमार्थरूपी अग्नीचा साधकाने यथायोग्यपणे सदुपयोग करणे नितांत आवश्यक ठरते. तसे केल्यास परमार्थरूपी अग्नि अग्निरूप परमात्मा प्राप्त करून देतो.

अग्नि हा व्यवहारात उष्णता आणि प्रकाश यांचे प्रतीक आहे. पण परमार्थात मात्र अग्नि हा शीतल आहे आणि तो प्रकाशरूपाने आत्म्याचा साक्षात्कार घडवून आणतो. म्हणजे असे :- नाद, बिंदु, कला व ज्योती या चार स्वरूपात आत्म्याचा साक्षात्कार होतो. त्यातील उत्तरोक्त तिन्ही प्रकाशरूप असल्याने ती अग्नीची प्रतीके आहेत. अग्नि हा तर अनेकदा ज्योतिरूप असतो. सूर्य हाही एक प्रकारचा अग्नि आहे. आत्म्याला सूर्य असे म्हटले जाते, म्हणजे तोही अग्निस्वरूप आहे. श्रीदासराममहाराजांना निंबरगीकरमहाराजांनी श्रुत केलेली गुरुलिंगगीता सांगते :- रविशशीलाही दिपवून टाकणारे अग्निरूप अंधारात चमकते (''तिमीरग्गे अग्नी रवि शशीवू बंबे हो ।।३७.६।।''). गुरुलिंगगीता आणखी सांगते : आकाशाचे आत असणाऱ्या वायूचे ठिकाणी आत्मा हा अग्निरूपात तेजाने देदीप्यमान होतो (''भासुर अग्नितेजवु कंडेनु । वायवु गगनगायिंथा ।।२८.२।।''). सूर्यचंद्र जेथे एक होतात त्या बिंदुमात्र विवरात जो प्रकाश आहे त्यात अग्निस्वरूप आत्म्याचा लोटच लोट आहे (''भासुर अग्निदलोट वेळकनु शिशिदिनू ।।७.४।।'').

परमार्थरूपी अग्नीचा सदुपयोग श्रीदासराममहाराजांनी केला. आणि अशाप्रकारे अग्निरूपाने आत्म्याचा साक्षात्कार करून घेऊन कृतार्थ होणाऱ्या संतांना 'मी लोटांगण घालतो' असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

***(२६.१२.२०११)***

***

## ११. हरिनामदास म्हणती सिद्धानंद

श्रीदासरामगाथा या ग्रंथात जे अभंग दासराममहाराजांचे आहेत त्यातील काही त्यांच्या स्वतःविषयीची माहिती देणारे आहेत. असाच हा पुढील अभंग आहे.

**प्रल्हादची ऐसा म्हणती रामानंद ।**
**गौरविला मंद हरिकीर्तनी ।।१।।**
**हरिनामदास म्हणती सिद्धानंद ।**
**पावोनी आनंद हरिकथे ।।२।।**
**श्रीनाथाप्पाण्णा सद्गगुरु बोलिले प्रल्हाद।**
**जाहला आनंद वासुदेवरावा।।३।।**
**काय जीवाचीया पाहता पात्रता ।**
**आपुलाची स्वता संती केला।।४।।**
**हनुमंत सद्गुरुरायाचे वचन ।**
**करील कीर्तन बालराम ।।५।।**
**सद्गुरुसेवक संतांचे कौतुक ।**
***दासरामी* भीक स्वानंदाची ।।६।।**

(दा.गा.६७६)

श्रीदासराममहाराजांच्या मातोश्री सौ. इंदिराबाई या दासरामांचे प्रसूतिवेळी आपल्या माहेरी कुरुंदवाडास गेल्या होत्या. तेथे श्रीदासराममहाराजांचा जन्म झाला. नातवाचे मुख पहाण्यास दासरामांचे

आजोबा अनंतराव तेथे आले होते. त्याचवेळी कुरुंदवाड पटवर्धन सरकारच्या गणेशोत्सवासाठी कीर्तन करण्यास ह.पां. ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज तेथे आले होते. नातवाला आशीर्वाद देण्यास कोटणीसमहाराजांनी यावे या अनंतरावांच्या विनंतीनुसार कोटणीसमहाराज सौ.इंदिराबाईंच्या घरी गेले होते. त्यांनी बाळाला मांडीवर घेतले, त्याचे मस्तकावरून आपला अतृतहस्त फिरवला आणि त्याला दृष्टिद्वारा उपदेशानुग्रह दिला आणि या बाळाचे नाव 'राम' असे ठेवा असे अनंतरावांना सांगितले. ''हा राम आमचाच आहे आणि तो बालपणापासून कीर्तन करू लागेल'' असा आशीर्वाद श्रीकोटणीसमहाराजांनी दिला (हनुमंतसद्गुरु बोलिले वचन । करील कीर्तन बाळराम ।।).

यथासमय सौ.इंदिराबाई सांगलीस परत आल्या. बालराम पाच वर्षांचा झाला आणि कोटणीसमहाराजांच्या वचनाप्रमाणे तो वयाचे पाचवे वर्षापासून हरिकीर्तन करू लागला. सांगलीतील दासरामांच्या वाड्याच्या पुढील भागात बाबाण्णा सोनार नावाचे भाविक गृहस्थ रहात होते. त्यांचेकडे खटावचे रामानंदमहाराज हे महान संत येत असत. त्यांनी एकदा बालरामाचे कीर्तन ऐकले. त्यांना ते फार आवडले आणि हा राम पुराणातील प्रल्हादाप्रमाणे आहे असे जाणवून ते त्याला प्रल्हाद म्हणू लागले (कीर्तन ऐकोनी रामानंद तोषले । तया संबोधिले प्रल्हादची ।।६९६.५।।; प्रल्हादची ऐसा म्हणती रामानंद। गौरविला मंद हरिकीर्तनी ।।).

एकदा रामानंदमहाराजांचे पुढे बालरामाचे कीर्तन चालू असताना, रामाच्या संप्रदायातील प्रवर्तक निंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूप धारण करून रामाच्या कीर्तनात प्रगट झाले. त्यावेळी सर्व उपस्थितांना अपूर्व सुवास जाणवला. बालरामाचे कीर्तन ऐकून संतुष्ट झालेले सिद्धानंद म्हणाले,

''हा राम म्हणजे हरिनामदास आहे'' (हरिनामदास म्हणती सिद्धानंद । पावोनी आनंद हरिकथे ।।). अशाप्रकारे सर्वश्रेष्ठ अशा सिद्धानंदांनी बालरामाला ''हरिनामदास'' असे म्हणून त्याचे कौतुक केले (हरिनामदास राम । म्हणती सिद्धानंद परम ।।६७७.४।।).

कालक्रमाने श्रीदासराम वयाने वाढले. इ.स.१९३९ साल उजाडले. या वर्षी साधुमहाराजांचा रथोत्सव पहाण्यास, वासुदेवराव अभ्यंकर यांना बरोबर घेऊन दासराम चिमडला गेले. तेथे प.पू. माईसाहेब यरगट्टीकर यांच्या सूचनेनुसार नारायणमहाराज यरगट्टीकर यांनी दासरामांचे कीर्तन आयोजित केले. त्यावेळी निंबरगीकरमहाराजांचे अधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हे कीर्तनात उपस्थित होते. दासरामांचे कीर्तन ऐकल्यावर ते उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''हे रामभाऊ म्हणजे प्रल्हाद आहेत'' (नागाप्पाण्णा सद्गुरु बोलिले हा प्रल्हाद). तसेच दासरामांच्या बरोबर आलेल्या वासुदेव अभ्यंकरांनाही नागाप्पाण्णामहाराजांनी सांगितले की, रामभाऊ म्हणजे प्रल्हाद आहे (कीर्तन ऐकोनि नागाप्पा तोषले । अभ्यंकरा बोलिले काय ऐका ।। प्रल्हादची आहे हा लाडका संतांचा ।।) (६८६.७-८). अशा प्रकारे रामानंद आणि नागाप्पाण्णा या दोन्ही संतांची वाणी एकच झाली (संतांची हे वाचा एक झाली ।। ६८६.८). नागाप्पाण्णामहाराजांचे वचन ऐकल्यावर वासुदेवराव अभ्यंकरांनाही आनंद झाला (जाहला आनंद वासुदेवरावा).

वरील सर्व प्रसंग सांगून झाल्यावर दासराममहाराज नम्रपणे म्हणतात, ''खरे म्हणजे माझी काय पात्रता होती? परंतु रामानंद आणि नागाप्पाण्णा या संतांनी माझे कौतुक करून मला आपलासा केला.'' (काय जीवाची या पहाता पात्रता । आपुलाची स्वता संती केला ।।). ते पुढे म्हणतात, ''खरे

म्हणजे मी हनुमंतसद्गुरूंचा म्हणजे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचा सेवक/ शिष्य आहे. पण रामानंद व नागाप्पाण्णा या संतांनी मला प्रल्हाद म्हणून आणि आपला म्हणून माझे कौतुक केले आहे. इतकेच नव्हे तर या सर्व संतांनी मला ''स्वानंद'' म्हणजे आत्मानंद दिला आहे'' (सद्गुरुसेवक संतांचे कौतुक। दासरामा भीक स्वानंदाची ।।).

अशाप्रकारे या अभंगात श्रीदासराममहाराजांनी आपल्या जीवनात घडून गेलेल्या दोन महत्त्वाच्या प्रसंगांचा उल्लेख केलेला आहे आणि त्यावरून श्रीदासराममहाराज हे बालपणापासून परमार्थात पारंगत होते याची खात्री पटते.

*(०२.०१.२०१२)*

***

## १२. दासराम तेथे धाला

**दासराम रामानंद । म्हणती कवतुके प्रल्हाद ।।१।।**
**तेची नागाप्पाण्णा वदले । आशीर्वाद संती दिले ।।२।।**
**हनुमंत सद्गुरुराय । प्रगटविले त्यांनी गूज ।।३।।**
***दासराम* तेथे धाला । म्हणूनी चरणदास केला ।।४।।**

(दा.गा.६८७)

स्वतःविषयी असे जे काही श्रीदासराममहाराजांचे अभंग आहेत, त्यापैकी वरील अभंग आहे.

गोविंद ऊर्फ मामामहाराज केळकर आणि सौ. इंदिराबाई या मातापित्यांच्या पोटी दासरामांचा जन्म कुरुंदवाड येथे झाला. त्यांचे जन्मापूर्वी औरवाड गावच्या वजीरबाबा या अवलियांनी तसा आशीर्वाद सौ. इंदिरामातेला दिला होता. दासरामांचा जन्म झाल्याच्या सुमारास सांगलीचे श्री हणमंत ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे कुरुंदवाडास सरकारदरबारी कीर्तन करण्यास आले होते. दासरामांचे आजोबांनी - जे नातवाचे मुख पहाण्यास कुरुंदवाडला आले होते - कोटणीसमहाराजांना सौ. इंदिरांच्या घरी बोलावले. हेतु हा की महाराजांचा आशीर्वाद बाळाला मिळावा. कोटणीसमहाराज इंदिराबाईंच्या घरी आले. महाराजांनी नूतन बालकाला आपल्या मांडीवर घेतले, त्याचे मस्तकावरून आपला अमृतहस्त फिरविला आणि बालकाच्या दृष्टीला दृष्टी भिडवून दृष्टिद्वारा या बाळाला उपदेशानुग्रह दिला. यावेळी बाळाचे वय फक्त १४ दिवसांचे होते. नंतर

या बालकाचे नाव ''राम'' असे ठेवण्यास महाराजांनीच सांगितले आणि हा ''बालराम लहानपणापासूनच कीर्तन करू लागेल,'' असा आशीर्वाद दिला.

महाराजांचा कृपाशीर्वाद खरा ठरला आणि वयाच्या पाचव्या वर्षापासूनच बालराम हा हरिकीर्तन करू लागला. कोटणीसमहाराजांनी मनात प्रगट केलेल्या गुह्य गोष्टींना अनुसरून त्यांचे कीर्तनात ब्रह्म, माया, जग, साधनप्रक्रिया इत्यादी पारमार्थिक विषय येत असत.

सांगलीत दासराम ज्या वाड्यात रहात, त्याच्या पुढील भागात बाबाण्णा सोनार नावाचे सात्त्विक गृहस्थ रहात होते. त्यांच्याकडे खटाव गावचे रामानंदमहाराज हे महान संत येत असत. एकदा त्यांनी बालरामाचे कीर्तन ऐकले. ते त्यांना फार आवडले आणि त्यामुळे दासराम त्यांचे दर्शनास गेले की, रामानंदमहाराज त्यांना कीर्तन करण्यास सांगत आणि आपण ऐकत बसत. पुराणकालीन प्रल्हादाप्रमाणे हा बालराम लहान वयातच कीर्तन करतो, हे पाहून रामानंदमहाराज कौतुकाने रामाला 'प्रल्हाद' म्हणू लागले.

पुढे इ.स. १९३९ साली श्रीदासराममहाराज हे चिमड गावी साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी गेले होते. या उत्सवासाठी निंबरगीकरमहाराजांचे परमाधिकारसंपन्न नातू नागाप्पाण्णामहाराज आलेले होते. या उत्सवप्रसंगी दासरामांचे कीर्तन झाले. ते ऐकून नागाप्पाण्णामहाराज अत्यंत खूष झाले आणि उत्स्फूर्तपणे ते म्हणाले, ''हे रामभाऊ म्हणजे प्रल्हादच आहेत.'' अशाप्रकारे नागाप्पाण्णामहाराजांनी दासराममहाराजांच्या प्रल्हाद नावाचे दृढीकरण केले.

अशाप्रकारे सद्गुरु कोटणीसमहाराज, रामानंदमहाराज खटावकर आणि श्रीनागाप्पाण्णामहाराज नीलवाणी हे तीनही महान संत दासरामांचेवर खूष होते आणि त्यांनी दासरामांना शुभ आशीर्वाद दिले. या तीनही संतांच्या कृपेमुळे दासराम संतुष्ट झाला आणि म्हणूनच या संतांनी बालरामाला आपल्या चरणाचा दास केले. संतांचा दास होणे ही काही सुलभ गोष्ट नाही. पण ती दुर्मिळ गोष्ट बालरामाला प्राप्त झाली, यातच बालरामाचेही महत्त्व दिसून येते.

**(२७.१२.२०११)**

***

## १३. दासरामा बोध साधनाचा

श्रीदासराममहाराजांनी आपल्या काही अभंगांत स्वतःच्या जीवनातील काही घटनांची नोंद केली आहे. त्यांना आत्मचरित्रपर अभंग म्हणता येते. असे अभंग एकत्र करून डॉ. के.वा. आपटे यांनी दासराममहाराजांचे 'आत्मचरित्र' संकलित केले आहे आणि ते प्रकाशितही झाले आहे. स्वतःच्या जीवनातील प्रसंग सांगणारा दासराममहाराजांचा एक अभंग असा आहे :-

**रामानंदमहाराज बोधिती माते ।**
**करी अभंग ते साधनाचे ।।१।।**
**हनुमंत सद्गुरुराये नवल केले ।**
**अबोल वदविले निजकृपे ।।२।।**
**तुकारामवाणी स्वप्नात योवोनी ।**
**आनंद देवोनी गेले मज ।।३।।**
**नागाप्पाण्णा करिती कवतूक ।**
**दिली प्रेमे भीक संतोषाची ।।४।।**
**सिद्धांचा प्रसाद गोडी ते अगाध ।**
***दासरामा* बोध साधनाचा ।।५।।**

(दा.गा.१३४०)

या अभंगात आपल्या जीवनातील तीन महत्त्वाच्या घटनांचा श्रीदासराममहाराजांनी निर्देश केला आहे. या घटना क्रमाने अशा :-

१) श्रीदासरामांना वयाचे चौदावे दिवशी हनुमंतराय कोटणीस या सत्पुरुषांचा दृष्टिद्वारे अनुग्रह झाला. त्याचवेळी त्यांनी त्यांचे नाव राम असे ठेवण्यास सांगितले आणि हा राम बालपणापासून कीर्तन करू लागेल अशी भविष्यवाणी केली. त्यांच्या आशीर्वादाप्रमाणे दासराम वयाच्या पाचव्या वर्षापासूनच कीर्तन करू लागले. श्रीदासराममहाराज सात-आठ वर्षांचे होते. त्यावेळी दादांच्या वाड्याच्या पुढील भागात बाबाण्णा सोनार नावाचे गृहस्थ रहात होते. त्यांच्याकडे मुकुंदराज संप्रदायातील रामानंदमहाराज खटावकर हे महान संत येत असत. एकदा रामानंदमहाराजांनी बालरामाचे कीर्तन ऐकले. ते त्यांना फारच आवडले. ते दासरामांना प्रल्हाद म्हणू लागले (बालाचे कीर्तनी डोल घेती रामानंद । प्रेमे हाक देती कवतुकाने या प्रल्हाद ।।). दासरामांची परमार्थातील प्रगती पाहून रामानंदमहाराज एकदा त्यांना म्हणाले, ''प्रल्हादा, तू साधनाचे अभंग करशील काय?'' ''हनुमंतराय या गुरूंच्या प्रेरणेने रचीन'' असे म्हणून दासराम घरी आले. आणि त्यांना साधनाचे अभंग स्फुरू लागले आणि मग त्यांनी ते लेखबद्ध केले (रामानंदमहाराज बोधिती माते । करी अभंग ते साधनाचे ।। हनुमंत सद्गुरुराये नवल केले । अबोल वदाविले निजकृपे ।।). हे ''साधनाचे अभंग'' दासरामगाथा या ग्रंथात प्रकाशित झाले आहेत.

२) दासराममहाराज १४-१५ वर्षांचे असताना एकदा आजारी पडले. औषधाने ते बरे झाले. पण प्रकृती नीट होण्यास डॉक्टरांनी त्यांना हवापालट करण्यास सांगितले. त्याप्रमाणे दासराममहाराज सातारा येथे गेले. तेथे रहात असताना एकदा त्यांचे स्वप्नात तुकाराममहाराज आले आणि त्यांनी एक अभंग उच्चारून दासरामांना बोध केला. त्यामुळे दासराममहाराजांना आनंद झाला (तुकारामवाणी स्वप्नात येवोनी । आनंद देवोनी गेले मज ।।). हा अभंग दासरामगाथा या ग्रंथात आहे.

३) इ.स.१९३९ सालच्या दिवाळीत दासराममहाराज चिमड गावी रघुनाथप्रिय साधुमहाराजांच्या रथोत्सवास गेले होते. त्यावेळी तेथे निंबरगीकरमहाराजांचे परमाधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज आलेले होते. या उत्सवात दासराममहाराजांचे कीर्तन झाले. ते नागाप्पाण्णामहाराजांना फार आवडले. तेही दासरामांना प्रल्हाद असे म्हणू लागले. त्यांना दासराममहाराजांनी काही पारमार्थिक शंका विचारल्या. त्यांचे निरसन नागाप्पाण्णामहाराजांनी केले. नंतर नागाप्पाण्णामहाराज बोलून गेले, ''रामभाऊ, निंबरगीकरमहाराज तुम्हाला बोध करतील.'' नागाप्पाण्णामहाराजांचे बोल खरे ठरले आणि इ.स. १९३९ च्या पौष शुद्ध नवमी पासून निंबरगीकरमहाराजांनी दासरामांना बोध करण्यास प्रारंभ केला (नागाप्पाण्णा करिती कवतुक। दिली प्रेमे भीक संतोषाची ।।). असे अनेक अभंग दासरामांना प्राप्त झाले. ते सर्व गुरुलिंगगीता या ग्रंथात संगृहीत केलेले आहेत. हा गुरुलिंगगीता ग्रंथही प्रकाशित झालेला आहे.

अशाप्रकारे तुकाराममहाराज, निंबरगीकरमहाराज इत्यादि सिद्धांनी दासराममहाराजांना बोध-प्रसाद दिला आणि हनुमंत सद्गुरूंनी तर अगोदरच दासरामांना साधनाचा बोध केला होता (सिद्धांचा प्रसाद गोडी ते अगाध । दासरामा बोध साधनाचा ।।).

अशाप्रकारे प्रस्तुत अभंगात दासराममहाराजांनी स्वतःच्या जीवनात घडून आलेल्या तीन महत्त्वाच्या प्रसंगांचा संक्षिप्त निर्देश केला आहे.

*(२१.१२.२०११)*

***

## १४. दासराम शरण त्याचे पैल

आत्मा/ब्रह्म/ईश्वर सर्व विश्वात आहे. साहजिकच आत्मा हा मानवी देहात आहेच (देव काही दूर नाही । आहे आपुल्याच देही ।। दासरामगाथा ५३१.३). या आत्मदेवाचे दर्शन झाले की मोक्ष प्राप्त होतो (देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य । झालिया दर्शन मुक्ती लाहे ।। रामपाठ १.१). आणि मानवी जन्मात आल्याचे सार्थक होते. आत्मा जरी या देहात आहे, तरी तो शरीरापेक्षा वेगळा आहे.

सामान्यपणे माणसाला एक देह आहे असे मानले जाते. पण साक्षात्कारी संतांच्या मते माणसाला चार देह आहेत आणि या चारही देहांपेक्षा आत्मा वेगळा आहे (एका जनार्दनी चौदेहावेगळा ।). आत्मा ''चौदेहासी अतीत'' (एकनाथमहाराज), चार देहांच्या पलीकडे आहे (चौदेहांचे पैल आत्मा घननीळ । दासरामगाथा), आणि या चार देहांचा निरास झाल्याविना आत्मदर्शन होत नाही (देहातीत होता पाविजे । परब्रह्म ते ।। दासबोध ८.८.२५). या चार देहांचे आकार आणि रंग ज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितलेले आहेत (ज्ञानदेवगाथा, ७८७.२-३, ८६३.१-२). ज्या चार देहांचे पल्याड आत्मदेव आहे ते चार देह असे आहेत :- १) स्थूल, २) सूक्ष्म, ३) कारण आणि ४)महाकारण. या चार देहांची माहिती दासराम केळकरमहाराजांनी पुढील अभंगात दिली आहे :-

**पंच तत्त्वयांचे जाहले शरीर ।**
**स्थूल देह साचार जाणिजे पा ।।१।।**

**वासनेचा देह तयाचे अंतरी ।**
**सूक्ष्म तो विवरी चाळकू गा ।।२।।**
**अज्ञान कारण देह त्या भीतरी ।**
**जाणिले चतुरी भक्तजनी ।।३।।**
**महाकारण देह ज्ञानमयी पूर्ण ।**
***दासराम* शरण त्याचे पैल ।।४।।**

(दा.गा.१७०३)

पहिला जो स्थूल देह आहे तो पाच तत्त्वांनी - महाभूतांनी - बनलेला आहे, ही पाच महाभूते म्हणजे आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी. हा देह हाडामासांचा, जड आणि दृश्य म्हणजे इंद्रियग्राह्य आहे. हा देह चार्वाकासकट सगळ्यांना मान्य आहे. हा देह नश्वर, नाशवंत आहे.

जे तत्त्वज्ञ स्थूल शरीरापेक्षा नित्य असणारा आत्मा वेगळा मानतात आणि तो मतानुसार परलोकी गमनागमन करतो असे मानतात (उदा. सांख्य मतानुसारी, पूर्ण मीमांसक) ते सूक्ष्म शरीर मानतात. कर्मांतून सुटून मोक्ष मिळेपर्यंत हे शरीर टिकून रहाते. हे सूक्ष्म शरीर सामान्य माणसाला दृश्य नसले तरी ते योगिजनांना दृश्य होऊ शकते. या सूक्ष्म शरीरालाच लिंगदेह, वासनामय शरीर असे म्हणतात आणि ते स्थूल देहाचे आत असते.

या सूक्ष्मशरीराचे घटक कोणते याबद्दल मतभेद आहे. सांख्य दर्शनाच्या मते लिंगशरीराचे घटक अठरा आहेत, तर कैवलाद्वैत वेदांताच्या मतानुसार हे घटक सतरा आहेत, ते असे - पाच प्राण, दहा इंद्रिये, मन आणि बुद्धि. या शरीरात प्राण असल्याने हे शरीर चालक/चालना देणारे आहे.

या स्थूल आणि सूक्ष्म शरीराच्या जोडीने केवलाद्वैत वेदांताने 'कारण' नावाचे शरीर मानले आहे. केवलाद्वैत वेदांतानुसार, ब्रह्मांडामध्ये 'अज्ञान' समष्टि आहे, तर पिंडात म्हणजे मानवी देहात अज्ञानव्यष्टि आहे. ही अज्ञानव्यष्टि ही अहंकार इत्यादींचे कारण आहे. म्हणून अज्ञानव्यष्टीला म्हणजेच अज्ञानाला कारणशरीर असे म्हणतात.

असे दिसते की साक्षात्कारी साधुसंतांनी वरील तीन देहांचे जोडीने आणखी एक चौथे शरीर मानले आणि त्याला 'महाकारण' असे नांव दिले. हे शरीर ज्ञानमय आहे. महाकारण शरीर म्हणजे ज्ञान. या शरीराला महाकारण म्हणण्याची दोन कारणे दिसतात :- १) हे शरीर कारणदेहाच्या पलीकडे, त्यापेक्षा वेगळे असल्याने त्याला महाकारण म्हणतात. २) नुसते अज्ञान काय कामाचे? अज्ञानापेक्षा ज्ञान महत्त्वाचे. म्हणून ज्ञानाला महाकारण हे नाव पडले. आता हे ज्ञान कोणते, या प्रश्नाचे उत्तर असे :- स्थूल देहाची जागृति अवस्था, सूक्ष्म देहाची स्वप्न अवस्था आणि कारणदेहाची सुषुप्ती ही अवस्था. सुषुप्ति अवस्थेत अज्ञान असते. महाकारण देहाची तुर्या ही अवस्था आहे. या तुर्या अवस्थेच्या संदर्भात, रामदासस्वामी सांगतात की, या अवस्थेत साधकाला माया आणि ब्रह्म या दोहांचेही ज्ञान असते (''जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।। ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ।। दासबोध ७.४.४९''). पण या अवस्थेतील ब्रह्मज्ञान हे शुद्ध ब्रह्मज्ञान नव्हे असे रामदासस्वामीच सांगतात. कारण तुर्या अवस्थेत द्वैत असते. शुद्ध ब्रह्मज्ञानात अद्वैत असते, तेथे जीव ब्रह्माशी एकरूप झाल्याने अद्वैत असते.

शुद्ध अद्वैत ब्रह्मज्ञानासाठी तुर्या अवस्था ओलांडून पलीकडील उन्मनी अवस्थेत जावे लागते. उन्मनी अवस्थेत अद्वैत आत्मसाक्षात्कार /

ब्रह्मसाक्षात्कार होतो. दासराममहाराजांनी उन्मनी अवस्था साधली आणि ते ब्रह्मरूप झाले. म्हणून त्यांनी अभंगाच्या शेवटच्या चरणात सांगितले आहे, ''दासराम शरण त्याचे पैल''.

***

(चार अवस्थांच्या पलीकडील उन्मनी अवस्थेला ''कैवल्य'' देह असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. म्हणजे पहिले चार देह आणि कैवल्यदेह मिळून परमार्थात पाच देह होतात. या पाचही देहांच्या सविस्तर माहितीसाठी पहा : प्रा.डॉ.के.वा.आपटे, परमार्थातील पाच देह, विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, नागपूर, १९९३).

--------

# १५. पाच प्राण आणि त्यांचे कार्य

''प्राण कंठाशी आले'', ''प्राण जाये पर वचन न जाये'', ''माझा प्राण निघाला आहे'' अशा प्रकारचे शब्दप्रयोग माणूस व्यवहारात करीत असतो. यावरून शरीरात प्राण म्हणून काहीतरी आहे, हे माणसाला माहीत आहे, एवढे आपल्याला कळते.

भारताच्या अध्यात्मशास्त्रात मानवी देहामध्ये ''प्राण'' नावाची शक्ती आहे असे मानले गेले आहे आणि तो पाच प्रकारात विभक्त होऊन शरीरात कार्य करतो असे सांगितले जाते. या पाच प्रकारांना पंचप्राण म्हणतात. शरीराच्या बहुतेक क्रिया या पंचप्राणांवर अवलंबून आहेत असे मानले जाते. या पाच प्राणांची नावे अशी आहेत :- प्राण, अपान, उदान, व्यान आणि समान. ''पंचप्राण पंचारती। मुक्ताई ओवाळी सद्गुरुमूर्ती ।।'' या शब्दांत ज्ञानेश्वरभगिनी संत मुक्ताबाई यांनी पाच प्राणांना पंचारती मानून त्यांचा गौरव केला आहे. हे पाच प्राण आणि त्यांची कार्ये श्रीदासराममहाराज केळकर यांनी आपल्या एका अभंगात दिलेली आहेत. तसे करताना त्यांनी उदान, प्राण,व्यान, अपान आणि समान असा या पाच प्राणांचा क्रम दिलेला आहे. हा अभंग असा :-

**उदान तो कंठस्थानी । घोटी अन्न आणि पाणी ।।१।।**
**प्राण देखे हृदयस्थानी । भाता फुंकितो जेथुनी ।।२।।**
**करी जठराग्नी प्रदीप्त । अन्नाचा तो रस होत ।।३।।**
**व्यान देख नाडीवाटे । वाहवी जीवनाचे पाट ।।४।।**

**सर्वांठायी टवटवी । रोमरामाते हालवी ।।५।।**
**दूषित वायु बाहेर टाकी । अपानाची खूण देखी ।।६।।**
**अन्नरसाचे रेचक । लीला अघटित निःशंक ।।७।।**
**समान तो नाभिस्थानी । राहे समता धरोनी ।।८।।**
**सर्व संधी पैस करी । सूत्र धरून नाचवी दोरी ।।९।।**
**हालवी जो हातपाय । जेणे जीवा तरणोपाय ।।१०।।**
***दासराम* संता शरण । त्यांनी दिधले ऐसे ज्ञान ।।११।।**

(दा.गा.१७०५)

उदान नावाचा जो प्राण आहे, तो शरीरात ''कंठ'' (घसा) या स्थानी असतो. माणसाने घेतलेले अन्न आणि पाणी यांचे पचन करण्यास तो उपयुक्त ठरतो.

शरीरातील ''हृदय'' या स्थानी ''प्राण'' नावाचा प्राण आहे. तो श्वास आणि उच्छ्वास या क्रियांना जबाबदार आहे. तो श्वासोच्छ्वासाचा भाता चोवीस तास आणि माणूस मरेपर्यंत हलवीत असतो. श्वासोच्छ्वासावरच माणूस जगत असतो. तसेच हा प्राण जठराग्नी प्रदीप्त करतो आणि जड अन्न पातळ करतो. मानवी देहात अनेक नाड्या आहेत. त्या नाड्यांमध्ये ''व्यान'' नावाचा प्राण असतो. या नाड्यांतून रक्त वहात असते. रक्त हे जीवनाचे/जिवंतपणाचे लक्षण आहे. व्यान वायु नाड्यांद्वारा जीवनाचे पाट सर्व शरीरभर वाहवीत असतो. या नाड्या सर्व शरीरभर आहेत. म्हणून हा व्यान रोमारोमाला शक्ति देतो आणि देहातील सर्व ठिकाणी टवटवी/ताजेपणा टिकवून धरतो, असे येथे म्हटले आहे.

उपयोगानंतर दूषित झालेले वायु आणि पदार्थ शरीराबाहेर टाकण्याचे कार्य ''अपान'' नावाचा वायु करतो. अन्नाचे पचन झाल्यावर जो निरुपयोगी

भाग असतो तो विष्ठेच्याद्‌वारा अपान वायु गुदद्वारातून बाहेर टाकतो. पाण्याचा उपयोग झाल्यावर जे निरुपयोगी पाणी उरते ते मूत्राद्वारा अपान वायु बाहेर टाकतो. तसेच पोटात अन्न कुजल्यावर जो दूषित/घाणेरडा वायु उत्पन्न होतो, तो गुदद्वारा बाहेर टाकण्याचे कार्यही अपान नावाचा वायु करीत असतो. शरीराच्या आरोग्याला घातक ठरणारे मल, मूत्र आणि वायु शरीराबाहेर टाकण्याचे अपानाचे हे कार्य अघटित आहे असे दासराममहाराज म्हणतात.  अपानाच्या या कार्यामुळे शरीराचे आरोग्य व्यवस्थित रहाते.

देहातील बेंबी/नाभि या स्थानी ''समान'' नावाचा प्राण असतो. तो 'समता/समानपणा' टिकविण्यास उपयोगी आहे. तो हाडांचे सांधे सैल करून ते व्यवस्थित ठेवतो. त्यामुळे अनेक सांधे असणाऱ्या हातांच्या आणि पायांच्या क्रिया घडवून आपणास तो उपयोगी पडतो.  तसेच समानतेचे सूत्र धरून आणि ते हलवून तो समान नावाचा प्राण शरीराला हलते ठेवून उपयुक्त असल्याने, तो जीवाला तरणोपाय आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

शेवटी श्रीदासराममहाराज सांगतात ः-  मी संतांना शरण गेलो आणि माझ्यावर कृपावंत होऊन त्यांनी पाच प्राण व  त्यांची कार्ये यांचे ज्ञान मला दिले आणि तेच मी येथे मांडले आहे.

*(१२.१२.२०११)*

***

(येथे आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी ती अशी. संतांच्या अभंगात, कधी कधी ''आपण नाकातून जो श्वास घेतो तो प्राण आणि नाकातून जो बाहेर टाकतो तो अपान'' असे म्हटलेले  ही आढळून येते).

-------

# १६. सोहंराव त्याचे पैल महाराजा

**जागृतीमाझारी स्थूलदेहाभीतरी ।**
**राजा वास करी मनोरूप ।।१।।**
**स्वप्नाचे माझारी सूक्ष्म देहाअंतरी ।**
**राजा वास करी वायुरूप ।।२।।**
**सुषुप्तिमाझारी कारण शरीरी ।**
**जीवराजा विवरी भावरूप ।।३।।**
**तुरीयेपाशी साचारी महाकारणांतरी।**
**शिवराजा सत्वरी देखे डोळा।।४।।**
**सोहंराव त्याचे पैल महाराजा ।**
**दावी आत्मखुणा *दासरामा* ।।५।।**

(दा.गा.१४९५)

व्यवहारातील अनुभव आणि परमार्थातील अनुभव यांना प्रामुख्याने कोण जबाबदार असतो, याचे संक्षिप्त दिग्दर्शन श्रीदासराममहाराजांनी या अभंगात केले आहे.

या जगातील व्यावहारिक जीवनात माणूस तीन अवस्थांतून जात असतो. म्हणून तो या अवस्था भोगतो, असे कधी कधी म्हटले जाते. या तीन अवस्था म्हणजे जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति किंवा गाढ निद्रा या होत.

या तीन अवस्थांपैकी जागृति या अवस्थेत माणसाचा स्थूल देह कार्यप्रवण असतो. हा स्थूल देह आकाश, वायु, तेज, पाणी आणि पृथ्वी

या पाच महाभूतांच्या विशिष्ट मिश्रणाने बनलेला आहे. जागृति अवस्थेत स्थूल देह, पाच ज्ञानेंद्रिये - डोळा, कान, नाक, जिव्हा आणि त्वचा, पाच कर्मेंद्रिये - हात, पाय, वाणी, गुद आणि शिश्न, पाच प्राण आणि अंतःकरण हे सर्वच कार्यशील असतात. पण या सर्वांत महत्त्वाचा कोण? ज्याप्रमाणे जगात राजा हा महत्त्वाचा असतो त्याप्रमाणे सर्व घटकात महत्त्वाचा कोण? या सर्व घटकांत मन म्हणजे मनोरूप राजा हा महत्वाचा आहे. मन हे अंतःकरणात मोडते. सर्व इंद्रियसंवेदना मनाप्रत जातात. त्यावर साधक बाधक विचार मन करते. काही करावयाचे असल्यास ते कर्मेद्रियांना प्रेरणा देते. म्हणून जागृति अवस्थेत सर्व घटकांमध्ये मन हे राजा आहे, मुख्य आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

स्वप्न ही दुसरी अवस्था आहे. या स्वप्न अवस्थेत स्थूल देह व दहाही इंद्रिये स्तब्ध असतात; त्यांचे कार्य बंद असते. या स्वप्न अवस्थेत माणसाचा सूक्ष्म देह कार्यशील असतो. पाच प्राण, दहा इंद्रिये, मन आणि बुद्धि या सतरा घटकांनी सूक्ष्म देह बनलेला असतो. 'मनी ते स्वप्नी' असे जरी म्हटले जात असले तरी मनात नसणाऱ्या अनेक गोष्टी स्वप्नात दिसतात आणि त्यांचा अनुभव येतो. म्हणजे मनाखेरीज आणि कोणी तरी स्वप्न पहाणारा आहे असे दिसते आणि हा 'वायुरूप राजा' आहे असे दासराममहाराज सांगतात. पण हा वायुरूप कोण हे मात्र नीटसे कळत नाही. स्वप्नसृष्टीचे ज्ञान या वायुरूप राजाला होत असल्याने, स्वप्न अवस्थेत वायुरूप राजा महत्त्वाचा ठरतो.

सुषुप्ती ही तिसरी अवस्था आहे. सुषुप्ति ही गाढ निद्रा अवस्था आहे. यात जागृति व स्वप्न या दोन्ही अवस्था नसतात. या अवस्थेत 'कारण' नावाचे शरीर असते. हे कारणशरीर म्हणजे अज्ञान आहे. म्हणून सुषुप्ति अवस्थेत बाह्य जग अथवा आंतरजग यापैकी कशाचेच ज्ञान

नसते. सुषुप्ति संपल्यानंतर जागृति अवस्था आली की ''झोपेत मला काही कळले नाही'' असे स्मृतिजन्य ज्ञान माणसाला होते. स्मृती ही पूर्वज्ञानाअंती असते. म्हणजे झोपेतील अज्ञान कुणाला तरी कळत होते असा अर्थ होतो. सुषुप्तीमध्ये अज्ञानाला जाणणारा जो महत्त्वाचा घटक होता, त्याला 'भावरूप जीवराजा' असे श्रीदासराममहाराजांनी म्हटले आहे. वेदांताच्या भाषेत बोलायचे झाल्यास ''प्रज्ञा'' आत्मा हा सुषुप्ति अवस्थेत मुख्य असतो.

वरील तीनही अवस्था माणसाच्या दैनंदिन जीवनात येत असतात. आता, जर कुणी व्यवहाराला, व्यवहारातील सुख-दुःखांच्या रहाटगाडग्याला कंटाळला असेल आणि जर तो नित्य सुखाची इच्छा करीत असेल तर तो परमार्थाकडे वळतो. परमार्थ करण्यापूर्वी त्याला आत्मसाक्षात्कारी गुरु शोधावा लागतो. आत्मानंद/नित्यानंद प्राप्त करून घेण्यासाठी गुरु त्याला योग्य ती साधनप्रणाली सांगतो. ती साधनप्रणाली आचरत असताना तो माणूस तुर्या या अवस्थेत पोहोचतो, असे संतसज्जन सांगतात. परमार्थाचा प्रारंभ आणि व्यवहाराचा शेवट अशा मध्यस्थानी ही तुर्यावस्था आहे. ही तुर्यावस्था ''महाकारण'' नावाच्या देहाची असते. महाकारण देह हा ज्ञानरूप आहे. आता प्रश्न असा :- महाकारण देह म्हणजे ज्ञान, हे कोणते ज्ञान? त्याला रामदास स्वामींनी दासबोधात उत्तर दिले आहे :- तुर्या अवस्थेत माया (आणि मायिक पदार्थ) आणि ब्रह्म या दोहोंचेही ज्ञान असते. ही तुर्यावस्था ''शिवाच्या'' अखत्यारीत येते. या अवस्थेत शिवाचे दर्शन होते. हा शिव ज्ञानरूप आहे. पण त्याचे ज्ञान अपूर्ण आहे. कारण तेथे ब्रह्माचे शुद्ध ज्ञान नाही. तुर्यावस्थेत होणारे ज्ञान हे अशुद्ध ब्रह्मज्ञान आहे, कारण तेथे द्वैत आहे, असे रामदासस्वामींनी दासबोध ग्रंथात सांगितले आहे. म्हणून तुर्यावस्थेचे पलीकडे जाऊन उन्मनी अवस्था साधावी लागते.

म्हणून तुर्या अवस्थेच्या पलीकडील उन्मनी अवस्थेत जावे लागते. या अवस्थेत अद्वैत असे शुद्ध ब्रह्मज्ञान होते, असे रामदासस्वामींनी सांगून ठेवलेले आहे. उन्मनी अवस्थेत मुख्य काय आहे? दासराममहाराज सांगतात :- ''सोहंराव'' हा या अवस्थेत ''महाराजा'' आहे. सोहंराव म्हणजे सोहंरूप सद्गुरु म्हणजेच आत्मा. उन्मनी अवस्थेत सोहंरूप सद्गुरूचे म्हणजेच आत्म्याचे म्हणजेच ब्रह्माचे दर्शन होते. या अवस्थेत आत्म्याखेरीज अन्य काही नाही. तेथे केवळ अद्वैत आत्मा आहे. तोच लौकिक भाषेत बोलायचे झाल्यास 'महाराजा' आहे.

उन्मनी अवस्थेत आत्म्याचे दर्शन झाले की जीव आत्मरूप होतो. त्याला नित्य आत्मानंद प्राप्त होतो. आता त्याला जीवनात मिळवावयाचे काही राहिले नाही. तो कृतकृत्य होतो. त्याचे जीवन सार्थकी लागते. कारण ब्रह्मरूप/आत्मरूप होणे म्हणजेच स्वतःचे मूळ स्वरूप प्राप्त करून घेणे हेच जीवाचे इतिकर्तव्य आहे. उन्मनी अवस्थेत आत्म्याचे ज्ञान होत असल्याने, ही तुर्येपलीकडील उन्मनी अवस्था ''आत्मखुणा'' दाखविते असे श्रीदासराममहाराज सांगतात. याचाच पर्यायाने असा अर्थ होतो की, दासराममहाराज उन्मनी अवस्थेत आत्मरूप झाले.

*(१६.१२.२०११)*

***

# १७. दासराम स्थिर अलक्ष्यातु

माणूस जन्माला आल्यापासून आध्यात्मिक, आधिभौतिक तसेच आधिदैविक या तीन तापातील कोणतातरी एक ताप त्याला त्रास देतो. मग त्यांना कंटाळलेला माणूस नित्य सुखासाठी परमार्थाकडे वळतो (''त्रिविधतापे पोळला । तोच येथे अधिकारी झाला ।।''). त्याला संसारदुःखातून सुटू इच्छिणारा मुमुक्षु असे म्हणतात. परमार्थ साधण्यासाठी हा मुमुक्षु आनंदरूप आत्म्याचा साक्षात्कार झालेल्या गुरूचा शोध घेऊ लागतो. असा गुरु भेटल्यावर तो गुरु त्याला आत्मप्राप्तीचे साधन सांगतो. गुरुप्रणीत साधनाचा आचार तो करू लागला की गुरु प्रसन्न होतो आणि मग गुरुकृपेने त्याची साधनात प्रगती होऊ लागते. ही प्रगती होत असताना आत्म्याचे निरनिराळे अनुभव घेत घेत तो साधक आनंदरूप आत्मा होऊन जातो. साधकाला येणारे हे विविध अनुभव श्रीदासराममहाराजांनी ज्या अभंगात सांगितले आहेत तो अभंग असा :-

**सर्व साधारण अठरा ते वीस ।**
**अंगुळे निश्वास गती वाहे ।।१।।**
**क्रोधाग्नी संतापे होता बेसुमार ।**
**छप्पनाचे वर गती वाहे ।।२।।**
**पंधरा अंगुळे निश्वास वहाता ।**
**तरी ये स्थिरता सहजेची ।।३।।**
**द्वादश अंगुळ साधनी निश्वास ।**
**समता चित्तास प्राप्त होय ।।४।।**


**एकादश अंगुळे जरी होय वहाती ।**
**तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची ।।५।।**
**दशम अंगुळे निश्वास वहाता ।**
**अक्षरे देखता दृष्टीपुढे ।।६।।**
**नवांगुळापासूनी साधी अष्टसिद्धी ।**
**असे त्याचा अवधी द्वयांगुळी।।७।।**
**एकची अंगुळ वहाता निश्वास ।**
**होय नादघोष सुस्वरेसी ।।८।।**
**जरी होय बंद ऐसा हा निश्वास ।**
**दरवळे सुवास चहू ठायी ।।९।।**
**ऊर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार ।**
***दासराम* स्थिर अलक्ष्यातु ।।१०।।**

(दा.गा.१६८४)

दासराममहाराज हे चिमड सांप्रदायिक होते. चिमड संप्रदायातले आत्मप्राप्तीचे साधन हे श्वासोच्छ्वासाशी निगडित आहे. कारण गुरुलिंगगीतेत सांगितल्याप्रमाणे श्वासोच्छ्वास हा आनंदरूप आत्म्याकडे जाण्याचा राजमार्ग आहे. या श्वासोच्छ्वासामध्ये नामाचा ध्वनी उमटत असतो. त्या नामनादाशी दृष्टी, कान आणि मन हे एकाग्र झाले की हळु हळु बाहेर जाणारा उच्छ्वास कमी कमी, मंद मंद होऊ लागतो. हा श्वास जसजसा मंद होत जाईल तसतसे साधकाला निरनिराळे पारमार्थिक अनुभव येऊ लागतात. ते कोणते ते या अभंगात श्रीदासराममहाराजांनी क्रमाने सांगितले आहेत.

सर्वसाधारणपणे माणसाच्या नाकातून बाहेर जाणारा उच्छ्वास हा नाकाच्या शेंड्यापासून बाहेर अठरा ते वीस अंगुळे वहात असतो. ही

अंगुळे म्हणजे माणसाच्या हाताची अंगठा सोडून चार बोटे होत. ही बोटे एकावर एक ठेवली की चार अंगुळे होतात. बाहेर जाणाऱ्या श्वासाचे अंतर याप्रमाणे येथे अंगुळांच्या मापांनी सांगितले आहे. या अंगुळाची आकृती अशी :-




श्वास बाहेर जाण्याच्या अंतरात रागाने फरक पडतो. समजा माणूस रागावला तर क्रोधाग्नीने संतप्त झालेल्या त्या माणसाचा उच्छ्वास बेसुमार होऊन तो छप्पन्न (५६) अंगुळापर्यंत दीर्घ होऊ शकतो. तसेच माणसाने खूप व्यायाम केला तरी उच्छ्वास दीर्घ होतो.

आता साधक साधन करू लागला की जसजसे साधन जमू लागते तसतशी बाहेर जाण्याच्या श्वासाचे अंतर कमी कमी होऊ लागते आणि साधकाला विविध अनुभव येऊ लागतात, ते असे :-

१) पंधरा (१५) अंगुळे निश्वास वाहू लागला तर सहजपणे स्थिरता येते. सामान्यपणे माणसाची इंद्रिये बहिर्मुख म्हणजे जगातील बाह्य विषयांकडे धावणारी असतात. त्यांच्यावर नियंत्रण येऊन ती मोठ्या प्रमाणात स्थिर होतात. २) साधन करताना जर उच्छ्वास बारा (१२) अंगुळे वाहू लागला तर चित्ताला म्हणजे मनाला समता येते. मन हे सतत संकल्प-विकल्प करून चंचळ होत असते. त्याची ही चंचळता कमी होऊ लागते. तसेच सुख आणि दुःख आले असता, त्याचा मनावर परिणाम होईनासा होतो. दोन्ही प्रसंगात मन सम रहाते. ३) जर श्वास हा अकरा (११) अंगुळांपर्यंत वाहू लागला तर साधकाला आत्म्याची काव्यस्फूर्ती

येते. काहीही प्रयत्न न करता त्याला काव्याची स्फूर्ती येते. या आत्म्याच्या काव्यस्फूर्तीने होणारे काव्य हे लौकिक विषयाशी निगडित नसते तर ते आध्यात्मिक/पारमार्थिक विषयाशी संबंधित असते. ४) नंतर जर उच्छ्वास दहा (१०) अंगुळे वाहू लागला तर साधकाला त्याच्या दृष्टीपुढे प्रकाशात अक्षरे दिसू लागतात. म्हणजे अध्यात्मिक विषयाशी संबंधित असे शब्द/वाक्ये त्याला प्रकाशाक्षर स्वरूपात दिसू लागतात. ५) यापुढे समजा उच्छ्वास हा नऊ (९) अंगुळे ते दोन (२) अंगुळे या प्रमाणात वाहू लागला तर साधकाला अष्टसिद्धी प्राप्त होतात. अणिमा, लघिमा, गरिमा, आकाशगमन इत्यादि आठ सिद्धी अध्यात्मात सांगितल्या गेल्या आहेत. त्या साधकाला प्राप्त होतात. येथे साधकाने एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी. या आठ सिद्धींचा वापर करण्याचा मोह त्याने टाळला पाहिजे. त्या मोहात जर तो सापडला तर त्याची पारमार्थिक प्रगती खुंटेल आणि त्याला आत्मसाक्षात्कार होऊन त्याला आत्मानंद मिळणार नाही. म्हणून या आठ सिद्धींचा वापर करण्याचा मोह टाळून साधकाने साधनातील पुढील प्रगतीकडे लक्ष द्यावयास हवे. ६) यानंतर उच्छ्वास जेव्हा एकच (१) अंगुळ बाहेर जाऊ लागतो, तेव्हा त्याला सुस्वर असा नादघोष ऐकू येऊ लागतो. हा नादघोष बाह्य जगातून किंवा शरीरातून येणारा नाही. हा नाद अनाहत आहे, तो कोणत्याही आघाताविना होत असतो. बाहेरील घंटा, शिंग, नौबत इत्यादीप्रमाणे हे अनाहत नाद असतात. या नादात मन गुंतून जाते.

आता बाहेर जाणारा हा श्वास जर थांबला तर तो आतच राहील. या स्थितीत साधकाला सुवासाचा अनुभव येऊ लागतो. हा सुवासही बाहेर असणाऱ्या अत्तर, सेंट, फुले इत्यादी सुगंधी द्रव्यातून येणारा नसतो. कोणतेही सुगंधी द्रव्य नसताना, हा सुवास साधकाला जाणवतो. हा वास कस्तुरी, मोगरा इत्यादींच्या वासाप्रमाणे भासतो.

यानंतर शुद्ध झालेला आणि आतच असणारा श्वास हा खाली आधारस्थानापर्यंत जाऊन, तेथून तो ऊर्ध्वगामी - वर जाणारा - होतो. तो शरीरातील भ्रूमध्य स्थानापर्यंत येतो. भ्रूमध्यस्थानी त्रिकूट हे स्थान आहे. त्यानंतर तो गोल्हाट, औटपीठ इत्यादी स्थाने साधकाला लागतात. त्या त्या ठिकाणी येणारे अनुभव घेत साधक सहस्रदळ या स्थानी पोहोचतो. तेथेच आत्म्याचा निवास आहे. तेथील आत्मा जरी अलक्ष आहे तरी तो आता साधकाला लक्ष होतो. आत्म्याला पाहिले की साधक आत्मरूपच होऊन जातो, तसाच तो स्थिर होतो.

वरीलप्रमाणे अनुभव घेत श्रीदासराममहाराज हे अलक्ष आत्म्यात स्थिर झाले असे ते शेवटच्या चरणात सांगतात. हीच परमार्थातील परमोच्च स्थिती आहे. तिच्यात परमानंद आहे.

*(१५.१२.२०११)*

***

## १८. पंचभूत अंश मन हे जाणिजे

**संकल्प विकल्प चालिले चिंतन ।**
**ऐसे असे मन देहामाजी ।।१।।**
**पंचभूत अंश मन हे जाणिजे ।**
**कैचे ओळखिजे चंचळू रे ।।२।।**
**हातासी आलिया पवनाची सिद्धि ।**
**सहज समाधी रामनामी।।३।।**
***दासराम* म्हणे सद्गुरूंची कृपा ।**
**मार्ग हा सोपा वैष्णवासी ।।४।।**

(दा.गा.१२८८)

ज्या जगात आपण रहात आहोत त्यातील सर्वच गोष्टी आपल्या इंद्रियांना ग्राह्य नाहीत. आपला साडेतीन हात स्थूल देह हा इंद्रियगम्य आहे. पण या देहात जे मन आहे ते मात्र इंद्रियांना कळणारे नाही. मन हे त्याच्या कार्यावरून ओळखावे लागते आणि मग मन आहे असे मानले जाते.

मानवी जीवनात मन हे अतिशय महत्त्वाचे आहे. मनात आले तर मनुष्य एखादी गोष्ट करतो. तसे न झाल्यास तो काही करत नाही. म्हणून इष्ट गोष्ट मनात आणण्याची खटपट करावी लागते. आणि म्हणूनच या मनाला साधुसंतांनी बोध केला आहे की, हे मना, तू चांगल्या गोष्टी मनात आण, वाईट गोष्टींचा विचार करू नको, ईश्वराची भक्ति कर आणि

आत्मसाक्षात्कार करून घे. या मनाला बोध करण्यासाठी समर्थ रामदासस्वामींनी ''मनोबोध'' नावाचे एक प्रकरणही लिहिले आहे.

माणसाचा स्थूल देह हा आकाश, वायु, तेज, पाणी आणि पृथ्वी या पाच जड महाभूतांच्या विशिष्ट मिश्रणाने बनलेला आहे. तसे मन कशाचे बनले आहे? केवलाद्वैत वेदांताच्या मते, मन हे सूक्ष्म अशा आकाश, वायु, तेज, पाणी आणि पृथ्वी यांच्या अंशापासून बनले आहे. म्हणून त्याला येथे 'पंचभूत अंश मन' असे म्हटले आहे. याच सूक्ष्म भूतांपासून माणसाचे सूक्ष्म शरीर बनते आणि त्याचा एक घटक मन आहे.

हे मन काय करते की ज्याच्यावरून ते आहे हे कळते? याचे उत्तर आहे :- मन हे सतत विचार करीत असते. झोपेतून उठल्यापासून ते पुनः झोप लागेपर्यंत मनाचे विचार करण्याचे कार्य चालू असते. आपण काहीही करीत असलो तरी हे मन विचार करण्याचे आपले कार्य सोडत नाही. या विचारांनाच संकल्प-विकल्प असे नाव पूर्वीच्या जाणत्या माणसांनी दिले आहे, आणि संकल्पविकल्प हे मनाचे कार्य आणि स्वरूप आहे असे सांगितले आहे (संकल्पविकल्पात्मकं मनः). एक विचार येतो, तो जातो, दुसरा येतो, तो जातो या पद्धतीने सतत विचार करीत रहाणे हेच मनाचे कार्य आहे. विचारांचे हे कार्य सतत चालू असल्याने मन हे ''चंचळू'' आहे असे येथे म्हटले आहे. मन स्थिर, एकाग्र नाही, ते सतत बदलत असते.

हे चंचळ मनच माणसाच्या व्यावहारिक आणि पारमार्थिक जीवनात उपयोगी पडणारे आहे. मनाला जे आवडत नाही ते करण्यास मन तयार होते, असा आपला या व्यवहारातील अनुभव आहे. याचाच उपयोग परमार्थात करून घेता येतो. म्हणून साधुसंत सांगतात की मनाला

परमेश्वराच्या नामाची गोडी पटवून द्या. ती त्याला आवडली तर ते ईश्वराचे / रामाचे नाम घेऊ लागेल आणि मग मन परमार्थात सहाय्यभूत होईल.

परमार्थात आत्मसाक्षात्कार हे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी देहातील श्वासोच्छ्वास हा राजमार्ग आहे. या श्वासोच्छ्वासात नामाची गती आहे आणि गति असल्यामुळे नामाचा ध्वनी उमटत आहे. आणि तिकडे लक्ष लागणे आवश्यक आहे. ''रामनाम गति देहात प्रचीती'' असे श्रीमामामहाराज केळकरांनी रामपाठ या ग्रंथात सांगितले आहे आणि ''रामनाम ध्वनी उमटे तिथे लक्ष लावी नेटे'' असे दुसऱ्या एका संतांनी सांगून ठेवले आहे.

हा जो रामनामाचा ध्वनी उमटतो आहे तिकडे दृष्टी, कान आणि मन हे लागले पाहिजेत. या रामनामाच्या गतीशी मन हे एकरूप झाले की माणसाला 'पवनसिद्धी' प्राप्त होते. या पवनसिद्धीत मनाचे संकल्प-विकल्प, विचार थांबलेले असतात. मन हे तेथे एकाग्र झालेले असते. म्हणजेच मन हे मन म्हणून राहिलेले नसते. या मनाच्या स्थितीला ''अमनीभाव'' किंवा ''उन्मनी'' असे म्हणतात. हीच सहज समाधिस्थिती. या उन्मनी अवस्थेतच आत्म्याचा साक्षात्कार होतो. आत्मसाक्षात्कार झाला की जीव आत्मरूप होतो. आत्मरूप होणे हेच परमार्थातील साध्य आहे.

वरील सर्व होण्यास सद्गुरुकृपा हवी, असे श्रीदासराममहाराज सांगतात. जो आत्मसाक्षात्कारी संत आपणास परमार्थाची वाट दाखवितो तो आपला सद्गुरु. हा सद्गुरु आत्मप्राप्तीचे साधन सांगतो. हे साधन करीत रहाणाऱ्यावर सद्गुरूची कृपा होते आणि सद्गुरुकृपेने परमार्थाची वाटचाल सोपी, सुलभ होते आणि अंतिम साध्य प्राप्त होते.

हे सर्व ''वैष्णवाला'' सुलभ होते, असे श्रीदासराममहाराज म्हणतात. शब्दशः 'वैष्णव' म्हणजे विष्णूचा भक्त. पण हा शब्द येथे

श्रीदासराममहाराजांनी व्यापक अर्थाने वापरला आहे. परमार्थाचे अंतिम साध्य साधू इच्छिणारा जो कोणी साधक तो येथे वैष्णव शब्दाने अभिप्रेत आहे.

सद्गुरुकृपेने परमार्थाची वाट कळते, साधकाला पवनसिद्धी लाभते आणि शेवटी मनाची ''उन्मनी'' होऊन त्या स्थितीत जीव आत्मरूप होऊन जातो. ते जीवाला साधावयाचे असते.

*(२०.१२.२०११)*

***

# १९. रामनाम तारु

परमेश्वरदर्शनासाठी भारतीय तत्त्वज्ञानात ज्ञानयोग, कर्मयोग, अष्टांगयोग, भक्तियोग इत्यादी उपाय सांगितलेले आहेत. त्यातला त्यात सोपा म्हणून भक्तियोगाचा पुरस्कार साधुसंतांनी केला आहे. भक्तीच्या अनेक प्रकारांपैकी नामस्मरण भक्तीवर त्यांनी जोर दिला आहे आणि त्याचे महत्त्व पुनः पुनः सांगितले आहे. या रामनामाचे महत्त्व श्रीदासराममहाराज केळकरांनी आपल्या पुढील अभंगात सांगितले आहे :-

**रामनाम तारु जो नर घेईल । जगी तो तरेल तरेलचि ।।१।।**
**रात्रंदिस मन देखे गुरुपदी । काळाची उपाधि मग नाही ।।२।।**
**रामनाम घेई धन्य तो संसारी । काळ आज्ञाधारी *दास* म्हणे।।३।।**

(दा.गा.१३२)

संसार म्हणजे जन्ममरणाचे चक्र. प्रत्येक जीव जन्मापासून या संसारात अडकलेला आहे. या संसाराला सागराची उपमा दिली जाते. परमेश्वराचे दर्शनासाठी, संसारातून सुटण्यासाठी हा संसार-सागर ओलांडून जावे लागते. संसारसागर तरून जाण्यास नाव पाहिजे. ही नाव म्हणजे रामनाम आहे. जो कोणी या रामनामरूपी नावेचा उपयोग करील तो नक्कीच या भवसागरातून तरून ईश्वराप्रत जाईल (''रामनाम तारू जो कोणी घेईल । जगी तो तरेल तरेलची ।।'') या रामनाम स्मरणाचे महत्त्व श्रीदासराममहाराजांनी आपल्या इतर अभंगांत पुढीलप्रमाणे सांगितले आहे :-

या कलियुगात संसार तरून जाण्यास रामनामासारखे अन्य साधन नाही (''रामनामाशी तुळणा । कलीमाजी नाही जाणा ।।''). रामनामाचे स्मरण केल्याने मोठमोठी पापे नष्ट होऊन जातात (''महान पापे हारवी सार'') आणि अगणित पुण्य जमा होते (''हेची कारक महान पुण्या''). नाम अखंड गाईल्यास माणूस संसाराच्या बंधनातून सुटून जातो (''अखंड नाम गाता । मुक्त दास तेव्हा ।।''). या कलियुगात नाम हाच धर्म आहे आणि तो सर्वश्रेष्ठ आहे (''कलियुगी नामधर्म । जाणी सर्वात उत्तम ।।''). या नामधर्माचे आचरण केल्यास माणूस संसाराच्या बंधनातून मुक्त होतो (''दास म्हणे बंधमुक्त । नामधर्म करी सत्य ।।''). तसेच संसारात असताना जो कोणी रामनाम घेतो त्याचे चांगलेच होते. किंबहुना त्याचे बाबतीत वाईटही चांगले होते (''नाम घेता पाही वाईट चांगले ।''). नाम हे परम संतोष निर्माण करते (''करी संतोष परम ।''). आणि ते माणसाला पूर्णकाम करते (''करीतसे पूर्णकाम ।'').

नाम हेच मोक्षाचे साधन आहे (''हेचि मोक्षाचे साधन''). नामाने प्राप्त होणाऱ्या अगणित पुण्याने माणसाला मोक्ष प्राप्त होतो (''नाम नेई मोक्ष धामा''). नामात राम प्रगट होतो (''नामामाजी प्रगटे राम''). नामाने ईश्वराचे दर्शन होते. अशाप्रकारे चालू/विद्यमान जीवनात ईश्वराचे दर्शन झाले, मोक्ष प्राप्त झाला, जीवन्मुक्ती मिळाली की देहाचे सार्थक होते (''दास म्हणे नाम गावे । देह सार्थक करावे ।।''). रामनामाने इष्ट गोष्ट प्राप्त होत असल्याने नामाच्या सामर्थ्याने चालू जीवनाचे/देहाचे सार्थक होते (''ऐसे नाम साठविता । होय देह सार्थकता।।''). रामनाम गायनाने सर्व चिंता संपून जातात (''रामनाम गाता । हरपती चिंता ।।''). म्हणून रामनाम हेच संसारातले वर्म आहे आणि त्यामुळे जीवाला स्वतःचे मूळ स्थान म्हणजे मोक्षपद प्राप्त होते (''संसाराचे वर्म एक रामनाम । जाल निजधाम दास म्हणे ।।'').

रामनामाचे सतत स्मरण होण्यास गुरुकृपा आवश्यक आहे. गुरु हाच परमेश्वर, परब्रह्म आहे (''गुरुः साक्षात् परब्रह्म ।''). म्हणून गुरुपदी मन लावून, गुरूने सांगितल्याप्रमाणे नामस्मरण केले असता, काळाची उपाधी लागत नाही (''काळाची उपाधि मग नाही''). जन्माला आलेला हा मरणारच. पण नामस्मरण करणाऱ्याचा काळावर ताबा येतो. तो इच्छामरणी होतो. नामस्मरण करणाऱ्या संतांनी आपले मरण मागेपुढे केले असे सांगितले जाते. उदा. लक्ष्मीबाई अक्का या चिमडपंथीय साध्वीने आपले मरण दोनदा पुढे ढकलले होते. याचा अर्थ असा की, काळ हा नामधारकाचा आज्ञांकित होतो (''काळ आज्ञाधारी दास म्हणे'').

शेवटी दासराममहाराज सांगतात :- या संसारात असताना, जो रामनामाचे स्मरणात गुंग होऊन जातो, तो धन्य होऊन जातो (''रामनाम घेई धन्य तो संसारी''). त्याचे जीवनाचे सार्थक केले असल्याने तो धन्य धन्य होतो.

***

# २०. सहजेची जोडे हरी

ज्या जगात जीव वावरत आहे ते जग खरे आहे अशी त्याची समजूत आहे. पण ती खरी नसून जग आणि जीव दोघेही ब्रह्मरूप/आत्मरूप/देवरूप आहेत असे सांगितले जाते (''सर्वं खल्विदं ब्रह्म । जीवो ब्रह्मैव ।।''). म्हणून संतांनी जीवाला सांगितले, ''अरे जीवा, तू गुरुप्रणीत नाममार्गाने जाऊन तुझे मूळरूप प्राप्त करून घे. तसे करणे हे तुझे इष्ट साध्य आहे.'' गुरुप्रणीत नाम हेच खरे सत्य आहे असे श्रीदासराममहाराज पुढील अभंगात म्हणतात :-

**खरे बोले तरी । सहजेची जोडे हरी ।।१।।**
**खरे खरे खरे । नाम देवाजीचे बरे ।।२।।**
***दासरामा* नाम । पूर्ण आनंदाचे धाम ।।३।।**

(दा.गा.११५६)

श्रीदासराममहाराज जीवाला सांगतात, ''अरे जीवा, तू जर खरे बोलत राहिलास, तर हरि हा देव तुला सहज प्राप्त होईल आणि हरि /ब्रह्म हेच तुझे खरे स्वरूप आहे.'' यावर जीव म्हणाला, ''महाराज, या जगात मला कळायला लागल्यापासून मी खरेच बोलत आहे. स्वप्नातसुद्धा मी खोटे बोललो नाही. पण अद्यापि तुमचा तो 'हरि' मला काही भेटला नाही.'' यावर श्रीदासराममहाराज सांगतात :- हे जग द्वंद्वाने भरलेले आहे. द्वंद्व म्हणजे परस्परविरुद्ध अशा दोन गोष्टी. उदा. मान-अपमान, शत्रु-मित्र, बरे-वाईट, लाभ-हानी इत्यादी. पण जगातील ही द्वंद्वे सापेक्ष आहेत.

जगातील खरे-खोटे हे सापेक्ष आहे आणि ही द्वंद्वे कायम तशीच राहतील असे नाही.  उदा. आज शत्रु असणारा माणूस उद्या आपला मित्र होऊ शकतो. कधी कधी तथाकथित मानाचे रूपांतर अपमानात होऊ शकते. आज जे बरे वाटते ते उद्या बरे वाटेल असे नाही. एकादेवेळी झालेली हानी हीच पुढे लाभ होऊ शकते.  तसे आज जे खरे वाटते ते उद्या खरे राहीलच याची खात्री नाही. म्हणून या सापेक्ष द्वंद्वातील ''खरे'' हे खरे ''खरे'' नाही. उदा. एकेकाळी पदार्थविज्ञान शास्त्रात ''ईथर''(Ether) हे खरे मानले जात होते. आता मात्र ईथर म्हणून काही नाही, ते खोटे आहे असे सांगितले जाते.  याचा अर्थच असा की सापेक्ष द्वंद्वातील ''खरे'' हे खरे नव्हे. मग जीव विचारतो, ''निरपेक्ष 'खरे' असे काय आहे?'' या प्रश्नाचे उत्तर असे :- देवाजीचे (ब्रह्माचे/आत्म्याचे/ईश्वराचे) नाम हे खरे आहे, हे त्रिवार सत्य आहे (''खरे खरे खरे । नाम देवाजीचे बरे।।'').  निरपेक्ष 'खरे' काय आहे हे 'खरे' सांगायचे झाल्यास, देवाजीचे नाव हेच एकमेव 'खरे' आहे, यात शंका नाही आणि या निरेपक्ष अशा 'खऱ्या' नामाच्या उच्चाराने हरि हा देव प्रचीतीला येतो (''खरे बोले तरी । सहजची जोडे हरि।।'').

या खऱ्या नामाबद्दल संतांनी पुष्कळ काही सांगून ठेवले आहे. दासराममहाराजांनीही आपल्या अभंगात या नामाबद्दल सांगून ठेवले आहे. त्यांच्या मते नाम हेच परब्रह्म आहे. नाम हे स्वतःसिद्ध आहे. ते नित्य आहे नाम हे चैतन्यरूप आहे. चैतन्य म्हणजेच नाम आहे. या चैतन्यरूप नामाच्या अभ्यासाने चैतन्य/हरि/देव याचा साक्षात्कार होतो. या नामाने जीव हा ब्रह्मरूप होऊन तो स्वतःचे मूळ रूप प्राप्त करून घेतो.

व्यवहारात असे आहे : जगातील प्रत्येक पदार्थाला रूप आहे आणि त्याला काहीतरी नाव दिलेले आहे. नाम आणि रूप वेगळे आहेत. म्हणून जग हे नामरूपात्मक आहे असे म्हटले जाते. पण परमार्थात मात्र

तसे नाही. परमार्थात नाम आणि रूप एकच आहे. परमार्थात ''नाम तेचि रूप'' अथवा ''रूप तेचि नाम'' असा प्रकार आहे. म्हणूनच परमार्थात 'नाम' हे साधन आहे आणि साध्यही आहे. नाम हेच परब्रह्म आहे. ब्रह्म हे सच्चिदानंद आहे. नाम हेही सच्चिदानंद आहे. म्हणजेच नाम हे आनंदरूप आहे, नाम हे 'आनंदाचे धाम' आहे, आनंदाचे स्थान आहे आणि नाम या साधनाने साध्य नाम प्राप्त करून घ्यावयाचे आहे.

साधन नाम कोणते ते गुरु शिष्याला दाखवून देतात. त्या साधन नामाच्या अभ्यासाने साध्य नाम हस्तगत होते. हे साध्य नाम म्हणजे परब्रह्म / आत्मा आहे. याचाच अर्थ असा की नाम या साधनाने ब्रह्मरूप नाम प्रत्ययाला येते. ब्रह्म हे आनंदरूप आहे. नाम हेही आनंदरूप आहे. साधन नामाने साध्य नाम साधले की साधक हा नामानंदरूप/ब्रह्मानंदरूप होऊन जातो आणि त्याच्या जीवनाचे साध्य त्याला गवसते.

*(२५.१२.२०११)*

***

# २१. दासरामांतरी प्रगटे नामब्रह्म

परमार्थदृष्ट्या 'जे जन्ममरण चुकविते' ते पुण्य आहे. जन्ममरण चुकले की मोक्ष मिळतो. मुक्ति देणारे नाम आहे. या नामाचे वर्णन श्रीदासराममहाराजांनी निरनिराळ्या प्रकारांनी सांगितले आहे. त्यांतील एक अभंग असा :-

**नाम हेची भक्ती नाम हेची मुक्ती ।**
**नामीच विरक्ती संतजनी ।।१।।**
**नामी होय ज्ञान सरे जाण नेम ।**
**आपुला आपण आपुले ठायी ।।२।।**
***दासराम*ांतरी प्रगटे नामब्रह्म ।**
**सद्गुरूंनी परम दया केली ।।३।।**

(दा.गा.१६८६)

श्रीदासराममहाराजांच्या मते, परमार्थात नाम हेच साध्य आहे आणि नाम हेच साधन आहे. आत्मसाक्षात्कार/आत्मरूप होणे हे परमार्थातील साध्य आहे. आता नाम हेच आत्मा/ब्रह्म/परमेश्वर असल्याने, नाम हे साध्य ठरते. आता या साध्य नामाच्या प्राप्तीसाठी नाम हेच साधन आहे. प्राण आणि अपान यात नाम आहे. प्राण म्हणजे आत घेतला जाणारा श्वास आणि अपान म्हणजे बाहेर टाकला जाणारा श्वास. त्यात नाम आहे. रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे ''नाम श्वासोच्छ्वासी असे''.

या श्वासोच्छ्वासातील नामाशी मन एकरूप करणे हे साधन आहे आणि ते साध्य झाले की परमार्थाचे साध्य सिद्ध होते (''प्राणामानामाजी मनाचे मीलन । परमार्थ पूर्ण तया ठाया ।।''). नाम हे साधन तसेच साध्य या दोन्ही गोष्टी वरील अभंगात आलेल्या आहेत. परमार्थासाठी वैराग्य म्हणजे बाह्य विषयांविषयी आसक्तीचा अभाव. संतजनांना हे वैराग्य/विरक्ती नामानेच प्राप्त होते (''नामीच विरक्ती संतजनी''). नवविधा भक्तीमध्ये नामस्मरण ही एक भक्ति आहे. त्यामुळे नाम हेच भक्ती होते (नाम हेचि भक्ती). साधकाच्या आपल्याच ठायी त्याचे त्रिपुट्यात्मक ज्ञान आणि अज्ञान संपून नामामुळे आत्मज्ञान होते (''नामी होय ज्ञान सरे जाण नेम । आपुला आपण आपुले ठायी ।।''). आत्मज्ञान होणे म्हणजेच आत्मसाक्षात्कार होणे. असा आत्मसाक्षात्कार झाला की नामरूपी ब्रह्म साधकाच्या देहात प्रगट होते आणि हे सर्व गुरुकृपेने घडते (''दासरामांतरी प्रगटे नामब्रह्म । सद्गुरूंनी परम दया केली ।।''). आणि नामाने आत्मसाक्षात्कार झाला की, तोच मोक्ष आहे. म्हणून नामाने मुक्ति मिळते असे म्हटले आहे (नाम हेचि मुक्ती).

नाम हेच साधन आणि नाम हेच साध्य परमार्थात आहे. याचा थोडा अधिक विचार यापुढे श्रीदासरामांच्या वचनाधारेच केला आहे.

नाम हे साधन :- नाम हेच जीवाचे परमार्थातील कर्म आहे आणि धर्म आहे (नाम हेचि निजकर्म । नाम हाची चोखट धर्म). हे नाम आवडीने घ्यायचे आहे, कारण ते गोड आहे (हरिनाम बरवे गोड). हरिनामाची आवड वाढत गेली की वैराग्य/विरक्ती वाढते (हरिनामी निरिच्छ सिद्धी). नामानेच नामस्मरणभक्ति वाढत जाते (हरिनामी वाढे भक्ती). आणि ही भक्ती वाढत

गेली की नामानेच श्रीरंगाची/परमेश्वराची भेट होते (नामी श्रीरंगाची भेटी). अशाप्रकारे परमेश्वरदर्शनाचे नाम हे साधन आहे.

नाम हे साध्य :- नाम हाच परमेश्वर आहे (हरिनाम तो श्रीपती). नाम हेच ब्रह्म/आत्मा आहे (नाम तेची ब्रह्म). नाम हेच विश्वाचे बीज आहे (नाम सकळ विश्वबीज). नाम हे ब्रह्मांडाचे एकमेव एक कारण आहे (ब्रह्मांडाचे कारण एक). नाम हेच विश्वाचा अंत करणारेही आहे. म्हणून ते नाम विश्वाच्या आदि आणि अंती आहे (नाम प्रथम शेवटी । नाम आदि अंती ।।). नाम हे ब्रह्माप्रमाणेच सर्वव्यापक आहे (नाम व्यापक व्यापक). ईश्वररूप/ब्रह्मरूप /आत्मरूप होणे हेच परमार्थाचे साध्य आहे. त्यादृष्टीने नाम हे साध्य आहे.

संक्षेपाने सांगावयाचे झाल्यास, श्वासोच्छ्वासातील नाम म्हणजे चैतन्याचा नाद हे साधन आहे आणि ईश्वररूप/ब्रह्मरूप/आत्मरूप/चैतन्यरूप होणे हे साध्य आहे. अशाप्रकारे परमार्थातील नाम हेच साधन आणि साध्य आहे.

***(१४.०१.२०१२)***

***

# २२. कठिण ते सोपे होय

**सूत्र धरोनिया करी नाम जप ।**
**पुढे आपेआप देव दिसे ।।१।।**
**आत्मसूत्र पहा तुटेना फुटेना ।**
**व्यापिलेसे ते जाणा सर्वाभूती ।।२।।**
**सूत्रचि सामर्थ्य वर्णवेना काही ।**
**लक्षिताचि पाही भय नुरे ।।३।।**
***राम* म्हणे कळे गुरुचिये कृपे ।**
**कठिण सोपे होय जाणा ।।४।।**

(दा.गा.१९७)

या अभंगात श्रीदासराममहाराज जीवाला परमार्थातले गुह्य सांगत आहेत. ते म्हणतात :- (हे जीवा,) तू सूत्र धरून नामजप कर मग आपोआप तुला देव दिसेल (१). (हे सूत्र म्हणजे आत्मसूत्र आहे.) हे आत्मसूत्र (श्वासोच्छ्वास करणाऱ्या) सर्व प्राण्यांमध्ये व्याप्त असून ते कधी तुटत नाही अगर कधी फुटत नाही (२). या सूत्राचे सामर्थ्य वर्णन करता येत नाही. त्याच्याकडे लक्ष दिल्यास (संसाराचे) भय उरत नाही (३). दासराम सांगतात, हे सूत्र गुरूच्या कृपेने कळते आणि मग कठीण ते सोपे होते (४).

या अभंगात ज्याला सूत्र अथवा आत्मसूत्र म्हटले आहे ते सूत्र म्हणजे सोहंसूत्र आहे. श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्रत्येक प्राण्यात हे सोहंसूत्र आहे. कारण हे सोहंसूत्र श्वासोच्छ्वासाशी निगडित आहे. समर्थ रामदास

स्वामींनी म्हटल्याप्रमाणे, ''धरिता सो टाकिता हं । अखंड चाले सोहं सोहं ।।'' अशी स्थिती आहे. म्हणजे श्वास आत घेताना 'सो' सदृश्य ध्वनी होतो आणि श्वास बाहेर टाकताना 'हं' सदृश्य नाद होतो आणि हे दोन्ही एकत्र केले की 'सोहं' बनतो.

या सोहंला सूत्र म्हणण्याचे कारण असे आहे :- बाहेरील जगात दोरीला (सूत्र) धरून माणूस ज्याप्रमाणे वर चढू शकतो, त्याचप्रमाणे सोहंसूत्राला धरून जीव वर भ्रुकुटिमध्यापर्यंत जाऊ शकतो आणि तेथून पुढे तो मस्तकातील सहस्रदलस्थानात जाऊ शकतो.

या सोहंसूत्राला आत्मसूत्र म्हणण्याचे कारण असे की सोहं आणि आत्मा यांचा घनिष्ठ संबंध आहे. श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्रत्येक प्राण्यात आत्मा हे अंतिम तत्त्व आहे. जोपर्यंत आत्मा शरीरात आहे तोपर्यंत सोहंसूत्र चालू असते. आत्मा शरीरातून बाहेर पडला की सोहंसूत्र बंद पडते. किंवा वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, देहातील आत्म्याच्या अस्तित्वाचे द्योतक असे सोहंसूत्र आहे. म्हणून त्याला येथे आत्मसूत्र असे म्हटले आहे.

या सोहंसूत्राचे सामर्थ्य इतके मोठे आहे की ते वर्णनाच्या पलीकडे आहे. कारण या सोहंच्या सामर्थ्यानेच आत्मसाक्षात्कार हे मानवी जीवनाचे श्रेष्ठ उद्दिष्ट साधता येते. साहजिकच आत्मसाक्षात्काराप्रत नेणारे सोहंसूत्र अवर्णनीय आहे यात शंका नाही. सोहंसूत्र म्हणजे श्वासोच्छ्वास हा आत्मप्राप्तीचा राजमार्ग आहे, असे गुरुलिंगगीतेने सांगून ठेवले आहे.

या सोहंसूत्राकडे लक्ष दिल्यास भय उरत नाही असे श्रीदासराममहाराज म्हणतात. हे भय संसाराचे आहे. संसार हा सागर, दावानल, अरण्य याप्रमाणे आहे. त्यात अनेक भीतीची कारणे आहेत. ही संसाराची भीती सोहंसूत्राने नष्ट होते. याचे कारण असे :- सोहंसूत्राने

आत्मसाक्षात्कार होतो. हा आत्मसाक्षात्कार झाला की प्राणी मुक्त होतो. म्हणजे तो संसारातून - जन्ममरणाच्या चक्रातून - सुटतो. साहजिकच प्राण्याला मग संसाराची भीती उरत नाही.

या सोहंसूत्राकडे लक्ष देऊन नामजप करावयाचा आहे. याचा अर्थ असा : सोहं हेच नाम आहे. त्या सोहंकडे डोळा, कान आणि मन एकवटून लावले की नामजप होतो. दिवसाच्या चोवीस तासात २१६०० इतके ''सोहं'' होतात. तोच सोहं नामजप आहे. यालाच अजपाजप असे म्हणतात. या सोहं नामजपाने शेवटी देव भेटतो. येथे देव शब्द ''आत्मा'' या अर्थाने - आत्मदेव या अर्थाने - घ्यावयाचा आहे. हा देव/आत्मा माणसाच्या मस्तकातील सहस्रदल नावाच्या स्थानात असतो. सोहं नामजपाच्या आधाराने जीव वर म्हणजे भ्रूमध्यस्थानी येतो आणि त्यानंतर तो सरळ सहस्रदलस्थानात जातो. तेथे त्याला ''आत्मदेवाचे'' दर्शन होते.

देवदर्शन/ आत्मदेवाचा साक्षात्कार हा प्राप्त होणे हे माणसाच्या दैनंदिन जीवनात फार कठीण आहे. तथापि या सोहं नामजपाने ही कठीण गोष्ट सोपी होते.

हे सर्व खरे असले तरी सोहं म्हणजे काय, त्याचा नामजप म्हणजे काय आणि तो कसा करावयाचा हे कळायला गुरुकृपा आवश्यक आहे. आत्मसाक्षात्कारी गुरूने सोहंचे स्वरूप, त्याचा नामजप कसा करावयाचा इत्यादि गोष्टी शिष्याला प्रत्यक्षपणे सांगणे आवश्यक आहे. तसे झाले तर मग ''कठीण सोपे होते''.

**(३१.१२.२०११)**

***

# २३. काही न करोनी नामचि घेतले

नरदेह मिळणे ही दुर्लभ गोष्ट आहे असे मानले जाते. साहजिकच तो प्राप्त झाल्यावर त्याचे सार्थक होणे हे जरूर आहे. तथापि नरदेहाचे सार्थक कशात आहे याबद्दल मतभेद आहे. राजकारणी, समाजकारणी, विद्वान इत्यादींच्या सार्थकाबद्दल नानाविध कल्पना आहेत. राष्ट्राध्यक्ष होणे, समाजाचे हित करणे, अलोट संपत्ती मिळविणे, सर्वोत्तम सुंदर स्त्री ही पत्नी म्हणून प्राप्त करून घेणे, विशिष्ट संशोधन करणे इत्यादि प्रकारच्या विविध संकल्पना या संदर्भात दिसून येतात आणि नरदेहाच्या सार्थकाबद्दल साधुसंतांची कल्पना मात्र एकच आहे. ती म्हणजे नरदेहात असणाऱ्या जीवाने ईश्वरदर्शन घेतले, मोक्ष प्राप्त करून घेतला तरच त्याच्या जन्माचे सार्थक होते. आणि हे साधण्यास मानवाने नामाचे महत्त्व ओळखून ते घेतले पाहिजे असेही संतसज्जनांनी सांगून ठेवले आहे. यासंदर्भात श्रीदासराममहाराज केळकरांनी पुढील अभंग रचलेला आहे.

**नाम ते न घेता सर्व काही केले ।**
**तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ।।१।।**
**नाम ते न घेता तीर्थ व्रत केले ।**
**तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ।।२।।**
**नाम ते न घेता योगयाग केले ।**
**तरी व्यर्थ गेले अरे प्राण्या ।।३।।**
**काही न करोनी नामचि घेतले ।**
**सार्थकचि भले *गोविंदतनया* ।।४।।**

(दा.गा.१७१)

नरदेहात आलेल्या जीवांना उद्देशून श्रीदासराममहाराज सांगतात : जन्माला आल्यानंतर एक रामनाम घेणे हेच जीवाचे कर्तव्य आहे. ते केले नाही तर जीवनाचे सार्थक होणार नाही.

नाम न घेता अनेक गोष्टी/कर्मे केली तरी ती कर्मे फुकट जातात. उदा. स्नानसंध्या, पूजा-अर्चा, जप-तप, भजन, कीर्तन इत्यादि कर्मे केली तरी मोक्ष/ईश्वरदर्शन हे साध्य साधण्याच्या कामी त्याचा उपयोग होत नसल्याने ती फुकट जातात.

नामाकडे लक्ष न देता समजा माणसाने तीर्थव्रते केली. भारतात अनेक तीर्थे, पवित्र स्थळे आहेत. उदा. काशी, रामेश्वर, चारधामे, कैलास दर्शन इत्यादि. या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन काय होणार? या तीर्थक्षेत्री एक देवाची प्रतिमा असते आणि स्नानासाठी पवित्र पाणी असते. पण या तीर्थांना भेटी देऊन मन शुद्ध झाले नाही, नामाची गोडी लागली नाही, तर तीर्थक्षेत्री जाऊनसुद्धा ती यात्रा व्यर्थच ठरते.

काही लोक ईश्वरदर्शनासाठी योगयागाचे आचरण करतात. यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार इत्यादि योगाची अंगे आहेत. ती अवघड आहेत आणि समजा ती आपणास साधली तरी त्यातून इष्ट गोष्ट प्राप्त होईलच ही खात्री नाही. त्यासाठी केलेले श्रम वायाच जाणार.

वेदांनी अनेक प्रकारचे याग/यज्ञ सांगितले आहेत. उदा. अश्वमेध, सोमयाग इत्यादि. ते पार पाडणे हे फार खर्चाचे काम आहे. समजा ते पार पाडले तर पदरात काय पडणार? त्यांचेद्वारा ऐहिक गोष्टी प्राप्त होतील अथवा परलोकात पुण्याईमुळे स्वर्गप्राप्ती होईल. पण स्वर्गात कायमचे राहून सुख भोगता येत नाही. कारण पुण्य संपले की पुनः इहलोकी यावे

लागते. भगवद्‌गीतेत म्हटल्याप्रमाणे, पुण्याने स्वर्गाचा उपभोग घेता येतो, पण पुण्य संपताच तेथून हकालपट्टी होते आणि पुनः पृथ्वीतलावर जन्म घ्यावा लागतो. तेव्हा अशा याग करण्याने जीवनाचे कोणते सार्थक प्राप्त होईल? (''ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति।।''). अंतिम कल्याणाच्या दृष्टीने याग हे निरुपयोगीच आहेत.

भावार्थ असा, ईश्वरदर्शन होण्यास, मोक्ष प्राप्त होण्यास वरील सर्व साधने कुचकामी आहेत, असे श्रीदासराममहाराजांचे सांगणे आहे. अंतिम कल्याण साधण्यास नाम हाच उपाय आहे. कारण वरीलपैकी काहीही न करता, जर नाम घेतले तर जीवनाचे साध्य साधणार आहे आणि ''मुखी नसता नाम । काही नोहे आपुले काम।।'' अशी वस्तुस्थिती आहे. तसे पाहू गेल्यास श्रीदासराममहाराज सांगतातः-

नाम कर्म नाम वर्म । नाम उपासना नेम ।।१।।
नाम मंत्र नाम तंत्र । नाम यंत्र देहीचे पा ।।२।।
नाम भक्ती नाम ज्ञान । नाम धन शाश्वतीचे ।।३।।

म्हणून नाम घेणे महत्त्वाचे आहे. कारण ''राम राम राम । म्हणता जाये भवश्रम ।।''. इतकेच नव्हे तर ''रामनामी प्रीती । दासरामा तेची मुक्ती ।।'' असा प्रकार आहे. नामामुळे मेघश्याम ईश्वर प्रगट होतो (''काही म्हणसी राम । प्राप्त होय मेघश्याम ।।'' श्रीदासराममहाराज). नामामुळे अंतिम तत्त्व ब्रह्म प्रगट होते, असा नामाचा महिमा आहे (''नवल नामाचा महिमा । प्रगट करी अंतरी ब्रह्मा ।।'' दासराम).

जीवनाचे सार्थक करून देणारे हे नाम हे बाहेर कोठे नसून शरीरातील श्वासोच्छ्वासात आहे. श्वासोच्छ्वासात नामाचा ध्वनि उमटत आहे. तेथे

लक्ष लागले पाहिजे. श्वासोच्छ्वासातील रामनामाच्या अभ्यासाने ईश्वर भेटतो, ब्रह्म प्रगट होते. त्यानंतर ईश्वररूप /ब्रह्मरूप होऊन जाणे हेच माणसाचे इतिकर्तव्य आहे आणि ते रामनामाने साधते असे श्रीदासराममहाराज सांगतात. आणि ईश्वररूप/ब्रह्मरूप होऊन जो जीवन्मुक्त होतो, त्यानेच नरदेहाचे सार्थक केले असे म्हणता येते. संक्षेपाने सांगायचे झाल्यास, अन्य काहीही न करता जर रामनामाचा अभ्यास झाला तर मानवी जीवनाचे सार्थक होते आणि तेच श्रीदासराममहाराजांना सांगावयाचे आहे.

*(०३.१२.२०११)*

***

# २४. नामी सर्व सुख आले

जीवनात माणसाचे ध्येय काय असेल हे नक्की सांगता येत नाही. कुणाला द्रव्यप्राप्ती हे ध्येय वाटते. कुणाला कीर्ति मिळविण्याची आकांक्षा असते. काहींना स्त्रीप्राप्तीची ओढ असते, तर कुणाला आपल्या जीवनात सततचे सुख मिळावे अशी इच्छा असते. ज्यांना सततचे सुख हवे आहे त्यांच्यासाठी अध्यात्म/परमार्थ आहे असे संतसज्जन सांगतात. त्यांच्या म्हणण्यानुसार परमार्थ केल्यास अखंड सुखात माणूस रममाण होतो.

या जगात दुःखानंतर सुख आणि सुखानंतर दुःख असते. सुखदुःखाचे रहाटगाडगे चालू असते. ते बंद होऊन कायमचे सुख हवे असल्यास जेथे कायमचे सुख मिळते तेथे जावयास हवे. साधुसंत सांगतात की सततचे / नित्य सुख हे फक्त ब्रह्म किंवा परमेश्वर यांच्याजवळ आहे. ते सच्चिदानंदस्वरूपी आहेत. साहजिकच ब्रह्मसाक्षात्कार होऊन ब्रह्मापाशी ऐक्य झाले किंवा परमेश्वरप्राप्ती होऊन परमेश्वराशी एकरूपता आली की सुखाला तोटा नाही; ते सुख नित्य असल्याने ते कधीही संपणारे नाही.

ब्रह्माच्या प्राप्तीसाठी किंवा परमेश्वरप्राप्तीसाठी या जगात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग इत्यादि अनेक मार्ग सांगितले गेले आहेत. अर्वाचीन संतसज्जनांच्या मते, त्या सर्व मार्गांत अथवा उपायांत नामस्मरणयोग हा सोपा आहे आणि तो सर्वांना आचरता येण्यासारखा आहे. याचे कारण असे की नाम हेच ब्रह्म किंवा ईश्वर आहे आणि नामस्मरणाने

सर्व काही साध्य होते असा साधुसंतांचा दावा आहे. नामाने काय काय घडते त्याची एक संक्षिप्त यादी श्रीदासराममहाराज केळकरांनी पुढील अभंगात दिली आहे. :-

**इंद्रिया लगाम । ते एक राम नाम ।।१।।**
**मनोनिग्रहण । साधे ऐसे महिमान ।।२।।**
**सहा जळूनी जाती । येई अद्वय प्रचीति ।।३।।**
**होतो जगाचे वेगळा । बंध होतो कळिकाळा ।।४।।**
**गतिरूप नाम । संधिकाळी घेई सम ।।५।।**
***दासराम* बोले । नामी सर्व सुख आले ।।६।।**

(दा.गा.१८६)

परमार्थातला कोणताही मार्ग स्वीकारावयाचा ठरवले तरी इंद्रियसंयम हा अत्यावश्यक आहे. नामयोगाच्या बाबतीत तर 'इंद्रियांसी नेम नाही । मुखी राम म्हणुनी काई ।।' असा प्रकार आहे. म्हणजे मुखाने नाम उच्चारत असताना जर इंद्रिये विषयांकडे धावत असतील तर त्या नामाच्या उच्चारणाचा काहीही उपयोग होत नाही. इंद्रियांचा निग्रह करणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु योग्य त्या पद्धतीने नाम घेतले तर इंद्रियांचा संयम साध्य होतो. रामनामामुळे इंद्रियांना लगाम लागतो आणि ती बाह्य विषयांपासून मागे खेचली जातात.

नामस्मरण करताना मनाचे सहकार्य आवश्यक आहे. नामस्मरण चालू असताना मर जर दहा दिशांना धावत असेल तर त्या नामोच्चरणाचा काही उपयोग होत नाही. आता हे मन म्हणजे संकल्प आणि विकल्प आहे. एक विचार येतो, तो जातो, दुसरा येतो. अशा प्रकारे विचारांचा प्रवाह

म्हणजे मन आहे. असे मन जर प्रवाही असेल तर ते नामाचे ठिकाणी लागू शकत नाही. मन हे नामात एकाग्र व्हावयास हवे. मनाची एकाग्रता होण्यास नामच उपयोगी आहे. म्हणजे योग्य त्या पद्धतीने नाम घेतले तर मनाचा निग्रह होतो आणि मन नामस्मरणात एकाग्र होते.

मानवी जीवनात काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहा विकार आहेत. ते कमी प्रमाणात असतील तर ते फारसे त्रासदायक ठरत नाहीत. पण ते अति झाले आणि माणूस जर त्यांच्या आहारी गेला तर माणसाचे जीवन फुकट जाते. म्हणूनच या सहा विकारांना माणसाचे रिपु म्हणजे शत्रु असेच म्हटले जाते. आता ते सहा विकार जर वेळोवेळी बळावत असतील तर नामाकडे लक्ष लागणार नाही, हे उघड आहे. या सहा रिपूंचे दमन झाले तर नामाकडे लक्ष लागू शकेल. योग्य पद्धतीने घेतलेल्या नामानेच या सहा रिपूंचा निग्रह होतो. हे सहा रिपू तसे नष्ट होऊन जात नाहीत. तर त्यांचे दमन होऊ शकते. किंवा त्यांची चाकोरी बदलू शकते. त्रास देणारी त्याची नांगी तोडता येते. या सहा शत्रूंचा वेग जर नियंत्रणात ठेवला, जर आपण त्याचे कचाट्यात सापडलो नाही तर ते असून नसल्यासारखेच होतात आणि तसे होण्यास योग्य ते नामस्मरण उपयोगी पडते.

नामाच्या साधनाने ''अद्वया'' ची प्राप्ती होते. अद्वय म्हणजे दोन नसणे म्हणजेच अद्वैत. ब्रह्म, परमेश्वर हा एकच अद्वय आहे आणि या अद्वयाची प्रचीति नामामुळे येते. कारण नाम तेच रूप आहे. नाम तेच ब्रह्म आहे. हे आनंदस्वरूप आहे. अद्वयाची प्रचीती म्हणजे साक्षात्कार झाला की ''ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति'' असे उपनिषदांनी सांगून ठेवले आहे ब्रह्मरूप

होणे म्हणजेच आनंदस्वरूपी होणे आहे. अशाप्रकारे योग्य त्या नामाने माणसाला सर्व सुखाची/आनंदाची प्राप्ती होते आणि ब्रह्म हे नित्य असल्याने ब्रह्मरूप झालेल्या माणसाला नित्यसुख/आनंद प्राप्त होतो.

असा नित्य ब्रह्मानंद चालू/विद्यमान जीवनात माणसाला मिळू शकतो. अशा माणसाला जीवन्मुक्त म्हणतात आणि हा जीवन्मुक्त इतर जीवांपासून वेगळा ठरतो. तो जरी या संसारात असला तरी संसारात त्याची आसक्ती नसल्याने तो संसारातून अलिप्त होतो. ज्याप्रमाणे कमळाचे पान पाण्यात राहून पाण्याचा लेप स्वतःला लावून घेत नाही त्याप्रमाणे जीवन्मुक्त हा जगात असून तो जगापासून अलिप्त असतो. वाळलेला नारळाचा गोटा नारळाच्या करवंटीत असून तो करवंटीपेक्षा वेगळा होतो, त्याप्रमाणे जीवन्मुक्त हा संसारात असून त्यातून तो लेपरहित असतो.

अशा जीवन्मुक्ताला कळिकाळाचे भय उरत नाही. कळिकाळ हा माणसाला भयाची प्रेरणा देणारा, चुकीच्या मार्गाने नेणारा असा असतो. जीवन्मुक्त हा पापपुण्याहून वेगळा झाला आहे. त्याच्या मनाची पापाकडे, वाईट गोष्टींकडे प्रवृत्ती होत नाही. साहजिकच त्याच्यावर कळिकाळाचा प्रभाव पडू शकत नाही. त्याने कळिकाळावर मात केली असल्याने तो साहजिकच कळिकाळाला वंदनीय ठरतो.

हे सर्व काही योग्य त्या नामाने होते असे वर म्हटले आहे. आता प्रश्न असा :- हे योग्य नाम कोणते आणि ते आहे कुठे ? या प्रश्नाची उत्तरे अशी :- योग्य नाम परमेश्वरानेच प्रत्येक माणसाला देऊन ठेवले आहे. पण माणसाला ते माहीत नसते. ते ब्रह्मसाक्षात्कारी सद्गुरूकडून जाणून घ्यावे लागते. सद्गुरु सांगतात की हे योग्य नाम प्रत्येक माणसाच्या देहातील

श्वासोच्छ्वासात आहे. श्सासोच्छ्वास हा वरखाली होत असतो, म्हणजेच तो गतिमान आहे. म्हणून श्वासोच्छ्वासातील नाम हे गतिरूप आहे. ''रामनाम गती देहात प्रचीती'' असे मामामहाराज केळकर यांनी आपल्या रामपाठात सांगितले आहे. समर्थ रामदास स्वामी सांगतात, ''नाम श्वासोच्छ्वासी असे । परब्रह्म तेथे वसे ।।''. आणि श्वासोच्छ्वास हा ईश्वराकडे नेणारा मार्ग आहे, असे गुरुलिंगगीतेत श्रीनिंबरगीकरमहाराजांनी सांगून ठेवले आहे. प्रत्येक श्वासोच्छ्वासाबरोबर 'सोहं' या शब्दाशी सदृश ध्वनि ऐकू येत असतो. हे सोहं नामस्मरण होणे आवश्यक आहे. हे सोहंनाम चोवीस तासात एकवीस हजार सहाशे वेळा स्फुरत असते. त्याच्याकडे लक्ष देणे हेच नामस्मरण आहे. त्यालाच 'अजपाजप' असे म्हणतात. श्वास आणि उच्छ्वास यांच्या दरम्यानच्या काळात म्हणजे त्यांच्या संधिकाळात नामाचा नाद उमटत असतो. त्याच्याकडे लक्ष देणे म्हणजेच नामस्मरण.

असे नामस्मरण साधले की ईश्वरी साक्षात्कार होऊन साधकाचे जीवन कृतार्थ होऊन जाते. तो जीवन्मुक्त होतो. आणि जीवन्मुक्ताला नित्यसुखाचा ठेवा मिळतो.

***

# २५. प्रेमे गान गाई अखंडित

या जगामध्ये आपण रहातो. या जगात शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पाच प्रकारचे विषय/पदार्थ आहेत. आपले कान, नाक, डोळे, जीभ आणि त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये बहिर्मुख म्हणजे बाह्य जगातील पाच प्रकारच्या पदार्थांचे ज्ञान करून घेऊन, त्यांचेकडे धावणारी आहेत. साहजिकच आपण या बाह्य विषयात आसक्त होतो. आणखी असे :- पाच भूतांनी बनलेला हा स्थूल देह म्हणजे ''मी'' असे मानून आपण सर्व व्यवहार करीत असतो. जगाच्या मागे आत्मा आहे हे अंतिम सत्य तत्त्व आहे आणि तोच देहाच्या उपाधीत सापडला आहे, हे आपल्यास माहीत नसल्याने, आपले लक्ष आत्म्याकडे जातच नाही. संतसज्जनांचेकडून आत्म्याविषयीचे शाब्दिक ज्ञान प्राप्त करून घेऊन, आपण या आत्म्याकडे लक्ष देणे हे खरे म्हणजे महत्त्वाचे आहे. त्यासाठी बाह्य पदार्थांची आसक्ति सोडावयास हवी. हा सर्व भाग सांगलीच्या श्रीदासराममहाराज केळकरांनी पुढील अभंगात सांगितला आहे :-

**घोटूनी मातीचा दिलासे मुलामा ।**
**तया तरी प्रेमा करितोसी ।।१।।**
**पापाचे बनले जाण हे शरीर ।**
**असत्य असार सांगितले ।।२।।**
**देहामध्ये आहे मुख्य आत्मा जाण ।**
**तेणेचि पावन आहे देह ।।३।।**

**लक्ष ठेवोनिया आत्म्यावरी राही ।**
**प्रेमे नाम गाई अखंडित ।।४।।**
***गोविंदतनय* म्हणे या जगती ।**
**धरी अनासक्ती म्हणिजे बरे ।।५।।**

(दा.गा.४५८)

मानवी शरीर आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी या पाच महाभूतांच्या मिश्रणाने बनलेले आहे. त्यात पृथ्वी या भूताचे प्रमाण जास्त आहे. म्हणून हे शरीर मातीचे बनले आहे, असे म्हणतात. ओबडधोबड मातीला आकार देऊन, ती घोटली/घासली आणि गुळगुळीत केली की ती चांगली दिसते. तसेच या शरीराचे आहे. शरीरात हाडे, रक्त, मांस इत्यादि पदार्थ आहेत. त्यांना योग्य आकार इत्यादि देऊन, त्यावर त्वचेचे आवरण घातलेले आहे. म्हणून हे शरीर ठाकठीक दिसते. या शरीरावर आपण प्रेम करतो आणि त्याची काळजी घेतो. ही गोष्ट श्रीदासराममहाराजांनी पहिल्या चरणात सांगितली आहे.

ज्या देहावर आपण प्रेम करतो, तो चालू जन्मी आपल्या पूर्वजन्मीच्या पुण्यपापात्मक कर्मांनी आपणांस प्राप्त होतो. त्यातील पापात्मक कर्मांनी शरीर बनते असे येथे म्हटले आहे, ते गौण अर्थाने. आता हे शरीर निर्माण झालेले असल्याने ते कधीतरी नष्ट होणार हे उघड आहे. म्हणून ते असत्य म्हणजे सतत न टिकणारे, नाशवंत आहे आणि म्हणूनच ते असार म्हणजे बिनमहत्त्वाचे आहे, असे दुसऱ्या चरणात सांगितले आहे.

हे शरीर जरी अनित्य आणि असार असले तरी त्यामध्ये नित्य आणि सारभूत असणारा आत्मा रहातो. या आत्म्याच्या उपस्थितीमुळे शरीर व इंद्रिये कार्यप्रवण होतात. आत्मा शरीरातून निघून गेला की शरीर,

इंद्रिये ही कार्यहीन होऊन कुजू लागतात. म्हणून या देहात आत्मा महत्त्वाचा आहे आणि त्याच्या उपस्थितीमुळेच शरीर पावन म्हणजे ठाकठीक असते. आत्म्यामुळेच देह टिकून असतो. देहात आत्मा हाच मुख्य आहे, असे तिसऱ्या चरणात सांगितले आहे.

साहजिकच शरीरात मुख्य असणाऱ्या आत्म्याकडे आपण लक्ष द्यावयास हवे. पण ते कसे? आत्मा हा इंद्रियांना आणि मनाला कळणारा नाही. मग त्याच्याकडे कसे लक्ष द्यावयाचे हेच चौथ्या चरणात सांगितले आहे. ते असे :- आत्मा हा चैतन्यरूप आहे. या आत्मचैतन्याचा नाद शरीरात घुमत आहे. हा चैतन्याचा नाद म्हणजे नाम हे श्वासोच्छ्वासात घुमत आहे. त्या आत्मचैतन्यरूप नादाकडे म्हणजेच नामाकडे लक्ष दिले म्हणजे ते नाम श्रवण केले म्हणजे आत्म्याकडे लक्ष दिले असा अर्थ होतो. मरेपर्यंत अखंडपणे श्वासोच्छ्वास चालू असतो. साहजिकच आत्मचैतन्याचा नादही अखंडित आहे. या नादाकडे लक्ष दिले म्हणजे आत्म्याकडे लक्ष दिले असा अर्थ होतो. हा चौथ्या चरणाचा भावार्थ आहे.

शेवटच्या चरणात श्रीदासराममहाराज सांगतात :- आत्म्याचे दर्शन किंवा आत्म्याचा साक्षात्कार हे मानवी जीवनाचे ध्येय आहे. त्यासाठी आत्म्याकडे लक्ष द्यावयास हवे. असे लक्ष द्यायचे असेल तर बाह्य विषयांची आसक्ति मनातून कमी व्हावयास हवी. तेव्हा जगातील विषयांच्या बाबतीत आसक्ति न बाळगता, आत्म्याकडे म्हणजे आत्मचैतन्याच्या नादाकडे म्हणजेच नामाकडे लक्ष देत रहावयास हवे.

***

## २६. दासा येई हाता मूळ ब्रह्म

अंतिम तत्त्व ब्रह्म/आत्मा आहे याबद्दल संतसज्जन ठाम आहेत. पण हे ब्रह्म दैनंदिन जीवनात जीवाला कोठेच दिसत नसते, त्याला फक्त जग दिसत असते. मग ब्रह्माऐवजी जग कसे दिसते असा प्रश्न उद्भूत होतो. हे जग कसे आणि केव्हा उत्पन्न झाले आणि त्याचा नाश होतो काय असे प्रश्न उपस्थित होतात. ईश्वराने हे जग निर्माण केले व तोच त्याचा शेवट/नाश करतो असे एक मत आहे. तर ब्रह्मावर जगाचा आभास होतो असे दुसरे मत आहे. या दुसऱ्या मताचा अनुवाद करून ब्रह्म/आत्मा यांचा साक्षात्कार कसा व केव्हा होतो, हे श्रीदासराममहाराजांनी पुढील अभंगात सांगितले आहे.

**उत्पत्ती व लय मिथ्याभास ।**
**हरिभक्त डोळस न देखती ।।१।।**
**पतित जे जीव अनुभविती हे ।**
**आत्मरूप आहे विसरोनी ।।२।।**
**सद्गुरुकृपेने नुरेचि विसर ।**
**अनुहत गजर श्रवण होय ।।३।।**
**पातालापासुनी स्वर्गाचे वरती ।**
**कैसी हंसगति चाले देही ।।४।।**
**पाताल स्वर्गासी ओलांडुनी जाता ।**
***दासा* येई हाता मूळ ब्रह्म ।।५।।**

(दा.गा.२७१)

ब्रह्म/आत्मा हे जरी अंतिम तत्त्व आहे तरी त्याचे ज्ञान होत नसल्याने अज्ञानी माणसाला ब्रह्माचे ऐवजी जग दिसू लागते. ब्रह्माच्या अज्ञानाने ब्रह्मावरच जग भासू लागते. याला रज्जुसर्पाचा दृष्टांत दिला जातो. अंधुक प्रकाशात रज्जू/दोरी पडली होती. ती ज्याला रज्जू म्हणून कळली नाही, त्याला तेथे सर्प दिसू लागला. याचा अर्थ रज्जूच्या अज्ञानाने सर्पाचा भास होतो. जर रज्जु रज्जु म्हणून कळली असती तर सर्पाचा भास झाला नसता. याप्रमाणे ब्रह्माच्या अज्ञानाने ब्रह्मावरच जग दिसू/भासू लागते. जर ब्रह्माचे ज्ञान झाले तर हा जगाचा भास संपतो. जगाचा भास होणे आणि तो भास संपणे म्हणजेच जगाची उत्पत्ति व लय आहे. आता भास/आभास हा खोटा/मिथ्या असतो, हे स्पष्ट आहे. म्हणून जगाची उत्पत्ती आणि नाश हे दोन्हीही ब्रह्म/आत्मा याप्रमाणे सत्य नाहीत.

ज्यांना ब्रह्माचे /आत्म्याचे ज्ञान होते त्यांना येथे हरिभक्त असे म्हटले आहे. त्यांना जगाची उत्पत्ती अथवा नाश ही गोष्ट मिथ्याच वाटते. त्यांना जग हे जग म्हणून दिसत नाही तर सर्व काही आत्मा/ बह्म आहे, अशी त्यांची भूमिका असते (सर्वं खल्विदं ब्रह्म । ऐतरात्म्यमिदं सर्वम्).

जग हे भासमय आहे आणि मूळ आत्मा/ब्रह्म आहे या गोष्टीचे ज्ञान ज्यांना नाही, त्यांना ब्रह्माचा / आत्म्याचा विसर पडला आहे असे येथे म्हटले आहे. ज्यांना आत्मरूपाचा/ब्रह्मरूपाचा विसर पडला आहे, ते फक्त जगाचा अनुभव घेतात, जगाला खरे मानतात. त्यांना या अभंगात 'पतित' म्हटले आहे. कारण आत्म्याच्या / ब्रह्माच्या खऱ्या ज्ञानापासून ते ढळले आहेत, च्युत झाले आहेत (''पतित जे जीव अनुभविती हे । आत्मरूप आहे विसरोनी ।।'').

ज्या जीवांना बह्माचे ज्ञान नाही ते अज्ञानी आहेत. तथापि या जगात काही लोकांनी ब्रह्माचे ज्ञान करून घेतले आहे; त्यांना ब्रह्माचा

साक्षात्कार झाला आहे. त्यांना संतसद्गुरु म्हणतात. अज्ञानी जीवाने अशा सद्गुरूंकडे जाऊन त्यांचा उपदेश घ्यावयास हवा. सद्गुरु हे ब्रह्मज्ञान होण्याचा उपाय सांगतात. तो अज्ञानी जीवाने आचरणात आणला, तर त्याचेवर सद्गुरुकृपा होते आणि सद्गुरुकृपेने त्या जीवाचे ब्रह्मविषयक विस्मरण दूर होऊन त्यांना ब्रह्मज्ञान, ब्रह्माचा साक्षात्कार होऊ शकतो (''सद्गुरुकृपेने नुरेचि विसर ।'').

आता सद्गुरु कोणता उपाय सांगतात, त्याचे दिग्दर्शनही या अभंगात श्रीदासराममहाराजांनी केले आहे. जग भासमान असले तरी ते भासेतोपर्यंत या जगात नाना प्रकारचे स्थूल देह आहेत. त्या स्थूल देहात जीव असतो. त्याने आत्मप्राप्तीचा उपाय करावयाचा आहे. हा उपाय जीवाच्या देहातच आहे. तो बाहेर कोठे शोधावयाचा नाही. हा उपाय / साधन म्हणजे देहातील श्वासोच्छ्वासात होणाऱ्या सोहंगतीचे / गतिजन्य नादाचे श्रवण होय. म्हणजे असे :- एका श्वासोच्छ्वासात एक श्वास आत घेतला जातो व तो बाहेर सोडला जातो. श्वास आत घेताना 'सो' सदृश ध्वनि होतो आणि श्वास बाहेर टाकताना 'हं' सदृश ध्वनी होतो. म्हणजे एका श्वासोच्छ्वासात 'सोहं' असा ध्वनि होत असतो. सोहं शब्दातील अक्षरे उलटी केली की हंस असा शब्द बनतो. श्वासोच्छ्वास हा गतिरूप - वरखाली होणारा - आहे, म्हणून हंस हाही गतिरूप आहे असे म्हटले जाते. माणूस मरेपर्यंत ही श्वासाची/हंसाची गति चालू असते, त्याचा नाद होत असतो. व्यवहारात कोणत्या तरी आघाताने ध्वनि निघतो. पण असला आघात नसताना, श्वासोच्छ्वासात सोहं नाद होत असल्याने त्याला 'अनाहत' असे म्हटले जाते आणि या सोहंच्या नादाला येथे 'गजर' असे म्हटले आहे (''कैसी हंसगति चाले देही । अनुहत गजर श्रवण होय ।।''). या सोहंनादाकडे, अनुहत गजराकडे लक्ष देऊन तो श्रवण करणे, हा उपाय सद्गुरु सांगतात.

पुराणांनी ब्रह्मांडातील स्वर्ग व पाताळ सांगितले आहेत. आता, जे ब्रह्मांडात असते ते पिंडात - मानवी देहात - असते असा एक सिद्धांत मानला जाते. साहजिकच ब्रह्मांडातील स्वर्ग व पाताळ ही स्थाने पिंडात म्हणजे मानवी देहात दाखविली जातात. ती अशी :- मानवी देहात 'आधार-स्थान' हे पाताळ आहे. तेथून भ्रूमध्यापर्यंतचा भाग हा स्वर्ग मानला जातो. आता ज्यावेळी सोहंनाम श्रवण करताना, श्वास अगदी नगण्य होतो, तेव्हा तो प्रथम आधारस्थानी जातो. आणि नंतर तो भ्रूमध्यापर्यंत जातो असे अनुभवी संतांनी सांगितले आहे. म्हणून ''पातालापासुनी स्वर्गाचे वरती । कैसी हंसगति चाले देही ।।'' असे या अभंगात श्रीदासराममहाराज म्हणतात.

देहातील हंसगतीच्या नादाचे श्रवण करता करता मन जर 'नादमय', त्या नादाशी एकरूप झाले तर उन्मनी अवस्था प्राप्त होते आणि या उन्मनी अवस्थेतच आत्मसाक्षात्कार/ब्रह्मसाक्षात्कार होतो. भ्रूमध्य म्हणजे स्वर्गाचा शेवट ओलांडून गेले की नाद, बिंदु, कला आणि ज्योति अशा विविध स्वरूपांत आत्म्याचा / ब्रह्माचा साक्षात्कार होऊ लागतो. आणि शेवटी जीव हा ब्रह्मरूप होऊन जातो. म्हणून ''पाताल स्वर्गासी ओलांडूनी जाता । दासा येई हाता मूळ ब्रह्म।।'' असे या अभंगात श्रीदासराममहाराज म्हणतात.

*(१०.१२.२०११)*

***

## २७. पूर्ण ब्रह्म नारायण

**लटिका भक्त लटिक्या रीती । करी भक्ति लटिक्याची ।।१।।**
**करितो लटिके हे कीर्तन । कृष्ण विष्णु नारायण ।।२।।**
**लटिके गाये लटिके ध्यासे । लटिके होते रूप नाम ।।३।।**
**पूर्ण ब्रह्म नारायण । तेथे *दासराम* कोण ।।४।।**

(दा.गा.३०५)

श्रीदासराममहाराजांचा हा अभंग वरवर पाहिल्यास चमत्कारिक वाटतो. कारण त्यात भक्त, त्याच्या भक्तीची रीत, कीर्तन, (नाम-) गायन, (ईश्वर-) ध्यान, नाम आणि रूप हे सर्वच 'लटिके' आहे असे म्हटले आहे. लटिके म्हणजे मिथ्या/खोटे म्हणूनच निरर्थक. व्यवहारात तर आपण ईश्वरभक्त, त्याची भक्ती, त्याचे ईश्वरगुणगान, ध्यान इत्यादींचे कौतुक करीत असतो. येथे उल्लेखलेल्या लटिक्या गोष्टीत 'पूर्ण ब्रह्म नारायण' मात्र नाही. या स्थितीत या अभंगाचा भावार्थ नीट समजून घेणे आवश्यक ठरते.

आद्य शंकराचार्यांनी ''ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'' असा पुकारा केला. महाराष्ट्रातील बहुतेक संतांनी तो मान्य केला. संतांच्या मते ब्रह्म हे एकमेव अंतिम सत्य आहे; ते पूर्ण आणि निर्गुण आहे. या ब्रह्माखेरीज जे काही अन्य - जग, जगातील गोष्टी, इत्यादि - सर्व मिथ्या/ खोटे आहे. कारण ब्रह्म न कळल्याने जग इत्यादि जगावर भासत असते. ब्रह्मावर जग कसे भासते हे अध्यारोपाच्या प्रक्रियेने सांगितले जाते. त्यानंतर अपवादप्रक्रिया

सांगितली जाते. या अपवादप्रक्रियेनुसार अध्यारोपाने भासणारे जग हे मिथ्या/लटिके आहे असे सांगितले जाते. जग आहे, ते सत्य वाटते अशी ज्यांची भूमिका असते त्यांच्यासाठी अध्यारोपाची प्रक्रिया सांगितली जाते. यासाठी एक उदाहरण दिले जाते. अंधुक प्रकाशात जमिनीवर पडलेली दोरी ज्याला दोरी म्हणून कळली नाही, त्याला ती साप वाटली. ज्यांना ती दोरी ही दोरी म्हणून कळली, त्यांना ती साप वाटली नाही. ज्यांना दोरी साप वाटली त्यांचे म्हणणे खरे आहे काय? नाही. त्याला दिसणारा सर्प तेथे नाहीच. त्याला भासणारा सर्प हा मिथ्या आहे, तो निरुपयोगी आहे. तथापि ज्याला सर्प भासला, त्याला सापाची भीती वाटली आणि तो तेथून दूर जाण्यास निघाला. आता प्रश्न असा : खोट्या सापामुळे वाटणारी भीती, इत्यादी हे कुठपर्यंत खरे वाटते? त्या माणसाला दोरी ही दोरी म्हणून कळत नाही तोपर्यंतच. पण एकदा का त्याला दोरी ही दोरी म्हणून कळली, की आपली भीती इत्यादि फुकट होते हे त्याच्या लक्षात येते. वेगळ्या शब्दात, दोरी ही दोरी म्हणून कळली की साप वाटल्यामुळे झालेल्या गोष्टी निरर्थक होत्या हे त्याच्या लक्षात येते.

असाच प्रकार ब्रह्म व जग आणि जगातील गोष्टी यांच्या बाबतीत होतो. ज्याला ब्रह्म कळत नाही त्या अज्ञानी माणसाला ब्रह्म न दिसता तेथे जग आणि जगातील गोष्टी दिसू लागतात. अशी अज्ञानी माणसे अनेक असतात आणि ती ईश्वराची भक्ति करतात. भक्तीचा एखादा प्रकार अवलंबितात. ईश्वराचे गुणगान करतात. ईश्वराचे ध्यान करतात. जगात दिसणाऱ्या पदार्थांना रूप आहे आणि नाम आहे असे समजून चालतात. पण हे कोठपर्यंत चालते ? ब्रह्माचे ज्ञान होईपर्यंत. एकदा का ब्रह्मज्ञान झाले की, जगाला वेगळे मानून जो व्यवहार चालला होता, तो लटिका/मिथ्या/निरुपयोगी होता हे त्याच्या लक्षात येते.

आता प्रश्न असा :- ज्याला ब्रह्म कळले नव्हते त्याला ब्रह्माचे ज्ञान कोण करून देतो? याचे उत्तर आहे :- संतसद्गुरु. ब्रह्माविषयी अज्ञान असणाऱ्या माणसाला संतसद्गुरु पटवून देतात की, ''बाबा रे, जे जग तू सत्य मानतोस ते तसे नाही. ब्रह्म हे एकमेव एक सत्य आहे आणि जगात जे तुला भक्त, नाम, रूप, भक्ति इत्यादी भासत होते ते सर्व लटके आहे. आहे ते एक ब्रह्म/नारायण. तेथे दोन म्हणून काही नाही.''

वरील भाग लक्षात घेतला की, वरील अभंगाचा भावार्थ लक्षात येतो, तो असा :- जग खरे मानून चालणाऱ्यांच्या बाबतीत भक्त, इत्यादि खरे वाटले तरी ते तसे नाहीत. कारण ब्रह्मज्ञान झाल्यावर जग व त्यातील भक्ति इत्यादी सर्व लटिके, निरुपयोगी आहे हे कळते. म्हणजेच ब्रह्मज्ञान झालेल्या माणसाच्या दृष्टिकोनातून जग म्हणून काही नसल्याने भक्त, भक्ति इत्यादि सर्व लटिके आहे. आहे ते एक ब्रह्मच/ नारायणच आहे आणि हे सांगणारा दासराम हासुद्धा ब्रह्मापेक्षा कोणी वेगळा नाही, तोही ब्रह्मरूपच आहे.

येथे अशी एक शंका येईल :- जग जर मिथ्या आहे, तर मिथ्या जगात भक्ति इत्यादि कशाला करावयाची? या शंकेचे समाधान असे - जोपर्यंत जग खरे वाटते तोपर्यंत ईश्वरभक्ती इत्यादि खरेच आहे. ब्रह्मज्ञान होण्यासाठी जे काही करावयास हवे ते ते करावयास हवे. पण एकदा का ब्रह्म कळले की ब्रह्माखेरीज भासणारे अन्य सर्व निरर्थक ठरते. ती शेवटची अवस्था आहे. ती अवस्था प्राप्त होईपर्यंत भक्ति इत्यादी करावयास हवीच.

***

# २८. कोणता धर्म ?

या जगात सद्यःकाळी अनेक धर्म प्रचारात आहेत आणि त्यांचे अनुयायी आहेत. सर्व धर्मांची मूलतत्त्वे सारखीच आहे, असे म्हटले जाते. तथापि, तिकडे लक्ष न दिल्याने त्यांच्या अनुयायांमध्ये मतभेद होऊन, धर्मासाठी भांडणे, रणे माजलेली दिसतात. हे झाले व्यवहारात. अध्यात्मात मात्र खरा धर्म वेगळा आहे. श्रीदासराममहाराजांच्या मते तो धर्म कळावयास हवा. ते एका अभंगात सांगतात :-

**सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा ।**
**दुजा भाव देखा नाही तेथे ।।१।।**
**जो का दरिद्र्यात तोची श्रीमंतात ।**
**म्हणोनी अद्वैत बोलताती ।।२।।**
**आत्मा तोची धर्म नाम तो आचार ।**
**संत सदाचार बोलताती ।।३।।**
***गोविंदतनय* सांगे सकळा अंतरी ।**
**भरला श्रीहरी सारिखाची ।।४।।**

(दा.गा.९१५)

धर्म हा संस्कृत शब्द आहे. त्याचा व्युत्पत्तीनुसार अर्थ आहे 'धारणाद् धर्मः' म्हणजे 'जो (इतरांना) धारण करतो म्हणजे टिकवून धरतो तो धर्म'. हा अर्थ लक्षात घेऊन व्यक्तिधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म असे शब्द वापरलेले दिसतात. अध्यात्मात मात्र धर्म शब्द वेगळ्या अर्थाने घेतला जातो. जो

मानवाचे धारण करतो तो धर्म. असा धर्म कोणता आहे? अध्यात्मदृष्ट्या या प्रश्नाचे उत्तर आत्मा असे आहे. आत्मा हा सच्चिदानंद आहे. तोच सगुणस्वरूपाने हरि आहे. त्यानेच हे विश्व आणि विश्वातील प्राणी निर्माण केले आहेत. अनंत कोटी ब्रह्मांडात जरी चौऱ्यांशी लक्ष योनी असल्या तरी आत्मा मात्र एकच आहे. तो एकमेव एक अल्याने त्यालाच अद्वैत म्हणतात.

हा आत्मा अखंड, निरवयव, भागरहित आहे. तो सूक्ष्मापेक्षा सूक्ष्म आहे. तो सूक्ष्मरूपाने सर्व जगात आणि प्राणिमात्रात भरलेला आहे. जग आणि शरीरे ही त्याची उपाधि आहे. म्हणूनच त्याला जगदात्मा आणि अंतरात्मा असे म्हणतात. पण या उपाधीमुळे आत्म्याचे भेद, तुकडे, भाग अथवा अवयव पडत नाहीत. उपाधीमुळे अज्ञानी माणसाला आत्मा वेगवेगळा वाटला तरी त्याचे अखंडत्व भंग पावत नाही, हे ज्ञानी माणसाला कळलेले असते. दरिद्री माणसात जो आत्मा आहे तोच श्रीमंतात आहे. जो मुंगीत आहे तोच ब्रह्मदेवात आहे. जो पाषाणात आहे तोच पाण्यात आहे. हा आत्मरूपी धर्म सर्वांचे ठिकाणी सारखा आहे, आत्मरूप श्रीहरि सर्वत्र समानपणाने भरलेला आहे. असे असले तरी आत्म्याचे अद्वैत, एकत्व भंग पावत नाही.

हा आत्मा प्रत्येक वस्तूत, प्रत्येक प्राण्यात सूक्ष्मरूपात राहून ती वस्तु टिकवून धरीत असतो. सर्व प्राणिमात्रांना धारण करणारा आत्मा आहे. त्या प्राण्यांना धारण करणारा 'दुजा' कोणी नाही. आत्मा हाच सर्वांचे धारण करीत असल्याने, परमार्थदृष्ट्या ''आत्मा तोचि धर्म'' असे आहे. आत्म्याशिवाय या जगात काही घडू शकत नाही. म्हणूनच श्रीदासरामामहाराजांनी दुसऱ्या एका अभंगात म्हटले आहे, ''जेणे योगे देह चाले । त्यासी धर्म बोलियेले ।।''. ज्याच्यामुळे माणसाची देहधारणा

होऊन त्याचे कर्म घडते, तोच धर्म. आणि हा धर्म म्हणजेच आत्मा आहे. आत्मा हाच प्रत्येकाचा ''स्वधर्म'' आहे.

माणसाच्या दृष्टीने पाहिल्यास आत्म्याखेरीज सर्व काही त्याला परके आहे (सर्व जाणावे परके । श्रीदासराममहाराज). सर्व काही आपल्या आत्म्यासाठी आपल्याला प्रिय होत असते. उपनिषदात याज्ञवल्क्य नावाच्या ऋषींनी म्हटले आहे की सर्व काही आपणास आत्म्यासाठी प्रिय होते (आत्मनस्तु कामाय इदं वा सर्वं प्रियं भवति।). असा जो आत्मा आहे त्याचे ज्ञान गुरूकडून करून घेऊन त्याचेवर प्रेम करावयास शिकले पाहिजे (''तेथे करावे की प्रेम ।'' दासराममहाराज). आत्म्यावर प्रेम केल्यामुळे, आत्मप्राप्तीचे साधन आचरणात आणल्याने, आपण आत्म्याप्रमाणे होतो. किंबहुना आपण आत्मरूप होतो आणि साहजिकच अखंड आनंदरूप होतो कारण आत्मा हा आनंदस्वरूप आहे.

आत्मप्राप्तीचे साधन आहे नाम. नामसाधन हाच सदाचार आहे, असे साधुसंतांनी सांगून ठेवले आहे. येथे हे लक्षात ठेवावे की आत्म्याप्रत नेणारे नाम हे वेगळेच आहे. व्यवहार आपण राम, कृष्ण, हरि, वासुदेव इत्यादि नावे उच्चारतो. पण ही माणसाने दिलेली नावे आहेत. आत्म्यानेच माणसाला स्वतःसिद्ध असे नाम दिले आहे. या नामाचे स्वरूप असे आहे. :- माणूस श्वासोच्छ्वासावर जगत असतो. या श्वासोच्छ्वातच नाम आहे. ''नाम श्वासोच्छ्वासी असे । परब्रह्म तेथे वसे ।।'' असे रामदासस्वामींनी सांगून ठेवले आहे. श्वासोच्छ्वास हा गतिरूप आहे. साहजिकच या श्वासात असणारे नाम हेही गतिरूप आहे. म्हणून ''रामनाम गती देहात प्रचीती'' असे श्रीमामामहाराजांनी सांगितले आहे. तसेच ''रामनामाची गती कोण जाणे रे'' असे दुसऱ्या एका संतांनी म्हटलेले आहे. प्राणी जन्माला आल्यापासून श्वासोच्छ्वासात असणारी नामगती आत्म्यामुळे टिकून रहाते आणि तीच

आत्म्यापर्यंत पोहाचविते. या नामगतीवर दृष्टी, कान आणि मन एकाग्र करणे हाच सदाचार आहे, तेच नामानुसंधान आहे. तेच नामसाधन आहे. या नामाचा आणि आत्म्याचा संबंध असल्यामुळे या नामरूपी सूत्राने आपण आत्म्याप्रत पोहोचून, आत्मरूप होऊ शकतो आणि आत्मरूप होणे हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास, परमार्थदृष्ट्या आत्मा हा ''स्व-धर्म'' आहे, आत्मप्राप्ति करून घेणे हा पुरुषार्थ आहे आणि त्यासाठी आत्मसंबंधित नामसाधन करणे हा सदाचार आहे.

***

# २९. वर्माची खूण

या जगात आपण जनमाला येतो आणि एक दिवस मरून जातो. जन्म आणि मरण या दरम्यानच्या काळात ''मी-मला-माझे'' आणि ''तू-तुला-तुझे'' असे म्हणत आपण आपली जीवनयात्रा चालवीत असतो. बायका, मुले इत्यादी प्रपंच चालविण्याची आपली धडपड असते. काही जण सामाजिक तसेच राजकीय कार्य करण्यात गुंतून जातात. काही शहाणी माणसे भविष्यकाळात काय होणार याची अटकळ बांधून अनेक गोष्टी आजच करीत असतात. अशाप्रकारे नाना गोष्टींचा विचार करीत आणि अनेक क्रियांत गुंतून जात आपले जीवन चाललेले असते. तथापि जे आपण धडपड करीत आहोत ते आपण कोण याचा विचार करावा असे आपल्या मनात येतच नाही.

खरे म्हणजे आपण कोण याचा विचार करणे आवश्यक आहे. ज्या आपणास जीवनभर सुखदुःखे भोगावी लागतात, ते आपण कोण याचा विचार करावयास नको काय? आपणास सुख हवे असते, दुःख नको असते. आणि ही सुखदुःखे कोणाला होतात यांचा विचार साधुसंतांनी केला आणि त्यांनी आपणास सांगितले, ''बाबानो, सुखदुःख हे शरीर व मन यांच्याशी निगडित आहे. आपण हा देह आणि मन यांच्यापासून वेगळे आहोत. तथापि हे शरीर म्हणजे मी असा अभिमान बाळगल्याने शरीराचे सुखदुःख हे आपले सुखदुःख असे आपणास वाटू लागते. खरे म्हणजे आपले स्वरूप हे मूलतः सुखरूप - आनंदरूप - आहे.'' ''हे तुम्ही कसे म्हणता?'' असे आपणास विचारले तर संत सांगतात, ''ऐका. हे जग

ब्रह्मापासून मायेच्या द्वारा निर्माण झाले आहे. माया ही ब्रह्माची उपाधि आहे. आपण खरे म्हणजे ब्रह्माचे अंश आहोत. हे ब्रह्म आनंदरूप आहे. म्हणून आपणही आनंदरूप आहोत.'' अशा स्वरूपाचे विवेचन मांडणारा सुप्रसिद्ध संत श्रीदासराममहाराज केळकर यांचा एक अभंग आहे, तो पुढीलप्रमाणेः-

**ब्रह्मस्वरूपाचा अंश । ऐसा शीव तू आहेस ।।१।।**

**ब्रह्मरूपी मिथ्या माया । जहाली जैशा परी छाया ।।२।।**

**ब्रह्माचिये सत्ते चाले । *दासराम* वर्म बोले ।।३।।**

(दा.गा.५१२)

श्रीदासराममहाराज म्हणतात, ''हे मानवा, मी तुला वर्माची खूण सांगतो ती ऐकून घे. या जगाचे मागे ब्रह्म हे एकच सत्य तत्त्व आहे. या ब्रह्माला माया ही उपाधी येते. उपाधिमुळे दोन गोष्टी घडतात :-

१) हे ब्रह्म /शिव परमेश्वर या स्वरूपात भासू लागते. २) ईश्वर मायेच्या द्वारा हे विश्व निर्माण करतो. या जगात नानाप्रकारचे स्थूल देह निर्माण होतात. त्या स्थूल देहांची उपाधि बह्माला आली की ब्रह्मच जीवरूपाने भासू लागते. आपण सगळे जीव आहोत. तरी स्थूलदेहाच्या मर्यादेत पडलेल्या ब्रह्माचे अंश आपण आहोत. ब्रह्म हे आनंदस्वरूप आहे. म्हणून आपण ही आनंदस्वरूपच आहोत. तथापि मायेमुळे आपणांस आपल्या मूळ आनंदस्वरूपाचे विस्मरण झाले आहे. हे विस्मरण दूर झाले की आपणांस आपले आनंदस्वरूप प्राप्त होते.''

यावर आपण विचारले, ''जिच्यामुळे आपणांस आपल्या मूळ रूपाचे विस्मरण होते, ती माया काय आहे?'' याला श्रीदासराममहाराज सांगतात, ''ब्रह्माप्रमाणे माया ही सत्य तत्त्व नाही. ती मिथ्या आहे.

ज्याप्रमाणे वृक्षाची छाया असते त्याप्रमाणे माया ही ब्रह्माची छाया आहे. ती मिथ्या आहे याचा अर्थ तिचे स्वरूप नीट शब्दांनी सांगता येण्यासारखे नाही. या मिथ्या मायेने माणसाला भुरळ पडते आणि तो स्वतःचे खरे स्वरूप विसरून जातो. ही माया दूर झाली तर आपले विस्मरण दूर होऊन आपणांस आपल्या खऱ्या आनंदस्वरूपाचा पत्ता लागेल आणि मग आपण ब्रह्माप्रमाणेच अखंड आनंदस्वरूप होऊन जाऊ.''

ही माया कशी दूर करावयाची या प्रश्नाचे उत्तर या अभंगात नाही. पण ते श्रीदासराममहाराजांच्या इतर अभंगांत आहे. ते असे देता येईल :- अरे मानवा, जीवन्मुक्त झालेल्या गुरूला शरण जाऊन त्याचा अनुग्रह घे. मायेचे निरसन करण्याचा उपाय/साधन गुरु सांगेल. त्या साधनाचे तू आचरण केलेस, तर ही माया दूर होऊन 'मीच आनंदस्वरूप ब्रह्म आहे' असा साक्षात्कार तुला होईल. ब्रह्माचा आनंद हा अखंड आहे. म्हणून तूही अखंड आनंदरूप होशील. तसे झाले की तुझ्या जीवनाचे सार्थक होईल.

***

# ३०. स्वये निर्मियेले द्वैत

वेदांच्या अंत्यभागी उपनिषदे येतात. म्हणून त्यांना 'वेदान्त' असे म्हणतात. हे वेदान्तग्रंथ अथवा उपनिषदे ही भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञानाचे मूलस्रोत आहेत. उपनिषदांत नानाप्रकारच्या मतांचा संग्रह आहे. काही उपनिषदांनी आत्मा हे अंतिम तत्त्व मानले आहे तर काहींनी परमेश्वर हे अंतिम तत्त्व मानले आहे. आणि या अंतिम तत्त्वापासून विश्वाची उत्पत्ती झाली असे सांगितले आहे. मूलतः आत्मा/परमेश्वर एकच होता. त्यापासून जग झाले. म्हणजे एका तत्त्वाऐवजी आता दोन तत्त्वे झाली. जग/विश्व हे दुसरे तत्त्व. आत्मा/परमेश्वर एक होता म्हणजे अद्वैत (दोन्हींचा अभाव) होता. विश्वाच्या उत्पत्तीनंतर द्वैत (दोन) झाले. आणि या द्वैती जगात आत्मा/ईश्वर जीवरूपाने शिरला. हा जीव द्वैतात व्यवहार करू लागला. पण या द्वैतात्मक जगात त्याला सुख व दुःख यांना सामोरे जावे लागले. आता त्याला सुखच हवे असल्यास त्याने परत आत्मरूप व्हावयास हवे. या संकल्पना श्रीदासराममहाराजांनी आपल्या एका अभंगात अशा व्यक्त केल्या आहेत.

**स्वये निर्मियेले द्वैते । सुख सेवाया निभ्रांत ।।१।।**
**कासयासी कष्टी व्हावे । आप आपणा मिळावे ।।२।।**
**दावी द्वैत हे अद्वैत । कासयासी व्हावे भ्रांत ।।३।।**
**निजत्वासी झाल्या भेटी । *दासरामी* सुख सृष्टी ।।४।।**

(दा.गा.८९)

द्वैतात्मक विश्व दिसू लागण्यापूर्वी प्रथम आत्मा हा एकच होता. जरी तो सुखरूप होता तरी त्याला एकट्याला चैन पडेनासे झाले. त्याला दुसरे काहीतरी हवेसे वाटले. म्हणजे द्वैताचे सुख त्याला हवेसे वाटले. मग त्याने जड विश्व निर्माण केले आणि त्यातील जड/स्थूल देहात तो जीवरूपाने शिरला. एकच आत्मा अनेक जीवरूपांत अनेक झाला. अद्वैतापासून द्वैत/अनेकत्व झाले.

पण स्थूल देहात जीव हा इंद्रियांच्याद्वारे बाह्य जगातील शब्द, स्पर्श इत्यादी विषयांचा भोग घेऊन लागला. त्यामुळे त्याला काही वेळा सुख वाटले. पण ते सुख तत्कालिक होते. त्यामुळे जीव हा सुखदुःखाच्या जंजाळात अडकला आणि आपण आत्मा आहोत, आपण आत्म्याचे अंश आहोत, आत्म्याप्रमाणे आपण सुखरूप आहोत याचा त्याला विसर पडला. दासराममहाराज जीवांना सांगतात, ''बाबानो, तुम्ही दुःखीकष्टी का होता? द्वैतात जसे सुख आहे तसेच दुःखही आहे. खरे म्हणजे तुम्ही आत्मरूप आहात. ही गोष्ट तुम्ही गुरूकडून जाणून घ्या. आपले मूळ रूप आत्मा आहे तेच आपण व्हावयास हवे (आप आपणा मिळावे). आणि तसे झाले तर दुःखाची बोच आपणांस लागणार नाही.''

मग प्रश्न असा :- जीवन हे कसे साधायचे ? याचे उत्तर असे :- जग द्वैतात्मक/अनेकात्मक आहे. द्वैत आणि अद्वैत हे सापेक्ष आहेत. द्वैत आहे याचाच अर्थ कोठेतरी अद्वैत आहेच. म्हणजे द्वैत हे अद्वैताकडे बोट दाखविते. अद्वैताचा बोध करून देते (दावी द्वैत हे अद्वैत). तेव्हा द्वैतात राहून भ्रांत/भ्रमित व्हावयाचे कारण नाही. कारण मुळात अद्वैत आहे हे द्वैतामुळेच कळून येते.

समजा, एक माणूस आपले घर सोडून बाहेर पडला. बाहेर त्याने टक्केटोणपे खाल्ले. त्याला तो कंटाळला. त्याला वाटू लागले की आपले घरच

बरे होते. त्याला आपल्या घराची आठवण येऊ लागली. घराबाहेर राहण्यात काही अर्थ नाही, हे त्याला कळल्यावर तो घरी परतला. तसे जीवाचे आहे. जीव हे द्वैतात घुटमळत आहे. पण ते मुळात आत्मरूप, अद्वैत आहे. म्हणून ते जर आत्मरूप झाले तर ते सुखी होणार आहे. श्रीदासराममहाराज आत्मरूप झाले आणि ते सुखी झाले. त्या स्थितीत सुखाला काय तोटा? आत्मरूप झाल्यावर जीवाला हे जग/सृष्टी सुखरूप भासू लागली आणि या द्वैतात्मक जगात अद्वैत आत्मरूप होण्याचे सुख त्याला प्राप्त झाले. म्हणून जीवाने आत्मरूप व्हावयास हवे असे दासराममहारजांना सांगावयाचे आहे.

आत्मरूप कसे व्हायचे हे मात्र या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितलेले नाही. पण आत्मरूप होण्याचा मार्ग त्यांनी आपल्या अन्य अभंगांत सांगितलेला आहे, याची नोंद येथे करावयास हरकत नाही. तो मार्ग संक्षेपाने असा :- श्वासोच्छ्वासातील अजपाजपाने जीव हा आत्मरूप होतो.

***

## ३१. अवघाचि आत्मराम

आपण या जगात रहातो आणि आपापल्या व्यवसायात गुंतून जातो. हे विश्व म्हणजे नक्की काय आहे, त्याचा कोणी कर्ता आहे काय अशा प्रकारचे प्रश्न प्रायः आपल्या मनात येत नाहीत. पण तत्त्वज्ञांनी तसेच संतांनी असल्या प्रश्नांचा विचार केला आणि त्यांना जी उत्तरे सुचली ती त्यांनी आपल्या लेखनात कधी संक्षिप्तपणे तर कधी विस्ताराने मांडली. असेच एक संक्षिप्त उत्तर श्रीदासराममहाराजांनी एका अभंगात दिले आहे. तो अभंग असा :-

**विकृती ही पहाता नाही । परी ती दिसे चंचळ ठायी ।।१।।**
**चंचळ हे निश्चळातु । स्थिर होये पा निवांतू ।।२।।**
**आदी ब्रह्म अंती ब्रह्म । म्हणोनिया सर्व ब्रह्म ।।३।।**
**अवघाचि आत्माराम । मौनावला *दासराम* ।।४।।**

(दा.गा.९८)

या अभंगातील ''विकृति'' या शब्दाने दासरामांना हे जग अभिप्रेत आहे. आपल्या आजूबाजूला जे जग आपणास चेतन व अचेतन या स्वरूपात दिसते आणि ज्या जगात आपण नाना प्रकारचे व्यवहार करीत असतो ते जग सत्य आहे अशी आपली भूमिका असते. या जगात नानाप्रकारचे बदल, पालट म्हणजे विकार होत असतात. म्हणून ज्या जगात सातत्याने विकार घडतात ते जग म्हणजे विकृती म्हणजे विकार आहे असे म्हणता येते. विश्वातील विकार हे कार्य-कारण भावानुसार घडतात असे आपण

समजत असतो. तथापि या ''विकृतीला'' म्हणजे जगाला स्वतंत्र असे अस्तित्व नाही, असे श्रीदासरामांचे मत आहे. त्यांच्या मते हे जग 'चंचळा' च्या ठायी दिसते. चंचळातून हे विकारमय विश्व दिसते.

आता चंचळ हा शब्द सापेक्ष आहे. म्हणजे काही तरी निश्चळ आहे असे मानल्यावाचून चंचळ या शब्दाला काही अर्थ नाही. श्रीदासरामांच्या मते हे चंचळ निश्चळात उद्भवते आणि तेथेच ते स्थिर होते म्हणजे लय पावते.

मग प्रश्न असा :- ज्या निश्चळाच्या अपेक्षेने चंचळ आहे, ते निश्चळ काय आहे? याचे उत्तर आहे :- ब्रह्म हे निश्चळ आहे. ब्रह्म म्हणजेच आत्मा. या निश्चळाच्या अंगावर चंचळाच्या लहरी उठतात आणि त्या चंचळामुळे विश्व भासते. याचा अर्थ असा होतो की विश्वाच्या आधी निश्चळ ब्रह्म होते. विश्व हे चंचळात लय पावते आणि चंचळ हे निश्चळात लय पावते. म्हणजे विश्वाच्या अंती निश्चळ ब्रह्मच आहे. आता जर विश्वाच्या आदि व अंती ब्रह्म असेल तर विश्वाच्या मधल्या स्थितीतही ब्रह्मच आहे. म्हणजे तथाकथित विश्व हे ब्रह्मरूपच आहे.

दुसऱ्या एका अभंगात श्रीदासरामांनी सांगितले आहे :- ''निश्चळ हे ब्रह्म चंचळ ते माया''. म्हणजे निश्चळ ब्रह्मात जे चंचळ उठले तीच माया आणि या चंचळामुळेच जगातील नाना आकार आले (चंचळेची जाले बहुत आकार). म्हणजे निश्चळातील चंचळामुळे अनेक रूपे/आकार असणारे जग दिसू लागले. याचा अर्थ असा होतो की या जगरूपी विकृतीला ब्रह्माखेरीज स्वतंत्र असे अस्तित्व नाही.

वेगळ्या शब्दात असे म्हणता येते :- प्रथम निश्चळ ब्रह्म होते. त्या निश्चळातून उठणाऱ्या चंचळामुळे विकाररूप जग दिसू लागले. हे जग

चंचळात विलीन होते आणि चंचळ निश्चळात विलीन होते. म्हणजेच विश्वापूर्वी - विश्वाचा उदय/ भास होण्यापूर्वी - आणि विश्वानंतर म्हणजेच विश्वाचा भास संपल्यावर निश्चळ ब्रह्मच असते. साहजिकच जेव्हा विश्व दिसते त्याकाळीही तेथे ब्रह्म आहेच. म्हणून हे तथाकथित सर्व विश्व म्हणजे ब्रह्म आहे, असे म्हणण्यात अडचण नाही. म्हणून ''म्हणोनिया सर्व ब्रह्म'' असे श्रीदासरामांनी म्हटले आहे. उपनिषदेही सांगतात की हे अखिल विश्व ब्रह्मच आहे (सर्वं खल्विदं ब्रह्म).

आता वर म्हटल्याप्रमाणे ब्रह्म म्हणजेच आत्मा आहे. साहजिकच विश्वाच्या आदि, अंती आणि मध्ये आत्मा आहे. उपनिषदेही सांगतात :- दिसते ते सर्व आत्माच आहे. आता अनेकदा आत्मा शब्दाऐवजी आत्माराम शब्द वापरला जातो. म्हणून आहे ते सर्व आत्माराम आहे असे श्रीदासराम म्हणतात (अवघाची आत्माराम).

आता सर्व काही आत्माच असल्याने दासराम म्हणून कोणी स्वतंत्र रहात नाही. तोही आत्माच आहे. मग दासराम काय बोलणार?

***

## ३२. आत्मवस्तू देखण्याची

**महामाया बोलण्याची । आत्मवस्तू देखण्याची ।।१।।**
**माया म्हणुनी काही नाही । परी नवल दिसो येई ।।२।।**
**आत्मवस्तु मूळ रूप । प्रथम तत्त्व निर्विकल्प ।।३।।**
***दासराम* देखे डोळा । देही सद्गुरु देती कळा ।।४।।**

(दा.गा.१३५२)

माणूस या जगात जन्माला आला. जाणता झाल्यावर त्याला चौफेर पसरलेले अफाट चराचर विश्व दिसले. जे दिसते ते खरे मानून माणूस जगाला खरे मानू लागला आणि जगाला खरे मानून चालल्यामुळे त्याच्या जगातील व्यवहाराला कुठेही बाधा आली नाही.

परंतु काही तत्त्वज्ञानी माणसांना प्रश्न पडला :- जे दिसते ते खरे असते काय? जग दिसते म्हणून ते खरे आहे काय? जे दिसते ते सगळेच खरे नसते असाही अनुभव येत असतो. उदा. तापलेल्या वाळवंटात पाणी दिसते पण तेथे पाणी नसते. संधिप्रकाशात पडलेली दोरी साप वाटते, पण तेथे साप नसतो. डोळ्यावर दाब दिला की दोन चंद्र दिसतात, परंतु दुसरा चंद्र नसतो. स्वप्नात अनेक गोष्टी दिसतात, पण त्या जागृत अवस्थेत नसतात. आगगाडीच्या दोन रुळांमध्ये उभे राहून दूरवर पाहिले तर समांतर असणारे ते रूळ एकमेकांना भिडलेले दिसतात. पळत्या वाहनांतून बाहेर पाहिले तर बाजूची झाडे इत्यादी पळत आहेत असे दिसते, पण झाडे पळत नसतात. तेव्हा जे दिसते ते सर्वच खरे नसते, असाही अनुभव आपणांस

येतो आणि म्हणून दिसणारे हे जग खरे आहे काय असा प्रश्न उद्भूत होऊ शकतो.

दिसणारे जग खरे नाही, असे मत शंकराचार्य इत्यादी साक्षात्कारी, तत्त्वज्ञानी पुरुषांनी मांडले. त्यांच्या मते जग हे भासमान आहे. पण भास होण्यास बुडाशी/अधिष्ठान म्हणून काहीतरी लागते. जसे :- पाणी दिसण्यास तापलेले वाळवंट आवश्यक आहे. साप दिसण्यास रज्जू हवी. त्याप्रमाणे जगाचा भास होण्यास काहीतरी अधिष्ठान हवे. भासमान जगाच्या बुडाशी अधिष्ठान म्हणून ब्रह्म/आत्मा आहे असे शंकराचार्य सांगतात.

ज्याप्रमाणे वाळवंट न कळल्याने पाणी दिसते, अथवा दोरी न कळल्याने साप दिसतो, त्याप्रमाणे आत्मा/ब्रह्म न कळल्याने जग दिसते. शंकराचार्यांचे हे मत साक्षात्कारी साधुसंतांनी ग्राह्य धरले आहे. त्याला श्रीदासराममहाराज हे संतही अपवाद नाहीत. शंकराचार्यांच्या मतातील काही अंश श्रीदासराममहाराजांनी या अभंगात संक्षेपाने मांडले आहेत.

श्रीदासराममहाराज सांगतात :- जगाच्या बुडाशी अधिष्ठान म्हणून असणारे एकच एक तत्त्व आहे. ते मूलतत्त्व आहे. हे मूलतत्त्व हे आत्मरूप आहे. म्हणजे आत्मा हे जगाला अधिष्ठानभूत असणारे एकमेव एक सत्य तत्त्व आहे. जगात प्रत्ययाला येणारे कोणतेच विकल्प आत्म्यात नाहीत, म्हणून हे मूलभूत आत्मतत्त्व निर्विकल्प आहे.

आत्मा ही वस्तु आहे. वस्तु हा शब्द येथे तांत्रिक अर्थाने वापरलेला आहे. हा अर्थ असा :- वस्तु ती की जी भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनही काळांत अस्तित्वात असते. म्हणून आत्मवस्तूला नाश नाही. आत्मवस्तूवर भासणारे जग हे भास संपल्यावर नसणार म्हणून ते वस्तु होऊ शकत नाही.

आता असे म्हटले जाते : दोरी न कळल्याने, दोरीच्या अज्ञानाने साप भासतो. त्याप्रमाणे ब्रह्म न कळल्याने, ब्रह्माच्या अज्ञानाने जग भासते आणि हे अज्ञान म्हणजे माया आहे.

यावर प्रश्न असा येतो :- आत्मा हे जर एकच एक, अद्वय, अद्वितीय असे मूळतत्त्व असेल, तर ही माया कशी असू शकेल? या प्रश्नाचे उत्तर आहे :- माया म्हणून काही नाही. माया म्हणून कोणतीही वस्तु नाही. या नसणाऱ्या मायेमुळे जग भासते हे नवलच आहे. जगाचा भास कसा होतो हे सांगण्यास माया शब्द वापरला जातो. प्रत्यक्ष माया म्हणून काही नाही. माया ही बोलण्यापुरती, बोलण्याचा विषय आहे. म्हणून श्रीदासराममहाराज सांगतात, ''महामाया'' म्हणजे माया ही फक्त बोलण्याची आहे. जसे : वांझेचा मुलगा, आकाशपुष्प, गंधर्वनगर, सशाची शिंगे हे नाहीतच. तथापि आपण बोलण्यात त्या शब्दांचा वापर करतो. त्याप्रमाणे माया म्हणून काही नसली तरी ती बोलण्यात वापरली जाते.

आता प्रश्न असा : जग हे भास आहे हे ज्याला कळले त्याने काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर आहे :- ज्या आत्मवस्तूवर जग भासते ती आत्मवस्तु पहावयाची आहे. म्हणजे जगाचा भास बाजूला सारून या भासाला अधिष्ठानभूत असणारा आत्मा जाणून घेऊन पहावयाचा आहे, त्या आत्म्याचे दर्शन घ्यावयाचे आहे.

मग प्रश्न असा : ही आत्मवस्तु कशी कळेल आणि कशी दिसेल? या प्रश्नांची उत्तरे अशी :- आत्मवस्तु ही अस्तित्वरूप आहे. अस्तित्व हे सर्वत्र, सर्वव्यापक आहे. मानवी देहातही आत्मा आहे. मानवी देहातील हा आत्मा जाणून घेऊन पहावयाचा आहे.

हे कसे शक्य होते? याचे उत्तर असे :- काही संतांनी जगाचा भास दूर सारून आत्मवस्तु पाहिली आहे. ते सांगणारा जो संत आपणास भेटेल

तो आपला सद्गुरु. हे सद्गुरु आत्मज्ञानाची किल्ली आणि आत्मदर्शनाची कळ सांगतात. सद्गुरूंच्या सांगण्याप्रमाणे वागल्यास, सद्गुरुप्रणीत साधना केल्यास, या देहातील आत्मा कळतो आणि त्याचे दर्शन होते. म्हणजे माणसाला आत्मसाक्षात्कार होतो.

सद्गुरूंनी सांगितलेल्या कळीचा वापर केल्याने आत्मज्ञान झाले आणि देहात आत्मा डोळ्याला दिसला असे श्रीदासराममहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात.

येथे हे लक्षात घ्यावे :- सद्गुरु कोणते साधन सांगतात आणि आत्मा कसा दिसतो हे या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितलेले नाही. ही कळ आणि हा डोळा यांचा निर्देश श्रीदासराममहाराजांच्या अन्य अभंगांतून जाणून घ्यावयास हवेत. येथे संक्षेपाने इतकेच सांगता येईल :- श्वासोच्छ्वास हा आत्म्याकडे जाण्याचा राजमार्ग आहे. मानवी देहातील बाह्य डोळ्याला आत्मा दिसत नाही हे अगदी उघड आहे. तसे असते तर सर्वांनाच आत्मा दिसला असता. पण तसे घडत नाही. आत्म्याला पाहण्याचा डोळा कमवावा लागतो,फक्त त्याच डोळ्याला आत्मवस्तु दिसते. हा डोळा म्हणजे प्रज्ञाचक्षु आहे.

*(१९.१२.२०११)*

***

## ३३. देहभावे जीव भ्रांतिरूप झाला

जग, जीव आणि जगदीश/ब्रह्म/आत्मा यांचा परस्परसंबंध काय हा भारतीय तत्त्वज्ञानातील ज्वलंत वादाचा विषय आहे. काहींच्या मते जगदीशाने/ब्रह्माने हे जग निर्माण केले आणि जीव हा ब्रह्माचा/जगदीशाचा अंश आहे. पण हे मत इतरांना मान्य नाही. त्यांच्या मते जग आणि जीव हे वस्तुतः वेगळे नसून ते जगदीशरूप/आत्मरूप/ब्रह्मरूप आहेत. पण या गोष्टीचा जीवाला विसर पडला आणि अज्ञानाने जीव हा जग हे वेगळे तत्त्व आहे आणि आपण म्हणजे देह आहोत अशी त्याची चुकीची समजूत होऊन बसली. हे उपरोक्त मत महाराष्ट्रातील साक्षात्कारी संतांची आपल्या लेखात अनेकदा मांडले आहे.

काही उपनिषदांनी असा सिद्धांत मांडलेला आहे. जगातील नानात्व नाहीच (नेह नानास्ति किंचन) आणि जीव हा ब्रह्मरूप आहे (तत्त्वमसि, अयमात्मा ब्रह्म). या औपनिषद मताचा अनुवाद श्रीदासराममहाराजांनी ज्या अभंगात केला आहे, तो अभंग असा :-

**देहभावे जीव भ्रांतिरूप झाला ।**
**कैचा हा गोविला बंधनात ।।१।।**
**हाचि ब्रह्मरूप वस्तुता पहाता ।**
**आत्मरूपी सत्ता त्याची असे ।।२।।**
**निरसोनी अज्ञान पाही तू स्वतासी ।**
**आत्मचि आहेसी आत्मरूप।।३।।**

**पंचतत्त्वा आत आत्मयाची गाठी ।**
**चिदानंदी भेटी सद्रूपाची ।।४।।**
**मानिले आपुले ते ते टाकी वेगी ।**
**राहे उगाउगी स्वस्थचित्त ।।५।।**
**निज ते आपण अयमात्मा ब्रह्म ।**
**महावाक्य वर्म *दासरामा* ।।६।।**

(दा.गा.१२१२)

जीव आणि ब्रह्म यांचे एकत्व सांगणारी काही वाक्ये उपनिषदांत आहेत, त्यांना महावाक्य म्हणतात. उदा. तत्त्वमसि, अयमात्मा ब्रह्म इत्यादी. त्यातील 'अयमात्मा ब्रह्म' याचा अर्थ आहे हा जीवात्मा ब्रह्म/ ब्रह्मरूपी आत्मा/ आत्मरूप आहे. ब्रह्म हेच जीवाचे 'निज' रूप आहे आणि जीव हा निज म्हणजे ब्रह्म/आत्मा आहे हे या महावाक्याचे मर्म आहे असे श्रीदासराममहाराज सांगतात (''निज ते आपण अयमात्मा ब्रह्म । महावाक्य वर्म दासरामा ।।'').

जरी जीव ब्रह्मरूप आहे, तरी जीवाचा जगातील व्यवहार कसा चालू आहे? ''आपण ब्रह्म आहोत'' याचे ज्ञान व्यवहारात जीवाला नाही आणि तो पाच महाभूतांनी बनलेल्या देहालाच मी असे मानीत आहे. हीच त्याची देहात्मबुद्धी होय. या देहात्मबुद्धीने जीवाचा घात झाला आहे. खरे पहाता, 'देह म्हणजे मी' ही जीवाला झालेली भ्रांती आहे, ते त्याचे चुकीचे ज्ञान आहे. पण या चुकीच्या ज्ञानाला बळी पडून, देहाला मी मानून, जीव हा अहंकार आणि आसक्ति यांच्याद्वारे नानाप्रकारची भलीबुरी कर्मे करतो आणि ती कर्मे 'आपली स्वतःची' असे मानतो आणि तसे मानल्यामुळे, त्या कर्मांची फळे भोगण्यास त्याला पुनःपुनः जन्म घ्यावा लागतो. म्हणजेच तो कर्मांच्या बंधनात अडकून रहातो (देहभावे जीव भ्रांतिरूप झाला । कैचा हा गोविला बंधनात ।।).

“देह म्हणजे मी” असे मानणे ही जर जीवाची चूक आहे, तर खरे काय आहे? श्रीदासराममहाराज सांगतात :- वस्तुस्थिती अशी आहे की जीव हा मूलतः ब्रह्मरूप (जीवो ब्रह्मैव) आहे. ब्रह्म म्हणजेच आत्मा. म्हणूनच ब्रह्म/आत्मा हेच जीवाचे अस्तित्व, मूळ रूप आहे (हाचि ब्रह्मरूप वस्तुता पहाता । आत्मरूपी सत्ता त्याची असे ।।).

पण नेहमीच्या जीवनात ही वस्तुस्थिती जीवाला कळत नाही. या त्याच्या अज्ञानामुळे जीव स्वतःचे खरे स्वरूप विसरून जातो. तेव्हा हे अज्ञान दूर करून जर स्वतःचे खरे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला असे कळून येते की, आपण देहरूप नसून आपण आत्मा/आत्मरूप आहोत. म्हणून श्रीदासराममहाराज जीवाला सांगतात : निरसोनी अज्ञान पाही तू स्वतःसी । आत्माचि आहेसी आत्मरूप ।।.

जीवाला स्वतःचे मूळ रूप/ आत्मरूप कळत नाही , याचे कारण त्याचे मूळ आत्मरूप या शरीरात पाच तत्त्वांनी झाकून गेले आहे. म्हणजे असे :- पाच तत्त्वे म्हणजे पाच महाभूते. ती अशी : आकाश, वायु, तेज, पाणी आणि पृथ्वी. या पाच महाभूतांच्या/तत्त्वांच्या विशिष्ट मिश्रणाने स्थूल देह बनला आहे. त्याचे आवरण आत्म्यावर पडले आहे. तसेच प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश या तत्त्वांनीही आत्म्यावर आच्छादन घातले आहे आणि पंचतत्त्वांनी बनलेला देह अथवा एकादा कोश म्हणजे मी अशी त्याची पक्की समजूत (गाठ) झाली आहे. ही पाच तत्त्वांची गाठ/घट्ट समजूत जर जीवाने सोडली, बाजूला केली, तर त्याला सच्चिदानंद ब्रह्म/आत्मा हे आपले खरे स्वरूप आहे हे कळून येईल. म्हणून श्रीदासराममहाराज म्हणतात :- “पंचतत्त्वा आत आत्मयाची गाठी । चिदानंदी भेटी सद्रूपाची ।।”.

तेव्हा प्रश्न असा :- पंचतत्त्वाची गाठ सुटण्यास जीवाने नक्की काय करावयास हवे? या प्रश्नाचे उत्तर श्रीदासराममहाराज असे देतात :- व्यवहारात ज्या देहाला आपण 'मी' म्हणतो आणि त्याअंती जे जे काही आपण आपले असे अहंकाराने मानतो, त्या सर्वांचा त्याग करावयास हवा आणि स्वस्थ व्हावयास हवे (''मानिले आपुले ते ते टाकी वेगी । राहे उगा उगी स्वस्थचित्त ।।''). वेगळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास जीवाने नित्यानित्यवस्तुविवेक करावयास हवा. नित्य एक ब्रह्म आहे आणि ब्रह्माखेरीज जे काही अन्य दिसते/ भासते/वाटते ते सर्व अनित्य आहे. हा विचार दृढ झाला की आपणच नित्य ब्रह्म /आत्मा आहोत अशी खात्री जीवाला होते. वेगळ्या शब्दांत, अनित्य गोष्टींचा मनाने त्याग करून नित्य आत्म्याकडे/ ब्रह्माकडे लक्ष दिले की त्या ब्रह्माच्या/आत्म्याच्या निदिध्यासाने, आपण ब्रह्मच आहोत हे ज्ञान जीवाला होते.

अशाप्रकारे स्वतःच्या खऱ्या स्वरूपाविषयीचे श्रवण, मग मनन (नित्यानित्यवस्तुविवेक) आणि मग आत्म्याचे निदिध्यासन झाल्यावर, 'मी अनित्य देह नसून मी नित्य ब्रह्म /आत्मा आहे' अशी जीवाला प्रचीती येते. आणि अशी प्रचीती येणे हेच उपनिषदातील महावाक्याचे वर्म आहे.

*(२०.१२.२०११)*

***

## ३४. दासराम हा ब्रह्म गे माय

लौकिक व्यवहारात आपण जीव ज्या जगात वावरतो ते जग सारखे बदलते आहे हे आपल्या प्रचीतीला येते. साहजिकच या जगाचे कारण असणारे आणि कधीही न बदलणारे असे काही सत्य तत्त्व आहे काय असा प्रश्न उपनिषत्कालीन ऋषिमुनींना पडला होता. त्याचे उत्तर त्यांना सापडले ते म्हणजे ब्रह्म. या ऋषिमुनींची वाट चोखाळणाऱ्या ब्रह्मसाक्षात्कारी साधुसंतांनीही अधून मधून 'ब्रह्म' या शब्दाचा उपयोग केला आहे. उदा. ''नामात ब्रह्म डोले'' असे श्रीदासराममहाराज सांगतात. या ब्रह्माविषयी श्रीदासराममहाराज एका अभंगात असे सांगतात :-

**उघडची असोनी चोरूनी ठेले ब्रह्म गे माय ।**
**प्रगट असोनी दिसेचिना जे ब्रह्म गे माय ।।१।।**
**दिसावया ते ग्रासुनी ठेले ब्रह्म गे माय ।**
**शब्दातीत जे रंगुनी गेले ब्रह्म गे माय ।।२।।**
**सद्गुरूचे जे हृदयी शिरले ब्रह्म गे माय ।**
**चराचरा जे व्यापुनी उरले ब्रह्म गे माय ।।३।।**
**अबोल बोल जेणे वदविले ब्रह्म गे माय ।**
**शेष प्रसादानंद देई जे ब्रह्म गे माय ।।४।।**
**सद्गुरुबालक *दासराम* हा ब्रह्म गे माय ।**
**त्वं पद तत्पद आटले जेथे ब्रह्म गे माय ।।५।।**

(दा.गा.१७९२)

या अभंगातील ''गे माय'' हे शब्द आईला उद्देशून नाहीत. मानवी जीवनात ''बुद्धी'' ही महत्त्वाची आहे. ती निश्चय करेल तसे घडते. म्हणून तिचा निश्चय करण्यास उपयोगी पडावे म्हणून अनेकदा साधुसंतांनी या बुद्धीला उपदेश केला आहे. या बुद्धीला उद्देशून या अभंगात 'गे माय' हे शब्द श्रीदासराममहाराजांनी उपयोजिले आहेत. या बुद्धीची खात्री पटविण्यास श्रीदासराममहाराज सांगतात :-

ब्रह्माने चराचर जग निर्माण केले अथवा ब्रह्मावर - ब्रह्म या अधिष्ठानावर - स्थावरजंगमात्मक जगाचा भास होऊ लागला. या विश्वात ब्रह्म हे सत्/अस्तित्व आणि चैतन्य या रूपांनी व्यापून आहे. तथापि हे चराचर विश्व व्यापण्यात ब्रह्म हे संपून जात नाही. ते अनंत असल्याने ते उरतेच. म्हणून ''स भूमिं विश्वतो वृत्वा अत्यनिषद् दशांगुलम् ।।'' असे पुरुषसूक्त सांगते. परमेश्वर/ब्रह्म हाही तसाच आहे. म्हणून गीतेमध्ये भगवान कृष्ण म्हणतात ''विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।''. तर मोरोपंत सांगतात ''भू-जल-तेज- समीर-ख-रवि-शशी-काष्ठादिकी असे भरला । अवघे स्थिरचर व्यापुनी तो हा आत्मा दशांगुले उरला ।।''. श्रीदासराममहाराज तेच सांगतात :- ''चराचरा जे व्यापुनी उरले ब्रह्म गे माय ।।''.

चराचरात्मक विश्वात 'अस्तित्व' आणि 'चैतन्य'रूपाने असणारे ब्रह्म हे अस्तित्व आणि चैतन्य या स्वरूपात उघड आहे. परंतु आपणास नेहमीच जीवनात त्याची जाणीव होत नाही. कारण ते इंद्रियगम्य नाही. म्हणून ते 'गुप्त' रहाते (''उघडची असोनी चोरुनी ठेले ब्रह्म गे माय'').

मानवी इंद्रियांना ब्रह्माचे ज्ञान होत नाही. त्या इंद्रियांना चैतन्यरूपात ब्रह्म हे व्यापून आहेच. त्याने इंद्रियांना ग्रासून टाकले आहे आणि त्या स्वरूपात ते स्थित आहे (''दिसावया ते ग्रासुनी ठेले ब्रह्म गे माय'').

ब्रह्म हे सर्वव्यापक आहे. ते प्रत्येक मानवी प्राण्यात अस्तित्व आणि चैतन्य या रूपात आहे. व्यवहारात आणि विशेषतः परमार्थात गुरु हा आवश्यक आहे. परमार्थातील सद्गुरूच्या हृदयातही हे ब्रह्म शिरून राहिलेले आहे (''सद्गुरूचे जे हृदयी शिरले ब्रह्म गे माय।।'').

जरी विश्वव्यापक ब्रह्म आहे तरी ते विश्वाप्रमाणे नाही. विश्वातील कोणताही पदार्थ अथवा त्याचा गुण हा ब्रह्माचे वर्णन करण्यास अपुरा पडतो. म्हणून ब्रह्म हे विश्वाप्रमाणे नाही, 'ब्रह्म हे असे नाही तसे नाही' (न इति न इति) असे त्याचे वर्णन वेदाने/उपनिषदांनी केले आहे. याचा अर्थ ब्रह्म हे शब्दातीत, शब्दांच्या पलीकडचे आहे (''शब्दातीत जे रंगुनि गेले ब्रह्म गे माय।।'').

असे जरी असले तरी गुरु/संत/ऋषी/मुनी या ब्रह्माचे ज्ञान मुमुक्षूंना देण्यास शब्दांचा वापर करतात. कारण काहीच शब्द वापरले नाहीत तर काहीच कळणार नाही. म्हणून त्यांनी शब्दांचा वापर करून ब्रह्माची कल्पना देण्याचा प्रयत्न केला. म्हणजे ब्रह्म हे जरी ''अबोल'' म्हणजे बोलात न सापडणारे, बोलाच्या पलीकडचे म्हणजे शब्दाच्या पलीकडचे आहे, सद्गुरु/संत यामध्ये असणाऱ्या ब्रह्मानेच ''अबोल'' असणाऱ्या स्वतःचे वर्णन करवून घेतले आहे. म्हणून श्रीदासराममहाराज म्हणतात, ''अबोल बोल जेणे वदविले ब्रह्म गे माय।।''.

विश्वात व्यापून असणारे ब्रह्म कळण्यास विश्वाचा पसारा बाजूला सारावा लागतो, जसे - शेवाळाकडे दडलेले पाणी पहाण्यास शेवाळ बाजूला करावे लागते. त्याप्रमाणे विश्वाचा पसारा बाजूला करून जर आपण पाहिले तर ब्रह्म हे जीवाच्या प्रत्ययाला येऊ शकते. बह्म हे जसे सत् आणि चित् /चैतन्य या रूपाने जगात आहे, त्याप्रमाणे ते ''आनंद'' रूपानेही या जगात आहे. म्हणून विश्व बाजूला झाल्यावर, जे ब्रह्म उरते (शेष), ते प्रसाद या स्वरूपात जीवाला आनंद देते (''शेष प्रसादानंद देई जे ब्रह्म गे माय।।'').

या जगात 'जीव' या स्वरूपात आपला सर्व व्यवहार चालू आहे. येथे प्रश्न असा :- जो जीव आहे तो कोण आहे ? तो ब्रह्मापेक्षा वेगळा आहे की तो ब्रह्मच आहे? काही उपनिषदे आणि शंकराचार्यांचे केवलाद्वैत वेदान्तमत यांच्या दृष्टीने जीव हा ब्रह्मच आहे (''जीवो ब्रह्म एव।''). हे सत्य उपनिषदांनी ''तत्त्वमसि'' या महावाक्याचे द्वारा सांगितले आहे. या वाक्यात ''तत्'' आणि ''त्वं'' अशी दोन पदे/शब्द आहेत. हे तत् आणि त्वं हे शब्द त्यांच्या वाच्यार्थाने घ्यावयाचे नसून ते त्यांच्या लक्ष्यार्थाने घ्यावयाचे आहेत. त्यांचा वाच्यार्थ सोडून लक्ष्यार्थ घेतला की तत् = चैतन्य = त्वं = जीव = ब्रह्म असे समीकरण प्राप्त होते. आणि मग आपण ब्रह्मच आहोत याचा जीवाला अनुभव आला की मग त्याला तत् आणि त्वं पदांचा आणि तत्त्वमसि वाक्याचा काहीच उपयोग नाही. ही गोष्ट श्रीदासराममहाराज अशी सांगतात :- त्वं पद तत् पद आटले जेथे ब्रह्म गे माय ॥.

वरील सर्व भाग श्रीदासराममहाराजांना सद्गुरूच्या कृपाप्रसादाने कळला. शिष्य हा गुरूचा पुत्र मानला जातो. म्हणून दासराममहाराज या अभंगात स्वतःला ''सद्गुरुबालक'' असे म्हणतात. आता सर्वच जीव जर ब्रह्म आहेत, तर श्रीदाससराममहाराज तरी ब्रह्मापेक्षा वेगळे कसे असणार? श्रीदासराममहाराज हेही ब्रह्मच आहेत. म्हणून ते म्हणतात, 'सद्गुरुबालक दासराम हा ब्रह्म गे माय'.

अशाप्रकारे चराचर व्यापून उरणारे, शब्दातीत असणारे, पण गुरुद्वारा शब्दगम्य करणारे, इंद्रियगम्य नसणारे, चराचरात सत्, चित् आणि आनंद या स्वरूपात असणारे ब्रह्म आहे असे कथन करीत, तत्त्वमसि या वाक्यानुसार सर्व जीव ब्रह्मच आहेत, असे श्रीदासराममहाराजांना या अभंगात सांगावयाचे आहे.

***(०१.०१.२०१२)***

***

## ३५. देहाचिये मध्ये भरले चैतन्य

ज्या जगामध्ये आपण रहातो ते कसे बनले आहे हे एक कोडेच आहे. या जगात मानव प्राणी वावरत आहे. त्याचे ध्येय काय आणि त्याचे कर्तव्य काय, हाही एक प्रश्नच आहे. साधुसंतांनी या दोन्हीही प्रश्नांची उत्तरे देऊन ठेवली आहेत. साधुसंतांच्या म्हणण्याचा विचार केला तर ही दोन्हीही उत्तरे आपणास समजून येतात. ही दोन्हीही उत्तरे श्रीदासराममहाराज केळकर यांच्या पुढील अभंगात कमी-जास्त प्रमाणात व्यक्त झाली आहेत.

**देहाचिये मध्ये भरले चैतन्य ।**
**ओतप्रोत जाण जगी आहे ।।१।।**
**तया ठाई करी मानवा तू प्रेम ।**
**जाळोनिया कर्म बहुत हे ।।२।।**
**निश्चितासी प्राणी नाचवितो पाहे ।**
**निराळाची राहे आपण ।।३।।**
**तेचि मुक्तरूप मूळ आत्मरूप ।**
**दिसे आपेआप गुरुकृपे ।।४।।**
***गोविंदतनय* म्हणे तया ठाई ।**
**प्रेम करूनी राहे तरीच बरे ।।५।।**

(दा.गा.८३)

चैतन्य हे एकच नित्य आणि सत्य असे अंतिम मूळ तत्त्व आहे. त्यालाच आत्मा अथवा ब्रह्म म्हणतात आणि म्हणूनच आत्मा / ब्रह्म चिद्घन, चैतन्यरूप आहे असे म्हटले जाते. हे चैतन्य जेव्हा स्थिर/निश्चल

असते, तेव्हा जग भासत नाही. पण या निश्चळ चैतन्यात चंचळत्व उठले की जगाचा भास होऊ लागतो. जगातील जड पदार्थांतही चैतन्य हे गुप्त/सुप्त स्वरूपात असतेच. चंचळ चैतन्यापासून जड अशी आकाश, इत्यादी पाच महाभूते निर्माण झाली आणि त्यांच्या मिश्रणाने जगातील जड पदार्थ बनले. असे असले तरी सर्व जगात चैतन्य हे ओतप्रोत भरले आहे हे विसरू नये.

जड महाभूतांपासून मानवाची स्थूल/जड शरीरे उत्पन्न झाली. साहजिकच मानवी देहातही चैतन्य आहेच. मानवी देहातील चैतन्याला अंतरात्मा अथवा प्रत्यगात्मा म्हणतात. या अंतरात्म्याचे प्रतिबिंब म्हणजे जीव आहे. हा जीव अहंकाराने मी कर्ता असे मानून बरी-वाईट कर्मे करतो आणि त्या कर्मांत त्याची आसक्ति असल्याने, कर्मांचे फळ या स्वरूपात त्याला जन्म आणि मरण प्राप्त होते. त्यातून त्याने सुटून मोक्ष प्राप्त करून घ्यावयास हवा, असे संतांचे सांगणे आहे.

जे निश्चळ चैतन्य आहे ते जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडत नाही, ते सदा मुक्तच आहे. ते निश्चळ चैतन्य हेच जीवाचे मूळ रूप आहे. म्हणजे जीव हा ब्रह्मरूप/आत्मरूप आहे. या चैतन्याचे/आत्मरूपाचे दर्शन घेणे हेच जीवाचे कर्तव्य/साध्य आहे. आता चैतन्य/आत्मा पहाणे, त्याचे दर्शन घेणे म्हणजे चैतन्यरूप/आत्मरूप होऊन जाणे आहे. जीवाने चैतन्यरूप /आत्मरूप होऊन जावयाचे आहे. हे चैतन्यरूप होण्यास जीवाला गुरुकृपा प्राप्त व्हावी लागते. गुरूची कृपा झाली की जीव आत्मरूप होतो. ज्याला आत्मसाक्षात्कार झालेला आहे तो गुरु या गुरूची कृपा कशी संपादन करावयाची, हे या अभंगांत सांगितलेले नाही. पण ते श्रीदासराममहाराजांच्या इतर अभंगांत सांगितलेले आहे. ते असे : चैतन्याचा नाद/चैतन्यरूप नाम मानवी देहात घुमत आहे ते गुरु दाखवून देतो. तशा

नामाचा अभ्यास शिष्याने केला तर त्याच्यावर गुरुकृपा होते आणि मग गुरुकृपेने आत्मरूप होता येते. म्हणून आत्मरूपावर प्रेम करून, चैतन्याचा नाद ऐकत चैतन्यरूप होऊन जावयाचे आहे.

चैतन्य हे सर्वव्यापक आहे. चैतन्याशिवाय रिता ठाव कोठेही नाही. मानवी देहातही चैतन्य भरलेले आहेच. या शरीरातील चैतन्याच्या बळावर माणूस चांगली-वाईट कर्मे आसक्ती बाळगून करतो. ही कर्मे माणसाला जन्ममरणाच्या फेऱ्यात टाकतात. म्हणून निरासक्तपणे, निरहंकारपणे कर्मे करून शरीरातील चैतन्यावर प्रेम करण्यास शिकावयास हवे (''तया ठायी करी मानवा तू प्रेम । जाळोनिया कर्म बहुत हे।।'').

खरे म्हणजे चैतन्यामुळेच कर्म घडत असते. प्राणी हा केवळ निमित्तमात्र आहे. तो खरा कर्ता नाही. पण अहंकाराने तो स्वतःला कर्ता मानतो. पण आपण केवळ निमित्तमात्र आहोत हे लक्षात आले की माणूस निरहंकारपणे कर्मे करू शकतो. मग ती कर्मे बंधनकारक होत नाहीत. जीव मुक्त होतो.

सर्व अभंगाचा भावार्थ असा :- जगात तसेच मानवी देहात चैतन्य भरले आहे. माणसाने जागतून, कर्मातून अलिप्त होऊन देहातील चैतन्यावर प्रेम करावयास हवे. देहात जरी आनखशिखाग्र चैतन्य भरले आहे तरी ते श्वासोच्छ्वासात प्रकर्षाने उपस्थित आहे. श्वासोच्छ्वासात या चैतन्याचा नाद/नाम उमटत असते. त्याच्यावर प्रेम करावयाचे. म्हणजे त्या चैतन्याच्या नादावर मन एकाग्र करावयाचे. असे झाले असता जीव चैतन्यरूप / आत्मरूप होऊन जातो आणि तेच मानवी जीवनाचे ध्येय आहे.

***

## ३६. शिवरूपची आहेसी

जगद्गुरु आद्य शंकराचार्य हे भारतात होऊन गेलेले एक महान तत्त्ववेत्ते होते. त्यांच्या मते जगाच्या बुडाशी निर्गुण/निश्चळ ब्रह्म हे एकमेव एक सत्य तत्त्व आहे. त्याला माया ही उपाधि येते. त्यामुळे ते सगुण होते. या सगुण ब्रह्माला ईश्वर म्हणतात. मग ईश्वराच्या अधिष्ठानावर माया ही जगाचा आभास उत्पन्न करते. या जगात स्थूल देहाच्या उपाधीत जे ब्रह्म सापडते त्याला जीव म्हणतात. शरीराच्या उपाधीत सापडलेला जीव म्हणजेच मायेच्या उपाधीत सापडलेले ब्रह्म म्हणजे ईश्वर आहे. जीव आणि ईश्वर भिन्न नाहीत. म्हणून ''जीवो ब्रह्मैव नापरः'' (जीव ब्रह्मच आहे, तो वेगळा नाही) असे श्रीशंकराचार्य सांगतात. शंकराचार्यांचे हे तत्त्वज्ञान महाराष्ट्रातील बहुतेक संतांनी स्वीकारलेले आहे. श्रीदासराममहाराज केळकर हे संतही याला अपवाद नाहीत. ते आपल्या एका अभंगात म्हणतात :-

**साखर गोडी नाही भिन्न । परी जाणावी अभिन्न ।।१।।**
**पाणी आणि पातळपण । दाविताचि नये दोन ।।२।।**
**सूर्य आणि त्याचे तेज । करिताचि नये दुजे ।।३।।**
**तैसा शिव आणि जीव । एकरूप नान्यभाव ।।४।।**
**परी विस्मरणभोग । करी जाण पा वियोग ।।५।।**
**टाकी तोडुनी अज्ञान । पाही एक आत्मखूण ।।६।।**
**शिवरूपची आहेसी । नामी ब्रह्मतन्मय होसी ।।७।।**
***दास* म्हणे नाम । करी संतोष परम ।।८।।**

(दा.गा.१४१)

साखर आणि तिची गोडी हे जरी भिन्न वाटले तरी ते भिन्न नसून अभिन्न, एकच आहेत. किंवा पाणी आणि पाण्याचे पातळपण हे जरी वेगळे वाटले तरी ते दोन नसून एकच आहेत. अथवा सूर्य आणि त्याचे तेज हे जरी निराळे वाटले तरी ते निराळे नसून एकच आहेत. ते वेगळे करता येत नाहीत. आणखी एक उदाहरण असे, तूप पातळ होते, ते घट्ट झाले म्हणून भिन्नता येत नाही. तूप एकच रहाते. त्याप्रमाणे निर्गुण ब्रह्म आणि सगुण ब्रह्म हे भिन्न नसून एकच आहेत. म्हणजे असे :-

निर्गुण ब्रह्माला माया ही उपाधी आली की ते सगुण होते, त्याला ईश्वर अथवा शिव म्हणतात. ईश्वराच्या अधिष्ठानावर माया ही जगाचा आभास निर्माण करते. या जगात अनेक स्थूल देह उत्पन्न होतात. त्या देहाच्या उपाधीत सापडलेले ब्रह्म म्हणजेच जीव आहे. याचा अर्थ असा :- मायेच्या उपाधीत सापडलेले ब्रह्म म्हणजे ईश्वर/शिव आणि देहाच्या उपाधित सापडलेले ब्रह्म म्हणजे जीव. म्हणून ब्रह्म = ईश्वर/शिव = जीव असे समीकरण होते. याचा अर्थ असा की मुळात ब्रह्म असणारे जीव आणि ईश्वर / शिव हे भिन्न नसून एकच आहेत. त्या दोहोत कोणताही भेद नाही.

मग प्रश्न असा येतो :- जीव जर ईश्वर/ब्रह्म आहे तर ते त्याला नेहमीच्या जीवनात का कळून येत नाही? याचे उत्तर असे :- अज्ञानामुळे जीवाला आपण ईश्वर/ब्रह्म आहोत हे ज्ञान होत नाही. अज्ञानजन्य विस्मरणामुळे जीव स्वतःला शिवापेक्षा वेगळा मानू लागतो. आता हे अज्ञान आणि विस्मरण जर दूर झाले तर जीवाला स्वतःचे खरे शिवस्वरूप /ब्रह्मस्वरूप कळून येणार, हे स्पष्ट आहे. त्याला आत्मखूण पटणारी आहे.

आता प्रश्न असा :- जीवाचे हे अज्ञान आणि अज्ञानजनित विस्मरण कसे दूर होणार? तसे होण्यास काय उपाय आहे ? त्याला ''नाम'' हा उपाय आहे असे श्रीदासराममहाराज सांगतात. हे नाम म्हणजे आपण

तोंडाने उच्चारतो ते नाम नव्हे. नाम हेच ब्रह्म आहे आणि हे नाम प्रत्येक प्राण्याच्या श्वासोच्छ्वासात उमटत असते. या नामाचे स्मरण अथवा अभ्यास झाला तर ''नाम'' हेच ''रूप'' असल्याने त्या नामाच्या योगाने जीव हा ब्रह्मरूपच होऊन जातो. दासराममहाराज दुसऱ्या एका अभंगात सांगतात, ''नामामाजी डोले ब्रह्म ।''. अशा ब्रह्मरूप नामाचा अभ्यास झाला की सगुण ईश्वर/शिव हाही ब्रह्मरूपच आहे आणि आपणही ब्रह्मरूप/शिवरूप आहोत हे जीवाला कळून येते. म्हणून श्रीदासराममहाराज म्हणतात, जीवाला सांगतात, ''अरे जीवा, तू शिवरूप आहेस''. शिव/ब्रह्म आनंदस्वरूपी असल्याने शिव झालेला जीव आनंदी होतो. त्याला जीवनात संतोष/आनंद प्राप्त होतो.

या जगात जन्माला आल्यावर जीवाने आपले मूळ शिवस्वरूप अथवा ब्रह्मस्वरूप प्राप्त करून घेणे हे त्याचे कर्तव्य आहे असे श्रीदासराममहाराजांचे मत आहे. ते अन्यत्र सांगतात :- ''असोनिया जीव स्वये परब्रह्म ।'', ''विसरोनी गेल्या आपुल्या आपणा ।।''. म्हणून जन्माला आल्यावर अज्ञान दूर करून 'जन्माचे सार्थक रहावे ब्रह्मपणे' असे आहे. नामाच्या साधनाने जीवाला आपले ब्रह्मस्वरूप कळले की तो विद्यमान जीवनातच ब्रह्मरूप/शिवरूप होऊन जीवन्मुक्त होतो आणि त्याच्या जन्माचे सार्थक होते.

*(०६.१२.२०११)*

***

# ३७. ब्रह्मी दृश्य मावळले

आपल्या सभोवती जगाचा पसारा आहे आणि तो खरा आहे असे आपण समजून चालतो. पण तत्त्वज्ञानी लोक त्याविषयी शंका घेतात. काही तत्त्वज्ञानी लोक जग हे अनादि आणि अनंत असून ते सत्य आहे असे म्हणतात. काहींच्यामते वायु, तेज, जल आणि पृथ्वी या चार महाभूतांच्या संयोगाने हे जग बनले आहे आणि ते खरे आहे. इतरांच्यामते ईश्वराने आपल्या शक्तीने हे जग निर्माण केले आणि ते सत्यच आहे. या उलट काही तत्त्वज्ञानी लोक अंतिम तत्त्व ब्रह्म आहे असे मानतात आणि त्यांच्या मते ब्रह्मावर जगाचा भास होतो. काही साधुसंतांच्या मतेही आपणास दिसणारे दृश्य विश्व हे भासमान आहे आणि ब्रह्म हे एकमेव एक सत्य आहे. या संदर्भात श्रीदासराममहाराज केळकर यांचा एक अभंग असा आहे :-

**नसे तेचि दिसो येते । खरे दावी वोखट ते ।।१।।**
**निश्चळची चंचळ झाले । घनू ठायी भासविले ।।२।।**
**अदृश्य ते दृश्य झाले । ब्रह्मी दृश्य मावळले ।।३।।**
***दासरामी* झाले मौन । तेथे तया समाधान ।।४।।**

(दा.गा.१०८)

श्रीदासराममहाराजांच्या मते ब्रह्म हे एकमेव सत्य पदार्थ आहे. ते चिद्घन असून ते निश्चळ आहे. मुळात विश्व नाही. पण नसणारे हे विश्व भासू लागते. जसे पाणी मुळात संथ असते, पण त्या पाण्यावर तरंग दिसू लागले. मुळात पाण्यात तरंग नाहीत. पण ते पाण्यावरच दिसू लागले.

तद्वत मुळात ब्रह्मात दृश्य नाही, दृश्य विश्व नाही (ब्रह्मी दृश्य मावळले). मुळात नसणारे विश्व दिसू लागले (नसे तेचि दिसो येते). सत्य ब्रह्मच मिथ्या विश्व/भासमान विश्‍व दाखविते (खरे दावी वोखटे ते ). हे कसे घडते? ते असे :- ब्रह्म निश्चळ आहे हे खरे, पण या निश्चळ ब्रह्मात सूक्ष्मपणे चंचळत्व आहे. अदृश्य निश्चळ असणारे ब्रह्म चंचलत्वाने विश्व भासवू लागते. निश्चळच चंचळ विश्व झाले असे वाटते. श्रीदासराममहाराज अन्य एका अभंगात सांगतात :- 'निश्चळ ब्रह्म चंचळ ते माया | चंचळाचे गुणे विश्व रचिले ||'. आणि जोपर्यंत हे चंचळत्व आहे, तोपर्यंत हे दृश्य विश्व दिसतच राहणार. पण ते कायम टिकणारे नाही. कायम टिकणारे एक ब्रह्मच आहे.

ब्रह्म हे अदृश्य आहे. ते मानवी इंद्रियांना ग्राह्य नाही. पण हे अदृश्य ब्रह्मच चंचळत्वामुळे दृश्य विश्व होते (अदृश्य ते दृश्य झाले).

ब्रह्मावरच जग भासत असल्याने ते मुळात नसले तरी भास म्हणून आहे. अशा या विश्वाविषयी काय बोलावे? या बाबतीत मौन धरणे हे श्रेयस्कर आहे आणि तसे केल्याने समाधान होते (दासरामी झाले मौन | तेथे तया समाधान ||).

संक्षेपाने सांगायचे झाल्यास :- मुळात जग नव्हते. मुळात एक निश्चळ ब्रह्म होते. हे निश्चळ, अदृश्य असणारे ब्रह्म जगरूपाने भासू लागले. विश्व हे भासमान असल्याने ते ब्रह्माचे ठायी मात्र नाही. म्हणजे विश्व हे भास म्हणून आहे पण मुळात नाही. अशा विश्वाच्या संदर्भात मौन बाळगणे हेच श्रेयस्कर आहे.

***

## ३८. ऐसा मी देखिला प्राणी

**ऐसा मी देखिला प्राणी । गुरुचे नयनी ।।ध्रु.।।**
**ज्यासी नाही एकही अवयव । परी नानाविध करी जो भाव ।**
**आपणची अनेक होऊनी सर्व । बहू रंगांनी ।।१।।**
**लटिके परी ते सत्य भासवी । भ्रम हा सारा उगाच नाचवी ।**
**सर्व सूत्र हे कसे खेळवी । स्वकरी धरोनी ।।२।।**
**करूनी अकर्ता धरोनी अधर्ता । काळा हाटवी ऐसी सत्ता ।**
**कर्माकर्मी दिसतो चित्ता । अलिप्तावाणी ।।३।।**
**गोडी चाखे रसनेवीण । सर्वही देखे चक्षूवीण ।**
**कृपाळुपणे भक्तालागून । पाळितो जाणी ।।४।।**
**पायावीण त्रिभुवनी गमन । कराविण व्यवहारी पूर्ण ।**
**माया अन्य साधनावीण । उभारिली ज्यानी ।।५।।**
**माया म्हणजे काहीच नसुनी । द्वैती गुंतवी जनालागुनी ।**
***दासराम* लागे चरणी । धरी भुजांनी ।।६।।**

(दा.गा.३२८)

''श्रीदासरामगाथा'' या ग्रंथात श्रीदासराममहाराजांचे काही कूट अभंग आहेत. वरील अभंग त्यातला एक आहे. त्यात विरोधाभासात्मक, चमत्कारिक विधाने येत असल्याने, त्याचा अर्थ चटदिशी लक्षात येत नाही, कारण वाच्यार्थापेक्षा वेगळा अर्थ त्यात अभिप्रेत आहे. ज्याचे वर्णन करावयाचे त्याचे वर्णन एक प्रतीक घेऊन येथे केलेले आहे. त्यामुळे

प्रतीकाचे मूळ कळल्याशिवाय अभंगाचा नीट अर्थ कळत नाही. म्हणून त्याला कूट अभंग असे म्हटले आहे.

या अभंगात येणाऱ्या ''भक्त'' आणि ''माया'' या शब्दांवरून या अभंगात कशाचे प्रतीक आहे हे कळू शकते ते असे :- माया आणि ब्रह्म अथवा ईश्वर यांची सांगड तात्त्विक वाङ्मयात आढळते. तसेच ईश्वर आणि भक्त यांचाही घनिष्ठ संबंध संतसाहित्यात दिसून येतो. हे लक्षात घेतले की या अभंगात ब्रह्म/आत्मा/परमात्मा/ईश्वर/परमेश्वर याचे प्रतीक वापरले असावे हे कळून येते आणि मग ईश्वराच्या बाबतीत जे काही म्हणता येते ते या अभंगात प्रतीकाच्या बाबतीत म्हटले आहे हे लक्षात येण्यास अडचण येत नाही. मग या कूट अभंगाचा अर्थ सुलभपणे कळून येतो. या अभंगात परमेश्वरासाठी ''प्राणी'' हे प्रतीक वापरले आहे. आणि त्याचे केलेले वर्णन हे ईश्वराला लागू पडणारे आहे. हे कळल्यावर या कूट अभंगाचा अर्थ असा होतो.

गुरुकृपेने प्राप्त झालेल्या ''नयना''ने मी एक ''प्राणी'' पाहिला, असे दासराम म्हणतात. ''एक प्राणी आढळला माते । नवल दाविले सद्गुरु माते ।।'' या दुसऱ्या एका कूट अभंगातील चरणावरून गुरूमुळे, गुरूच्या कृपेने, गुरुकृपेने प्राप्त झालेल्या डोळ्याला हा प्राणी दिसला, असे श्रीदासराममहाराजांना सांगावयाचे आहे. हा प्राणी म्हणजे परमेश्वर आहे.

या प्राण्याला एकही अवयव नाही. पण तो स्वतःच अनेक होऊन, तो नानाविध रंगांनी अनेक भाव दाखवीत आहे. परमेश्वर हा एकच आहे. पण जीवांच्या रूपात तो अनेक रूपांत नटला आहे. त्या जीवांच्या स्वरूपात तो अनेक प्रकारांनी राग, द्वेष, लोभ, मत्सर, सुख, दुःख इत्यादी भाव दाखवीत असतो. परमेश्वर हा अखंड, निरवयव, अवयवरहित आहे.

या ईश्वरापासून मायेद्वारासर्व विश्व निर्माण होते. हे मायाजन्य जग हे लटिके / मिथ्या आहे. परंतु ते सत्य आहे असे तो जीवांना भासवीत असतो. म्हणजे जीव या भासमान जगाला सत्य मानतात. भासमान जगाला सत्य समजणे हा भ्रम/चुकीचे ज्ञान आहे. तरी या जगाला सत्य समजून जीव नानाप्रकारचे उद्योग, बरीवाईट कर्मे करीत असतात.

सर्व जग आणि जीव हे ईश्वराच्या हातात आहेत. ईश्वर हा एकाद्या सूत्रधाराप्रमाणे आहे. पूर्वी एक बाहुल्यांचा खेळ दाखविला जात असे. त्या बाहुल्या दोरीला जोडलेल्या असत आणि या सर्व दोऱ्या/सूत्रे सूत्रधाराच्या हातात असत आणि दोरी ओढून तो सूत्रधार नाचवील त्याप्रमाणे त्या बाहुल्या नाचत असत. ईश्वर हा आपल्या हातातील सूत्राच्या आधारे सर्व जगाला आणि जीवांना नाचवीत असतो. एका कवीने असे म्हटले आहे, ''बाहुली मनुष्ये केली । हालवी धरूनी दोरीला ।।''. सूत्राच्या आधारे ईश्वर हालवील त्याप्रमाणे जीव आणि जग हालत असतात.

आता जीव आणि जग यांच्या बाबतीत सूत्रधार ईश्वर असल्याने तोच कर्ता आहे आणि जग व जीव यांना धारण करणारा तोच आहे. पण दिसताना मात्र जीव आणि जग काहीतरी करीत आहेत असे दिसते. पण त्यांच्या सर्व क्रियांत ईश्वर हा अलिप्त आहे, तो कशातही आसक्त नाही. म्हणून तो अकर्ता आणि अधर्ता आहे. म्हणून जीव जी काही कर्मे करतात अथवा करीत नाहीत, त्या सर्वांमध्ये तो अलिप्त आहे असेच दिसून येते.

जगाचा आभास सुरू झाल्यावर काळ (Time) सुरू होतो. काळ पुढे पुढेच जात असतो, हे खरे. पण या काळालाही ईश्वर उलटे पालटे करू शकतो. कारण काळावरही त्याची सत्ता/सामर्थ्य चालते. कारण ईश्वर सर्वसमर्थ आहे. काळ म्हणजे प्राण्यांच्या बाबतीतील मरण असा अर्थ

घेतल्यास, ईश्वर हा आपल्या भक्तांचे मरण हटवू शकतो, असाही अर्थ होईल.

जीवांच्या स्वरूपात ईश्वरच आहे. जीवाला देह आहे आणि त्या देहाला इंद्रिये आहेत. त्या इंद्रियातील ज्ञानेंद्रियांचे द्वारा जीव जगातील बाह्य पदार्थांचा उपभोग घेत असतो. त्यांचे ज्ञान करून घेत असतो. उदा. जीव जिभेने गोड पदार्थांची गोडी चाखीत असतो आणि डोळ्यांनी बाहेरील पदार्थ पहात असतो. पण या सर्वांमागे ईश्वराची सत्ता आहे. पण त्याला जीभ, डोळे इत्यादी अवयव नाहीत. म्हणून तो रसनेवीण गोडी चाखे आणि चक्षूवीण सर्व पाहे, असे येथे म्हटले आहे.

या भासमान जगात ईश्वराची भक्ति करणारे काही लोक असतात. या भक्तांची काळजी ईश्वर वहात असतो. तो भक्तांवर कृपा करतो आणि त्यांचे रक्षण करतो. कृपा करून ईश्वराने प्रल्हाद या आपल्या भक्ताचे सर्वतोपरी रक्षण केले, याचा निर्देश पुराणात आहे.

ईश्वराला अवयव नाहीत. त्याला हात, पाय असे मानवी अवयव नाहीत. जीव हातापायांचा उपयोग करून गमन करतात आणि अन्य कर्मे करतात. ईश्वराला पाय नसले तरी तो त्रिभुवनात - स्वर्गलोक, मृत्युलोक व पाताललोक यात - गमन करतो. ईश्वर हा सर्वव्यापक असल्याने तो त्रिभुवने व्यापून आहे आणि स्वतःला हात नसले तरी तो जीवांच्या हाताद्वारे सर्व प्रकारचे व्यवहार करीत असतो.

ईश्वर हा एकमेव एक आहे. त्याच्या जोडीने अन्य काही नाही. तथापि हा ईश्वर अन्य कोणतेही साधन नसताना ‘‘माया’’ निर्माण करतो. खरे म्हणजे ‘‘माया’’ म्हणून काही नाही. तरी नसणाऱ्या या मायेच्याद्वारा ईश्वर जग व जगातील जीव हा पसारा दाखवीत असतो. जग हे द्वैतात्मक

आहे. या जगात ''मी-तू'' अशा प्रकारच्या द्वैतामध्ये जीवांचा व्यवहार चालू असतो आणि या द्वैतात जीव बुडून जातात. त्यांना मूळ अद्वैत-दोनरहित - ईश्वर आहे याची जाणीव सर्वसाधारणपणे होत नाही. म्हणून ते या द्वैतात अडकून सुख व दुःख यांच्या जाळ्यात हिंडत रहातात.

प्रतीकाच्याद्वारे असे ईश्वराचे वर्णन झाल्यावर शेवटी श्रीदासराममहाराज सांगतात :- मी या ईश्वराचे चरण धरले. मी ईश्वराला शरण गेलो. मज भक्तावर ईश्वर खूष झाला आणि त्याने मला दोन हातांनी धरून आपल्या जवळ घेतले.

***

## ३९. जगाचा तोडी या तटका

**जगाचा तोडी या तटका ।**
**तरी तुझा लागे मज चटका ।।१।।**
**संकटे आदळोत पुढती । तरी तुझे नाम रमो चित्ती ।**
**आनंद संतबोध घुटका ।।२।।**
**नको मज मान दंभ चेष्टा । विनवितो तुजला रे श्रेष्ठा ।**
**मारी रे षड्रिपूला फटका ।।३।।**
**सर्वदा घडो तुझे स्मरण । तुझिया देहचि भान ।**
**करी रे द्वंद्वातूनी सुटका ।।४।।**
**तुझेची रूप सदा आवडो । हरि तुझे दार मला उघडो ।**
**करी जो *दासराम* लटका ।।५।।**

(दा.गा.१८०५)

हा अभंग म्हणजे ईश्वर आणि त्याचा एक भक्त यांचा संवाद संगृहीत करणारा आहे. कशावरून? या अभंगाचे दुसरा-तिसरा-चौथा चरण आणि 'हरि तुझे दार मला उघडो' यावरून, भक्त काहीतरी सांगत आहे हे स्पष्ट होते. त्याला देव जे उत्तर देतो, ते पहिल्या चरणात समाविष्ट आहे, हे उघड आहे. अशाप्रकारे या अभंगात देव आणि भक्त यांचा संवाद श्रीदासराममहाराजांनी प्रगट केला आहे.

या अभंगात भक्ताचे म्हणणे असे आहे :-

संतांनी नामस्मरण करण्याचा जो बोध केला आहे, त्या बोधाचा घुटका घेणे मला आवडते. म्हणजे संतांचे म्हणणे मला पटते आणि म्हणून

हे देवा, तुझे नामस्मरण करण्याची मला इच्छा झाली आहे (आवडे संतबोध घुटका । तरी तुझे नाम रमो चित्ती ।।). आणि माझी अशी इच्छा आहे की हे देवा, सर्वदा माझ्या हातून तुझे नामस्मरण घडो (सर्वदा घडो तुझे स्मरण).

पण हे घडण्यात येणाऱ्या अडचणी फार आहेत. हे देवा, तूच त्या तुझ्या कृपेने दूर कराव्यास अशी माझी प्रार्थना आहे.

कोणत्या अडचणी आहेत, देवाने पृच्छा केली. तेव्हा भक्त सांगू लागला :- या जगात बाह्य दृष्ट्या अनेक संकटे येतात, नद्यानाल्यांना पूर, अतिवृष्टी, दुष्काळ, परचक्र, दुष्टांचे त्रास, संसर्गजन्य रोग इत्यादी अनेक संकटे माझ्यावर येत आहेत. हे देवा, ही संकटे जरी आली तरी त्यातून तू मला निभावून ने आणि त्या संकटकाळातसुद्धा तुझे नाम माझ्या मनात राहो.

बाह्य संकटांच्या जोडीने माझ्या अंतःकरणातूनही नामस्मरणाला अडथळा येतो. म्हणजे असे : काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे माझे शत्रु आहेत. कारण ते मला शत्रूप्रमाणेच त्रास देत असतात. ते मला व्यवहारात गुंतवतात आणि तुझे विस्मरण पाडतात. हे देवा, तू त्यांना फटका मार. म्हणजे तू असे झाले तर त्यांचाही परमार्थात उपयोग होऊ शकेल. उदा. देवपूजेची आवड/काम माझे मनात निर्माण होवो. इत्यादी प्रकारे असे काही झाले, तर त्या सहा रिपूंचा नाश करण्यात अडथळा येणार नाही (मारी रे षड्रिपूला फटका).

या जगात मला व्यवहार करावा लागतोच. तसे करताना माझे मन जगातील द्वंद्वात अडकून पडते. मान-अपमान, शत्रु-मित्र, ज्ञान-अज्ञान, सुख-दुःख इत्यादी द्वंद्वे म्हणजे परस्परविरोधी गोष्टी आहेत. त्यांतील एकादी आवडते पण ती मिळतेच असे नाही. मग त्यासाठी प्रयत्न करावा

लागतो. अशाप्रकारे या द्वंद्वातील कशा ना कशात तरी माझे मन अडकून रहाते. परिणाम असा होतो की मन द्वंद्वात गुंतल्याने तुझे स्मरण होत नाही. तेव्हा तू माझी या द्वंद्वातून सुटका कर म्हणजे मी निर्विघ्नपणे तुझे स्मरण करू शकेन (करी रे द्वंद्वातुनी सुटका).

आणखी असे :- माझ्याजवळ अभिमान आहे. या अभिमानाअंती मला मान-सन्मान हवा वाटतो. या मान-सन्मानासाठी मी कधी कधी दांभिकपणाने वागतो. जे जसे नाही तसे ते दाखवितो. या मान, दंभ, इत्यादीत गुंतले की नामस्मरणाचा बोऱ्या उडतो हे मला कळते. म्हणून हे श्रेष्ठ देवा, मी तुला विनंती करतो की तू मजवर कृपा कर आणि मला मान, दंभ इत्यादी त्रास देणार नाहीत असे कर (नको मज मान दंभ चेष्टा । विनवितो तुजला रे श्रेष्ठा).

तसेच देवा, नेहमी असे घडते. मला सतत देहाचे भान असते. देहाचे भरण, पोषण इत्यादीकडे माझे लक्ष असते. देह चांगला रहावा असे वाटते. असे सतत देहाचे भान असल्याने देवाचे भान माझ्या मनात येऊ शकत नाही. देहाकडे लक्ष गेले की देवाकडे दुर्लक्ष होते. म्हणून देवा, माझी तुला विनंती आहे की 'नुरो या देहाचे भान' आणि तसे झाले तर मग मला तुझे भान येईल आणि तुझे स्मरण माझ्या मनात येऊ शकेल.

हे ईश्वरा, आणखी असे आहे :- माझे मन असे बनले आहे की त्याला विश्वातील वस्तु आवडतात. कारण माझी डोळा, कान, नाक इत्यादी ज्ञानेंद्रिये बहिर्मुख, बाह्य जगाचे ज्ञान देणारी आहेत. त्यांच्या मागोमाग माझे मन धावते. आणि जगातील काही वस्तु मला आवडू लागतात आणि काही नावडू लागतात. पण या मनाच्या आवडीनिवडीला काही अर्थ नाही. याची कारणे दोन :- (१) या आवडणाऱ्या अगर नावडणाऱ्या वस्तु सतत टिकणाऱ्या नाहीत. आवडणाऱ्या वस्तु सतत मजजवळ रहातील असे नाही आणि नावडणाऱ्या वस्तु मजपासून दूर

रहातील असेही घडत नाही. तसेच माझ्या मनाची आवडनिवड तरी कुठे टिकून रहाते? माझ्या आवडीनिवडी सतत बदलत असतात. त्यामुळे या आवडीनिवडी व्यर्थ आहेत. याउलट देवा, तू सतत टिकणारा आहेस. म्हणून मला ''तुझेची रूप सदा आवडो'' असे घडूदे. तू सतत आणि माझी आवडही सतत. असे घडले तर मला दुःख होणार नाही.

मला माहीत आहे, हे देवा, की तुझे एक रूप सगुण आहे. ते माझ्या मनात बिंबून राहो आणि तेच मला सतत आवडत राहो. देवा, तू चैतन्यरूप आहेस. आणि तुझे हे चैतन्यरूप माझ्या देहात आहे. देवा, माझी तुला विनंति अशी की माझे देहाकडचे लक्ष उडो आणि देहातील तुझ्या चैतन्यरूपाकडे माझे लक्ष वळो. जडदेहाकडे लक्ष देण्याऐवही माझे लक्ष देहातील तुझ्या चैतन्यरूपाकडे वळो (तुझेची रूप सदा आवडो). तुझ्या चैतन्यरूपाची आवड माझ्या मनात निर्माण होवो.

हे ईश्वरा, माझ्या देहात तू चैतन्यरूपाने आहेस. पण हे चैतन्य सध्या तरी गुप्त, प्रगटपणे न कळणारे, झाकले गेलेले असे आहे. त्याला झाकणारे दार माझ्यासाठी उघडे होवो (हरी तुझे दार मला उघडो). या देहात नऊ द्वारे उघडी आहेत, पण तुझे द्वार - दहावे द्वार - मात्र बंद आहे. माझ्या शरीरात दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, तोंड, गुद आणि शिश्न अशी नऊ द्वारे उघडी आहेत. त्यांतून माझी ये-जा चालू असते. पण त्यामुळे तुझे दर्शन होत नाही. शरीरात नऊ दारांपेक्षा वेगळे असे दहावे दार आहे आणि ते उघडले की देवदर्शन होते असे संतांनी सांगून ठेवले आहे (दशमद्वारीच्या छिद्रा । तेथे भेटी रामचंद्रा ।। ). तेव्हा हे देवा, तुझ्याच कृपेने हे दहावे दार उघडो आणि मला तुझे दर्शन होवो.

भक्ताचे हे सर्व म्हणणे ऐकल्यावर ईश्वराने त्याला पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे :- जगाचा तोडी या तटका । तरी तुझा लागे मज चटका

||. माझ्या भक्ता, माझे नामस्मरण व्हावे, माझे दर्शन व्हावे इत्यादि जे काही तुला वाटते, ते प्रत्यक्षात येण्यास तुला प्रथम एक गोष्ट करावी लागेल. ती म्हणजे तू या जगाची आसक्ती सोडून दे. माझ्या भक्ता, तुला पाच ज्ञानेंद्रिये आणि पाच कर्मेंद्रिये आहेत. ती सर्व इंद्रिये बहिर्मुख म्हणजे बाह्य जगाचे ज्ञान करून देणारी आणि त्याचेकडे धावणारी आहेत. त्यांची ओढ जगातील शब्द, स्पर्श, रूप रस आणि गंध या विषयांकडे आहे. आणि त्या इंद्रियांपाठोपाठ तुझे मन त्या त्या विषयांकडे धावते आणि त्यांतील कशात तरी गुंतून पडते आणि त्या मनात जगाची आसक्ति निर्माण होते. ही आसक्ति अत्यंत घातक आहे. या आसक्तीमुळेच काम, क्रोध इत्यादि विकार प्रबळ होतात आणि मान, दंभ इत्यादि उत्पन्न होतात. आणि मग त्यांत गुंतलेले तुझे मन माझ्याकडे वळत नाही. तेव्हा माझ्याकडे तुझे मन वळावे, माझे रूप तुला आवडावे, माझे नामस्मरण व्हावे इत्यादि जर तुला वाटत असेल, तर सर्वप्रथम तू तुझी जगाविषयीची आवड, आसक्ति दूर कर. त्यासाठी तुला संतांनी सांगितलेला नित्यानित्यवस्तुविवेक करावा लागेल. आणि त्या विवेकाने जर तुझा जगाचा 'तटका', जगाची आवड संपुष्टात आली, तर मला तुझा चटका लागेल (तरी तुझा लागे मज चटका). जगाची आसक्ती तुझ्या मनातून गेली तर मला तुझ्याविषयी आवड निर्माण होईल आणि मग तू जे जे मागत आहेस, ते ते मी तुला देईन.

देवाची/ईश्वराची वरील इच्छा पूर्ण होण्यास भक्ताने लटके व्हावयास हवे. म्हणून दासराममहाराज सांगतात, ''करी जो दासराम लटका''. या जगाची आसक्ती संपली की माणूस लटका पडतो, तो निरिच्छ होतो. आणि अशी निरिच्छ स्थिती जर भक्ताने प्राप्त करून घेतली, तर देवाचे नामस्मरण इत्यादि गोष्टी त्याचे हातून घडतील.

***(२७.१२.२०११)***

***

# ४०. पुण्य आणि पाप

हिंदु लोक नेहमी व्यवहारात पाप आणि पुण्य हे शब्द वापरतात. 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्' असे एक सुभाषित सांगते. संक्षेपाने सांगायचे झाल्यास परोपकारासाठी सत्कर्मे म्हणजे पुण्य आणि दुसऱ्याला पीडा देणे यासारखी दुष्कर्मे म्हणजे पाप असे व्यवहारदृष्ट्या म्हणता येते. परंतु परमार्थात मात्र पाप आणि पुण्य यांच्या संकल्पना वेगळ्या आहेत. त्या पुढील अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितल्या आहेत. :-

**चुकवी जे जन्ममरण । ऐशा कर्मा नाव पुण्य ।।१।।**
**पापकर्म तेची जाण । जेणे चुकेना बंधन ।।२।।**
**द्वैताचे ज्वलन । करी थोर ते साधन ।।३।।**
***दासराम* सांगे खूण । जेणे विकल्पनिरसन ।।४।।**

(दा.गा.४६९)

माणूस पूर्वीच्या बऱ्यावाईट कर्मांचे फळ या स्वरूपात जगात जन्माला आला आहे, असे हिंदू लोक मानतात. मग विद्यमान जीवनात आसक्ति आणि अहंकार बाळगून माणूस जी काही बरी-वाईट कर्मे करतो, त्यांची फळे त्याला भोगावीच लागतात. ज्या कर्मांची फळे चालू जन्मात भोगली जात नाहीत, त्यांची फळे भोगण्यास त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो. कारण फळ भोगल्याशिवाय ते कर्म नष्ट होत नाही 'नाभुक्तं क्षीयते कर्म कल्पकोटिशतैरपि ।'. आणि मग अशाप्रकारे माणसाचे जन्म-मरण, पुर्नजन्म हे चक्र सतत चालू रहाते. जन्ममरण हाच संसार आहे (''पुनरपि जननं पुनरपि मरणं इह संसारे।''). या संसारात गुरफटलेला माणूस त्या

कर्मातून स्वतःची सुटका करून घेऊ शकत नाही. म्हणून तो संसाराच्या म्हणजे जन्म-मरणाच्या बंधनात अडकलेला आहे असे म्हटले जाते. परमार्थदृष्ट्या ज्या कर्मांनी हे संसाराचे बंधन सुटत नाही ते सर्व पापकर्म होय (''पापकर्म तेची जाण । जेणे चुकेना बंधन ।।''). या पापकर्मात व्यवहारिकदृष्ट्या चांगली असणारी तीर्थयात्रा, अन्नदान इत्यादी कर्मेही येऊ शकतात हे लक्षात असावे.

या पापकर्मांच्या विरुद्ध असे पुण्यकर्म परमार्थात आहे. म्हणजे ज्या कर्माच्या योगाने जन्ममरणरूप संसार संपून जातो ते पुण्यकर्म होय (''चुकवी जे जन्ममरण । ऐशा कर्मा नाव पुण्य ।।''). ज्या कर्माने जन्ममरण संपते ते कर्म कोणते हे या अभंगात सांगितलेले नाही. पण अन्य अभंगांत श्रीदासरामांनी आणि इतर संतांनी पारमार्थिक पुण्यकर्म कोणते ते सांगितले आहे :- ''हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ।।'' असे सांगून ईश्वराचे नाम घेणे हे पुण्यकर्म आहे असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. श्रीमामामहाराज केळकरही म्हणतात, ''रामपाठ करी रामपाठ करी । पुण्याची हे थोरी वर्णवेना ।।''. श्रीमामामहाराजांच्या मते रामनाम घेणे हेच थोर पुण्य आहे. या रामनामाने देवाचे दर्शन होते आणि मुक्ती म्हणजे जन्ममरणातून सुटका प्राप्त होते, असे श्रीमामामहाराज सांगतात (''देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य । झालिया दर्शन मुक्ति लाहे ।।'').

हे ईश्वराचे नामस्मरण हे फार मोठे साधन- पुण्याचे साधन- आहे. याचे योगे द्वैत जळून जाते (''द्वैताचे ज्वलन । करी थोर ते साधन ।।''). प्रापंचिक व्यवहारात सर्वत्र मी-तू असे द्वैत आहे. जन्ममरणाअंती हा व्यवहार माणसाचे मागे लागला आहे. जन्ममरणाअंती येणारे हे प्रापंचिक /सांसारिक द्वैत - द्वैताचे बंधन - हे नामरूपी थोर साधनाने संपून जाते.

म्हणजे नामस्मरण या महान साधनाने द्वैतरूप - जन्ममरणरूप - संसार संपून जातो, संसाराचे बंधन तुटते आणि माणसाला मोक्ष प्राप्त होतो.

तेव्हा परमार्थात पाप-पुण्य कशाला म्हणावे अशी जर शंका/ विकल्प येत असेल तर श्रीदासराममहाराज सांगतात की, मी पाप व पुण्य ओळखण्याची जी खूण सांगितली आहे त्यामुळे ही शंका हा विकल्प दूर होईल (''दासराम सांगे खूण । जेणे विकल्पनिरसन ।।'').

संक्षेपाने सांगायचे झाल्यास, जन्ममरणाच्या - संसाराच्या -बंधनात टाकणारे सर्व कर्म हे पाप आहे, तर जन्ममरणाचे - संसाराचे - बंधन तोडून टाकणारे जे नामस्मरणरूप कर्म आहे, ते पुण्य आहे. पाप-पुण्याच्या अशा खुणा परमार्थात आहेत.

*(१२.०१.२०१२)*

***

# ४१. मोक्ष दूर नाही त्याला

जग, जीव आणि जगदीश्वर यांच्या संबंधाशी निगडित निरनिराळ्या तत्त्वज्ञांनी विविध सिद्धांत मांडले आहेत. ते कळल्यावर सामान्य माणसाचा गोंधळ उडतो. त्यातून सुटण्यास संतांनी जे काही सांगितले आहे, तेवढेच घ्यावे आणि त्यांचेवर विश्वास ठेवून त्यांनी जे करण्यास सांगितले आहे तेवढेच परमार्थ करू इच्छिणाऱ्या माणसाने करावे, असे सांगितले जाते. कारण संत स्वतःच्या अनुभवावरून बोलत असतात.

साक्षात्कारी संतांच्या मते जग म्हणजे ईश्वर आहे. ईश्वरच जगरूपाने नटला आहे. ''हरि हा आपणची जग झाला ।'' असे एका संतांनी म्हटले आहे. साहजिकच जगाचा एक भाग असणारा जीव हा ईश्वर आहे हे उघड आहे. हीच गोष्ट आद्य शंकराचार्यांनी ''जीवो ब्रह्मैव'' या शब्दांत मांडली आहे. पण संतांचा हा सिद्धांत वाच्यार्थाने घेता येत नाही. कारण जग हेच जर ईश्वर असेल तर मग ईश्वरदर्शन वेगळे कोठे रहाते ? तसेच जीवच जर ईश्वर असेल तर त्याने पुनः साधन करण्याची जरुरी काय‘? या प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यावयास हवीत. जगाच्या बुडाशी ईश्वर आहे आणि देहाच्या उपाधीत सापडलेला ईश्वर म्हणजे जीव आहे. या देहाच्या उपाधीमुळे जीव हा देहालाच मी असे मानू लागतो. कारण ''मी म्हणजे ईश्वर'' हे तो विसरला आहे. हे त्याचे विस्मरण दूर होऊन त्याला आपले मूळ ईश्वररूप कळण्यास साधन करणे आवश्यक आहे आणि संतांनी सांगितलेले साधन केले तरच जीव ईश्वररूप होऊन जातो. ईश्वररूप होणे हीच जीवाची मुक्ति

आहे. कारण ईश्वर हा नित्यमुक्त आहे. हा भागच वेगळ्या शब्दात श्रीदासराममहाराज केळकर यांनी आपल्या एक अभंगात सांगितला आहे.

**अंतरीचा काम गेला । मोक्ष दूर नाही त्याला ।।१।।**
**संती मांडिले सिद्धांत । केली जगावरी मात ।।२।।**
**जगा दाविला उपाय । कैसा भेटे देवराय ।।३।।**
***दासराम* हात जोडे । गुरुपायी मुक्ति जोडे ।।४।।**

(दा.गा.२०९)

अज्ञानामुळे जीव हा देह या उपाधीलाच ''मी'' असे मानीत आहे. देहाला दहा इंद्रिये आहेत. त्यांचा संबंध जगातील शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या पाच विषयांशी येतो. त्या विषयांचा भोग घ्यावा असे जीवाला वाटते. बाह्य वस्तूविषयी आकर्षण/प्रेम/इच्छा जीवाच्या ठिकाणी निर्माण होते. ही इच्छा म्हणजेच ''काम'' होय. हा काम मनात असतो. हा काम पूर्ण झाला नाही तर क्रोध येतो. नंतर काम आणि क्रोध या विकारांमुळेच लोभ, मोह, मद, मत्सर हे निर्माण होतात. या विकारांअंती माणूस सन्मार्ग सोडतो. या विकारांमुळे माणसाचे जीवन अस्थिर, चंचळ आणि सुखदुःखमय होते. परंतु जीव जर या विकारातून सुटला - मुख्य म्हणजे काम या विकारातून सुटला- तर तो मुक्त होईल. म्हणून श्रीदासराममहाराज म्हणतात, ''अंतरीचा काम गेला । मोक्ष दूर नाही त्याला ।।''. या सहा विकारांतून सुटलेला पुरुष मोक्ष मिळविण्यास पात्र ठरतो, त्याला मोक्ष लांब रहात नाही. हा मोक्ष म्हणजे तरी काय? मोक्ष म्हणजे विकारांच्या तडाक्यातून सुटून ईश्वररूप होणे. ईश्वराला कोणतेच बंधन नाही, तो नित्यमुक्त आहे, म्हणून ईश्वररूप झालेला जीव संसारातून मुक्त होतो.

जीव हा ईश्वररूप आहे असा सिद्धांत संतांनी मांडलेला आहे. तसे करून त्यांनी जगावर मात केली आहे (''संती मांडिले सिद्धांत । केली जगावरी मात ।।''). म्हणजे देह म्हणजे मी, इंद्रिये म्हणजे मी, मन म्हणजे मी अशा ''मी'' विषयी लोकांच्या ज्या काही चुकीच्या कल्पना होत्या, त्यांना संतांनी धक्का दिला आहे. त्यांचे मते जीव हा मूलतः ईश्वरच आहे.

जीव जरी मूलतः ईश्वर आहे तरी सध्या त्याला ती गोष्ट ज्ञात नाही. म्हणून त्याचे अज्ञान दूर होऊन, तो ईश्वररूप कसा होईल त्याचा उपायही संतांनी सांगून ठेवला आहे (''जगा दाविला उपाय। कैसा भेटे दवराय ।।''). संतप्रणीत उपाय आचरणात आणला असता देवाची/ईश्वराची भेट/दर्शन होते आणि ज्याला ईश्वराचे दर्शन होते तो ईश्वररूपच होतो, असा संतांचा सिद्धांत आहे. परमार्थाचा उपदेश करणारा संत तो सद्गुरूच होय. त्याने जीवाला ईश्वररूप होण्याचा उपाय सांगितला. सद्गुरूच्या कृपेने ईश्वरदर्शन होते, मोक्ष मिळतो असा संतांचा आणखी एक सिद्धांत आहे. म्हणून श्रीदासराममहाराज येथे सांगतात, ''गुरुपायी मुक्ती जोडे ।''. आणि गुरु हा असा महान असल्याने मी त्याला हात जोडून वंदन करतो, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

ईश्वररूप होण्याचा संतांनी सांगितलेला उपाय हा या अभंगात श्रीदासराममहाराजांनी निर्दिष्ट केलेला नाही. पण त्यांच्या अन्य अभंगांवरून हा उपाय आपण जाणून घेऊ शकतो. हा उपाय असा आहे :- मानवी देहातील श्वासोच्छ्वासामध्ये नामाचा घोष होत आहे. तेथे लक्ष ठेवावयाचे आहे (''नामघोष जेथे देही । लक्ष्य ठेवी तेथे ।।''). मग प्राण व मन यांचा एक लय झाला असता पवनसिद्धी प्राप्त होते (''प्राणाचा मनाचा एक लय होता । तत्त्वे तत्त्व सारिता पवनसिद्धी ।।''). ही पवनसिद्धी प्राप्त झाली

की आत्माराम प्रगट होतो (‘‘पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम ।’’). हा आत्माराम म्हणजेच इश्वर आहे. श्वासोच्छ्वासात ‘‘सोहं’’ रूपाने नामाचा ध्वनी उमटत आहे. त्यामध्येच राम आहे. म्हणून सोहं साधनाच्या उपायाने आत्मा/ईश्वर दिसतो आणि जीवाला ईश्वर दिसताच तो ईश्वररूप होऊन जातो आणि जीवाला ईश्वररूप प्राप्त झाले की त्याला त्याचे मूळ रूप प्राप्त होते आणि तो संसाराच्या बंधनातून सुटून मुक्त होतो.

*(०२.१२.२०११)*

***

## ४२. एक सद्गुरुराव आळवावा

या जगातील दुःखाच्या माऱ्यातून सुटून नित्य असणारे मोक्षाचे सुख मिळविणे, हे मानवी जीवनाचे ध्येय आहे, असे भारतातील साधुसंतांचे सांगणे आहे. मोक्षसुख म्हणजे जीवाला आनंदरूप आत्म्याची प्राप्ती होय. ती कशी करून घ्यावी हे संतांनी सांगितले आहे. अशा संतांपैकी ज्याचे मार्गदर्शन आपणास मिळते तो आपला सद्गुरु. सद्गुरु तरी कोण? जो आत्मरूप/ब्रह्मरूप होऊन जीवन्मुक्त झाला आहे तो सद्गुरु. हा सद्गुरूच मुमुक्षूंना परमार्थाचे मार्गदर्शन करू शकतो. म्हणून परमार्थात सद्गुरु हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मुमुक्षूंच्या परमार्थाचा प्रारंभ आणि परमार्थातील अंतिम स्वरूपप्राप्ति ही सद्गुरुकृपेशिवाय होतच नाही, असे संतांचे म्हणणे आहे. अशाप्रकारच्या सद्गुरूंचे महत्त्व सांगणारा श्रीदासराममहाराज केळकर यांचा एक अभंग आहे. त्यात त्यांनी 'दास' अशी मुद्रिका वापरली आहे. हा अभंग असा :-

**सद्गुरुवाचोनि उमजेना वाट ।**
**उगीच बोभाट का करावा ।।१।।**
**सद्गुरुवाचोनि कळेना साधन ।**
**उगीच का शीण करूनि घ्यावा।।२।।**
**सद्गुरुवाचोनि नोहे ते दर्शन ।**
**का करावी जाण खटपट ।।३।।**
***दास* म्हणे यासी एकचि उपाय ।**
**एक सद्गुरुराव आळवावा ।।४।।**

(दा.गा.७)

या जगात आपणास कुठेतरी जावयाचे असल्यास, त्या ठिकाणाकडे जाण्याची वाट आपण ती जाणणाऱ्या माणसाकडून जाणून घेतो. परमार्थात आत्म्याच्या/स्वरूपाच्या प्राप्तीसाठी त्याकडे जाण्याचा मार्ग आपणास कळावयास हवा. ही वाट/मार्ग फक्त सद्गुरूला माहीत असल्याने, आत्म्याची वाट गुरूशिवाय कळत नाही. उगीच गाजावाजा, बोभाटा करण्यात काय अर्थ आहे ? म्हणूनच ''गुरुबिन कौन बताये वाट'' असे कबीर साहेबांनी सांगून ठेवले आहे. तेव्हा सद्गुरूशिवाय मोक्षाची वाट, आत्म्याकडे जाण्याचा मार्ग कळत नाही, हे लक्षात घ्यावे.

जगातल्या स्थानांकडे जाण्याच्या वाटा या जगात आहेत. पण आत्म्याकडे जाण्याची वाट या बाह्य जगात नाही. जगात ही वाट शोधण्याचा प्रयत्न करून नुसता शीणच पदरात पडतो. चिमडमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''आकाशातूनि वाट रे ।''. हे आकाश म्हणजे जागतील भूताकाश नाही हे लक्षात घ्यावयास हवे. हे आकाश प्रत्येकाच्या देहात आहे. मानवी शरीरात ''भ्रूमध्यापासून वरचा भाग'' म्हणजे आकाश आहे. ही आकाशातील वाट फक्त सद्गुरूच सांगू शकतात.

आत्म्याकडे जाण्याची वाट कळली म्हणजे झाले असे नाही. बाहेरच्या जगातील वाटेवर मार्गक्रमण करण्यास घोडा, गाडी, सायकल, स्कूटर, मोटार, विमान इत्यादी कोणते तरी वाहत लागते. तसे आत्म्याकडे जाण्याच्या वाटेवर चालण्यास जे साधन आहे ते सद्गुरूच सांगतात. देहातील वाटेवरून जाण्याचे साधन ''श्वासोच्छ्वास'' आहे. हेही सद्गुरूच सांगतात आणि ही साधनाची हातोटी कशी वापरावयाची हेही सद्गुरूच सांगतात. म्हणून श्रीदासराममहाजारांनी दुसऱ्या एका अभंगात म्हटले आहे :-

अनुपम हातोटी गुरुविना कळेना । जरी ज्ञाना झाले साधनाच्या ।।

म्हणजे नुसते साधन कळून उपयोगी नाही तर ते साधन कसे वापरावयाचे त्याची हातोटीही गुरूकडूनच जाणून घ्यावी लागते. मुद्दा हा की आकाशतल्या वाटेवर कोणते साधन व ते कसे वापरावयाचे हे सद्गुरूकडूनच जाणून घ्यावयास हवे. तसे न केल्यास उगीचच शीण होईल, पदरात मात्र काहीच पडणार नाही.

आता गुरुकथित साधन आपणांस जमले आणि ते पूर्णत्वास गेले की आत्म्याचे दर्शन होते. आत्म्याचे दर्शन होणे म्हणजेच आत्मरूप होणे आहे. व्यवहारात आपणास जे दिसते ते आपण होत नाही. उदा. उंट बघितला तर आपण उंट होत नाही, पण परमार्थात मात्र आपण देव पाहिला तर आपण देव होऊन जातो. आत्मा पाहिला तर आपण आत्माच होऊन जातो. आत्मदर्शन होण्यास गुरुप्रणीत साधनाच्या आचाराविना दुसरा कुठलाही प्रयत्न, दुसरी कुठलीही खटपट उपयोगी पडत नाही. म्हणून श्रीदासराममहाराजांनी दुसऱ्या एका अभंगात सांगितले आहे, आत्मस्वरूपाचे दर्शन, आत्मस्वरूपाचा ''अनुभव येई घडता साधन ।''.

इतके सर्व सांगून झाल्यावर श्रीदासराममहाराज अभंगाच्या शेवटच्या चरणात सांगतात :- परमार्थातील ध्येय साध्य होण्यास एकच उपाय आहे तो म्हणजे गुरूची प्रसन्नता. त्यासाठी सद्गुरूची आळवण करून, त्याने सांगितलेले साधन करून, त्याला प्रसन्न करून घ्यावयास हवे. सद्गुरु प्रसन्न झाला, त्याची कृपा झाली की साधक आत्मरूप होऊन मुक्त होतो आणि तो नरजन्माचे सार्थक साधतो.

***

# ४३. परमार्थ पूर्ण तया ठाया

परमार्थ शब्दाला दोन अर्थ आहेत. त्यातील एक मुख्य अर्थ आहे आणि दुसरा गौण अर्थ आहे. परमार्थ म्हणजे शब्दशः श्रेष्ठ अर्थ, सर्वश्रेष्ठ वस्तु/पदार्थ. संतांच्या मते सर्वश्रेष्ठ पदार्थ हा परमेश्वर/ब्रह्म/आत्मा आहे. हा परमार्थ शब्दाचा मुख्य अर्थ आहे. आता या जगात वावरणारा जीव हा परमेश्वर/ब्रह्म/परमात्मा आहे, ते त्याचे मूळ स्वरूप आहे. ते त्याला सद्यःस्थितीत अवगत नाही, ते प्राप्त करून घेणे हे त्याच्या जीवनाचे साध्य आहे आणि हे साध्य साधण्यासाठी त्याला जे जे करावे लागेल ते ते परमार्थ या शब्दात मोडते. हा परमार्थ शब्दाचा गौण अर्थ आहे. हे दोन्हीही परमार्थ शब्दाचे अर्थ असणारा श्रीदासराममहाराजांचा पुढील अभंग आहे :-

**प्राणगती वारे वहाते बाहेरी ।**
**आत जाय वैखरी अपान तो ।।१।।**
**खूण तो जाणेल गुरुपुत्र केवळ ।**
**संशयकल्लोळ येरा मनी ।।२।।**
**प्राणापानामाजी मनाचे मीलन ।**
**परमार्थ पूर्ण तया ठाया ।।३।।**
***दासराम* झाला अंतरी शरण ।**
**लाधले चरण सद्गुरूचे ।।४।।**

(दा.गा.१७०६)

गौण अर्थाने परमार्थ करण्यास गुरु/सद्गुरु आवश्यक आहे, असे संतांचे म्हणणे आहे. हा सद्गुरु आत्मसाक्षात्कारी असावयास हवा. तर तो परमार्थ करू इच्छिणाऱ्या पुरुषाला योग्य ते मार्गदर्शन करू शकेल. यादृष्टीने श्रीदासराममहाराज सांगतात, ''मला सद्गुरु भेटले आणि मी त्यांना मनाने शरण गेलो'' (''दासराम झाला अंतरी शरण । लाधले चरण सद्गुरूचे ।।''). मग दयाळू सद्गुरूंनी कृपावंत होऊन परमार्थाकडे / परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग दाखविला. हा मार्ग कोणता हे फक्त गुरुपुत्रांनाच माहीत असते. येथे गुरुपुत्र म्हणजे गुरूचा औरस पुत्र असा अर्थ नसून गुरूचा शिष्य असा अर्थ आहे. अशा गुरूच्या शिष्यांना परमार्थमार्गाची खूण पटते. ज्यांनी गुरु केलेला नाही त्यांना ती कळत नाही. परमार्थाबद्दल त्यांचे मनात नुसता संशयकल्लोळच असतो (''खूण तो जाणे गुरुपुत्र केवळ । संशयकल्लोळ येरा मनी ।।'').

माणसाचे जीवन शरीरातील प्राणशक्तीवर चालते. ही प्राणशक्ती पाच प्रकारात विभक्त होऊन शरीराची देहधारणा करीत असते. हे पाच प्रकार म्हणजे प्राण, अपान, उदान, व्यान आणि समान असे आहेत. परमार्थात मात्र प्राण आणि अपान या शब्दांना थोडे वेगळे अर्थ आहेत. नाकातून श्वासोच्छ्वास होत असतो. नाकातून श्वास आत जातो आणि मग तो बाहेर पडतो. म्हणजे श्वास हा गतिरूप आहे. त्यातील जो श्वास बाहेर जातो त्याला प्राण असे म्हणतात आणि जो श्वास नाद (वैखरी) करीत नाकात शिरतो त्याला अपान म्हणतात (''प्राणगती वारे वहाते बाहेरी । आत जाय वैखरी अपान तो ।।''). (काहींच्या मते आत जाणारा श्वास म्हणजे प्राण आणि बाहेर जाणारा श्वास म्हणजे अपान होय.) या प्राण व अपान यांच्या सहाय्यानेच परमार्थाची म्हणजे परमेश्वराची प्राप्ति होणार आहे.

श्वास आत घेताना ‘सो’ सदृश ध्वनी होतो आणि श्वास बाहेर टाकताना ‘हं’ सदृश ध्वनी होतो. या सोहं ध्वनीकडे दृष्टी, कान आणि मन हे एकवटून लागले पाहिजेत. मुख्य म्हणजे या प्राणापानगतीत मन हे एकाग्र व्हावयास हवे. असे एकाग्र झालेले मन त्या ध्वनीत विरघळून जाते (‘‘प्राणापानामाजी मनाचे मीलन।’’). असे झाले की मनाचे संकल्पविकल्प गळून पडतात. संकल्पविकल्प हेच मनाचे स्वरूप असल्याने, त्या ध्वनिश्रवणात मन हे मन म्हणून उरत नाही. ते ‘‘अमन’’ अथवा ‘‘उन्मन’’ होते आणि या मनाच्या उन्मन अवस्थेला ‘‘उन्मनी’’ अवस्था असे म्हणतात. आणि या उन्मनी अवस्थेत परमात्म्याचा साक्षात्कार होतो. परमात्म्याचा साक्षात्कार होणे म्हणजेच जीवाने परमात्मरूप होऊन जाणे असा अर्थ आहे. आणि तेच जीवनाचे सार्थक आहे, साध्य आहे आणि ते जीवाला प्राप्त झाले की त्याचा परमार्थ तेथेच पूर्ण होतो (‘‘परमार्थ पूर्ण तया ठाया ।’’).

अशाप्रकारे प्राणापानाच्या गतीत जर मनाचे उन्मन झाले तर परमेश्वराचा साक्षात्कार होऊन, तेथेच जीवाचा परमार्थ पूर्ण होतो, असा या अभंगाचा तात्पर्यार्थ आहे.

*(२१.१२.२०११)*

***

## ४४. नादमयी जहाल्या शिव कळतसे

श्रीदासराममहाराज केळकर या संतांचा एक अभंग पुढीलप्रमाणे आहे. त्यामध्ये ते स्वानुभवाच्या आधारे साधकाशी संवाद साधून त्याला शिवस्वरूप होण्याचा उपाय सांगत आहेत :-

**अंतरात नाद कसा घुमतसे पहा ।**
**नादमयी जहाल्या शिव कळतसे अहा ।।१।।**
**शिवस्वरूप गाठताची भेद तुटे हा ।**
**भेद जाता अभेदची, नुरती सहा ।।२।।**
**सहा तरी मावळले उरती ना दहा ।**
**दहा नाश पावताची सुखरूप हा ।।३।।**
**ऐसी ग्वाही देती पाही चार आणि सहा ।**
**गुरुकृपे अहं जळुनी उरतो *राम* हा ।।४।।**

(दा.गा.२७०)

या अभंगाचा सरळ अर्थ असा :- अंतरात नाद कसा घुमत आहे, ते पहा. आश्चर्य असे की (अहा) त्या नादाशी एकरूप/नादमय झाल्यावर शिव कळून येतो (१). अशाप्रकारे, शिव कळल्यावर आणि त्याच्याशी एकरूप झाल्यावर भेद संपतो आणि अभेद उरतो. आणि सहाही संपून जातात (२). सहा मावळताच दहासुद्धा उरत नाहीत दहा संपले की मन (जीव) सुखरूप होते (३). गुरुकृपेने अहंकार नष्ट झाला की फक्त राम / आत्माराम उरतो. (या माझ्या सर्व सांगण्याला) चार आणि सहा हे ग्वाही देतात (४).

या अभंगाचे स्वारस्य कळण्यास संतांचे अनेक सिद्धांत आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजेत ते असे :- आत्मा/परमेश्वर हे एकच अंतिम तत्त्व आहे. ते सुखरूप आहे. या आत्म्यापासून सूक्ष्म व स्थूल जग निर्माण होते वा भासते. या जगातील जड देहात आत्मरूप हे उपाधीत सापडते. त्याला जीव म्हणतात. उपाधिअंती हा जीव स्वतःला देह, इंद्रिये इत्यादी मानू लागतो, पण ते बरोबर नाही. जीव हा मूलतः शिव/आत्माराम आहे. त्याचा त्याला विसर पडला आहे. साधनाच्या प्रक्रियेने तो शिवरूप/ आत्मरूप झाला की सर्व भेद संपून जातो, जीव आत्मरूप होऊन सुखरूप होतो.

देहातील सहस्रदळ स्थानामध्ये आत्माराम, जीव आणि शिव आहेत. तेथे जीव शिवाकडे पाठ करून आहे. या सहस्रदळ स्थानातून प्राणगती भ्रूमध्यापर्यंत येत असते. शरीरातील श्वासोच्छ्वासात सोहं नाद घुमत आहे. त्याच्यावर दृष्टी, श्रवण आणि मन हे एकवटून लागले की श्वासोच्छ्वासातील चैतन्यनादाची गति ऊर्ध्वमुख होऊन भ्रूमध्यात येते. तेथे ती प्राणगतीशी एकरूप होऊन पुनः सहस्रदळ स्थानात शिरते. तेथे ती जीवाला धक्का देते. त्या धक्क्याने जीव शिवाकडे वळतो. तसे झाल्यावर जीवाला शिव दिसतो आणि शिवाला पाहताच जीव शिवरूप होऊन जातो. मग ते दोघेही आत्मस्वरूप होऊन जातात.

असे घडले की जीव, शिव, आत्माराम असा जो भेद मानला जात होता, तो नष्ट होऊन जातो. भेद संपला की फक्त अभेद उरतो. एकच आत्मा अभिन्न रूपाने सर्वत्र आहे हे कळते.

परमार्थातला हा अभेद प्राप्त झाला की प्रापंचिक जीवनात त्रास देणारे सहा म्हणजे सहा रिपु - काम,क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर - हे संपतात. ते संपतात याचा अर्थ ते नष्ट होतात असा नाही. एक तर ते ईश्वराशी संबंधित होतात अथवा आपले लौकिक कार्य करण्यास असमर्थ

होतात. म्हणजेच ते असून नसल्यासारखे, नगण्य होतात.

या सहा विकारांअंती दहा म्हणजे दहा इंद्रिये कार्यप्रवण असतात. त्यांच्या प्रभावाखाली ही दहा इंद्रिये बाह्य विषयांकडे धावत असतात. सहा विकार नगण्य झाले की ही दहा इंद्रिये नष्ट होतात. म्हणजे त्यांचे बाहेर धावण्याचे कार्य थांबते. म्हणून ती नाही म्हणण्याइतकी नगण्य होतात. डोळा, कान, नाक, जीभ आणि त्वचा अशी पाच ज्ञानेंद्रिये आणि हात, पाय, त्वचा, गुद आणि जननेंद्रिय अशी पाच कर्मेंद्रिये मिळून दहा इंद्रिये आहेत.

अशा प्रकारे दहा इंद्रिये आणि सहा विकार हे नगण्य झाल्यावर, बाह्य विषयांमुळे होणारे सुखदुःखाचे आघात जाणवेनासे होतात (कळो नये सुखदुःख । तुकाराममहाराज). मन हे अखंड सुखरूप होते.

हे सर्व होण्यास गुरु करावयास हवा. गुरूने सांगितलेले साधन केले की गुरुकृपा होते आणि गुरुकृपेने अहंकार नष्ट होतो. माणूस अहंकारानेच देह इत्यादींना मी म्हणत असतो. हा अहंकार नष्ट झाला की जीव हा शिवस्वरूप होऊन आत्मरूप होतो. मग तेथे फक्त आत्माराम उरतो. भेद नष्ट होऊन अभेद स्वरूपात एक आत्माराम रहातो.

नंतर श्रीदासराममहाराज म्हणतात :- हे जे मी सांगितले आहे त्याला आधार आहे. माझ्या म्हणण्याला चार म्हणजे चार वेद आणि सहा म्हणजे सहा शास्त्रे यांचा आधार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे चार वेद आणि सहा शास्त्रे ही हरि/राम/आत्मा याविषयीच सांगत असतात.

अशा प्रकारे शास्त्रप्रचीति, गुरुप्रचीति आणि आत्मप्रचीति येऊन जीव हा अखंड सुखरूप होतो.

***(०७.१२.२०११)***

***

# ४५. अतर्क्य तो जाण वेदालागी

आपण ज्या जगात वावरतो, ते काय आहे? ते कधीतरी उत्पन्न झाले काय? असले काही प्रश्न विचारवंतांना पडतात. त्यांची उत्तरे शोधण्याचे प्रयत्न फार प्राचीन काळापासून झाले. चार्वाक इत्यादि जडवादी लोक म्हणतात की पृथ्वी, पाणी, तेज आणि वायु या चार महाभूतांच्या मिश्रणाने हे जग निर्माण झाले. अणुपरमाणूंच्या संयोगाने हे जग बनले असे काहींचे मत आहे. आणि जडापासूनच काही विशिष्ट परिस्थितीत चैतन्य निर्माण झाले असे काहींचे मत आहे. जडापासून जग आणि चैतन्य निर्माण झाले हे मत भारतातील साधुसंतांना मान्य नाही. त्यांच्यामते चेतन अशा ईश्वराने हे जग निर्माण केले. हाच अभिप्राय सांगलीतील संत श्रीदासराममहाराज यांच्या एका अभंगात व्यक्त झाला आहे. तो अभंग असा :-

**रामाचिये सत्ते वागे सूर्य चंद्र ।**
**भीत असे इंद्र महादेव ।।१।।**
**ऐसी ज्याची आहे सर्वावरी सत्ता ।**
**तयाचिया भक्ता काय उणे ।।२।।**
**काहीच न चले त्याचे सत्तेवीण ।**
**पहाताची जाण कळो येई ।।३।।**
***गोविंतनय* सांगे महिमान ।**
**अतर्क्य तो जाण वेदालागी ।।४।।**

(दा.गा.५१४)

भारतात देवांना काही तोटा नाही. पण ते देव गौण आहेत; ते म्हणजे मुख्य परमेश्वर नव्हेत. परमेश्वर हा सर्वश्रेष्ठ देव आहे. रामदासस्वामींच्या शब्दात सांगायचे झाल्यास तो तो ''थोरला देव'' आहे. त्यानेच ब्रह्मदेव, विष्णु, रुद्र, चंद्र, सूर्य, इत्यादी देव निर्माण केले आणि त्यांना त्यांची कर्तव्ये वाटून दिली. या परमेश्वराला या अभंगात श्रीदासराममहाराजांनी ''राम'' हे नाव दिले आहे. या रामाच्या सत्तेने आणि भीतीने अन्य गौण देव आपापली कामे करीत असतात. एका उपनिषदाने सांगितले आहे की या परमेश्वराच्या भीतीने /धाकाने वायु वहातो, सूर्य उगवतो, अग्नि, इंद्र, मृत्यू इत्यादी आपले कार्य करीत राहतात (भीषास्मात् पवते वायुः भीषोदेति सूर्यः । भीषास्मादाग्निश्चेंद्रश्च मृत्युर्धावति पंचमः).

या अभंगात दासराममहाराज सांगतात की रामाच्या/परमेश्वराच्या सत्तेने /भीतीने/धाकाने सूर्य, चंद्र, इंद्र, महादेव इत्यादी देव आपापले कर्तव्य कर्म न चुकता करीत असतात. इतकेच नव्हे तर रामाने हे जे जग निर्माण केले आहे त्या जगातसुद्धा त्याच्या सत्तेशिवाय काही घडत नाही, असे नीट पाहिल्यास कळून येते. या जगात अचानक भूकंप होतात, ज्वालामुखीचे उद्रेक होतात, अनेक अपघात घडतात, अनेक जण मरतात पण एखादे लहान मूल त्यातून वाचते. तसेच आपण काहीतरी करायचे ठरवितो पण ते होत नाही. अशा घटनांचा नीट विचार करून पाहिले तर असे दिसते की सर्व घटनांच्यामागे ईश्वरी सत्ता आहे. माणूस ''मी करतो मी करतो'' असे म्हणतो, पण त्याला ईश्वरी इच्छा अनुकूल असेल तरच ते घडते नाही तर नाही. म्हणूनच ''देव करी सर्व काही । मानव न करी काही।।'' असे संतसज्जन सांगतात. परमेश्वर हाच सर्व कर्ता आहे. मानव फक्त निमित्तमात्र आहे. म्हणून कृष्ण गीतेत अर्जुनाला सांगतो, ''निमित्तमात्रं भव सव्यसचिन् ।'' (हे अर्जुना, तू फक्त निमित्त हो).

हा राम सर्वसत्ताधीश आहे. त्याचा मोठेपणा वर्णन करणे हे माणसाच्या शक्तीबाहेरचे काम आहे. वेद हे सर्वज्ञ आहेत असे म्हणतात, ते माणसाला ज्ञान देतात, पण त्यांनाही ईश्वराचा महिमा कळत नाही. राम हा इंद्रियातीत, अंतःकरणातीत असल्याने, त्याचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. तर्क करूनही त्याचे संपूर्ण स्वरूप कळू शकत नाही. असे असल्यानेच ''न इति न इति'' (ईश्वर असा नाही असा नाही). अशी नकारात्मक भाषा वेदाला वापरावी लागली.

अशा या परमेश्वराची/रामाची भक्ती करून जीवाने तद्रूप/रामरूप व्हावयाचे आहे, तेच त्याचे ध्येय /साध्य आहे. वर्तमानकाळी जीव हा शरीर इत्यादींच्या उपाधीत सापडलेला आहे. पण तो ईश्वराचा अंश आहे. गीता सांगते की ''ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।''. या जीवाने रामाची भक्ती करावयास हवी. भक्ती म्हणजे काय ? भक्ती म्हणजे ईश्वरावरील निःस्वार्थ, निरपेक्ष एकनिष्ठ प्रेम होय. या भक्तीने देव संतुष्ट होतो आणि तो आपल्या भक्ताचे कल्याण करतो. येथे कल्याण शब्दाचा अर्थ नीट लक्षात घ्यावयास हवा. ईश्वराच्या या जगात भक्ताला उणे पडत नाही; पण नेहमीच तसे दिसेल असे नाही. ईश्वराचा भक्त हा अठरा विश्वे दारिद्र्यात असू शकतो; त्याला पुष्कळ ''उणे'' आहे. तेव्हा ईश्वरामुळे भक्ताला जगात उणे पडत नाही असे नेहमीच दिसून येत नाही. तेव्हा ईश्वर भक्ताचे उणे दूर करतो याचा अर्थ त्याला पारमार्थिक दृष्ट्या उणे पडू देत नाही. त्याला आपल्यात सामावून घेऊन त्याला स्वतःप्रमाणे पूर्ण करून टाकतो. मग भक्ताला काय उणे पडणार?

''काय उणे'' या शब्दांचा आणि एक अर्थ होऊ शकतो. तो असा - भक्ताचे ''काम'' म्हणजे शरीर हे ''उणे'' होते. म्हणजे देहबुद्धि नाहीशी

होते. ''मी म्हणजे देह'' या भूमिकेला देहबुद्धी म्हणतात. भक्ताला कळून येते की ''मी म्हणजे देह नव्हे''. त्यामुळे त्याचे शरीरावरील ममत्व उडून जाते. याचाच अर्थ त्याचे ''काय उणे'' होते. अशी देहबुद्धी नष्ट झाल्याशिवाय जीवाला परमेश्वराची प्राप्ति होत नाही, असे साधुसंत सांगतात.

अशाप्रकारे परमेश्वराचे/थोरल्या देवाचे/रामाचे महिमान या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितलेले आहे.

***

# ४६. नामी सर्व सुख आले

जीवनात माणसाचे ध्येय काय असेल हे नक्की सांगता येत नाही. कुणाला द्रव्यप्राप्ती हे ध्येय वाटते, कुणाला कीर्ति मिळविण्याची आकांक्षा असते. काहींना स्त्रीप्राप्तीची ओढ असते, तर कुणाला आपल्या जीवनात सततचे सुख मिळावे अशी इच्छा असते. ज्यांना सततचे सुख हवे आहे त्यांच्यासाठी अध्यात्म/परमार्थ आहे, असे संतसज्जन सांगतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, परमार्थ केल्यास अखंड सुखात माणूस रममाण होतो.

या जगात दुःखानंतर सुख आणि सुखानंतर दुःख असे सुखदुःखाचे रहाटगाडगे चालू असते. ते बंद होऊन कायमचे सुख हवे असल्यास, जेथे कायमचे सुख मिळते तेथे जावयास हवे. साधुसंत सांगतात की, सततचे/ नित्य सुख हे फक्त ब्रह्म किंवा परमेश्वर यांच्याजवळ आहे, ते सच्चिदानंदस्वरूपी आहे. साहजिकच ब्रह्मसाक्षात्कार होऊन परमेश्वराशी एकरूपता झाली की सुखाला तोटा नाही. ते सुख नित्य असल्यामुळे ते कधी संपणार नाही.

ब्रह्माच्या प्राप्तीसाठी किंवा परमेश्वरप्राप्तीसाठी या जगात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग इत्यादि अनेक मार्ग सांगितले गेले आहेत. अर्वाचीन साधु-सज्जनांच्या मते, त्या सर्व मार्गांत/ उपायांत नामस्मरणयोग हा सोपा आहे आणि तो सर्वांना आचरता येण्यासारखा आहे. याचे कारण असे की, नाम हेच ब्रह्म किंवा ईश्वर आहे आणि नामस्मरणाने सर्व काही साध्य होते, असा साधुसंतांचा दावा आहे. नामाने काय काय घडते, त्याची एक संक्षिप्त यादी दासराममहाराज केळकर या सांगलीतील संतांनी पुढील अभंगात दिली आहे :-

**इंद्रिया लगाम । ते हे एक रामनाम ।।१।।**
**मनो-निग्रहण । साधे, ऐसे महिमान ।।२।।**
**सहा जळुनी जाती । येई अद्वय प्रचीती ।।३।।**
**होतो जगाचे वेगळा । वंद्य होतो कळिकाळा ।।४।।**
**गतीरूप नाम । संधिकाळी घेई सम ।।५।।**
***दासराम* बोले । नामी सर्व सुख आले ।।६।।**

(दा.गा.१८६)

परमार्थातला कोणताही मार्ग स्वीकारण्याचे ठरविले तरी इंद्रियांचा संयम हा अत्यावश्यक आहे. नामयोगाच्या बाबतीत तर ''इंद्रियांसी नेम नाही। मुखी राम म्हणुनी काई ।।'' असा प्रकार आहे. म्हणजे मुखाने नाम उच्चारत असताना जर इंद्रिये जगातील विषयांकडे/पदार्थांकडे धावत असतील, तर त्या नामाच्या उच्चारणाचा काहीही उपयोग होत नाही. इंद्रियांचा निग्रह करणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु योग्य त्या पद्धतीने नाम घेतले तर इंद्रियांचा संयम साध्य होतो. रामनामामुळे इंद्रियांना लगाम लागतो आणि ती बाह्य विषयांपासून परावृत्त होतात.

नामस्मरण करताना मनाचे सहकार्य आवश्यक आहे. नामोच्चारण चालू असताना मन जर दहा दिशांना धावत असेल, तर त्या नामोच्चारणाचा काही उपयोग होत नाही. आता, हे मन म्हणजे संकल्प आणि विकल्प आहे. एक विचार येतो, तो जातो, दुसरा येतो. अशा प्रकारे विचारांचा प्रवाह म्हणजे मन आहे. मन जर असे प्रवाही असेल, तर ते नामाचे ठिकाणी लागू शकत नाही. मन हे नामात एकाग्र व्हावयास हवे. मनाची एकाग्रता होण्यास नामच उपयोगी आहे. म्हणजे योग्य त्या पद्धतीने नाम घेतले, तर मनाचा निग्रह होतो आणि ते मन नामस्मरणात एकाग्र होते.

मानवी जीवनात काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर असे हे सहा विकार आहेत. ते कमी प्रमाणात असतील तर ते फारसे त्रासदायक ठरत नाहीत. पण ते जर अति झाले आणि माणूस जर त्यांच्या आहारी गेला तर माणसाचे जीवन फुकट जाते. म्हणूनच या सहा विकारांना माणसाचे

रिपू म्हणजे शत्रू असे म्हटले जाते. हे सहा विकार जर बळावत असतील तर नामाकडे लक्ष लागणार नाही हे उघड आहे. या सहा रिपूंचे दमन झाले तर नामाकडे लक्ष लागू शकेल. योग्य पद्धतीने घेतलेल्या नामानेच या सहा रिपूंचा निग्रह होतो. हे सहा रिपू तसे नष्ट होऊन जात नाहीत, तर त्यांचे दमन होऊ शकते किंवा त्यांची चाकोरी बदलू शकते. त्रास देणारी त्यांची नांगी तोडता येते. या सहा शत्रूंचा वेग जर नियंत्रणात ठेवला, जर आपण त्यांचे कचाट्यात सापडलो नाही, तर ते असून नसल्यासारखे होतात आणि तसे होण्यास योग्य ते नामस्मरण उपयोगी पडते.

नामाच्या साधनाचे 'अद्वया'ची प्राप्ती होते. अद्वय म्हणजे दोन नसणे, म्हणजेच अद्वैत. ब्रह्म/परमेश्वर हा एकच अद्वय आहे आणि या अद्वयाची प्रचीति नामामुळे येते. कारण नाम हेच रूप आहे. नाम तेच ब्रह्म आहे. ब्रह्म हे आनंदस्वरूप आहे. अद्वयाची प्रचीति म्हणजे ब्रह्माचा साक्षात्कार. तो झाला की साक्षात्कारी पुरुष ब्रह्मरूप होतो. कारण ''ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति'' असे उपनिषदांनी सांगून ठेवले आहे. ब्रह्मरूप होणे म्हणजे आनंदस्वरूपी होणे आहे. अशा प्रकारे योग्य त्या नामाने माणसाला सर्व सुखाची / आनंदाची प्राप्ति होते. आणि ब्रह्म हे नित्य असल्याने, ब्रह्मरूप झालेल्या माणसाला नित्य सुख / आनंद प्राप्त होतो.

असा नित्य ब्रह्मानंद माणसाला विद्यमान जीवनात मिळू शकतो. अशा माणसाला जीवन्मुक्त म्हणतात आणि हा जीवन्मुक्त इतर माणसांपासून वेगळा ठरतो. तो जरी संसारात असला तरी त्याची आसक्ति नसल्याने तो संसारातून अलिप्त होतो. ज्याप्रमाणे कमळाचे पान पाण्यात राहून पाण्याचा लेप स्वतःला लागू देत नाही, त्याप्रमाणे जीवन्मुक्त हा जगात असूनही तो जगापासून अलिप्त असतो. वाळलेला नारळाचा गोटा हा नारळाच्या करवंटीत असून तो करवंटीपेक्षा वेगळा असतो, त्याप्रमाणे जीवन्मुक्त हा संसारात असून त्यापासून अलिप्त असतो, वेगळा असतो.

अशा जीवन्मुक्ताला कळिकाळाचे भय उरत नाही. कळिकाळ हा माणसाला पापाची प्रेरणा देणारा, चुकीच्या मार्गाने नेणारा असा असतो.

जीवन्मुक्त हा पापपुण्याहून वेगळा झाला आहे, त्याच्या मनाची पापाकडे, वाईट गोष्टीकडे प्रवृत्तीच होत नाही. साहजिकच त्याच्यावर कळिकाळाचा प्रभाव पडू शकत नाही. त्याने कळिकाळावर मात केली असल्याने तो साहजिकच कळिकाळाला वंदनीय ठरतो.

हे सर्व काही योग्य त्या नामाने होते. आता प्रश्न असा :- हे योग्य नाम कोणते आणि ते आहे कुठे? या प्रश्नांची उत्तरे अशी :- योग्य नाम परमेश्वरानेच प्रत्येक माणसाला देऊन ठेवले आहे. पण माणसाला ते माहीत नसते. ते ब्रह्मसाक्षात्कारी सद्गुरूकडून जाणून घ्यावे लागते. सद्गुरु सांगतात की हे योग्य नाम प्रत्येक माणसाच्या देहातील श्वासोच्छ्वासात आहे. श्वासोच्छ्वास हा वरखाली होत असतो, म्हणजेच तो गतिमान आहे. म्हणून श्वासोच्छ्वासातील नाम हे ''गतिरूप'' आहे. ''रामनाम गती देहात प्रचीति'' असे मामामहाराज केळकर यांनी आपल्या रामपाठात सांगितले आहे. समर्थ रामदास स्वामी सांगतात, ''नाम श्वासोच्छ्वासी असे । परब्रह्म तेथे वसे ।।''. आणि श्वासोच्छ्वास हा ईश्वराकडे नेणारा मार्ग आहे, असे गुरुलिंगगीतेत निंबरगीकरमहाराजांनी सांगून ठेवले आहे. प्रत्येक श्वासोच्छ्वासाबरोबर 'सोहं' या शब्दाशी सदृश ध्वनि ऐकू येत असतो. हे सोहं नामस्मरण होणे आवश्यक आहे. हे सोहंनाम चोवीस तासात एकवीस हजार सहाशे वेळा स्फुरत असते. त्याच्याकडे लक्ष देणे हेच नामस्मरण आहे. त्यालाच ''अजपाजप'' असे म्हणतात. श्वास आणि उच्छ्वास यांच्या दरम्यानच्या काळात म्हणजे त्यांच्या संधिकाळात नामाचा नाद उमटत असतो. त्याच्याकडे लक्ष देणे म्हणजेच नामस्मरण. हेच योग्य नामस्मरण होय.

असे नामस्मरण साधले की या अभंगात सांगितलेले सर्व काही साध्य होते, मानवी जीवन सार्थ होते आणि माणसाला सततचा सुखाचा ठेवा मिळतो.

***

## चिमड संप्रदायाची आरती

आरती सांप्रदाया । प्रेमभावे वंदूनिया ।
ओवाळीन संतराया । विनवोनी सदया ।।ध्रु।।
अगाध काडसिद्धा । शिवस्वरूप प्रसिद्धा ।
माया ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा ।।१।।
जय जया नारायणा । जीविचिया जीवना ।
साकार ब्रह्मतनु । गुरुलिंगा निधाना ।।२।।
लक्ष्मी अक्का भली । आदि शक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ।।३।।
रघुनाथप्रिय साधू । गुरुआज्ञे करी बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्य सिंधू ।।४।।
धन्य धन्य रामचंद्र । महाविष्णू अवतार ।
साधन सांप्रदाय । गुरुभक्ति बडिवार ।।५।।
नारायण गुरुपीठ । हनुमंत वरिष्ठ ।
*गोविंदसुत रामी* । नामावली चोखट ।।६।।

\- श्रीदासराममहाराज

## चिमड संप्रदाय परंपरा

गुरुलिंगे घातला पाया । उभारिले देवालया ।।१।।
रघुनाथप्रिय किंकर । सेवा केली अपरंपार ।।२।।
रामचंद्र श्रेष्ठ महंत । स्थापियेला चिमड मठ ।।३।।
हनूमंते कीर्तनद्वारा । केले संप्रदायाच्या विस्तारा ।।४।।
कळस झाले दासराम । *केशवाचे* त्या प्रणाम ।।५।।

\- प्रा. डॉ. के. वा. आपटे

## श्रीदासराममहाराजांच्या गुरुपरंपरेला वंदन

भगवान सोमेश । जगाचे या ईश ।
तदनु रेवणसिद्धेश । तयांना नमस्कार ।।१।।
महाराज रेवणसिद्ध । शिष्य त्यांचे मरुळसिद्ध ।
तयांचे शिष्य काडसिद्ध । वंदन तयांना करीतसे ।।२।।
श्रीनारायण नाम । ते श्रीगुरुलिंगजंगम ।
रघुनाथप्रिय साधु परम । तयांना नमन ।।३।।
रामाचे अवतारु । चिमडाचे रामचंद्रु ।
मग हनुमंत गुरु । तयांलागी प्रणाम ।।४।।
हनुमंतशिष्य प्रसिद्ध । दासराम ते संतसिद्ध ।
गुरुशिष्य परंपरा वंद्य । पूजनीय ती *केशवा* ।।५।।

\- प्रा. डॉ. के. वा. आपटे

## श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु।।
सद्गुरु काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।
गुरुलिंगजंगम नामे । जगप्रसिद्ध जहाला ।
*दासराम* शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

\- श्रीदासराममहाराज

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनी रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

- प्रा. डॉ. के. वा. आपटे

## प्रा.डॉ. के. वा. आपटे
## यांचा निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके एकोणीसशे अडतिसात ।
दुर्मुख नाम संवत्सर उत्तरायण ।।१।।
पौष शुद्ध एकादशी आणि रविवार ।
दिवसा प्रथम प्रहर तिसरे तासी ।।२।।
नामस्मरणी निर्वाण केशवांचे झाले ।
हाती जपमाळ फिरतसे ।।३।।
दासरामांविना अन्य नाही ध्यास ।
दुजा देव नाही मनी त्यांच्या ।।४।।
दासरामी दादा मिळोनिया गेले ।
स्मृतिरूपे उरले नारायणी ।।५।।

- प्रा. नारायण केशव आपटे

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | **ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्‌बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्‌गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुर्लिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुर्लिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुर्लिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्‌दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्‌गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |